
विषय निबंध
सं. नं. ६३८


टी संस्कृति

कांहीं समस्या

शं. वा. जोशी



विमक्तेषु।


REFBK-007746

आन्तर भारती प्रकाशन

वाक्संप्रदाय, म्हणी, रूढि, सण अशा सामान्य वाटणाऱ्या गोष्टींत केवढा सांस्कृतिक इतिहास सामावलेला असतो याची जाणीव हें पुस्तक वाचतांना पदोपदीं होते. वस्तुस्थितीची कल्पना यावी यासाठीं भाषा व चालीरीती यांच्या आधारें केलेल्या तर्कांना मानसशास्त्रांतील अढळ सिद्धांतांचा व शिलालेखादि लिखित पुराव्यांचा आधार लेखकानें दिला आहे.

केवळ शिलालेख ताम्रपटादि साधनांवरूनच आपल्या संस्कृतीचें संपूर्ण दर्शन घडणें शक्य नाहीं, हें निश्चित आहे. जेथें लिखित आधार हात टेकतात, तेथें वरील प्रकारच्या साधनांचा उपयोग आवश्यक ठरतो. ही लेखकाची भूमिका आहे. हा प्रयत्न एक प्रकारें अभिनव असून मराठी संस्कृतीच्या अभ्यासास कानडी-चाहिं पुरेपूर उपयोग करून घेतलेला आहे हें या ग्रंथाचें एक मुख्य वैशिष्ट्य आहे. ★

A NEW APPROACH TO THE DRAVIDIAN PROBLEM

मऱ्हाटी संस्कृति

कांहीं समस्या



लेखक

शं. बा. जोशी

अविभक्तं विभक्तेषु ।

REFBK-0007746

आन्तर भारती प्रकाशन

किंमत पांच रुपये

आन्तर भारती प्रकाशन

: १ :

प्र का श क

स. ज. भा ग व त

: १२, टिळक रोड, पुणें २.

☆

प्रथम आवृत्ति : ११००

२४ डिसेंबर १९५२

सर्व हक्क स्वाधीन

☆

मुद्रक

श्री रं ग व रे र क र

साधना प्रेस, मुंबई ११

२२१८
२०।२।५३

डॉ. शंकरराव जोगळेकर एफ्. आर्. सी. एस्. (इंग्लंड)
व सौ. माणिकबाई जोगळेकर

आणि

प्रा. धनंजयराव गाडगीळ एम्. ए., एम्. लिट्. (कँटब्र)
व सौ. प्रमिलाबाई गाडगीळ

यांस—

लेखक परिचय

आन्तर भारती प्रकाशनाच्या पहिल्या पुस्तकाचे लेखक श्री शंकर बाळदीक्षित जोशी हे कर्नाटकांतील एक नाणावलेले संशोधक आहेत. त्यांचा जन्म १८९६ सालीं गुर्लहोसूर येथें झाला. विद्वत्ता ही विद्यालयीन शिक्षणावर अवलंबून नसते हें श्री जोशी यांच्या चरित्रावरून सहज समजण्यासारखें आहे; कारण त्यांचें शिक्षण कन्नड थर्ड इयर ट्रेन्ड पर्यंतच झालें असून त्यांनीं इंग्रजीचें अध्ययन आपलें आपणच केलें आहे. पण त्यांचा अधिकार आज एवढा मोठा आहे कीं त्यांचीं कित्येक पुस्तकें मुंबई, कर्नाटक, मद्रास आदि विद्यापीठांनीं आपल्या उच्च परीक्षांसाठीं पाठ्यपुस्तकें म्हणून निवडलीं आहेत. श्री जोशी चिकोडी येथील प्राथमिक शाळेंत शिक्षक असतांना १९२१ सालीं असहकारितेची चळवळ झाली व त्यावेळीं त्यांनीं आपली नोकरी सोडली. पुढें ते धारवाडच्या राष्ट्रीय शाळेंत अध्यापन करूं लागले. 'कर्मवीर' 'जय कर्नाटक' आदि प्रसिद्ध कन्नड नियतकालिकांच्या संपादकीय विभागांत कांहीं दिवस काम केल्यावर त्यांनीं धारवाडच्या विद्यारण्य हायस्कूलांत (पूर्वीचें व्हिक्टोरिया हायस्कूल) पंधरा वर्षें कन्नड भाषेचे शिक्षक म्हणून काम केलें. कन्नड भाषा, देश व समाज याविषयीं दीर्घकाल परिश्रमानें संशोधन करून १९३३ ते १९४९ या अवधींत चौदा पंधरा संशोधनात्मक प्रबंध त्यांनीं प्रसिद्ध केले आहेत.

लेखकाचे कांहीं प्रमुख प्रबंध

कण्मरेयाद कन्नड—(दृष्टीआड झालेला कर्नाटक) १९३३

महाराष्ट्रद मूल—(महाराष्ट्राचें मूळ) १९३४

हट्टिकाररु अथवा कर्णाटद वीरक्षत्रियरु-(कर्नाटकाचे वीरक्षत्रिय) १९३७

कन्नडद नेले—(कर्नाटकाचा पाया) १९३९

कन्नाड कते—(कन्नड देशाची कथा) १९४७

यक्षप्रश्ने—(यक्ष-प्रश्न) १९४८

समाजदर्शन—१९४९



श्री शंकर बाळदीक्षित जोशी

निवेदन

धारवाड येथील प्रख्यात कन्नड संशोधक श्री. शं. बा. जोशी यांचें हें पुस्तक आन्तर भारतीचें पहिलें प्रकाशन म्हणून महाराष्ट्रीय वाचकांच्या हातीं देतांना मला फार आनंद होत आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचे भाषिक व सांस्कृतिक संबंध इतके संमिश्र आहेत कीं या दोनहि भाषांतील विद्वानांनीं आणि संशोधकांनीं परस्परभाषांचा अभ्यास केल्याशिवाय कोणताच प्रश्न निर्णायकरीत्या सुटेल असें मला वाटत नाहीं. एका अर्थानें कर्नाटक व महाराष्ट्र यांतील संबंध उलगडावयाचा म्हणजे आर्य–द्राविड संबंधाचाच उलगडा करण्यासारखें आहे. द्राविड संस्कृतीचें मूलस्वरूप काय, तिचा आर्यांच्यावर कोणता परिणाम झाला व आर्य-द्राविडांमध्यें झालेली देवघेव कोणत्या स्वरूपाची होती हा साराच विषय अद्यापि अनिर्णीत स्थितींत आहे. संशोधकांमध्यें विविध तर्क चालू आहेत. 'मोहेंजोदारो'च्या संस्कृतीचें स्वरूप अद्यापि निश्चित झालें नाहीं. त्यामुळें या क्षेत्रांतील कोणाच्याहि लेखनाला संपूर्ण मान्यता मिळणें स्वभावतःच कठिण आहे. श्री. शं. बा. जोशी यांनीं आर्य–द्रविड समस्येचा उलगडा करण्यासाठीं कित्येक वर्षें चिंतन चालविलें आहे. त्यांच्या-जवळ अशा संशोधनाला लागणारी प्रतिभाशक्ति फार मोठ्या प्रमाणांत आहे. बारीक बारीक पुराव्यांचे दुवे गोळा करण्यासाठीं त्यांनीं वर्षानुवर्षें कष्ट घेतले आहेत. प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या दीडदोन तपांचें फलित सामावलेलें असल्यामुळें सामाजिक संशोधनाची आवड असलेल्या अभ्यासु वाचकांना हा ग्रंथ अतिशय मनोरंजक आणि विचारप्रेरक भासल्याशिवाय राहाणार नाहीं.

पू. साने गुरुजी यांच्या आन्तर भारतीच्या कार्याला प्रारंभ करतांना अशा तऱ्हेचा मौलिक ग्रंथ प्रकाशित करण्याची संधि मिळाल्यामुळें मला फार समाधान वाटत आहे. भारतांतील भिन्नभिन्न भाषा–विभागांत जें पांडित्य वा लालित्य निर्माण झालेलें आहे त्याचा परस्परांना परिचय करून देणें हें आन्तर भारतीचें मुख्य प्रयोजन आहे. परस्पर परिचयाचा हा प्रारंभ आपल्या निकटवर्ती भाषा–बंधूंपासून व्हावा।यांत विशेष औचित्य आहे. आन्तर भारती संस्थेला कोणत्याहि विशिष्ट मताचा प्रचार करण्याची इच्छा नाहीं. खुद्द

कर्नाटकांतहि श्री. शं. बा. जोशी यांच्या संशोधनांतील कित्येक बाबतींत मतभेद बाळगणारी विद्वान मंडळी आहेत. महाराष्ट्रांतहि या विषयाचे अभ्यासक बरेच आहेत. त्या सर्वांना श्री. शं. बा. जोशी यांचीं सारींच विधानें मान्य होतील असें मानता येणार नाहीं. तथापि असल्या विषयांत मतभिन्नता असली म्हणून भिन्नभिन्न अभ्यासकांचें महत्त्व कमी होत नाहीं. उलट, आदरानें व सहृदयतेनें भिन्न मतांचाहि अभ्यास करण्याची प्रवृत्ति वाढली पाहिजे. सत्याची प्राप्ति व्हावयाची असेल तर सहिष्णुतेची जोपासना झाली पाहिजे. निर्भयतेनें सत्य-संशोधन चालू राहावें असें वाटत असेल तर अप्रिय अथवा पूर्वग्रहांना धक्का देणाऱ्या विचारांचेंहि कौतुकानें स्वागत करण्याची शक्ति समाजांत वाढविली पाहिजे. आन्तरभारतीच्या कल्पनेमध्यें ही सहिष्णुता प्रधान मानलेली आहे. त्या वृत्तीनेंच ह्या ग्रंथाचें मी मनःपूर्वक स्वागत करीत आहें. महाराष्ट्रीय वाचकहि या स्वागतांत मोकळ्या मनानें सहभागी होतील यांत मला शंका नाहीं.

स. ज. भागवत
संचालक, आन्तर भारती

अनुक्रम

	योगायोग	आठ
	पीठिका	११
१	महाराष्ट्राचें मूळ नांव : मऱ्हाट कीं महाराष्ट्र ?	१७
२	स्थलनामें आणि समाजेतिहास	३२
३	हे 'मरहट्टे' कोण ?	५२
४	जुळीं भावंडें : मरहट्टे आणि कानडे	६८
५	भाषिक पुरावा	८४
६	देवदेवता	१११
७	धर्मपंथ	१५०
८	उपसंहार	१९५
	सूचि	२१७—२२४

★

योगायोग

सुमारें अठरा वर्षें झालीं; पुण्याच्या केसरींत एका चर्चेंचा गोषवारा दिला होता. भा. इ. संशोधक मंडळांत झालेली ती एक खासगी चर्चा होती. माझे मित्र श्री ग. ह. खरे यांनीं तो योग जमवून आणला होता. त्या चर्चेंत श्री द. वि. आपटे यांजसारख्या कानडी जाणणाऱ्या विद्वानांनीं, 'या दिशेनें मराठीचे बरेच प्रश्न सुटणें शक्य आहे,' असें आपलें मत व्यक्त केलें; कांहींना माझ्या विचारांत कांहींच तथ्य वाटलें नाहीं.

महाराष्ट्रांतील विचारवंतांच्या प्रतिक्रिया जाणण्याकरितां केसरींतील हा लेख कांहींना पाठविला. प्रो. वा. म. जोशी यांनीं आपण या विषयाचे तज्ज्ञ नसल्याचें कळविलें; पण "आपलें कात्रण येण्यापूर्वीच केसरींतील हा भाग निराळा काढून जपून ठेवला आहे. आपल्यांत स्वतंत्रपणें विचार करणारे फारच थोडे आहेत, या दृष्टीनें आपला लेख मला उद्‌बोधक वाटला," असेंहि त्यांनीं पुढें लिहिलें होतें. श्री. वाग्भट नारायण देशपांडे, प्रो. कुलकर्णी, प्रो. बनहट्टी, श्री. ना. गो. चापेकर यांनीं आपले बरेच अनुकूल अभिप्राय कळविले; महामहोपाध्याय श्री. काणे व श्री. या. मा. काळे यांनीं आपलें प्रतिकूल मत असल्याचें लिहिलें. त्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्र शब्द कोशाच्या प्रस्तावनेंत (भाग ३) केसरींतील या लेखाचा उल्लेख केला आहे.

पुढें आचार्य स. ज. भागवतांच्या परिचयाचा योग लाभला. तो न लाभता तर, माझे विचार इतक्या विस्तारानें महाराष्ट्रापुढें मांडणें मला शक्य झालेंच नसतें. त्यांच्या प्रेमाच्या आग्रहामुळें पुण्याच्या नवभारत मासिकांतून याविषयीं लिहिण्याचें घाडस मीं केलें. जिज्ञासेनें कांहीं वाचन करीत असतां, मनांत कांहीं शंका वारंवार डोकावूं लागल्या. स्वतःच्या समाधानाकरितां शंकानिरसनासाठीं केलेला हा थोडाफार प्रयत्न आहे. या प्रकारच्या अभ्यासाला आवश्यक अशी पढीक विद्वत्ता मजजवळ नाहीं. शास्त्रीय पद्धतीची माहिती नाहीं. स्वतःपुरत्या जरूरीच्या ग्रंथसंग्रहाची तर राहोच पण सार्वजनिक ग्रंथालयाची अनुकूलतासुद्धां मोठ्या मुष्किलीची. अशा अननुकूल परिस्थितींतील अदीक्षिताच्या प्रयत्नांत पदोपदीं उणीवा न दिसल्या तरच आश्चर्य !

श्री धनंजयराव गोडगीळ यांची आपल्या सांस्कृतिक इतिहासाविषयींची आस्था, त्यांची मूलगामी तलबुद्धि व सूक्ष्म विचारपद्धति महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाची आहे. फेरतपासणीकरितां, माझे विचार मी बऱ्याच वेळां त्यांच्यापुढें मांडीत असे. त्यांच्या टीकेचा व सूचनांचा फायदा पुष्कळच झाला आहे.

यापूर्वी त्यांनींहि माझे विचार एकवार टांचणरूपानें तरी लिहून काढण्यास सांगितलें होतें. तशीं दोन तीन टांचणें लिहून मीं त्यांजकडे दिलीं. त्यांतील 'अडका' हें एक टांचण साहित्यपत्रिकेंत बऱ्याच दिवसांनंतर प्रसिद्ध झालें. पण त्यावर एकांनीं कडाडून टीका केली. 'अडका' (सुपारी) एकेकाळीं कवडीप्रमाणें 'किंचित् व्यावहारिक द्रव्य' म्हणून वापरलें जात होतें, हें माझें म्हणणें साफ खोटें आहे असें त्यांनीं प्रतिपादिलें. त्यावेळीं महानुभाव साहित्य पुरेसें उपलब्ध नव्हतें. अलीकडे प्रा. तुळपुळे यांनीं महानुभावकालीन सामाजिक स्थितीविषयीं कांहीं लेख परिश्रम-पूर्वक लिहून 'नवभारतांत' प्रसिद्ध केले आहेत. त्यांत सुपारी ही त्यावेळीं नाण्याप्रमाणें उपयोगांत होती, असें साधार नमूद केलें आहे. अशा रीतीनें मराठी व कानडी भाषेंतील कांहीं आधारांवरून केलेल्या माझ्या तर्काला दुसरा पुरावा मिळून तो खरा ठरला.

पण तेव्हां माझीं टांचणें प्रसिद्ध होण्याचें तसेंच राहून गेलें. आचार्य भागवतांच्या प्रेरणेशिवाय माझे सर्व विचार मनांतल्या मनांतच विरून गेले असते.

हीं माझीं टिपणें पुस्तकरूपानें छापलीं जातील अशी कल्पनाहि नव्हती; यामुळें कांहीं ठिकाणीं द्विरुक्ति-दोष राहून गेला आहे. यांतील कांहीं लेख नवभारतांत यापूर्वी आले आहेत; मुंबईच्या धनुर्धारीच्या दिवाळी अंकांत एक प्रसिद्ध झाला आहे. त्या टिपणांत कांहीं थोडी नवीन भर घालून त्यांचें संकलन आज पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहे.

मोत्यांकरितां सागराच्या तळाशीं बुडी घेणाऱ्या पाणबुड्याची आठवण मला वारंवार होत असते. सागराच्या पोटांत शिरून हातीं लागतील त्या शिंपा वैगेरे घेऊन तो वर येतो; आपल्या दृष्टीनें त्यांची चाळणी करून बरे वाटलेले मोती लोकांपुढें मांडतो. ते सर्व तितकेच पाणीदार व बहुमोल असणें

असंभवनीय आहे. तरी पण रत्नपारख्यांनीं त्यांत एखादा तरी दाणा मोलाचा आहे असें ठरविलें तर त्यांत त्याच्या सर्व श्रमांचें चीज होणार असतें. त्यांत कांहींच हातीं न लागण्याची भीतिहि पण थोडी थोडकी नाहीं. हा सर्व योगायोग आहे. प्रयत्न करणें आपलें कर्तव्य. योग्यता ठरविणें सत्यान्वेषी परीक्षकांचें कार्य.

एका अखिल भारतीय समस्येची चर्चा करणाऱ्या या पुस्तकाला पू. साने गुरुजींच्या 'आन्तर भारती प्रकाशनांत' स्थान मिळाल्याबद्दल समाधान वाटतें. पूर्वसूरींच्या परिश्रमांचें साहाय्य मिळालें नसतें तर मी कांहींच लिहूं शकलों नसतों. हस्तलिखित तयार करण्याचे कामीं तरुण मित्र श्री माधवराव पंचनदीकर B.A., श्री वसंतराव निगवेकर B.Sc. व श्री मा. द. खाडिलकर यांनीं मदत केली. श्री श्रीपादराव जोशी यांनीं भाषाशुद्धीच्या दृष्टीनें कांहीं सूचना केल्या. डॉ. रा. ना. दांडेकर यांनीं वेळांत वेळ काढून हस्तलिखित एकवार वाचून काढलें व कांहीं बहुमोल सूचना केल्या. श्री वसंत बापट यांनीं मनावर घेतलें नसतें तर शैलींतील बोजडपणा कमी झाला नसता. प्रा. वि. म. बेडेकर यांनीं 'नवभारतांत' लिहिण्यास उत्तेजन दिलें. साधना प्रेसनें छपाईच्या कामीं घेतलेले श्रम मीच जाणूं शकतों. योजनेमध्यें अहं-कर्तृत्वाचा अनुभव येतो; योगायोगांत 'मी' चें निमित्तमात्रत्व कळून येतें.

साधनकेरे,
धारवाड

शंकर बाळदीक्षित जोशी

पीठिका

मन्हाटी संस्कृतीचा सांगोपांग व आमूलाग्र अभ्यास आजहि पुरा झालेला नाहीं. पुष्कळ विद्वानांनीं परिश्रमपूर्वक संशोधन केलें असलें तरी बरेचसे प्रश्न अजूनहि अनिर्णीत आहेत. या प्रबंधांत त्यांपैकीं कांहीं प्रश्नांची चर्चा केलेली आहे; तीहि निर्णयात्मक बुद्धीनें नव्हे. अनिर्णीत समस्यांविषयीं अधिक संशोधन व्हावें या हेतूनें कांहीं विचार ग्रथित केले आहेत एवढेंच.

प्रबंधाच्या नांवांत 'मराठी' या संज्ञेऐवजीं 'मन्हाटी' अशी संज्ञा साक्षेपानें वापरली आहे. याचें कारण असें आहे कीं यांतील समस्यांची चर्चा बहुशः 'मन्हाटी'चें 'मराठी' असें रूप होण्यापूर्वीच्या काळाच्या म्हणजेच, हळेबीडु देवगिरी यादवांच्या काळाच्या संदर्भानें केलेली आहे. मुसलमानी संघर्षापासून आजतागायतच्या प्रश्नांचा अंतर्भाव 'मराठी'मध्यें होतो. अर्थात् हें केवळ विवेचनाच्या सोयीसाठीं.

समस्या

मन्हाटी संस्कृतीच्या अभ्यासांत अनेक प्रश्नांचा उलगडा आज झालेला नाहीं. या देशाचें नांव, येथील शेकडों ग्रामनामें, येथील भिन्न भिन्न जन व त्यांचे वांशिक संबंध, त्यांच्या भाषेची जडण घडण, त्यांचीं दैवतें व चालीरीती असे नानाविध प्रश्न आहेत. पण वास्तविक हीं सर्व एकाच समस्येचीं उपांगें आहेत. ही समस्या मन्हाटी संस्कृतीपुरतीच मर्यादित नसून तिची व्याप्ति भारतीय संस्कृतीच्या अतिप्राचीन थरापर्यंत पोंचणारी आहे. ही समस्या 'द्राविड प्रभाव' म्हणून विद्वानांत ओळखली जाते. भारतीय संस्कृति–संगम म्हणजे आर्य व द्रविड यांच्यांतील देवाणघेवाण हें सर्वमान्य आहे. पण हे द्रविड म्हणजे कोण व वेदकालीं यांना काय नांव होतें, यांचा व आर्यांचा संबंध कशा प्रकारचा होता यासंबंधीं निश्चित विवेचन क्वचितच केलेलें आढळतें. या प्रबंधांत या दृष्टीनें स्थूल विचार केलेला असून कांहीं संभाव्य उत्तरें सूचित केलेलीं आहेत.

दिशाभूल.

आर्यावर्तीतील प्रत्येक भाषेंत या ना त्या प्रमाणांत द्राविड अंश आहेच असें सर्व संशोधकांना आढळलें आहे. प्रांताप्रांतांतील ग्रामनामांवरहि द्राविडांचा प्रभाव आहे असें निदर्शनास आलें आहे. आज, कानडी, तेलगु, तमिळ आदि जनांना सरसकट द्रविड ही संज्ञा दिली जाते; आणि द्रविड संस्कृतीची व्याप्ति तमिळ देशापुरतीच मर्यादित मानली जाते. साहजिकच आर्यावर्ताच्या उत्तर सीमेकडील ग्रामनामांवर एकाद्या द्रविडवर्गीय भाषेचा प्रभाव आहे असें दर्शविल्यास अनेक विद्वानांना तें मान्य होत नाहीं. एक तर द्रविडदेशाची मयादा दक्षिणेपुरती असा त्यांचा ग्रह असतो आणि दुसरें म्हणजे द्रविड हे असंस्कृत अतएव आर्यापेक्षां हीन अशीहि त्यांची भावना असते. हे पूर्वग्रह संशोधनाला बाधक ठरले आहेत. मोहेंजोदारो व हरप्पाच्या उत्खननानंतर बरोबर विरुद्धहि प्रतिक्रिया झाली आणि संस्कृतींतील सारें सुवर्ण द्रविडांपासून घेतलेलें आहे असाहि अत्याग्रह कोणी धरला. या उभयविध भ्रमांचा निरास होईल त्यावेळीं एतत्संबंधीं प्रश्नांवर अधिक प्रकाश पडेल.

वेदकाळापूर्वी द्रविडांची श्रेष्ठ दर्जाची नागर संस्कृति अस्तित्वांत असेल तर तत्कालीन साहित्यहि कां उपलब्ध होऊं नये अशी शंका पुष्कळांना येते. तत्कालीन लिखित साहित्य आज उपलब्ध नाहीं हें खरें. क्षणभर असें समजूं या कीं त्यावेळीं साहित्याची निर्मिति झाली नाहीं. पण एवढ्यानें त्यांच्या नागरिक गुणांना किंवा संस्कृतीला बाध येतो असें मानण्याचें कारण नाहीं. या उलट आर्यांचें प्राचीन साहित्य भरपूर उपलब्ध असलें तरी नगरसंस्कृतीशीं त्यांची तोंडओळखहि नव्हती असें संशोधकांचें मत आहे. पुर किंवा पूर हें आर्येतरांचें वसतिस्थान. आर्यांच्या विजिगीषु नेत्याला–इंद्राला पुरंदर, पुरघ्न, अशीं नांवें आहेत. यावरून पूरुजन (यदु–तुर्वसूंचे बांधव) आर्यविरोधी वर्गातील म्हणजे तथाकथित द्राविड वर्गातील असावेत असा तर्क करण्यास जागा आहे.

यदु–तुर्वसूंचे धागेदोरे

यदु-तुर्वसु हे आर्येतर असावेत किंवा दुसऱ्या शब्दांत पत्तिजन असावेत या तर्कामागें पुढील कारणपरंपरा आहे.

(१) प्राचीनकाळीं साहित्यांत सार्थ किंवा प्रतीकात्मक नांवें पुष्कळांनीं योजिलेलीं आहेत. विशेषतः वेद-व्यासांनीं. वेदांतहि अजः (मेंढपाळ), शिग्रुः (अश्वपाल) वगैरे उदाहरणें आहेत. याच पद्धतीनें यदु-तुर्वसु, पूरु हीं नांवें अर्थयुक्त असणें शक्य आहे. या नांवांच्या ध्वन्यर्थाचा उपयोग या जनांचें पूर्वोत्तर चरित्र जाणण्यास कां करूं नये ?

(२) यदु-तुर्वसूंचीं नांवें ऋग्वेदांत पुनःपुन्हां येतात. त्यांच्या वंशावळीवरून पाहातां या देशांत त्यांची वसणूक वेदपूर्वकाळापासून होती असें दिसतें. यामुळें त्यांच्या पूर्वजांचा व आर्यांचा संबंध ऋग्वेदकाळापूर्वी म्हणजे मोहेंजोदारोंच्या काळांत आला असावा असा तर्क करतां येतो. यदु-तुर्वसु व आर्य यांच्या संघर्षाची तीव्रता कालांतरानें कमी होत गेली. ऋग्वेदकाळीं त्यांतील एक गट आर्यपक्षीय झालेला आढळतो. हें संस्कृति–संगमाच्या तत्त्वास धरूनच झालें. ऋग्वेदांत कांहीं यदु-तुर्वश आणि पूरु इंद्राचे मित्र आहेत तर कांहीं त्याच्या शत्रूच्या–शंबराच्या पक्षाचे आहेत.

(३) ऋग्वेदांत 'मृध्रवाचा' हें विशेषण आर्यशत्रूंना लावण्यांत येतें. एके ठिकाणीं पूरूंनाहि तें बहाल केलेलें आहे. (VII.18.13). शतपथ ब्राह्मणांत (VII 8.1.14) पूरूंना असुर, राक्षस असेंहि म्हटलें आहे. ऋग्वेदांतील पूरुविषयक एका उल्लेखाच्या विवरणासाठीं हे शब्द योजले आहेत हें विशेष.

(४) ऋषि आणि मुनि हे शब्द आपण समानार्थी मानतों. पण संशोधनाची सूक्ष्म दृष्टि ठेवल्यास या दोन शब्दांच्या अर्थांत भेद आहे असें दिसेल. वेदांत प्रमुख आहेत तीं ऋषींचीं नांवें; मुनींचीं नव्हत. या शब्दांचा अर्थ समान मानल्यानें दोन भिन्न परंपरांचा पूर्वकालीन भेद पुढें मिटून गेला असें म्हणतां येईल. मुळांत ऋषि व मुनि हे दोन भिन्न वर्ग असावेत. ऋषि सामान्यतः विवाहित गृहस्थाश्रमी असत. यज्ञसंस्थेचे अध्वर्यु गृहसंस्थेस उचलून धरणारे असावेत हें स्वाभाविक आहे. पण मुनि विरागी, संन्यासमार्गी दिसतात. ऋग्वेदांत मुनींचा दोनदांच उल्लेख आहे. ते जटाधारी असत. श्रमणाचा उल्लेख वेदांत नसला तरी बृहदारण्यांत आहे. पुढील काळीं श्रमण (संन्यासी) प्रामुख्यानें अवैदिकांतच दिसतात. जैनांत संन्यासी मुनींची

परंपरा अखंड चालू आहे. निरीश्वर सांख्यांचा कपिलमुनि (सिद्धानां कपिलो मुनिः) योगमार्गी संन्यासी दिसतो. सांख्य व योग या दोन्ही मतांत भिन्नता नाहीं असें गीता सांगते. मुळांत संन्यासमार्गी यतिपंथ हा वैदिक परंपरेंतील नव्हे असें मानणाऱ्या पक्षास गीतेनें दिलेला हा दुजोरा आहे. सिद्धानां कपिलो मुनिः या गीतेंतील वाक्यावरून दुसरीहि एक गोष्ट ध्वनित होते. सिद्ध पंथांतील अर्हतांस मुनि संज्ञा असावी. सिद्धपंथांत हठयोगी व राजयोगी यांचा समावेश होतो. जैन व बौद्धांत अनेक विख्यात सिद्ध झाले आहेत. महाराष्ट्रांत ८४ सिद्ध व ६४ योगिनी यांचा पंथ जिवंत होता असें तत्त्वसार वगैरे ग्रंथांवरून दिसतें. या वर्गाची वागणूक लोकविलक्षण असे, विक्षिप्त असे हें पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे. ऐतश मुनीचे प्रलाप ऐतरेय ब्राह्मणांत वर्णिलेले आहेत. वज्रयान बौद्ध पंथांतून उगम पावलेल्या सिद्धपरंपरेचें लोण महाराष्ट्र–कर्णाटकापर्यंतहि येऊन पोंचलें. या पंथाचे दक्षिणेंतील पर्याय म्हणजे वीरशैव, महानुभाव व वारकरी पंथ होत. वीरशैवांप्रमाणें जैनांत पुरातन त्रेसष्ट शलाकापुरुष आहेत. कर्णाट–मऱ्हाटांतील तिरसष्टी किंवा तिरसट या रूढ वाक्प्रचारांचा संबंध या विलक्षण त्रेसष्ट मुनींशीं तर नसेल ना? वेदकालीन मुनींचीं मलिन प्रावर्णें जैनांतील 'मलधारण' रुढीची आठवण करून देतात.

मुनि आणि सिद्ध हे मुळांत अवैदिक परंपरेंतील असावे. पुढें ते जैन व बौद्ध पंथांत विशेषेंकरून दिसतात. पण कांहीं समन्वयवादी गुणग्राही वैदिक ऋषि संन्यासमार्गासहि, त्यांतील ग्राह्य तें स्वीकारून, आत्मसात् करूं लागलेले दिसतात. उदाहरणार्थ याज्ञवल्क्य. आदर्श जीवनाविषयीं कालिदासाचा दंडक 'वार्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम्' असा आहे. अंतकाळ समीप आल्यावर संसाराचा मोह सोडून परिव्रज्या घ्यावयाच्या एका परंपरेचाच येथें पडसाद आहे. निदान अंतकाळीं मोक्षासाठीं 'आतुरसंन्यास' घेण्याची रूढि स्मार्त परंपरेंत साठ सत्तर वर्षांपूर्वीपर्यंत सर्रास चालू होती.

आरंभीं वैदिकांना मुनिपंथ—संन्यासमार्ग तितका मान्य नव्हता. इंद्रानें यतींचा संहार केल्याचें प्रसिद्धच आहे. ययातीचा वडील बंधु 'यति' होता. शंतनूचा थोरला भाऊ देवापि यति बनला. शंतनूचा ज्येष्ठ पुत्र भीष्म,

ब्रह्मचर्याची निष्ठुर प्रतिज्ञा घेतलेला 'देवव्रत' म्हणून प्रसिद्ध झाला. अशा रीतीची ही अवैदिक परंपरा यदूंत होती, हें यदुवंशांतील यति, देवापि, देवव्रत वगैरे व्यक्तींच्या उदाहरणांवरून आर्येतरांतील भीष्मसंन्यासाची रूढि सूचित होते. अजूनहि कांहीं समाजांत घरांतील ज्येष्ठ पुत्राकडे कुलव्रतें व कुळधर्म पाळण्याची जबाबदारी देण्याची वहिवाट आहे. कर्णाटांतील धनगर (कुरुब), कुणबी वगैरे जातींतून घराण्यांतील एक व्यक्ति—ज्येष्ठ पुत्र किंवा कोणता तरी एक पुत्र–व्रतस्थ ठेवण्याची, देवाला अर्पण करण्याची रूढि आहे.

(५) महाभारतांतील यदु–तर्वसु (अंधक-वृष्णि समाज) हे प्रिलस्कींच्या मताप्रमाणें अवैदिक–द्राविडवर्गीय–आहेत. महाभारतांतील यदु–तुर्वसु आणि वेदांतील यदु–तुर्वश हे जर अभिन्न असतील तर वेदांतील ह्या समाजाला द्राविडवर्गीय म्हणावें लागतें.

(६) चंद्रवंशीय क्षत्रिय म्हणविणारा यदु-तुर्वसूंचा ऐलवंश एका वर्णाचा व ऋषिसमुदाय आणि मानववंश दुसऱ्या वर्णाचा असें पार्जिटर यांचेंहि मत आहे. हा निर्णय प्राचीन पौराणिक परंपरेचा आमूल अभ्यास करून घेतलेला असला तरी श्री पार्जिटर यांचा या ठिकाणीं थोडा गोंधळ उडालेला दिसतो. हे दोन्ही वर्ग भिन्नवंशीय आहेत हें पुराणगत पुराव्यावरून स्पष्टच आहे. यदु–तुर्वसु आर्यक्षत्रिय मानले तर ऋषींचा गट आर्येतर ठरेल. पार्जिटरना ही इष्टापत्ति वाटली आणि एका दगडांत दोन पक्षी मारण्याचें काम त्यांनीं साधलें. पण त्यांचा निर्णय भारतीय परंपरेशीं सर्वस्वीं विरोधी आहे. त्यांच्या संशोधनांतील परिश्रमाबद्दल आदर बाळगूनहि असें म्हटलें पाहिजे कीं संशोधकाला आवश्यक असलेली समत्व बुद्धि त्यांनीं ठेवलेली नाहीं. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाच्या भोवऱ्यांत ते सांपडलेले दिसतात. ब्राह्मण तेवढा लुच्चा हें त्यांचें मत. ब्राह्मण वर्ग अनार्य व यदु-तुर्वसु आर्य या त्यांच्या विधानामुळें ब्रिटिश अमदानींत जातीय द्वेष वाढण्यालाच काय ती मदत झाली असेल; पण ऐतिहासिक सत्य त्यांत तिळमात्र नाहीं. ब्राह्मण मुळांत अनार्य असतील तर त्यांच्या संस्कृत-प्रेमाला, गोत्रपरंपरेला, वैदिक निष्ठेला कांहीं अर्थच राहणार नाहीं. पार्जिटर ज्यांना आर्य क्षत्रिय म्हणतात त्या यदु-तुर्वसूंनीं मात्र संस्कृत भाषेची विशेष चिंता न करतां कांहीं वेगळ्याच परंपरा संवर्धिल्याचें दिसतें. गंगा-यमुनातीरीं यदु-तुर्वसूंच्या

संततीनें जोपासलेल्या प्राकृतांत आढळणाऱ्या ऱ्हस्व ए, ऱ्हस्व ओ आदि आर्येतर भाषावर्गीय उच्चारांवरून यदु-तुर्वसूंची मायबोली संस्कृत नव्हती असेंच सिद्ध होतें. यदुतुर्वसूंनीं संस्कृतचा स्वीकार करण्याचा प्रयत्न केला; पण तो त्यांना साधला नाहीं. त्या प्रयत्नांतून प्राकृतचे पर्याय मात्र निर्माण झाले. या व इतर अनेक आधारांवरून यदु-तुर्वसु मुळांत आर्येतर असावेत व पुढें आर्यीकरणांत ते आरिय बनले असावेत असें म्हणणेंच क्रमप्राप्त आहे.

एक हानि

आपल्या मनाला एकदां जडलेल्या संवयी पटकन् मोडवत नाहींत. पूर्वग्रह व नाना अभिमान यांच्याहि अडचणी असतातच आणि त्यामुळें आपला सांस्कृतिक इतिहास गुंतागुंतीचा होऊन आपण सत्यास मात्र मुकतों. उदाहरणार्थ : शातवाहनांचें मुख्य घराणें पैठणास आणि कर्णाटकांतील बळ्ळारी जिल्हा त्यांची मायभूमि असा निश्चित पुरावा मिळाला आहे; शातवाहनांनीं स्वतःस कधींहि आंध्र किंवा आंध्रभृत्य म्हणवून घेतलेलें नाहीं; पण पुराणिकांनीं त्यांना जोडलेली आंध्रभृत्य ही उपाधि अजूनहि आपल्या जिभेला चिकटून आहे. यदु–तुर्वसूंविषयीं असाच प्रकार झालेला आहे असें मला वाटतें.

प्राचीन संस्कृतीचें सम्यक् आकलन झाल्याशिवाय आजच्या समस्यांचीं उत्तरें सांपडणें शक्य नाहीं. ' To understand the present age, therefore, it is necessary to go back to a considerably earlier time' असें सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ व साहित्यिक बर्ट्रँड रसेल यांनीं म्हटलें आहे तें संपूर्णपणें खरें आहे. भाषा, वेष, चालीरीती, दैवतें या गोष्टी मानवाच्या अव्यक्त मनाचीं व्यक्त प्रतीकें आहेत. त्यांचा उलगडा होण्यासाठीं आपल्या संस्कृतीचा तटस्थपणें अभ्यास करणें आवश्यक आहे.

★ ★ ★

: १ :

महाराष्ट्राचें मूळ नांव : मऱ्हाट कीं महाराष्ट्र ?

अध्यात्मज्ञानापासून आत्मस्वरूपाची जाणीव होते अशी आजपर्यंतची श्रद्धा आहे. पण ऐतिहासिक ज्ञानामुळें होणारें आत्मस्वरूपज्ञान याहूनहि निश्चित आणि वास्तवरूप आहे असें मला वाटतें. अध्यात्मज्ञानापासून होणारें आत्मस्वरूपाचें दर्शन हें अव्यक्त स्वरूपाचें आहे. इतिहासापासून होणारा आत्मस्वरूपाचा साक्षात्कार साकार व सगुणरूप आहे. अध्यात्म व्यष्टिरूप आत्म्याचें दर्शन घडवितें, तर इतिहास समष्टिरूपाचा साक्षात्कार होण्यास साहाय्य करतो.

नामस्मरणापासून आत्मदर्शन होतें, असें अध्यात्मांतील अनुभूतिमार्गामध्यें (Mysticism) सांगितलें जातें. नाम जसें अध्यात्मांत महत्त्वाचें आहे, तसें इतिहासांत त्या त्या देशाचें 'नांव' हें सुद्धां तेथील जनांच्या आत्मस्वरूपज्ञानास अत्यंत महत्त्वाचें साधन आहे. याकरितांच देशाच्या नांवांतील रहस्य समजून घेणें फार जरूर आहे. जगांतील प्रत्येक राष्ट्राच्या कित्येक ऐतिहासिक कोड्यांचा उलगडा त्या त्या राष्ट्राच्या नांवापासून झालेला आपणांस दिसून येतो. त्याचप्रमाणें महाराष्ट्राच्या इतिहासांतील पुष्कळशा समस्या त्याच्या नांवाचें खरें रहस्य विशद झाल्यासच उलगडणार आहेत; पण दुर्दैवानें अजून महाराष्ट्र किंवा मऱ्हाट यांची उपपत्ति चांगली न समजल्यामुळें

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांतील वऱ्याच गुंतागुंती सोडविणें फार मुष्किलीचें झालें आहे.

'महाराष्ट्र' शब्द प्राचीन कां नसावा ?

आज तरी अशी समजूत आहे कीं, 'महाराष्ट्र' शब्दच मूळ असून 'मऱ्हाट' किंवा 'मरहट्ट' हीं पुढें रूढ झालेलीं नांवें आहेत. या सार्वत्रिक समजुतीला कांहींच आधार नाहीं असें नाहीं; आजच्या बोलींत आणि लेखनांत 'मराठा' (देश) व 'मराठी' (भाषा) असे शब्द उपयोजिले जातात; पण, प्राचीन महानुभाव साहित्यांत व ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांत तरी हा प्रयोग 'मऱ्हाट' किंवा 'मरहट्ट' असाच आढळतो. यामुळें 'मराठ'चें पूर्वरूप 'मऱ्हाट' किंवा 'मरहाट' अथवा 'मरहट्ट' असेंच ठरतें. अशाप्रकारें 'मराठ' पेक्षां 'मऱ्हाट' किंवा 'मरहट्ट' हींच रूपें प्राचीन आणि शुद्ध आहेत हें निर्विवाद आहे. पण 'महाराष्ट्र' हा शब्द यापेक्षांहि अधिक प्राचीन साहित्यांत आढळतो. 'मरहट्टे' यांचा उल्लेख अपभ्रंश-काव्यत्रयींत (खिस्तशक नववें शतक) आला आहे. कोऊहल कवि तर (काल सुमारें ८०० इ. स.) आपलें काव्य मरहट्ट देशींतच लिहिल्याचें सांगतो. पण महाराष्ट्राचा उल्लेख तत्पूर्वीच्याहि ग्रंथांत आढळतो. यामुळेंच 'महाराष्ट्र' शब्दापासून 'मरहट्ट' 'मऱ्हाट' हा शब्द निष्पन्न झाला असावा, असें आज गृहीत धरलें जातें.

'महाराष्ट्र' शब्दापासून 'मरहाट' शब्द कसा उत्पन्न झाला असावा याविषयीं प्राकृत व्याकरणकारांनीं तर्कानें नियमहि पण सांगून टाकले आहेत. हेमचंद्राच्या प्राकृत व्याकरणांत या विषयावर दोन सूत्रें रचलेलीं आढळतील :—

महाराष्ट्रशब्दे आदेकारस्य अद् भवति । मरहट्ठम् । मरहट्ठा ॥ ८-१-६९
महाराष्ट्रे ह-रोः ॥ ८-२-११९ ॥ महाराष्ट्रशब्दे हरोर्व्यत्ययो भवति मरहट्ठम् ॥

या सूत्राधारें मूळ 'महाराष्ट्र' शब्दाचें 'मरहट्ठ' हें रूप कसें बनलें असावें याची कल्पना येणार आहे.

पण 'महाराष्ट्र' शब्द पूर्वीचा व मरहट्ट तदनंतरचा असें मानण्यास मला कांहीं अडचणी दिसतात. त्यांचें निराकरण झाल्याशिवाय 'महाराष्ट्र' हें रूप 'मरहाट' पेक्षां प्राचीन असें समजणें सयुक्तिक होणार नाहीं.

'महाराष्ट्र' हा शब्द प्राचीन आहे असें मानण्यानें उत्पन्न होणाऱ्या अडचणी अशाः—

(१) प्राचीन काळीं देशांना जीं नांवें मिळालीं तीं तेथील मूळ वसाहत करणाऱ्या जनांवरून, याविषयीं आज कोणाचें दुमत नाहीं. आधीं जन नंतर जनपद. या उलट देशांना नांवें आधीं, नंतर लोकांना असा क्रम मानणें केव्हांहि समंजसपणाचें होणार नाहीं. प्राचीन देशांना तर तेथील वसाहत केलेल्या मूळ जनांवरूनच नांवें मिळालेलीं आहेत. जगांतील सर्व देशांत हाच क्रम आढळतो. 'महाराष्ट्र' हा जर प्राचीन देश असेल, तर या देशाचें मूळ नांव जनवाचकच असलें पाहिजे. पण 'महाराष्ट्र' हा शब्द तर राष्ट्रवाचक आहे हें स्पष्ट आहे. आणि आजपर्यंत—कांहीं अपवाद सोडले तर—बऱ्याच विद्वानांनीं 'महाराष्ट्र' म्हणजे मोठें राष्ट्र असा अर्थ केलेला आहे.

'महाराष्ट्र' हा शब्द जर देशवाचकच असेल तर, आणि हा खिस्ताब्दाहून पूर्वीचा असेल तर, या देशाचें मूळ नांव प्रदेश–वाचक असणें शक्य नाहीं. याकरितां या देशाचें नांव मुळांतच 'महाराष्ट्र' असें प्रदेश–वाचक होतें असें गृहीत धरणें सयुक्तिक होणार नाहीं.

(२) देशांना जनांशिवाय आणखी कांहीं निराळ्या तऱ्हांनींहि, उदा. चतुर्दिशीं लक्षांत येणाऱ्या भौगोलिक स्थितीवरून आणि त्याचप्रमाणें, अरण्य, वनस्पति वगैरेवरून नांवें पडतात. या नामकरणामागें विशेष चर्चा, विचार वगैरे असण्यापेक्षां बहुजनांना नित्यव्यवहारांत येणाऱ्या प्रत्यक्ष अनुभवाचाच भाग जास्त असतो. पण 'महाराष्ट्र' या नांवाविषयीं विचार केला तर सबंध देशाच्या विस्ताराची कल्पना येण्याकरितां आधीं पाहाणी होऊन मोजमाप केलें गेलें होतें असें गृहीत धरावें लागतें. पण हें प्राचीन काळीं असंभाव्य आहे. शिवाय मोजमाप करून महाराष्ट्र असें नांव देण्यापूर्वी या देशाला कांहीं तरी दुसरें एक नांव असलें पाहिजे. कारण 'महाराष्ट्र' हें नांव येईपर्यंत दुसरें कोणतेंच नांव त्या प्रदेशाला नव्हतें असें मानणें सयुक्तिक होणार नाहीं. या दृष्टीनेंसुद्धां 'महाराष्ट्र' हें नांव आधींचें असें ठरत नाहीं.

(३) शिवाय 'महाराष्ट्र' हें 'राष्ट्र' स्वरूपांत फार प्राचीन काळापासून अस्तित्वांत होतें याला दुजोरा देणारे ऐतिहासिक आधार मिळत नाहींत.

'महाराष्ट्र' हा शब्द वररुचीच्या प्राकृत व्याकरणांत प्रथम आढळतो. वररुचि हा खिस्त शकाच्या आरंभीं होऊन गेला असें मानण्यांत येतें. नंतर 'महावंसो' नामक बौद्ध ग्रंथांत महाराष्ट्र शब्दाचा उल्लेख येतो. हा ग्रंथ पांचव्या शतकाच्या मध्यांत झाला असें मानतात. सहाव्या शतकांतील वराह-मिहिराच्या 'बृहत् संहितेंत' 'महाराष्ट्र' चें नांव आढळतें. पुढें ७ व्या शतकांत बादामी चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याच्या दिग्विजयाचें वर्णन करणाऱ्या ऐहोळे-शिलालेखांत 'महाराष्ट्रांचें' नांव कोरलेलें आढळतें.

वररुचीच्या काळापासून आपल्या मोठेपणानें 'महाराष्ट्र' अशी ख्याति मिळविलेल्या देशाचें नांव त्यापूर्वीहि कित्येक शतकें अस्तित्वांत असावें व त्याची कीर्ति आणि महत्त्व सर्व जनतेस कळलेलें असावें हें स्पष्ट आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं त्या सुमाराच्या कोणत्याहि ग्रंथांत महाराष्ट्राचें नांव ऐतिहासिक संदर्भांत कोठेंहि आढळत नाहीं. महाभारताच्या प्राचीन प्रतींत 'महाराष्ट्राचें' नांव नाहीं. अशोकाच्या शिलालेखांतहि महाराष्ट्राचें नांव नाहीं. गुप्त राजांच्या वेळीं महाराष्ट्र या नांवानें ओळखला जाणारा प्रदेश कोठें अस्तित्वांत असल्याचें त्या काळच्या ऐतिहासिक लेखावरून दिसून येत नाहीं.

'माहाराष्ट्री' हें नांव केवळ भाषावाचक

पण राष्ट्र या नात्यानें जरी याचें अस्तित्व त्या काळीं मान्य नव्हतें, तरी भाषेच्या दृष्टीनें याला गौरवस्थान होतें हें मात्र निश्चित आहे. वररुचीच्या व्याकरणावरून ही गोष्ट स्पष्ट होते. 'शेषम् माहाराष्ट्रीवत्' हें सूत्र माहाराष्ट्री ही सुप्रसिद्ध भाषा होती याचा स्पष्ट पुरावा होय. तेव्हां राष्ट्र म्हणून जरी महाराष्ट्रीय म्हणविणारे विख्यात नसले, तरी त्यांची भाषा चांगलीच प्रसिद्ध होती. सर्व प्राकृतांना ही भाषा प्रमाण अशी मानली जात असे. यामुळें भाषेच्या प्रसिद्धीविषयीं वादच नाहीं. ही प्रसिद्ध बोली बोलणारे लोक त्यावेळीं होते हें निर्विवाद आहे. पण या लोकांचें जें संस्कृतांतील नांव 'महाराष्ट्र' तें त्यांना कितपत यथार्थपणें लागू होतें याबद्दल शंका आहे.

मूळ नांव 'महाराष्ट्र' कीं 'मरहट्ट'?

'महाराष्ट्र' या शब्दावरून बोध होत असल्याप्रमाणें हे लोक जर

अतिविख्यात राष्ट्राचे असते तर त्यांचे या नांवाचेच ऐतिहासिक उल्लेख कां मिळूं नयेत असा मुद्दा उत्पन्न होतो. 'राष्ट्रिक' म्हणून मुळांत कांहीं जन होते त्यांचाच पुढें महासंघ बनला व त्यावरून पुढें राष्ट्रिकांचें 'महाराष्ट्र' बनलें असें एक उत्तर वरील शंकेस देतां येईल. पण हें उत्तर समाधानकारक वाटत नाहीं. कारण राष्ट्रिक हा शब्द जनवाचक असला तरी तो 'आर्य' गणल्या गेलेल्या महाराष्ट्रिकांना लागू पडत नाहीं. 'राष्ट्रिक' याचा अर्थ काय ? तर या देशाचा मूळ रहिवासी. विन्सेंट स्मिथ वगैरेंनींहि असाच अर्थ केला आहे. 'राष्ट्रिक' म्हणजे या प्रदेशांतील मूळ रहिवासी असें ठरल्यास ते आर्येतरांपैकीं एक असावेत असें म्हणावें लागेल. आणि यावरूनच विन्सेंट स्मिथ, डॉ. आळतेकर प्रभृति विद्वान् संशोधकांना राष्ट्रिक–राष्ट्रकूट हे आर्येतर (native) कर्णाट जनांपैकीं असावेत असें वाटलें असून त्यांनीं आपल्या ग्रंथांत हें आपलें मत नमूद केलें आहे.

राष्ट्रिकांचा संबंध राष्ट्रकूटांशीं जितका जवळचा असल्याचें ऐतिहासिक पुराव्यावरून दिसतें तसा महाराष्ट्रिकांशीं असल्याचें दिसून येत नाहीं. इतिहासांत राष्ट्रकूटांचीं घराणीं अनेक आढळतात; त्यांचे अनेक ताम्रपट मिळतात; तसें महारट्ठिक किंवा महाराष्ट्रिक या नांवाचें राजघराणें एकहि अस्तित्वांत असल्याचा ऐतिहासिक पुरावा पुढें आलेला नाहीं.

भाषेंतील वाक्प्रचार व म्हणींतून तत्कालीन जनतेच्या मनोवृत्ति सूक्ष्मपणें ध्वनित होत असतात. 'मारवाडी वृत्ति', 'तेलंगी ब्राह्मण' अशा वाक्प्रचारांतून ऐकूं येणारा व्यंग्य ध्वनि विचारार्ह आहे. एका प्रांताबद्दल दुसऱ्यास काय वाटत असतें हें अशा प्रकारच्या वाक्प्रचारांतून उघड होत असतें. 'गौडबंगाल' या वाक्प्रचारांतून जादूटोणा, चेटूक वगैरे तंत्रविद्येबद्दल महाराष्ट्राची भावना चांगल्या प्रकारें व्यक्त होते. कै. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या लेखांत एका ठिकाणीं असें वाक्य येतें : 'कडवा मुसलमान, धिप्पाड रजपूत, राठ कानडी...'यांतील विशेषणें अभ्यसनीय आहेत. त्यांतील राठ शब्द येथें विशेष महत्त्वाचा आहे. राठ शब्द 'राष्ट्र' शब्दापासूनच निष्पन्न झाला असावा. याशिवाय दुसरी व्युत्पत्ति दिसत नाहीं. हें जर खरें असेल तर मराठींतील 'राठ' शब्दांत व्यंग्यार्थानें सूचित होणारे लोक मराठ्यांहून म्हणजे 'महाराष्ट्रिकांहून' निराळे असले पाहिजेत असें म्हणणें जरूर नाहीं काय ?

यावरूनहि 'राष्ट्रिक' हे महाराष्ट्रीयांहून निराळे असावेत असेंच ध्वनित होत आहे. राष्ट्रिक म्हणजे येथील मूळचे (Native) लोक हा अर्थ घेतला तर या लोकांची संस्कृतेतर दुसरी कोणती तरी प्राचीन भाषा असावी असा साहजिकच तर्क चालतो. हें राष्ट्रिक घराणें कानडी असावें असें डॉ. आळतेकरांचें मत आहे.

दक्षिणापथांतील देशांचीं मूळ नांवें तद्देशीय लोकांवरून आलीं असलीं पाहिजेत असें आजपर्यंतच्या संशोधनावरून सिद्ध होत आहे. संस्कृत साहित्यांत 'द्रविड' या नांवानें उल्लेखिलेल्या लोकांच्या देशाचें मूळ नांव 'तमिळ' हेंच असल्याचें आज सर्वमान्य झालें आहे. तमिळ या शब्दाचें संस्कृतीकरण होऊन (दमिळ, द्रामिळ, द्रमिड, द्रविड) त्याचीं द्रविड आणि द्राविड अशीं दोन रूपें रूढ झालेलीं आढळतात. इतकेंच नव्हे तर 'द्रविड' हाच शब्द मूळ असें समजून पंडितांनीं त्याचें पुन्हा द्राविडीकरण करण्यास आरंभ केला! आणि अशाप्रकारें द्राविड शब्दापासून बनलेला 'तिरमिड' हा शब्दहि तमिळ साहित्यांतच दृष्टोत्पत्तीस येतो !

Tamil was adopted into Sanskrit in early times as Dravida which occurs for example, in the Mahabharat, in Atharvaveda Parishishta and in the Code of Manu. Not only has the word thus transliterated survived to us in Sanskrit literature, it even imposed itself on Tamil men of letters who retransliterated it into their own characters as " Tiramida "

(Indian Antiquery 1919 p. 194)

द्रविडाचें तिरमिड झालेलें असें एकच उदाहरण नाहीं. कर्णाटाचें 'करुनाडु' असें जें रूप कांहीं ठिकाणीं आढळतें तेंहि याच प्रकाराचें आणखी एक प्रत्यंतर आहे.

'द्रविड' शब्दच मूळचा अशी लोकसमजूत होण्याचें कारण संस्कृत साहित्याइतकें प्राचीन लिखाण दुसऱ्या कोणत्याच भाषेंत मिळत नाहीं हें होय. यामुळें आपल्या देशांतील प्राचीन जनांचा व प्रदेशाचा इतिहास समजण्यास संस्कृत ग्रंथ हेंच आजचें एकमेव साधन झालें आहे. संस्कृत ग्रंथांतील प्राचीनतम उल्लेखांनाच मूलाधार समजून आपल्या देशांतील इतिहास व संस्कृति जाणण्याचे प्रयत्न सुरू झाले.

पण यांत कांहीं तरी चुकतें आहे याचें प्रत्यंतर पुढें अनेक गोष्टींवरून येऊं लागलें. वेद वगैरे ग्रंथांतील सर्व शब्दहि केवळ संस्कृतच आहेत कां अशी शंका विद्वानांच्या मनाला प्रथम चाटून गेली. तुलनात्मक भाषाशास्त्रानें यावर बराच नवीन प्रकाश टाकला व पुष्कळ संस्कृतेतर शब्द वेदांत आहेत हें निदर्शनास आणलें. या देशांतील नाना जनांच्या रंग–रूप–आकाराचा व भाषांचा अभ्यास होऊं लागला तशा नवीन गोष्टी उजेडांत येऊं लागल्या. आर्यपूर्व जन येथें कांहीं होते हें सिद्ध झालें. पण त्यांचें साहित्य असें कांहींच मिळत नाहीं. श्रीरामचंद्रास साहाय्य करणारे " मर्कट " हीं खरोखर वानरेंच असतील काय अशी शंका उद्भवून मर्कट शब्दाची व्युत्पत्ति पाहाण्याची इच्छा कांहींना झाली. मर्कट यांत ' झाड ' या अर्थाचा ' मर ' हा प्राचीन द्रविडवर्गीय शब्द आहे. त्यावरून मर्कट म्हणजे झाडींत राहणारे वनांतील जन, तेच वानर असा कांहींनीं तर्क केला.

प्राचीन काळीं या देशांत संस्कृत भाषेशिवाय दुसऱ्याहि भाषा बोलणारे लोक हते याला संस्कृत ग्रंथांतूनच पुष्कळ आधार मिळतात. वेदांत दास, पणी वगैरेंचीं नांवें येतात. ब्राह्मणादि ग्रंथांतून कांहीं जनांविषयीं ' वङ्गाः पक्षिणः ' अशा तऱ्हेचीं वाक्यें येतात. पक्षी, गरुड, मर्कट, जांबुवंत वगैरे प्राण्यांसारखीं जनवाचक नांवें संस्कृत साहित्यांत मिळतात. असे जनसमूह होते हें जर खरें तर त्यांची भाषाहि असलीच पाहिजे हें स्पष्ट आहे.

नानाचर्मभिराच्छन्ना नानाभाषाश्च भारत
कुशला देशभाषासु जल्पन्तोऽन्योन्यमीश्वराः ॥

महाभारतांतील (शल्यपर्व ४५.१०३) या उल्लेखावरून तेथें जमलेले राजे आपसांत बोलत असलेल्या नाना भाषा कोणत्या याचा कांहींच बोध होत नाहीं !

भारताच्या राजधानींत, केंद्रीय लोकसभेंत जमलेले लोक–प्रतिनिधि आपापल्यांत नाना देशभाषा बोलत असले तरी तेथील इतिवृत्त इंग्रजी भाषेंतच लिहलें गलेलें आपण पाहातों. इंग्रजींतील लिखाण तेवढें शिल्लक राहून देशभाषेंतलें सर्वच नष्ट झालें तर इंग्रजी आधारावरूनच पुढें आजचा इतिहास लिहावा लागेल. अशा स्थितींत ज्या प्रकारच्या चुका गैरसमजामुळें आपल्या

हातून होणें शक्य आहे, तशाच प्रकारच्या चुका, प्राचीन उपलब्ध संस्कृत साहित्यांतील उल्लेखांवर भिस्त ठेवल्यानें होत आहेत.

कर्णाट हेंच मूळ नांव असें समजून "कर्णाटदेशीयः कर्णदेशं अभूषयत्" (१४.१६५) व 'कर्णे अटति इति कर्णाटः' अशा व्युत्पत्त्या वेंकटाध्वरीनें व भट्टाकलंकदेवांनीं सांगितल्या आहेत. कन्नड हें मूळ नांव असें आज निश्चित झालें आहे. तेलंगणाला तीन लिंगांवरून नांव आलें अशी जुनी समजूत होती. पण डॉ. लेवींनीं त्रिकलिंगचें तिलंग तेलंग झाल्याचें दाखविलें आहे. या प्रांताला आंध्र असें दुसरें एक नांव आहे. तेंहि पण तेथील जनवाचकच आहे. कलिंगजन आस्ट्रो एशियाटिक वर्गाचे, तर आंध्र पत्तिजनसंबंधी (द्रविड वर्गीय) होत.

दक्षिणापथांतील गुर्जर व महाराष्ट्र यांचीं आधींचीं नांवेंहि तमिळ, कन्नड, आंध्राप्रमाणेंच येथील मूळ जनांवरूनच कांहीं निराळीं असणें शक्य आहे. गुर्जरांचें राष्ट्र तें गुर्जर झालें. गुर्जर जन अलीकडे आलेले परकीय लोक होत. तत्पूर्वी या भागाला लाट, सुराष्ट्र, अशीं नांवें होतीं. लाट म्हणजे 'नाट' जन. नाटांचा उल्लेख 'नटश्च करणश्चैव' या श्लोकांत मनुस्मृतींत आलेला आहे. हे नट, नाट म्हणजे राष्ट्रिकांचे पूर्वसंबंधी होते. नट व राष्ट्रिकांवरून लाट व सौराष्ट्र हीं नांवें आलीं आहेत. आणि हे नट व राष्ट्रिक हे एतद्देशीय असल्याचें वर आलेंच आहे.

दक्षिणापथांतच मोडणारा महाराष्ट्र हा आंध्र, कन्नड, व तमिळ यांच्याप्रमाणें मूळ एतद्देशीय जनांचाच असून त्याचें नांवहि त्यांच्याच भाषेंतील असणें शक्य नाहीं काय? आर्यावर्ताबाहेरील देशाचें नांव 'महाराष्ट्र' असें संस्कृत भाषेंतील असणें संभवनीय तरी आहे काय? यामुळेंच या देशाचें मूळ नांव 'महाराष्ट्र' नसून 'मरहट्ट' आहे असें म्हणणें जास्त समंजसपणाचें वाटतें.

महाराष्ट्रीयांची पहिली वसाहत वऱ्हाडांत

भौगोलिक दृष्टीनें महाराष्ट्राचा निर्विवाद असा पुरावा सातव्या शतकापर्यंत मिळत नाहीं. मागें उल्लेखिलेल्या ऐहोळे-शिलालेखांत 'त्रयाणाम् महाराष्ट्रकाणाम्'

हें वाक्य मिळतें. पण हे तीन 'महाराष्ट्र' कोणते याबद्दल तज्ज्ञांत अद्यापि एकमत नाहीं.

तरी पण महाराष्ट्रीयांची पहिली वसाहत कोठें झाली याबद्दल सर्व संशोधकांचें एकमत असून ती वऱ्हाडांत झाली असें निर्विवाद ठरलेलें आहे. वऱ्हाडचें नांव तर अतिप्राचीन काळापासून संस्कृतसाहित्यांत आढळतें. अगस्त्यानें विदर्भकन्या लोपामुद्रेशीं विवाह केला व दक्षिणापथांत आर्यीकरणास त्यानेंच सुरुवात केली अशी एक आख्यायिका आहे. वेदकालापर्यंत नेणारी ही दंतकथा बाजूस सारली तरी, महाभारतांत विदर्भाचा उल्लेख आहे. हा विदर्भ म्हणजे वऱ्हाडच होय याबद्दल कोणाचाहि मतभेद नाहीं.

पुलकेशीनें जिंकलेल्या तीन महाराष्ट्रांमधील आणखी दोन महाराष्ट्र कोणते हें जरी आज अनिश्चित असलें तरी त्यांतील पहिला महाराष्ट्र कोणता हें पक्कें ठरल्यासारखें झालें आहे. त्याचें नांव संस्कृतसाहित्यांत 'विदर्भ' असें आढळत असलें, तरी आज त्याचें 'वऱ्हाड' हेंच नांव सर्वत्र दिसून येतें. महाभारतादि संस्कृत ग्रंथांतून विदर्भ या नांवानें उल्लेखिलेला भाग पुलकेशीच्या शिलालेखांतील तीन महाराष्ट्रांपैकीं पहिला महाराष्ट्र होय. पण आजपर्यंत लोक भाषेंत याला 'वऱ्हाट' असेंच नांव असलेलें दिसून येतें.

एकूण या भागास तीन नांवें झालीं:—विदर्भ, वऱ्हाट आणि महाराष्ट्र. यांची संगति काय ?

विदर्भ व 'वरहाट' विचार

वऱ्हाडास असणाऱ्या निराळ्या दोन नांवांपैकीं 'महाराष्ट्र' हें मूळचें नांव नसावें याविषयीं दोन तीन कारणें वर सांगितलीं आहेत. विदर्भ हें नांव कां व कसें आलें असावें हें गूढच आहे. 'हरिवंशां'त (२. ६०. १०), यादवकुळीं विदर्भ नांवाचा राजा झाला त्यावरून या देशाला विदर्भ असें नांव मिळालें असा उल्लेख आहे. "विंध्यस्य दक्षिणे पार्श्वे विदर्भान् यो न्यवेशयत् !" विदर्भ राजानें वसविलेला प्रदेश म्हणून याला विदर्भ देश असें नांव प्राप्त झालें ही पौराणिक परंपरा सोडली तर, समर्पक अशी एकहि दुसरी व्युत्पत्ति अजून पुढें आलेली नाहीं. याविषयीं संशोधन होणें जरूर आहे. डॉ. केतकरांनीं आपल्या बेडर

वृत्तीनें विदर्भाच्या व्युत्पत्तीविषयीं एक कल्पना सुचविण्याचें साहस केलें आहे. विदर्भाचे मूळ लोक कदाचित् 'बेडर' (बेरड) जातीचे नसतील काय अशी एक शंका त्यांनीं पुढें मांडली आहे (प्राचीन महाराष्ट्र, भाग १, पृष्ठ १४). विदर्भ–विदर–बेदर–बेडर या नामसादृश्यावरून बेडरांचा विदर्भाशीं संबंध जोडण्याचा मोह होणें साहजिक आहे; पण बेडर म्हणजे ज्यांना बेरड म्हणतात ते क्षत्रिय राज्यकर्ते म्हणून प्राचीनकाळीं कधींच चमकले नाहींत. बेरड ही जात आर्य किंवा द्रविड वर्गाहून भिन्न अशा 'कोळी' (कोलमुंडा) वर्गात मोडते. विदर्भाच्या प्राचीन राजघराण्याचा संबंध यादव वंशाशीं होता हें लक्षांत घेतां बेरडांच्या वसाहतीमुळें या देशाला 'विदर्भ' नांव मिळालें असेल असें म्हणणें धाडसाचें होईल.

अशा रीतीनें या प्रदेशाच्या वरील तीन नांवांपैकीं आतां 'वऱ्हाट' हें एकच राहिलें. या वऱ्हाट शब्दाचा तरी कोठें समर्पक अर्थ लागला आहे असा प्रश्न कोणी उपस्थित करील. 'वऱ्हाट' शब्दाच्या साधारणपणें दोन व्युत्पत्ति पुढें आल्या आहेत :

(१) श्रीकृष्णाचें वऱ्हाड द्वारकेहून जें आलें तें येथेंच राहिलें; त्यावरून या प्रांताला वऱ्हाड असें नांव मिळालें असें सांगतात. ही कथा झाली; शास्त्रीय व्युत्पत्ति नव्हे. संशोधकांत या व्युत्पत्तीला कोणी विशेष मान दिलेला दिसत नाहीं.

(२) दुसरी व्युत्पत्ति : वर्धा+तट = वऱ्हाट. वऱ्हाडच्या इतिहासाचे लेखक श्री यादवराव काळे व इतर कांहीं विद्वान् या मताचे पुरस्कर्ते आहेत; पण ही व्युत्पत्ति बरीच फोल आहे असें पुष्कळ टीकाकारांचें मत आहे. Imperial Gazetteer (Vol. VII p. 361) मध्यें वऱ्हाडच्या या व्युत्पत्तीविषयीं लेखकानें शंका प्रदर्शित केली आहे. वऱ्हाडमध्यें तापी वैनगंगेसारख्या मोठ्या नद्या असतां, ओहोळवजा एका प्रवाहासारख्या असणाऱ्या छोट्या वर्धेवरून सबंध प्रांताला हें नांव मिळालें असेल हें केवळ असंभवनीय आहे. कारण वर्धातट देश अशा प्रकारचे प्रयोग कोठेंहि मिळाल्याचें पुढें आलेलें नाहीं. दुसरी कोणतीही समर्पक व्युत्पत्ति आढळत नाहीं म्हणून अशा कोणत्यातरी रीतीनें वळेंच समाधान मानून घेणें हें विचारशक्तीला मारक आहे.

विदर्भ–वऱ्हाट देश महाभारत काळाहूनहि प्राचीन आहे हें जर खरें तर

त्याला तेथल्या जनांवरूनच नांव मिळालें असणें तितकेंच निश्चित आहे. तेव्हां या दिशेनेंच विशेष विचार-संशोधन करणें अधिक फलप्रद होईल.

वऱ्हाटच्या मायबोलीचें नांव मऱ्हाटी आहे यांत तरी वाद नाहीं. भाषेवरून देशाला (किंवा लोकांना) नांव असा विपरीत कोटिक्रम कोणी करणार नाहीं. भाषेला नांव तद्भाषिक लोकांवरून किंवा देशावरून येत असतें. वऱ्हाटची मूळभाषा मऱ्हाटी हें जर ठाम आहे तर त्या भागाचें मूळ नांव 'मऱ्हाट' असेंच असावयास नको काय? या भागाचें नांव 'मऱ्हाट' किंवा 'मरहट्ट' असें ठरल्यास वऱ्हाट शब्दाची व्युत्पत्तिहि अत्यंत सरळ रीतीनें आपणांस कळणार आहे. 'म' चा 'व' होण्याची कानडींतील लकब लक्षांत घेतां मूळ मऱ्हाट हा शब्द 'वऱ्हाट' अशा रीतीनें कसा बदलला असावा हें आपल्या ध्यानांत येईल. मकाराचा वकार होतो असें हेमचंद्रादि प्राकृत वैय्याकरणीहि सांगतातच. 'म'काराचा 'व'कार झाल्याचीं उदाहरणेंहि आहेतः मीमांसा=विवांस (पाली); मन्मथ=वम्मह (प्राकृत) मगध-वगध; 'वंगा वगधाश्चेरपादाः ।' या ऐतरेय आरण्यकांतील (द्वि. १-१-९) संस्कृत वाक्यांतहि मकाराचा वकार (मगध-वगध) झालेला आढळेल. याप्रमाणें 'मऱ्हाट-वऱ्हाट' असें झालें असणें अशक्य नाहीं.

वऱ्हाट (मऱ्हाट) चे मूळ रहिवासी

येथील लोकांना 'मरहट्टे' असें नांव होतें हें अपभ्रंशकाव्यत्रयी वगैरे ग्रंथांवरून दिसतें. लोकांवरून देशाला नांव प्राप्त होतें हें सूत्र लक्षांत घेतां यावरूनहि वऱ्हाडचें मूळनांव 'मऱ्हाट' किंवा 'मरहट्ट' हेंच सिद्ध होतें.

वऱ्हाडांत 'हटगार' नांवाचे लोक आहेत. "Hatgars are of considerable importance in Berar" असें तेथील जाति व जन यांचा अभ्यास केलेले एंथोवेन वगैरेंसारखे तज्ज्ञ लिहितात. (Tribes and Castes in Central Provinces, Volume IV pp. 204, 206) वऱ्हाटची पुष्कळ देशमुख-देशाचे प्रमुख-घराणीं 'हटगार' (धनगर) कुळींचीं असल्याचें कळतें. हटगारांना हटगार-धनगर किंवा धनवडे (मराठे) म्हणण्याची प्रथा वऱ्हाडकडे आहे. हे मुळांत गोपालनवृत्तीचे लोक होत. (गो) धन पाळणारे म्हणून यांना धनगर नांव मिळालें. हटगार या शब्दाचा अर्थहि कानडींत

गोपाल असाच आहे. हटगारांची ज्या भागांत प्रमुख वसाहत आहे त्या भागाला हट्ट देश म्हणून नांव मिळालें असल्यास आश्चर्य तें काय ?

'मरहाट' म्हणजे 'झाडमंडळ'

या भागाला 'हट्ट' देश असें मूळ नांव हटगार (मराठे) लोकांवरून मिळालें असें गृहीत धरलें तरी 'मरहट्टांतील' 'मर' याचें औचित्य काय याचा उलगडा अद्याप झालाच नाहीं.

हट्टी म्हणजे पट्टी, गौळवाडा, घोष, प्रदेश असा अर्थ आहे. आतां मरहट्टांतील 'मर' याचें स्पष्टीकरण होण्यास या प्रदेशाच्या आणखी एका रूढ नांवाचें साहाय्य घेणें जरूर आहे. या भागाला 'झाडमंडळ' किंवा 'झाडिमंडळ' असें नांव प्रचारांत असलेलें दिसून येतें. नागपूर वऱ्हाड-कडील आधुनिक प्रांताभिमानी साहित्यिक आपल्या नांवापुढें 'झाडिमंडळस्थ' असें विशेषण लावून घेत असलेले आढळतात. 'झाडिमंडळ' हा शब्द एका जुन्या यादवकालीन ताम्रपटांत मिळतो. हेमाद्रीनें झाडिमंडळ जिंकून घेतल्याचें त्यांत वर्णन आहे. (पाध्येकृत 'हेमाडपंताचें चरित्र' पहा.) महानुभाव चक्रधरांच्या 'लीळाचरित्रांत' 'झाडिमंडळ' हा शब्द बऱ्याच वेळां येतो. नरेंद्रकृत 'रुक्मिणीस्वयंवरांत' (खि. श. सुमारें ११८५) 'झाडमंडळ' हा शब्द आलेला आहे (ओवी २४५). प्राचीन मराठीचे सुविख्यात संशोधक, 'झाडमंडळ'चे रहिवासी, प्रा. कोल्हे यांनीं संपादिलेल्या 'रुक्मिणी-स्वयंवर' ग्रंथांत 'झाडमंडळ' म्हणजे 'गोंडवन' 'आजचा मध्यप्रांत' असा अर्थ दिलेला आहे. तेव्हां वऱ्हाड देशाला 'झाडमंडळ' असें प्राचीन नांव होतें आणि तें बाराव्या शतकाच्या सुमारास प्रचलित होतें याबद्दल शंका राहात नाहीं. यावरून 'झाडमंडळ' आणि 'मऱ्हाट' हे दोन्ही समानार्थक शब्द आहेत हें निश्चित ठरलें. येथें 'मर' शब्दाचें कोडेंहि आपोआप आश्चर्यकारक रीतीनें सुटत आहे. 'हट्ट' किंवा 'हट्टी' या कानडी शब्दाचा अर्थ मंडळ किंवा प्रदेश असा होतो हें मागें सुचविलें आहेच. कानडींतील 'मर' या शब्दाचा झाड असा मराठी अर्थ आहे. एकूण 'मरहाट' म्हणजे 'झाडमंडळ' असें हें भाषांतर आहे.

असें हें भाषांतर कां झालें असा प्रश्न मनांत येणें साहजिक आहे. पण

अर्थ नीट कळण्याकरितां अशा प्रकारें भाषांतर करण्याची पद्धत सर्वत्र दिसून येते. 'मरहाट' या शब्दयोजनेनें अर्थबोध होईनासा होतांच भाषांतराची आवश्यकता उत्पन्न होणें साहजिक आहे. मरहाट 'हे आम्हांसी कानडे' जेव्हां झाले त्यावेळीं झाडमंडळ अशा दुसऱ्या स्पष्टीकरणाची जरुरी उत्पन्न झाली असावी. नाहींतर 'झाडमंडळ' या नांवाच्या औचित्याची व आवश्यकतेची दुसरी उपपत्ति लागत नाहीं. वोली-शेला; चूल-वैल, कोल-काठी वगैरे भाषांतरित जोडशब्द हे अशाच प्रकारच्या संक्रमणावस्थेंत प्रचारांत आलेले आहेत. याच अनुरोधानें विचार केला असतां 'मरहाटाचें' महाराष्ट्र असें संस्कृतीकरण कसें झालें असेल याचाहि उलगडा होणार आहे.

भाषांतराचे दोन प्रकार

दोन भाषिकांचा संपर्क वाढत जातो तसें त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाण घेवाण सुरू होते. अशावेळीं कांहीं विशिष्ट प्रकारची घटना पाहावयास मिळते. यांतहि दोन प्रकार आहेत. एक तर दुसऱ्या भाषेंतील शब्द आपल्या उच्चारास आणि भाषेच्या प्रकृतीस अनुरूप होतील असा कांहींसा बदल करून घेण्याची प्रथा आहे. उदाहरणार्थ 'अँडरसन' मराठींत 'इंद्रमन' होतो. 'स्टुअर्ट' 'इस्टुरफाकडा' होतो. हीं जुनीं पेशवाई उदाहरणें वगळलीं तरी आधुनिक मॅक्समुल्लर हा ऋग्वेदाच्या छापलेल्या प्रतीवर 'मोक्षमुल्लर भट्ट' असें स्वतःचें नांव घालतो.

परभाषेंतील शब्द घेण्याचा दुसरा प्रकार म्हणजे सबंध अर्थाचें भाषांतर करून नवीन शब्दच बनवावयाचा-उदाहरणार्थ, Red Sea : तांबडा समुद्र. शिलालेखांत अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें आढळतात. किसुवोळल् (किसु म्हणजे तांबडा, वोळल् म्हणजे नगर) याचें भाषांतर रक्तपुरी असें केलेलें आपणांस दिसून येतें.

वरील दोन प्रकारांपैकीं पहिला प्रकार हा बऱ्याच आरंभकालाचा असतो आणि पुष्कळ देशांचीं नांवें याच प्रकारें संस्कृतमध्यें शिरलेलीं आपणांस दिसतात. 'कन्न-नाडु' (कन्न लोकांचा देश) याचें संस्कृतीकरण होऊन कण्णनाड-कण्णाड-कण्णाट-कर्णाट असें झालें. याचप्रमाणें मरहट्ट-मरहाट-मऱ्हाट महाराष्ट्र अशा प्रकारें संस्कृत रूपांतर झालें असणें शक्य आहे. यामुळेंच संस्कृतांत

जरी महाराष्ट्र असा राष्ट्रवाचक उल्लेख बऱ्याच प्राचीनकाळीं आढळला तरी महाभारतादि ग्रंथांतून प्रमुख राष्ट्रांच्या यादींत या देशाचें नांव स्वाभाविकपणेंच आलेलें नाहीं. याप्रमाणें पहिल्या प्रकारानें जसें 'मरहट्टा' चें संस्कृतांत 'महाराष्ट्र' झालें त्याचप्रमाणें 'मरहाटा' चें 'झाडिमंडळ' हें दुसऱ्या प्रकारें झालेल्या भाषांतराचें सुंदर उदाहरण आहे.

आपल्याकडील प्राकृत ग्रंथांतून मरहट्ट असें रूपच विशेषेंकरून आढळतें. पण सिंहलद्वीपस्थ पंडितांकडून रचल्या गेलेल्या महावंसो ग्रंथांत 'महरट्ठ' असा प्रयोग आढळतो. द्रविड शब्द मूळचा समजून 'तिरमिड' हें रूप जसें पुढें आलें तसें 'महाराष्ट्र' या शब्दावरून 'महरट्ठ' हा तद्भव शब्द त्यांनीं बनविला असें दिसतें. कारण गट-रात्रिक हे महाराष्ट्रीयांपेक्षां निराळे आहेत हें राठ शब्दांतील व्यंग्य ध्वनि दर्शवीत आहे.

आजपर्यंतचे 'महाराष्ट्रा' च्या व्युत्पत्तीचे प्रयत्न

आजपर्यंत 'महाराष्ट्र' शब्दाची व्युत्पत्ति लावण्यांत मुळांतच गैरसमज झाल्यानें कोठलीहि समर्पक अशी व्युत्पत्ति पुढें आलेली नाहीं. विल्सन-मोल्सवर्थ प्रभृतींनीं लोकांवरून देशाला नांव मिळतें हें मूळ तत्त्व स्वीकारलें; पण तरीहि 'महाराष्ट्र' हाच मूळ शब्द मानण्यांत ते चकले. आणि 'महाराष्ट्र' या शब्दावर भिस्त टेवून 'महारांचें राष्ट्र' असा तर्क त्यांनीं लढविला पण हा केवळ तर्क असें आतां सिद्ध झाल्यानें त्याविषयीं पुन्हा चर्चा करण्याची जरूरी नाहीं.

आतां कांहीं विद्वानांनीं, 'महारथी,' 'महारठी' 'राष्ट्रिक-महाराष्ट्रिक' वगैरे कल्पना लढवून महाराष्ट्राची व्यु-पत्ति सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण डॉ. भांडारकरांपासून तों डॉ. काणे याच्यापर्यंत झालेल्या सर्वांच्या एतद्विषयक वादविवादावरून एकाची व्युत्पत्ति दुसऱ्यास संमत नाहीं हेंच सिद्ध होतें. डॉ. भांडारकर, श्री. राजवाडे, डॉ. काणे वगैरेंचीं परस्परविरोधी मतें पाहिलीं कीं अजून महाराष्ट्र शब्दाची समंजस उपपत्ति पुढें आलेली नाहीं हें स्पष्ट होतें. 'रथिक' म्हणजे वीर यांच्यावरून प्राचीन काळीं देशाला नांव मिळालें, असें गृहीत धरणें ऐतिहासिक क्रमाला धरून नाहीं. वीर ही अवस्था गाजर्काय उलाढालीच्या वेळची आहे. 'हट्टा' जन हा शब्द पशुपालनवृत्तीचा द्योतक आहे.

यामुळें या शब्दावरूनच 'हट्ट' देश असें नांव आलेलें, ऐतिहासिक व सामाजिक विकासास अनुसरून दिसतें.

वरील विवेचनावरून माझ्या मतें या देशाचें नांव मूळचें महाराष्ट्र नव्हे. मरहट्ट हेंच याचें मूळ नांव असून त्याचें संस्कृतीकरण होऊन 'महाराष्ट्र' झालें आणि त्याचेंच भाषांतर 'झाडिमंडळ' होय. मकाराचा वकार होऊन 'मऱ्हाट' चें 'वऱ्हाट' असें आजचें नांव प्रचारांत आलें.

कित्येक देशांच्या नांवावरून संगीतांतील राग-रागिण्यांना नांवें मिळालीं आहेत. कानडा, तिलंग हीं याचीं उदाहरणें होत. 'महाराष्ट्र' असा राग यांत नसावा हें विचित्र दिसतें. पण थोडें खोल पाहिलें असतां असा पक्षपात झालेला नाहीं असें दिसेल. 'वराळी' हा महाराष्ट्राच्या नांवाचा राग आहे. वराळी म्हणजे वराडी हाच मराठ्यांचा रागविशेष आहे. यावरूनहि 'महाराष्ट्र' हा शब्द पूर्वी राष्ट्रवाचक नसावा हेंच निश्चित ठरतें व वऱ्हाट = मऱ्हाट हें नांवच आरंभींचें असावें या मताला दुजोरा मिळतो.

★ ★ ★

: २ :

स्थलनामें आणि समाजेतिहास

मानवेतिहास जाणण्याचीं पुष्कळ साधनें आहेत. त्यांत स्थल-नामांचा अभ्यास हें एक साधन आहे. कोणत्याहि साधनाकडून होऊं शकणाऱ्या साहाय्याला कांहीं एक मर्यादा असते. त्या मर्यादेपलीकडे तें साधन गैरलागू ठरून निरुपयोगी होतें. इतकेंच नव्हे तर त्यामुळें, आपण जें सत्य जाणूं इच्छितों त्यापासून दूर आडमार्गांत जाण्याची भीति असते. स्थल नामांच्या अभ्यासांत तर ही भीति याहून विशेषच आहे. या साधनाचा उपयोग करतेवेळीं दिशाभूल होऊं नये म्हणून जितकी काळजी घेतां येईल तितकी हितावह आहे. शक्य ती दक्षता बाळगूनहि नकळत कांहीं उणीवा या राहतातच. पण त्यांचीहि योग्य छाननी व्हावी व जास्तींत जास्त सत्य जाणतां आलें तर जाणावें या हेतूनेंच या लहानशा मुद्यावर कांहीं विचार या प्रकरणांत मांडले आहेत.

स्थलनामांच्या मागील जुना इतिहास

अतिपरिचयामुळें पुष्कळ गोष्टींतील अर्थ-स्वारस्य बरेचसें कमी होतें म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. याला अतिशय जवळचेंच उदाहरण म्हणजे आपल्या गांवांचीं नांवेंच घ्या. आपण राहात असलेल्या गांवाला मिळालेलें विशिष्ट नांव कां प्राप्त झालें हें निश्चितपणें सांगणें आज जवळ जवळ अशक्य

झालें आहे. याचें कारण आपण पिढ्यान्‌पिढ्या तिकडे दुर्लक्ष करीत आलों, हेंच नव्हे काय? स्थलनामांच्या योगानें आपणांस कितीतरी जुना इतिहास कळूं शकतो, याची जाणीव फारच थोड्यांना आहे. आपल्या देशांतील पुष्कळ विचारवंतांचें लक्ष अजून इकडे पुरेसें वेधलें गेलेलें नाहीं यावरून हेंच सिद्ध होतें.

एकेक स्थळनांव घेऊन तें नांव कसें रूढ झालें याचा शोध घेत जाणें ही एक पद्धत झाली. पण तुलनात्मक अभ्यासाचा प्रकार याहून थोडा निराळा आहे. एकेका विशिष्ट प्रदेशांतील शक्य तों एकूण एक स्थलनामांची यादी करावयाची; त्यांच्या नांवाचे जुने सर्व फेरफार जाणावयाचे. अशा रीतीनें नांवें जमवीत असतां त्यांत आपणांस आपोआप कांहीं गट पडत असलेले दिसून येतात. उदाहरणार्थ, स्थलनामांतील पूर्व भागावरून त्यांत वीस ते पंचवीस गट होतील. पौराणिक प्रसंगांवरून, देवादिकांवरून, ऐतिहासिक प्रसंग व व्यक्ति यांवरून, ग्रहनक्षत्रांवरून, वारांच्या नांवांवरून, संख्यांवरून, दिशांवरून, वृक्ष वनस्पतींवरून, कृमिकीटकांवरून, गुराढोरांवरून, पशुपक्ष्यांवरून, उंचसखल वगैरे भौगोलिक परिस्थितीवरून, लोकजातींवरून, व्यवहारोद्योगादिकांवरून वगैरे स्थलनामांचे विविध गट होतात.

या एकेका विभागांत येणाऱ्या स्थलांच्या नांवांवरून बरीच सूक्ष्म अशी नवी माहिती नजरेस येते. एकेका स्थलाचें नांव सुटें घेतलें असतां कांहींचा अर्थबोधच होत नसतो. पण गटांत त्याचा अर्थ चटकन लक्षांत येतो. भाषेंतील शब्दांचीं जुनीं रूपें कळतात. नानातऱ्हांच्या अपूर्व झाडाझुडुपांची माहिती मिळते. एकेकाळीं त्या भागांत कोणत्या देवता लोकप्रिय होत्या हें समजतें. गतकालीन प्रभावी महाभाग, ऋषि, मुनी, योगी, संत, महंत, सिद्ध, सत्पुरुष किंवा राजकारणी महापुरुष यांचें अजरामर स्मारकच जणुं, अशीं पुष्कळ स्थलांचीं नांवें कालप्रवाहासहि दाद न देतां तगून उभीं असलेलीं दिसतात. कांहीं गावांच्या नांवांवरून, त्यांच्या पंचक्रोशींतील खनिज संपत्ति आदींची सूचना मिळते. अशाप्रकारच्या सूचनेवरूनच भद्रावती (म्हैसूर) जवळील लोखंडाच्या कारखान्याला आरंभ झाला. या प्रकरणांत स्थलनामांच्या पूर्वभागाचें विवरण प्रस्तुत नाहीं म्हणून त्याचा विस्तार येथें इष्ट नाहीं.

कोणतेंहि ग्रामनाम घेतलें तरी सामान्यपणें त्यांत दोन शब्द आढळतात. पण कांहीं ठिकाणीं पूर्व भागाइतका उत्तर भाग स्पष्ट नसतो. नित्य व्यवहारांतील बोलींत तो बराच संक्षिप्त झालेला दिसतो. नाग+पूर, सिंद+खेड, केंद+ऊर. अशा ठिकाणीं जी स्पष्टता आहे, ती जुन्नर, खोपवली वगैरे ग्रामनामांत नाहीं. त्याठिकाणीं जुनें+नगर, खोप+पल्लि अशा स्पष्टिकरणाची आवश्यकता भासते. नाशिक, नगर, पाटण वगैरे कांहीं गावांच्या नावांत उत्तरपद रूढ नसते. तरी अशा नांवापुढें शहर, गांव, खेडें असे कांहीं एक ग्रामवाचक उत्तरपद जोडण्याचा प्रघात आहेच. वर सांगितल्याप्रमाणें पूर्वभाग वितरणात्मक असतो. उत्तरभाग स्थान, तीर किंवा प्रदेश यांचा वाचक असतो.

मंगळवाड, गणेशवाडी, उदयगिरी, सिंहगड, विंचूर, चाळिसगांव, नागपाडा, वोडनदी, इत्यादि उत्तर भागांतील, गड, गिरि, नदी, खोरें, घळ वगैरे नांवें वगळलीं तर बाकीचीं पूर, गांव, वाड, वाडी, हाट अशीं स्थान किंवा प्रदेश या अर्थांचींच नांवें राहातात.

शब्दाच्या उत्तरभागावरून वसतिस्थानाची कांहीं कल्पना येऊं शकते. तळें, नदी, खोरें, गड अशा नांवांवरून त्या गांवांच्या भौगोलिक परिस्थितीची अटकळ करता येते. खेडें, खोप, नगर, वाडी, पूर यासारख्या शब्दांवरून तें गांव छोटें आहे किंवा मोठें आहे असा कांहींसा तर्क करण्यास अवकाश मिळतो. तसेंच आपल्या वसाहतीला कोणत्या तऱ्हेनें आरंभ झाला व त्याची वाढ कशी होत गेली, हें पाडा, पाडि, वाडा, वाडि...हाट या वर्गांतील ग्रामवाचक शब्दांवरून बरेंचसें कळून येतें. पाडा-वाडा-हाट या वर्गांतील ग्रामनामांची या दृष्टीनें अजून कोणी चिकित्सा केलेली नाहीं. तिचा हा प्रथमच प्रारंभ आहे. या विवेचनांत कांहीं तथ्यांश आहे असें ठरेल तर आपल्या प्रागैतिहासिक, अत्यंत महत्त्वाच्या पण आजपर्यंत संदिग्ध असणाऱ्या कांहीं गोष्टींचा सुगम रीतीनें उलगडा होणार आहे.

'पट्टि'-'पाडि' ची व्युत्पत्ति

'पट्टि, पाडि, पाडा,...वाडि, वाडा...हट्टि, हाट, हाडि...' हे या वर्गांतील मुख्य शब्द आहेत, याचा सामान्य आराखडा पुढें दिला आहे. पण

प्रथम हे शब्द स्वतंत्र आहेत किंवा एकाच मूळ धातूपासून उत्पन्न झालेलीं हीं विविध रूपें आहेत हें स्पष्ट करून घेणें जरूर आहे.

'पाडगांव' सारखे कांहीं अपवाद सोडले तर 'पट्टि, पाडि, पाडा,... वाडि, वाडा...हट्टि, हाट' हे शब्द साधारणपणें ग्रामनामांच्या शेवटीं आढळतात; तेथें सर्वत्र 'स्थळ' 'जागा' 'प्रदेश' असाच मुख्यार्थ आढळतो. उदाहरणार्थ कडपट्टी (जमखंडी जवळचें खेडें), कोंकणपट्टी (प्रदेश), गोपाडि (मंगळूर कडील खेडें), ताळेपाडि, नागपाडा, कुरुडुवाडि, मन्हाटवाडा, हाटवटि, शिरहट्टी, हाडि (ग्राम) वगैरे या वरील उदाहरणांतील 'पट्टि, पाडि, पाडा यांना एक अर्थ, 'वाडि, वाड' यांना दुसरा अर्थ व 'हट्टि, हाट' यांना तिसराच अर्थ संभवत नाहीं. सर्वांत स्थलवाचक अर्थच पुरेपूर भरला आहे. यामुळें हे सर्व शब्द सामान्यपणें समानार्थी आहेत असें म्हणावें लागतें.

'पट्टि, पाडि, पाडा...वाडि, वाडा...हट्टि, हाट' यांत अर्थ सादृश्याप्रमाणें रूपसादृश्यहि आहे. 'पाडि' आणि 'पाडा' हे शब्द भिन्न मानण्याची जरूरी नाहीं. वाडि, वाडा, वाड व वड ही भिन्न म्हणतां येणार नाहींत. नित्य व्यवहारांतील उच्चारांत किंचित् फरक पडत जाऊन अंत्य इकारामध्यें बदल होत होत 'वाडि' चें वाडा, वाड, वड असें रूपांतर होत गेलेलें दिसून येतें. कर्णाटक, तेलंगण, तमिळ या देशांत पट्टि, पाडि व पाडु हे शब्द जितक्या प्रमाणांत आहेत तितके ते उत्तरेकडे आले असतां कमी प्रमाणांत दिसून येतात. संस्कृतोद्भव बोलींत शब्दान्त्य उ, इ पेक्षां अ, (किंवा आ) कडे जास्त कल दिसतो. 'हालु' शब्द हाला किंवा हाल या स्वरूपांत बदललेला आढळेल. 'ऊरु' चे 'ऊर' किंवा 'ऊरा' असें होतें (उदाहरणार्थ, केंदूर, बंकूरा) याप्रमाणेंच 'पाडि, पाडा' ही 'पाडु' चीच भिन्नरूपें मानणें जरूर होतें. तसेंच वाडा, वाड किंवा वड हे शब्द 'वाडि' चींच निरनिराळीं रूपें होत. पट्टि आणि पाडि (पाडु) हे शब्द मुळांत 'पडु' या धातूचीं साधित रूपें आहेत, असें सर्व द्राविडवर्गीयभाषा–कोविदांचें मत आहे.

आतां मुख्य प्रश्न राहातो तो हा कीं, 'वाडि' (वाडा) हा स्वतंत्र शब्द आहे कीं, पाडीपासूनच तो निष्पन्न झाला ? संस्कृत व प्राकृत परंपरेप्रमाणें 'वाटिका' पासून 'वाटि-वाडि' झालें आहे. 'वाट' पासून 'वाड' झालें

आहे. यांत वाटि आणि वाट हे शब्द निराळे मानण्याची जरूरी नसतां, तसे ते गृहीत धरले गेले आहेत ! आणि या शब्दांच्या व्युत्पत्तीविषयीं संस्कृत विद्वानांतच मतैक्य दिसत नाहीं. वृत्त-वट्ट-वाट-वाड अशी व्युत्पत्ति कांहीं विद्वान् सुचवितात, तर कांहीं वर्ति-वट्टि वाटि-वाडि असें गृहीत धरतात. आणखी कांहीं तर वटवृक्षाशीं 'वाटि-वाडि' चा संबंध जोडूं पाहातात ! 'वाड' करितां 'वृत्त' ची आवश्यकता भासली, वाडि पाहतांच 'वर्ति' कडे धांव घ्यावी लागली हें स्पष्ट आहे. मुळांत 'वाड' आणि 'वाडि' भिन्न समजल्यानें हा घोटाळा झाला आहे.

'पाडि' पासून 'वाडि' शब्द निष्पन्न होतो हें लक्षांत घेतलें तर वरील सर्व यातायात चुकून घोटाळे दूर होणार आहेत. 'प' काराचा 'व' कार होऊन 'पाडि' चा 'वाडि,' 'पाडा' चा 'वाडा' झाला आहे. या तऱ्हेचे कांहीं जुने प्रयोग पाहिल्यावर याविषयीं शंकेला जागाच राहात नाहीं.

'सप्तार्ध लक्ष रट्टपाडि" चा उल्लेख जुन्या ताम्रपटांतून वगैरे मिळतो, (South Indian Inscriptions Vol. I pp. 63,65). रट्टपाडी म्हणजे रट्टांचा देश. 'पाडि' चा देश, प्रदेश असा अर्थ येथें सुस्पष्ट आहे. 'रट्टपाडि' प्रमाणेंच गंगवाडि, सिंदवाडि, नोळंबवाडि, कन्नवाड वगैरे प्रयोग शिलालेख, ताम्रपट वगैरेमधून पुष्कळ आलेले आहेत. येथें रट्टपाडिप्रमाणेंच, गंगपाडि, सिंदपाडि असें मूळरूप असलें पाहिजे. संधि होतांना 'पाडि' चें 'वाडि' झालें आहे यांत शंका नाहीं.

कर्णाटांतील ताम्रपट व शिलालेखांतून नोळंबवाडि, कन्नवाडि अशा तऱ्हेनें 'वाडि' युक्त समस्त शब्द आढळतात, पण तमिळनाड मधील ताम्रपटांतून 'वाडि' च्या ऐवजीं 'पाडि' हा शब्दच उपयोजिलेला आहे. कर्णाटांत आढळणाऱ्या रट्टपाडि या प्रयोगाप्रमाणें तेथें गंगपाडि, नोळंबपाडि, तडिगेपाडि अशाप्रकारचीं उदाहरणें फ्लीट यांच्या नजरेस आलीं आहेत (South Indian Inscriptions Vol. I pp. 63, 65). या उदाहरणांवरून वाडिचें पूर्वरूप पाडि हेंच होय यांत शंका नाहीं.

हेमचंद्राच्या प्राकृत व्याकरणांत याला आधारहि आहे. "पो वः" (:८·२·२३१) या सूत्राप्रमाणें 'पाडीं' तील 'प' काराचा 'व' कार होऊं

शकतो. 'स्वरात् परस्य असंयुक्तस्य अनादेः परस्य प्रायो वो भवति ॥' असें या सूत्राचें विवरण दिलें आहे. यावरून गंगवाडि, नोळंबवाडी अशा उदाहरणांतील "वाडि" चें मूळ रूप 'पाडि' च आहे हें निःसंदिग्ध रीतीनें सिद्ध होत आहे. 'पाडि" चें वाडि ज्याप्रमाणें होतें, त्याचप्रमाणें पल्लि(-ळ्ळ) चे वल्लि (-ळ्ळ) झालेलीं उदाहरणेंहि पुष्कळ मिळतात. उदा० तिळवळ्ळि, कासवलि इत्यादि.

प्राकृत व्याकरणाप्रमाणें कानडीचाहि या लकब्राला पूर्ण पाठिंबा आहे. नागवर्मा यानें 'कर्णाटक-भाषा-भूषण' नामक ग्रंथांत कानडी व्याकरणसूत्रें संस्कृत भाषेंत रचलीं आहेत (इ. स. ११४५). याचाच 'काव्यावलोकन' हा दुसरा ग्रंथ आहे. त्यांत 'शब्दस्मृति' विभागांत व्याकरणविचार येतो. या दोन्हींत अनुक्रमें ३१ व १२ या सूत्रांत 'प' 'ब' 'म'काराचा 'व'कार कोठें संभवतो हें सांगितलें आहे. केशिराजानें 'शब्द-मणि-दर्पण' नांवाचा व्याकरणग्रंथ लिहिला आहे. (इ. स. १२६०). त्यानें आपल्या ग्रंथाच्या ६७ व्या श्लोकांत हाच नियम दिला आहे. भट्टाकलंक देवानें (इ. स. १६००) संस्कृत भाषेंत, कानडी प्रौढव्याकरण लिहिलें आहे. ५९२ सूत्रें देऊन त्यावर 'भाषामंजरी' नामक वृत्ति व 'मंजरी मकरंद' नामक व्याख्यान लिहिलें आहे. यांतील ९१ व ९२ सूत्रांत 'प' 'ब' 'म'काराचा 'व'कार होण्याचा नियम सांगितला आहे.

समासांत आणि वाक्यांत 'प', 'ब', 'म' यांचा 'व' कार होतो, ही प्रथा कानडींत अतिप्राचीन आहे. प्राकृतांतहि असाच नियम दिसून येतो. कानडी आणि प्राकृत यांतील या वैशिष्ट्यांचें गमक लक्षांत न आल्यानें मराठींतील कांहीं कोडीं न सुटतां आजपर्यंत तीं जशींच्या तशींच राहिलीं आहेत. 'वाडि, वाड' यांचीच व्युत्पत्ति केवळ नव्हे, 'वऱ्हाड' शब्दाचा सुद्धां उलगडा न होतां आजपर्यंतचे सर्व तर्कवितर्क आडमार्गांत नेण्यास कारणीभूत झाले आहेत हें आपण मागें पाहिलेंच. एकूण 'पट्टि, पाडि, पाडा, 'वाडि, वाडा', 'हट्टि, हाट, हाडि' यांतील 'पट्टि, पाडि, पाडा व वाडि' हे शब्द स्वतंत्र नाहींत, 'पट्टि पाडि' चीं हीं सर्व निराळीं रूपें आहेत असेंच ठरतें. आतां 'हट्टि, हाट' चा प्रश्न: हट्टि आणि हट्ट, हे निरनिराळे शब्द

समजण्याची जरूरी नाहीं कारण 'वाडि, वाडा, वाड' प्रमाणेंच उच्चारांतील अस्पष्टपणामुळें हे प्रकार निर्माण झाले आहेत. हट्टि व हट्ट हे शब्द संस्कृतांतून मराठींत आले अशी बऱ्याच विद्वानांची समजूत आहे. आणि संस्कृत 'हट्' (प्रकाशणें) धातूपासून याची व्युत्पत्ति सांगितली जाते. पण 'हट्टि' हा शब्द संस्कृत नाहीं असें वाटतें. हेमचंद्राच्या 'देशीनाममालें' त 'हट्टि गृहभेदे च'; 'ग्रामे ऊरुः'; असें दिलेलें आढळतें. 'ऊरु' (ग्राम) याप्रमाणेंच 'हट्टि' शब्द संस्कृत नसून देशी आहे, असें हेमचंद्रासारख्या संस्कृत व प्राकृत उभय भाषाविशारदाचें मत आहे.

'हट्टि' हा देशी शब्द असें ठरल्यास त्याची व्युत्पत्ति सरळ लक्षांत येण्याजोगी आहे. जुन्या कानडींत 'ह' कार नाहीं. संस्कृत भाषेच्या संपर्कानें कानडी भाषेवर जे कांहीं बरेच मूलगामी परिणाम झाले आहेत, त्यांत 'प' काराचा 'ह' कार होणें हा एक महत्त्वाचा परिणाम आहे. 'प' काराचा 'ह' कार होण्यामुळेंच पालु–हालु, पुलि–हुलि, पिट्ठ–हिट्टु, पर्व–हब्बसारखे शब्द नव्यानें कानडींत अस्तित्वांत आले. या नियमानुसारच पट्टि–हट्टि, पाडि–हाडि हे शब्द तयार झाले आहेत असेंच सर्व जुन्या व नव्या कन्नड पंडितांचें मत आहे.

यावरून (१) पट्टि, पाडि पाडा...(२) वाडि, वाडा...(३) हट्टि, हाट, हाडि, हे भिन्न भिन्न शब्द नसून ती उच्चार भेदामुळें रूढींत आलेलीं एकाच शब्दाचीं विविध रूपें आहेत असें म्हणावें लागतें.

'पट्टि-पाडि' ची व्युत्पत्ति निश्चित ठरल्याशिवाय पुढील विचाराला चांगली वळकटी येणें शक्य नाहीं. याकरितां या किचकट चर्चेंत शिरल्याविना गत्यंतर नव्हतें. 'पट्टि-पाडि' या वर्गांतील पाडि, वाडि, हट्टि वगैरे शब्द प्राचीन कानडी, तमिळादि वर्गांतील सर्व भाषांतून आढळणाऱ्या 'पडु' धातूपासून निघाले असें ठरलें तर बरीच गुंतागुंत आपोआप उकलणार आहे.

विद्वानांना मराठी भाषेंतील 'पाडि' शब्दाच्या अर्थाचा थांग लागल्याचें अजून दिसत नाहीं. महाराष्ट्र-शब्द-कोशांत या शब्दाचा 'पहाडा' शीं संबंध जोडला आहे! अलीकडील प्रा. कुलकर्ण्यांच्या व्युत्पत्तिकोशांतहि हाच प्रकार दिसतो. 'पाडि' शब्द, महानुभाव भास्करकवीनें व श्री ज्ञानेश्वरांनीं उपयोजिला

आहे. 'कैवल्याची पाडि' हा महानुभाव भास्करकवीचा प्रयोग आहे: 'सद्वासनेचिया पाडि आला' असें ज्ञानेश्वर लिहितात. (७'१२६) पहिल्या उदाहरणांत 'कैवल्य' म्हणजे (कैलास) 'पर्वत' असा भ्रम उत्पन्न झाला असावा. पण दुसऱ्या अवतरणांत तशा शंकेला बिलकुल जागा नाहीं. शिवाय 'रट्टपाडि' वगैरेमध्यें पाडि शब्दाचीं, केवळ प्रदेश किंवा स्थान या अर्थाचीं बरींच उदाहरणें यापूर्वी दिलींच आहेत. यावरून 'पाडी' चा संबंध पहाडाशीं नेऊन भिडविण्याची आवश्यकताच राहात नाहीं. खेडीं-पाडिं या जोड शब्दांतील पाडीचा अर्थ सांगणारा खेड शब्द जवळच असल्यानें याचा अर्थ जाणण्यास पर्वतप्रदक्षिणेची जरूरी राहात नाहीं.

याचप्रमाणें 'पाडी' शब्दाच्या सिद्धिक्रमाविषयीं गैरसमज आहेत. संस्कृतांतील 'पद्र [क]' शब्दापासून पाडा शब्द निष्पन्न झाला असावा असा समज आहे. पण 'पद्र' शब्दाचें बूडच आधीं संस्कृतांत स्थिर नाहीं! 'पद्र-a village' असा अर्थ देऊन, मोनियर विलियम्सनें त्यापुढें 'L' खूण घातली आहे. 'L' या संकेताचा अर्थ त्यानें दिला आहे तो असाः—"L—Lexicographers, (i. e.) a word or meaning which although given in native lexicons, has not yet been met with in any published text" बेन्फेच्या (मॅक्समुल्लरनीं संपादिलेल्या) कोशांत हा शब्द घेतलेला नाहीं. संस्कृतांतील आधार म्हणून गणलेल्या मूळ 'पद्र' शब्दालाच जर या भाषेंत स्थान नसेल तर पुढें 'पाडा' चा काय पाड? संस्कृत साहित्यांत ज्या शब्दाला जागा नाहीं त्याला संस्कृत म्हणण्यापेक्षां 'देशी' शब्द म्हणणेंच जास्त समंजस होणार नाहीं काय? यास्तव 'पाडा (पाडि)' हा संस्कृतोत्पन्न शब्द नव्हे तर पट्टि—पाडि, वाडि—हट्टि या वर्गांतीलच एक आहे असें वाटतें.

पट्टि—पाडि 'पडु' धातूपासून निष्पन्न झाले आहेत. 'पडु' या धातूला पुढील अर्थ किट्टेल देतोः—'to lie down, to repose' तमीळ कोशांत (Tamil Lexicon) 'to spread out, as bedding; to lay horizontally, to lie down, to sleep' असे बरेच अर्थ दिले आहेत. तेलगु, मल्याळम् मध्येंहि हेच अर्थ आहेत. किट्टेलनें 'पडु' (नाम) a place (hollow or hole) of refuge (for wild animals) between stones or rocks" असा अर्थ दिला आहे. 'पडु' धातूच्या 'निजणें' वगैरे

अर्थानुसंधानांत 'पहुडणें' या मराठी धातूचें औचित्य चांगलेंच लक्षांत येण्याजोगें आहे. पहुडण्याची (वसतीची) जी जागा ती पट्टि किंवा पाडि, असा या शब्दाचा मुळांतील अर्थ आहे. पाळींमुळीं या मराठी जोड शब्दांतील पाळीं शब्द पाडीचेंच रूप होय. आणि याचा अर्थ (मूळ) वसतिस्थान हाच आहे२।

पुढें लक्षणेनें या शब्दांना बरेच अर्थ प्राप्त झाले आहेत. कालानुक्रम-दर्शक शब्दकोश तयार होतांच शब्दांच्या अर्थांमध्यें झालेल्या फरकांच्या मागें दडलेला बराच महत्त्वाचा इतिहास प्रकाशांत येणार आहे. शब्दांचे लक्षणेनें प्रतीत होणारे नवनवीन अर्थ निष्कारण कधींच आलेले नसतात. कालपरिस्थितीच्या ओघांत शब्दांना अर्थ संभवतो. सामाजिक पार्श्वभूमींतील, विविध घटनांची रंगीबेरंगी छटा तत्कालीन बोलींतील शब्दांच्या अर्थांमध्यें सामावलेली आपणांस दिसून येते.

या दृष्टीनें पाहातां पट्टि, पाडि, पाडा...वाडि, वाडा...हट्टि, हाट या शब्दांमध्यें व्यक्त होणारे निरनिराळे अर्थ देतेवेळीं, कोशकारांनीं, एकादा विशिष्ट क्रम पाळण्याची तसदी घेतलेली दिसत नाहीं. कालानुक्रमाचा विचार तर राहोच, मूळ अर्थ आधीं, नंतर लक्षणेनें येणारे दुसरे अर्थ असा क्रमसुद्धां अनुसरलेला क्वचितच आढळतो. पट्टि, पाडि, पाडा...वाडि, वाडा...हट्टि, हाट यांचे प्रत्येकीं एकापेक्षां अधिक अर्थ आहेत. त्यांत आधींचा कोणता व मागून आलेला कोणता याचा निर्णय कालानुक्रमयुक्त कोश तयार होईपर्यंत निश्चयात्मक रीतीनें होणें जरा कठिण आहे. तरीपण समाजशास्त्र आपणांस या बाबतींत कांहीं थोडें साहाय्य करूं शकतें. त्याच्या आधारें—पट्टि, पाडि, पाडा...वाडि, वाडा... हट्टि, हाट' यांच्या निरनिराळ्या अर्थांचा बराच उलगडा होऊं शकतो.

'पट्टि' शब्दाला किट्टेलनीं पुढील अर्थ दिले आहेत: 'A place of lying down, a pen or fold; an abode, a hamlet.' जुन्या कन्नड कोशांत या शब्दास 'आभीरपल्लि, घोष' असे अर्थ दिले आहेत. तमीळ कोशांत 'Cowstall, Sheepfold, a measure of land sufficient for a sheepfold, cattle pound, a hamlet, a village, a place असे अर्थ आहेत. 'हट्टि' ला गोस्थानक, गुरेंढोरें बांधण्याची जागा, असा

अर्थ नाचिराजीय नांवाच्या अमरकोशावरील एका जुन्या कानडी टीकेंत दिल्याचें किट्टेलनें नमूद केलें आहे. 'हट्टि' याचे झोंपडी, गोठा आणि लहान खेडें, असे अर्थ आजच्या कानडींत अजूनहि रुढ आहेत. वसुद्वादशीपासून आरंभ होणाऱ्या सणाला हट्टि हब्ब (गुरामेंढ्यांचा सण) असें नांव आहे. त्यावेळीं गाईबैलांची व मेंढ्यांची पूजा केली जात असते. गौळवाड्याचा म्हणजे 'हट्टी' चा हा सण; यामुळेंच 'हट्टिहब्ब' असें नांव प्राप्त झालें आहे. वऱ्हाडांतील हटगार धनगरांतहि हा सण मोठ्या उत्साहानें साजरा केला जात असून त्यांत बैलांच्या पूजेला महत्त्व दिलें जातें. (Russels : Castes & Tribes in Berar IV p 205) यावरून पट्टि आणि हट्टि यांच्या अर्थामधील साम्य चांगलेंच व्यक्त होतें.

पहुडण्याची जागा ती पाडि, पाडा किंवा पट्टि (हट्टि), वसतिस्थान, राहाण्याची जागा असा मुख्य धात्वर्थ आहे. या मूळ अर्थाबरोबर गौळवाडा, धनगराचें ब्रिन्हाड हा दुसरा अर्थ कां व कसा आला असावा?

पशुपालन वृत्तीपासून कृषीवल वृत्तीपर्यंत

मानव विकास–क्रमाच्या सामान्यपणें चार अवस्था सांगितल्या जातातः– (१) आहारसंचयार्थ भटकणाऱ्या पारध्यांची. (२) पाळीव जनावरांची माहिती झाल्यानंतर उदयास आलेल्या धनगरांची (३) वृक्ष वनस्पतींची ओळख झाल्यावर, त्यांची लागवड करण्यास आरंभ करणाऱ्या शेतकऱ्यांची कुटुंबीयांची (४) शेतीपुढील क्रमप्राप्त व्यापारोद्योग व राजकारणी धंदेवाइकांची. या चार अवस्थांपैकीं दुसऱ्या अवस्थेंतील जीवनाची सूचना 'पट्टि–हट्टि' मध्यें तर आहेच; शिवाय 'पाडा, पाडी' मध्येंहि तोच अर्थ ध्वनित होत आहे. 'पाडम्' ला तमीळमध्यें Street, Street of herdsmen, 'इडैयर्चेरी' (गवळ्यांची आळी) असे अर्थ व पाडीला Town, City, Hamlet, Quarters, Pastoral Village, District, असे अर्थ आहेत. कानडी रट्टपाडि, गंगवाडि वैगरे शब्दांत 'पाडि'चा देश असा अर्थ व्यक्त होतो. खेडें या अर्थी 'पाडि' आणि 'हाडि' म्हैसूरमध्यें व दक्षिण कन्नड जिल्ह्यांत आढळतात. तरी पण महाराष्ट्रांत 'पाडा' शब्दांत, वरील 'पट्टि' (हट्टि)चा अर्थ संपूर्णतया दिसून येतो. 'पाडा' म्हणजे शेतीच्या कामाच्या सोयीसाठीं

शेतकऱ्यांनीं आपल्या गांवापासून किंचित् दूर व शेतीपासून जवळ बांधलेल्या झोपड्यांची वाडी, लहान खेडें' असा अर्थ 'महाराष्ट्र शब्दकोशांत' दिला आहे. जुन्या सांप्रदायिक माहितीनें भरलेल्या व त्यामुळें उपयुक्त आधारग्रंथाचें महत्त्व पावलेल्या 'गांवगाडा' या ग्रंथांत श्री. त्र्यं. ना. अत्रे यांनीं 'पाडा'चें विवरण दिलें आहे तें असें : शेतांत एकदोन घरें असतील तर त्यांना झांप, अवसा, कोठा-गोठा किंवा पडाळ म्हणतात. आणि तीं दहा पांच किंवा अधिक घरें असून त्यांचें छोटेखानी गांवठाणच बनलें असेल तर त्याला वाडा, वाडि, मजरे, पाडा असें नांव प्राप्त होतें.

वरील दोन्ही उताऱ्यांवरून पाडा, वाडा व वाडि हे समानार्थी शब्द आहेत याविषयीं शंका राहात नाहीं. पाडा छोटा असल्यास त्याला पाडळ अशी संज्ञा आहे, असें श्री. अत्रे लिहितात.

एकूण, पट्टि (हट्टि), पाडा यांत पशुपालन वृत्तीपासून शेतकरी—जीवन-क्रमापर्यंतच्या स्थितीची अर्थसूचना आहे असें सिद्ध होतें.

वाट, वाटि (का) शब्दाला संस्कृतांत आढळणारा अर्थहि याला संपूर्ण पोषकच आहे. A site of a house, an enclosure, a park, an orchard. वाट शब्दाच्या अशा या अर्थाबरोबर हरिवंशांतील ३३९७) 'गोवाट' चा प्रयोग पाहिला तर 'वाट' ला पट्टि—पाडिचा संपूर्ण अर्थ असल्याचें मान्य करावें लागतें.

खिस्तपूर्व पहिल्या शतकांत रचलेल्या उत्तराध्ययन सूत्रांत 'वाड' शब्द आला आहे. या प्राकृत ग्रंथांतील 'वाड' शब्दाला गोठा असा अर्थ असल्याचें दिसून येतें. ९–१० व्या शतकांतील देवेंद्रादि टीकाकारांनीं तोच अर्थ सांगितला आहे. "वाडेहि पंजरेहि सन्निरुद्धा" विवाहप्रसंगीं अरिष्टनेमीला 'वाड' व 'पंजर' यांमध्यें कोंडून ठेवलेलीं जनावरें पाहून उपरति झाली व तो प्रव्रज्येस प्रवृत्त झाला, असा तो प्रसंग आहे. मराठींतील 'कोंडवाडा' यांतील वाडा शब्दाचें रहस्य येथें चांगलेंच ध्यानांत येईल.

'पट्टि-हट्टि'मधील अर्थाचें मर्म विसरून गेल्यानें मराठींतील 'हट्टिकार-धनगर' किंवा हटगार-धनगर' यांतील पदद्वयांची व्युत्पत्ति अजून कोणाच्या लक्षांत आल्याचें दिसत नाहीं. 'हटगार' याला हट्टी 'Obstinate' असा

अर्थ कांहींनीं लावण्याचा प्रयत्न केला आहे. 'धनगर' म्हणजे धेनुकर असा तर्क लढविलेला पहावयास मिळतो! विल्सनचा हा तर्क पुढें कोणास मान्य झाला नाहीं. पण धन-कर याची दुसरी व्युत्पत्ति लागल्याचेंहि दिसत नाहीं. हा वैचारिक गोंधळ प्रा. कुळकर्ण्यांच्या व्युत्पत्तिकोशांत नमूद आहे. 'हट्टि-हव्व' हट्टीचा सण म्हणजे 'गाई-मेंढ्यांचा सण' हें मागें सांगितलें आहे. खानदेशच्या गॅझेटियरमधील पुढील उतारा पहा : Kanadas (gavalis) are a peculiar race of drovers...they have a peculiar breed of black and white cattle, HATKAR which, though not large, are much prized for their strength and spirit (p. 106) येथें 'हटकार' चा गाईबैल असा अर्थ स्पष्ट आहे. कानडींतील नाचिराजीय, मंगराजनिघंटु वगैरे जुन्या कोशांतून हट्टिकार म्हणजे गवळी असा अर्थ दिलेला आहे. 'हट्टिकार-धनगर' किंवा 'हटकार-धनगर' हें पद, एकाच अर्थाचे दोन शब्द मिळून झालेलें आहे. तांबडा–लाल, कागद-पत्र, ईड–लिंबू, खेळ–आडु अशा तऱ्हेची ही जोडी आहे. यांना Translation Compounds असें डॉ. सुनीतिकुमार चतर्जींनीं नांव दिलें आहे. 'हट्टिकार' म्हणजेच धनगर. 'धन' ला येथें गो-धन असा अर्थ आहे. कानडींत 'दन' म्हणजे गुरेंढोरें (यांत केवळ गाई बैल यांचाच समावेश होतो, म्हशींचा नाहीं). 'दन' हा शब्द 'धन' शब्दाचा तद्भव आहे, असें बाराव्या शतकाच्या पूर्वीपासून कानडींत मानण्यांत आलेलें आहे. यामुळें (गो)धन पाळणारा तो धनगर अर्थात् 'हट्टिकार' तोच 'दनगार'. 'दनगार' (म्हणजे गुरें पाळणारा) हा शब्द आजहि कानडी बोलींत रूढ आहे.

पशुपालनवृत्तीच्या पुढील पायरी शेतीवाडीची. शेतीवाडी हा जोडशब्द विचारार्ह आहे. यांत शेती शब्दापासून होणारा अर्थबोध थोडा निराळा आहे. पावसाच्या पाण्यानें पीक घेणारे ते शेतकरी असें समजलें जातें. वाडी म्हणजे मळा; विहिरीच्या किंवा नदीच्या पाण्यानें पोसून भाजीपाला वाढविला जातो, ती बाग. कृषीच्या विकासक्रमांत आधीं वाडी, नंतर शेती. स्त्रियांकडून बागायतीला आरंभ झाला असें संशोधकांचें मत आहे. पशुपालनावस्थेंतील पुरुषांना गुरें चारण्याकरितां सदैव भटकावें लागणें साहजिक आहे. पट्टींत (गौळवाड्यांत) राहणाऱ्या स्त्रिया आपल्या फावल्या वेळीं, आपल्या निरीक्षणानें

अनुभवानें उपयुक्त ठरलेल्या वेली, वनस्पति परसांत लावून वाढवूं लागल्या. हा उद्योग किफायतशीर ठरून उपजीविकेचें साधन बनूं लागल्यावर पुरुष मंडळी या कामाकडे विशेष लक्ष देऊं लागली. अशाप्रकारें गुराढोरांच्या वाडीनें–गौळवाडा–पुढें बागेचें रूप धारण केलें. शेतीवाडी, वतनवाडी यांतील 'वाडी' शब्दाला 'गौळवाडा' असा अर्थ नसून 'बाग' असा निराळा अर्थ प्राप्त झालेला आहे.

कानडींतील 'तोट–पट्टि' या जोडशब्दांतील 'पट्टि' ला मळा हाच अर्थ आहे. 'पट्टि' या प्राचीन शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठीं 'तोट' या त्याच अर्थाच्या आधुनिक शब्दाची जोड द्यावी लागली. तामीळ भाषेंत 'पडप्पै' म्हणजे वाडी, बाग हा अर्थ आहे. संस्कृतांत 'वाट' 'वाटी' ला बाग असा अर्थ असल्याचें सर्वश्रुत आहेच.

वरील सर्व गोष्टींवरून 'पट्टि–हट्टि' मध्यें गोपालनवृत्तीपासून कृषीवल वृत्तीपर्यंतच्या अवस्थेचा अर्थ प्रतीत होतो हें निःसंशय आहे.

संस्कृतांत व मराठींत 'हाट' किंवा 'हट्ट' याला बाजार असा जो अर्थ आहे तो शेतकीच्या पुढील पायरीचा. पट्टि-पाट-पाटक-पेठ यांतील अर्थपरिवर्तनहि लक्षांत घेण्याजोगें आहे.

संस्कृतमध्यें 'गोप' शब्दाच्या अर्थविकासाची रीत पाहिली तर मराठींतील (गौळ-)वाड्याला विस्तीर्ण (राज)वाडा, वैभवशाली भव्य हवेली असा अर्थ कसा प्राप्त झाला असेल याची चांगली कल्पना येणार आहे. हें हटगारांच्या वाढत्या वैभवाचें निदर्शक आहे. पट्टि, पाडि, पाडा, वाडा यांना विस्तीर्ण प्रदेश, देश, राज्य असे अर्थ आले. (लहानशा) 'पट्टि' चें 'पट्टण' होऊन राजधानी असा अर्थ प्राप्त झाला. कालगतींत हट्टि, पाडि यांना ओसाड गांव असा अर्थहि आला असल्यास नवल नाहीं.

या हजारों वर्षांच्या कालावधींत 'पट्टि,' 'हट्टि' चीं विविधरूपें लोक-व्यवहारांत रूढ होणें अत्यंत साहजिक आहे. दक्षिणापथांतील (नर्मदा ते कावेरी) गांवांच्या नांवांची यादी पाहिली तर 'पट्टि-हट्टि' या वर्गांतील नाना रूपें स्वल्प उच्चार-भेदानें पहावयास मिळतील. पाडेगांव, पाटगांव, पारगांवसारख्या कांहीं ठिकाणीं हीं रूपें ग्रामनामांच्या पूर्व भागांत आढळलीं तरी तीं बहुतेक

उत्तर भागांतच दृष्टीस पडतात. उच्चारानुरोधानें झालेल्या फरकांप्रमाणें गटवारी करून त्यांचा आराखडा येथें देत आहे.

'पट्टि—हट्टि'चे विविध पर्याय

पाडु — पाडि, **पट्टि**; पट्टग — पाटण — पाटणा;
पट्ट — पाट — पाटक; पट्टार;...पेठ; पेठा;
पाडु — पाडा — पारा.....
पारा — हारा, हार — हर;...आर...;
पाडु...आडु; **पाडि**...आडि;
पाडु — बाडु — बाड...
बाडु — बाळु — बाळ
बाळु — वाळु — वाळ — वळ...वल
पाडा — वाडा — वाड; वड वाडे; वडिगे...
पट्टि — पाटि...
पाटि — वाटि; वाटिका
पट्टि — **पाट**
पाट — वाट; वाटक...वाढार (पाठार); वठार; वठाण...
पट्टि — पाटि — प्याटि;... पेटे, पेठ, पेठा;...पाटार; पाटक;
पट्टि — हट्टि; **पट्ट** — हट्ट; **पाट** — हाट;
पाटक — हाटक; **पाडि** — हाडि;...
पाडु — पाळु – हाळु – हाळ;...आळ; आल...आण
पाळि — पळ्ळ — हळ्ळ
पट्टि — पाडि — पाळि — पळ्ळ — हळ्ळ...
पळ्ळ — वळ्ळ...वळि...वलि...ओलि...ळि;
पाडि — पाळि — हाळि — हाळ;
पाळि — पाळ्य, पल्य

'पट्टि-हट्टि'चा हा विविध पसारा लक्षांत आल्यास बऱ्याच गोष्टींवर नवीन प्रकाश पडणार आहे. 'हटगार-धनगर' हें उदाहरण वर आलेंच आहे. शिवाय या प्रकारचें आणखी एक उदाहरण म्हणजे 'अग्रहार' हें होय.

'अग्रहार' शब्दाची व्युत्पत्ति अजून निश्चित झालेली नाहीं. खालील अवतरणावरून ही गोष्ट पटेल :

(१) 'अग्रं ब्राह्मणभोजनं, तदर्थं ह्रियन्ते राजधनात् पृथक् क्रियन्ते ते क्षेत्रादयः।' (२) अग्रं प्रथमं ह्रियते उत्पन्नशस्यान् उद्धृत्य स्थाप्यते।' (३) अग्रं हरति।' (४) क्षेत्रोत्पन्नशस्यात् उद्धृत्य ब्राह्मणोद्देशेन स्थाप्य धान्यादि गुरुकुलादावृत्तब्रह्मचारिणे देयं क्षेत्रादि ग्रामेभ्यश्च।'

वरील उताऱ्यावरून 'अग्र' आणि 'हार' या दोन्हीहि शब्दांच्या अर्थाविषयीं एकमत दिसत नाहीं. तरी पण 'अग्र' हा ब्राह्मणवाचक शब्द आहे असें कबूल करूनहि 'हार' शब्दाला संस्कृत भाषेंत ग्रामवाचक सरळ अर्थ होऊं शकत नाहीं. यामुळेंच वरील पंडितांनीं 'हार' याला 'ह्रियते' 'ह्रियन्ते' किंवा 'हरति' असा अर्थ केलेला दिसतो.

उत्तर भारतांत आर्येतर 'पत्ति'

'हार', 'हारा' हा शब्द जुन्या ताम्रपटांतून वगैरे आढळतो. बळ्ळारी जिल्ह्यांत मिळालेल्या लेखांत 'सातवाहनी हरा' हें पद आलें आहे. तेथें 'हरा म्हणजे abode, home' असा अर्थ डॉ. सुखटणकरांसारख्या तज्ज्ञांनीं केला आहे (Epigraphica Indica XIV p.155). हा शब्द प्रेहार, शिलाहारादि ठिकाणींहि दिसतो (Mysore Arch. Rept. 1929). हार, हरा किंवा हर हे निराळे शब्द नसून वाड, वाडा, वड सारखीं एकाचींच निरनिराळीं रूपें होत.

'हारा' किंवा 'हार' याचें प्राचीन रूप 'पारा' किंवा 'पार' असलें पाहिजे. 'पाडा' 'वाडा' चींच हीं निराळीं रूपें आहेत. 'पारगांव' यांत 'पार' शब्द आपल्याकडे आढळतो. उत्तर भागांत आसाम, बंगाल, बिहारकडे, तेल्हपारा, उत्तरपारा वगैरे ग्रामनामांतून शेवटीं हा शब्द दिसतो.

येथें असा एक प्रश्न उद्भवतो कीं जर पट्टि, पाडि, हट्टि, हे शब्द 'देश्य' असून द्रविडवर्गीय म्हणविणाऱ्या संस्कृतेतर भाषेंतील असतील तर हीं उत्तर भारतांतील, 'आर्यावर्ता' तील ग्रामनामें आर्येतर भाषेंतील कशीं ?

वाल्डे आणि पोकर्नी यांच्या आर्यभाषावर्गीय जर्मन शब्दकोशांत पट्टि-हट्टि हट्ट शब्दांचा सुगावा लागत नसल्याचें डॉ. दांडेकरांकडून कळलें. 'पट्टि-हट्टि'

हा वर दर्शविल्याप्रमाणें संस्कृतेतर भाषेचाच असें निश्चित झाल्यास आज-पर्यंत न सुटलेल्या एका महत्त्वाच्या समस्येचा परिहार होणार आहे.

द्रविड शब्द वेदकालाइतका प्राचीन नाहीं, नंतरचा आहे. 'द्रविड' लोक आर्यांच्याहि पूर्वी होते हें जर खरें असेल, तर वेदकाळीं हे लोक कोणत्या नांवानें ओळखले जात असावेत ?

माझ्या मतें यांना त्यावेळीं 'पत्ति' असें एक नांव असावें. वराहमिहिर 'पत्ति' जनांचा उल्लेख करतो हे पत्ति कोण असतील ? मध्यकाळांतील हट्टिकारांच्या पूर्वजांचें नांव 'पट्टि' किंवा 'पत्ति' असणें संभवनीय नाहीं काय ? यजुर्वेदीय रुद्राध्यायांत अनेक आर्येतर (अनाय म्हणजे रानटी नव्हे !) जनांचा उल्लेख असल्याबद्दल दुमत नाहीं; त्यांतच पत्तींचेंहि नांव येतें:—
नम उच्चैर्घोषायाऽऽक्रंदयते **पत्तीनां** पतये नमः ॥

हे पत्ति कोण असतील बरें ? 'पट्टि'मध्यें वास करणारे ते पट्टि (पत्ति). पट्टण–पत्तन असा टवर्गाचा संस्कृत भाषेंत तवर्गांत बदल होतो. पट्टि आणि पत्ति यांत संबंध असल्याचें सिद्ध झालें तर, यापुढें द्रविड या संदिग्ध व अनुचितार्थी शब्दापेक्षां 'पत्ति-जन' हा प्रतिशब्द रूढ करणें समंजस ठरेल. तमिळानांच 'द्रविड' अशी संज्ञा असल्यामुळें त्या शब्दांत त्या वर्गांतील सर्वांचा समावेश होऊं शकत नाहीं. शिवाय 'पत्ति' या पदप्रयोगानें कन्नड, तमिळ, आंध्र वगैरे या सर्व जनांची पूर्वपरंपरा वेदकालापर्यंत भिडलेली स्पष्टपणें लक्षांत येईल.

'पट्ट इल्ल'–पट्टिल असे प्रयोग प्राकृत 'सुपासनाहचरिय' वगैरे ग्रंथांत आढळतात. (पाइअ-सद्द-महाण्णवो' कोश पहा) इल्ल–इल या तद्धित प्रत्ययाचा अर्थ 'त्यांत असणारा' असा आहे. पट्टिल म्हणजे पट्टींत राहणारा असा अर्थ होतो. हे पट्टिल हट्टिकारांचे संबंधी असणें असंभवनीय नाहीं. पट्टिल शब्दाचें पुढील रूपच पाटिल किंवा पाटील. 'पाटील' हा ब्राह्मण नव्हे. कुणबी धनगरांना 'अहो पाटील' असें संबोधण्याची प्रथा आहे. पाटील याचा अर्थ ग्रामाधिकारी असा मुळांत नाहीं; पुढें तसा लक्षणेनें रूढ झाला असला पाहिजे. नाहीं तर सबंध एक जातच 'पटेल' म्हणजे ग्रामाधिकारी असणें शक्य नाहीं. ज्यांचा पाटिलकीशीं संबंध नाहीं अशा जाती आहेत; पाटील घराणींहि पण आहेत. उत्तर

कन्नड व गुजरात गॅझेटियरांत 'Patti' व 'Patelia' (पट्टि व पटेलिया) अशा लोकजाति असल्याचें नमूद आहे. आणि पटेलिया हा शेतकरी वर्ग आहे असेंहि तेथें सांगितलें आहे.

कर्णाटांत पाटील आणि गौड हे दोनहि शब्द समानार्थी वापरले जातात. गौड म्हणजेच पाटील. गौड शब्दाचा संबंध गौळ—गोवळ—गोपाळ याशीं जाऊन पोंचतो. यावरूनहि पट्टिल—पाटिल हा हट्टिकार (गौळ) संबंधीं असल्याचें आणखी एका रीतीनेंहि सिद्ध होतें.

हटगार-धनगर, पटेलिया व पट्टि या लोक जातींवरून 'पत्ति' हे आर्येतर जन असावे असा तर्क करण्यास कांहीं बाध येत नाहीं असें वाटतें. ते पत्ति रुद्रशिवाचे उपासक; तसे आजचे 'हटगार धनगर' वगैरे लोकहि शिवभक्त आहेत. (विष्णु-कृष्णाची उपासना ही शैव परंपरेनंतरची आहे.) यजुर्वेदांतील 'पस्ति' हे जर आर्येतर असतील तर आर्येतर भाषेंतील पाडा, पाटक, पारा, ऊरा, हट्टि, पट्टण वगैरे ग्रामवाचक शब्द उत्तर भारतांत (आर्यावर्तांत) कसे शिरले हें कोडें आपोआप सुटतें.

छांदोग्यांत, टोळधाडीमुळें कुरुदेशांत दुर्भिक्ष झाल्याचा उल्लेख आहे. "मटचिहतेषु कुरुषु"...कुरुदेशावर मटचींची धाड आली त्यामुळें तेथील पिकांची नासाडी झाली (१–१०–१) या वर्णनांतील मटची हा काय प्राणी आहे, आणि तो शब्द कोणत्या भाषेंतील असावा याबद्दल संशोधक विद्वानांनीं बरेच परिश्रम करून शेवटीं जवळ जवळ सर्वानुमतें असें ठरविलेलें दिसतें कीं 'मटची' म्हणजे टोळ; आणि तो शब्द द्रविड गणलेल्या भाषेंतला आहे. कानडींत टोळ या अर्थीं 'मिडिचे' असा शब्द रूढ आहे. आणि संस्कृतांतील 'मटची' 'मिडिचे' ला फार जवळ आहे हें स्पष्ट दिसतें.

डॉ. बागची यांनीं मटची हा शब्द इराणी भाषेंतला असावा असें (Indian Historical Quarterly 1933 p. 254) सुचविलें आहे. पण कानडी तमीळ (कंदमिळ्) या भाषावर्गांत उडणें या अर्थाचा 'मिडि' धातु आहे. त्यावरून मिडचे शब्द सिद्ध झालेला आहे. आणि संस्कृतांत या वर्गाचा मटचीसारखा हा एकच शब्द वेदांत असता तर गोष्ट निराळी होती; पण चंद्र, अरणी, मर्कट वगैरे अनेक शब्द असेच शिरलेले आपण पाहतों.

डॉ. सुनीतिकुमार चतर्जी, रे. किट्टेल वगैरेंनीं अशा प्रकारच्या शब्दांची एक यादीच तयार केली आहे. असें असतां 'मटची' करितां इराणी भाषेचा आधार घेण्याची जरूरी दिसत नाहीं.

एके काळीं पत्तींची वस्ती उत्तर भारतांत सर्वत्र होती, असें संशोधकांनीं सिद्ध केलें आहे. सिंध–बलुचिस्थानमध्यें अजून जिवंत असलेली ब्राहुई भाषा 'द्रविड' वर्गीय असें ठरलें आहे. सिंधु नदाच्या काठानें आर्यांच्या पूर्वी एके काळीं द्रविडवर्गीय जनांच्या वसाहती होत्या असें रे. शर्ट यांचें मत आहे. Traces of Dravidian element in Sindhi या लेखांत त्यांनीं शेवटीं असा निष्कर्ष काढला आहे :—I believe they (all these things) point to the fact that the Indus Valley was a home to some part of the Dravidian race, before the Aryan immigration (Ind. Ant. VII p. 293).

गंगायमुनातीरीं जेथें प्राकृत व्रजभाषा प्रथम निर्माण झाली तेथें त्यावेळीं द्रविडवर्गीयांची वस्ती असली पाहिजे, असें डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांना कबूल करावें लागलें आहे (Wilson Philological Lectures 1867 p. 46, 47, 81, 87, 108). बंगाल वगैरे उत्तर प्रदेशांत द्रविड वस्ती होती असें डॉ. सुनीतिकुमार चतर्जींचें तर ठाम मत आहे. आर्यीकरणामुळें आज हा वर्ग संपूर्ण अदृश्य झाला असला तरी, गांवांची नांवें, भाषेंतील लकबी, चालीरीतींतील कांहीं प्रकार वगैरे गोष्टींवरून याबद्दल शंकेला बिलकुल जागा नाहीं, असें डॉ. चतर्जींचें मत आहे. The Languages which were replaced by Magadhi Apabhransha in Bengal were Dravidian, Kol and Monkhmer, Tibeto-Barman...There are, again, some unmistakably Dravidian affinities in Bengali phonetics, Morphology, Syntax and vocabulary; but these agreements with Dravidian languages are not confined to Bengali alone, but are found in other North–Indo– Aryan Languages also. (Bengali Language : Its origin & Development p. 284). †

† अधिक संदर्भ : 'Kolerian & Dravidian Place names' J. R. A. S. 1903 Part III.

मध्ययुगांत नर्मदेच्या दक्षिणेला पट्टि किंवा पत्तिजन दृढमूल झाले. आजहि वऱ्हाडकडे हट्टिकार कांहीं कमी नाहींत. Hatkar—Dhangars seem to have been of considerable importance in Berar असें एंथोवेन लिहितो. पट्टि (हट्टि) किंवा पाडि जनांच्या वसाहतीच्या प्रदेशाला पट्टि, हट्टि किंवा पाडि असें नांव प्राप्त होणें साहजिकच आहे. महाराष्ट्र असें संस्कृत नांव धारण करणाऱ्या प्रदेशांचें देशीय मूळनांव **'मऱ्हाट'** असें आहे. मऱ्हाट किंवा मरहट्ट या नांवांतील 'हट्ट' हें पद विचारणीय आहे. यावरून या प्रदेशाला 'हट्ट' देश असें नांव होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. नाशिकच्या त्र्यंबकेश्वराला 'हाटकेश्वर' असें नांव असलेलें दिसून येतें; 'द्रष्टुं त्रैलोक्यभर्तारं त्र्यम्बकं हाटकेश्वरम्' हाटकेश्वर असा 'वाचस्पत्य कोशां' त आधार मिळतो. वसवपुराणांत श्रीशैलेश्वराला 'हाटकेश्वर' असें संबोधलें आहे. हाटकेश्वर हें नांव शिवाला कां आलें असेल ? हाट(क) देशाचा जो ईश्वर, तो हाटकेश्वर असा याचा सरळ अर्थ होण्याजोगा आहे. हट्टि किंवा हाटक जनांचा ईश्वर असाहि याचा अर्थ होऊं शकेल. श्री रामदासांनीं केलेल्या एका आरतींत हाटक करणाटकाचें नांव येतें. "जय देवी जय देवी जय वेदमाते...हाटक करणाटक करुणाकल्लोळी" असा तो उल्लेख आहे. यांतील हाटक हा महाराष्ट्र देशाला असलेला प्रतिशब्दच होय. शिव हाटकेश्वर तर पार्वती हाटकेश्वरी झाली. या हाटकेश्वरीची श्री रामदासांनीं करुणा भाकली आहे. 'हे देवी तुझ्या देशांतील (हाटक–कर्णाटांतील) जनांचें रक्षण कर' असा वर उद्धृत केलेल्या ओळीचा अर्थ आहे. तें कांहींहि असो; यावरून नाशिक ते श्रीशैलापर्यंतचा प्रदेश तो हाटक देश असें म्हणावयास कांहीं हरकत दिसत नाहीं.

नर्मदा ते कावेरीपर्यंत राष्ट्रकूटांचें राज्य होतें. राष्ट्रकूटांच्या राज्याला 'रट्ट पाडि' अशी संज्ञा होती. या पाडि–हाडि–(हाटक) देशांतच हाटकेश्वराच्या त्र्यंबक व श्रीशैल क्षेत्रांचा समावेश होतो. यजुर्वेदांतील 'पत्तीनां पति' तोच मध्ययुगांत हट्टीचा हाटकेश्वर झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हाटक देश किंवा सुवर्णभूमि

या हाटक देशाला सुवर्णभूमि असेंहि म्हणणें सार्थ आहे. सोन्याला हाटक असा एक पर्यायशब्द संस्कृत भाषेंत आहे. हट्ट किंवा हाटांतील जें, तें 'हाटक.'

हाट देशांत निर्माण होणारी विशेष वस्तु, म्हणून सोन्याला 'हाटक' नांव पडलें असावें असें मला वाटतें; निजाम-कर्णाटकांतील हट्टि नामक गांवांत जुनी सोन्याची खाण आहे. भरतखंडांतील अतिशय खोल खाण हीच असें सर मार्शल यांनीं मोहेंजोदारोवरील विख्यात ग्रंथांत आपलें मत व्यक्त केलें आहे. कोडगु (कर्णाटक) प्रांतांत हरिंगी (हिरण्यांगी) नांवाची एक नदी आहे. या नदीला कांहीं ठिकाणीं हट्टिहोळे 'सुवर्णावती' असेंहि म्हटलें जातें. पोन्नगुंद (हुन्नगुंद) वगैरे सुवर्णवाचक नांवांचीं गांवें या हट्टि देशांत थोडीं नाहींत. श्री-पुर, शिरोळ, शिरूर वगैरे श्री-वाचक गांवें तर सर्वत्र विखुरलेलीं आहेत. हिंदुस्तानांत ज्या सोन्याच्या खाणी सांपडल्या आहेत त्या या हाटक देशांतच आहेत.

खिस्ताब्दाच्या प्रारंभापूर्वीपासून सातवाहन, कदंब, गंग, चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे प्रतापशाली प्रख्यात राजवटींत हट्ट देशानें अखिलभारतीय जनांचें चित्त आकर्षित केलें. हट्ट देश जसा कांहीं भारताचें केंद्रच बनला! वर उल्लेखिलेल्या वैभवशाली राजघराण्यांच्या कारकीर्दींत या केंद्राकडे संपत्तीचा पूर वहात असला पाहिजे हें उघड आहे. यामुळेंहि हाट देशाचें 'सुवर्णभूमि' हें नांव सार्थ झालें असलें पाहिजे.

पण बाराव्या शतकानंतर सेऊण व होयसळ यादवांच्या यादवींत हाट देशाचे दोन तुकडे झाले. मऱ्हाट व कन्नड असा हा प्रदेश दुभंगला गेला. पुढें या दुफळीमुळें हट्ट देशाच्या वैभवाला ओहोटी लागली. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूटांच्या वेळचें तें वैभव स्वप्नवत् झालें. पुन्हां तसली ती ऊर्जित स्थिति कधींच आली नाहीं. आज या जुन्या पट्टी-हट्टीची स्मृति पार नष्ट झाल्यासारखी वाटते. तरीपण पट्टि-पाडि-हट्टि या प्रकारच्या ग्रामनामांतून ती स्मृति अंधुक रीतीनें थोडीफार तरी शिल्लक राहिली आहे हेंच आपलें भाग्य समजलें पाहिजे.

★ ★ ★

: २ :

हे 'मरहट्टे' कोण ?

अर्थ किंवा भाव अव्यक्त आहे. अव्यक्त अर्थाच्या अभिव्यक्तीसाठीं व्यवहारांत निरनिराळे संकेत उपयोजिले जातात. चित्र, आकृति, मूर्ति वगैरेंप्रमाणें शब्द (ध्वनि) हाहि एक अशाच प्रकारचा संकेत आहे. चित्ररूपाचा संकेत, मूर्ति वगैरे निरनिराळ्या स्वरूपांत आपणांस पाहावयास मिळतो. हरप्पा, मोहेंजोदारो येथें मिळणाऱ्या विटांवरील चित्रें हा एक लिपीचा प्रकार आहे असें कळतें. पण चित्र किंवा आकारामागील अर्थ, परंपरा-विच्छेदामुळें नष्ट झाल्यास, त्या संकेतापासून कांहींच अर्थबोध होत नाहीं. यामुळें मोहेंजोदारोंतील त्या चित्रमय लिपीचा अर्थ काय हें तज्ज्ञांना मोठें कोडेंच होऊन बसलें आहे ! लक्ष्मी, सरस्वती, शिव, अनंत (शेषशायी) वगैरे मूर्तींच्या मागील अभिप्रेत अर्थ आज जवळ जवळ विसरला गेल्यासारखा झाला आहे. अशा ठिकाणीं मनुष्याला आपल्या अज्ञानाची जाणीव होण्यास उशीर लागत नाहीं.

पण आपल्या भाषेंतील शब्दसंकेतांचें तसें होत नाहीं. आपल्या बोलींतील शब्द कानीं पडल्यानंतर त्यापासून आपणांस कांहीं अर्थबोध झाल्यासारखा वाटतो खरा; आणि झालेला अर्थबोध संपूर्णपणें खोटा असतो असेंहि नाहीं. कारण विशिष्ट कालीं त्याला विशिष्ट अर्थ असतो. पण त्या विशिष्ट पदसमुच्चयाला

सर्वकाळीं, सर्वस्थळीं तोच अर्थ होता किंवा असतो असें मानणें फार धोक्याचें आहे. शब्दाचा अर्थ युगमानाप्रमाणें वेळोवेळीं बदलत असतो ही गोष्ट पुष्कळांच्या ध्यानांत न आल्यानें अनेकदां विचारांत गोंधळ उत्पन्न होतो.

उदाहरणार्थ प्रस्तुत 'मराठा' हा शब्दच पहा. आज महाराष्ट्रांत स्थिर झालेला प्रत्येक मनुष्य 'मराठा' समजला जातो; आणि तसें मानणें युक्तहि आहे. मात्र प्राचीन काळींहि असाच अर्थ होता अशी समजूत भ्रामक ठरेल. महाराष्ट्रांतील प्रत्येक नागरिक आपण 'मराठा' आहोंत, असें आज मोठ्या अभिमानानें सांगण्यास प्रवृत्त होत असला तरी पन्नास पाऊणशें वर्षांपूर्वी अशी स्थिति नव्हती हे पुष्कळांना माहीत नसेल. मराठा या शब्दानें ध्वनित होणारा त्यावेळचा अर्थ आजच्याहून निराळा होता. मराठ्यांत त्याकाळीं ब्राह्मणाचा समावेश होत नव्हता. ब्राह्मण बहुधा स्वतःस महाराष्ट्रीय म्हणवीत. कारण मराठा ही एक विशिष्ट जात होती व आहे. §

मरहट्टे आणि महाराष्ट्रिक

आजच्या मराठ्यांच्या पूर्वजांचा उल्लेख प्राकृत ग्रंथांतून 'मरहट्टे' अशा रीतीनें केलेला आढळतो, आणि संस्कृत ग्रंथांतून यांनाच 'महाराष्ट्रिक' अशारीतीनें संबोधलेलें दिसून येतें. मध्यंतरीं महाराष्ट्रीयांमध्यें ब्राह्मणांचा समावेश होत असला तरी प्राचीन काळीं 'महाराष्ट्रिक' हा शब्दहि मराठे किंवा मरहट्टे यांना उद्देशूनच वापरलेला दिसतो; दहाव्या शतकांतील राजशेखर कवि आपण महाराष्ट्रीय कुलवधूशीं विवाह केल्याचें सांगतो. ती महाराष्ट्रीय सुंदरी चाहुआण (चव्हाण) कुलांतील होती असें खुद्द राजशेखरानें सांगितलें आहे:—

"चाहुआनकुलमौलिमालिका राजशेखरकवीन्द्रगेहिनी" (कर्पूरमंजरी)

---

§ एकोणिसाव्या शतकाच्या शेवटपर्यंत (विसाव्या शतकाच्या उदयापर्यंत) म्हणजे दक्षिणेंत राष्ट्रीय भावना जागृत होईपर्यंत महाराष्ट्रीय ब्राह्मणाला 'मराठा' असें म्हटलें असतां त्याला आपला अपमान झाला असें वाटे व चटदिशीं रागानें तो प्रत्युत्तर करी, "छे ! छे ! मी मराठा नव्हे, दक्षिणी ब्राह्मण आहें." जदुनाथ सरकार यांचें शिवाजी चरित्र, अनुवाद : श्री. वि. स. वाकसकर पृष्ठ २८५ (Shivaji & his times—Sir Jadunath Sarkar, 1919, p. 484.)

: यावरून आज मराठे किंवा महाराष्ट्रीय या शब्दांत जो व्यापक अर्थ आला आहे तो पूर्वीच्या "दृढलघुश्यामाङ्गान् सहमानान् अभिमानान्... कलहशीलांश्च।" अशा रीतीनें अपभ्रंश काव्यत्रयींत वर्णिलेल्या प्राचीन 'मरहट्टे' किंवा 'महाराष्ट्रिक' या शब्दांत नाहीं हें निराळें सांगावयास नको.

मरहट्टे यांची पूर्वपरंपरा

'महाराष्ट्र', या शब्दापासून विशिष्ट जन हा अर्थबोध होत नाहीं, कारण हा प्रदेशवाचक शब्द आहे. म्हणूनच या लोकांचें प्राचीन जनवाचक नांव 'महाराष्ट्रिक' नसावें. या बाबतचें विवेचन यापूर्वी पहिल्या प्रकरणांत आलें आहे. 'महाराष्ट्र' या शब्दसमुच्चयाला कारणीभूत झालेला निराळाच एक शब्द असावा आणि तो 'मरहट्ट, किंवा 'मऱ्हाट' हाच होय हेंहि यापूर्वी स्पष्ट केलेलेंच आहे. आतां 'मरहट्टे' यांची पूर्वपरंपरा काय असावी याचा छडा लावणें जरूर आहे.

'मरहट्ट' यांत 'हट्ट' म्हणजे प्रदेश किंवा मंडळ असा अर्थ निश्चित आहे. 'झाडमंडळ' यांतील मंडळ म्हणजे 'हट्ट' आणि 'झाड' म्हणजे 'मर' असा हा अनुवाद आहे. वऱ्हाड प्रांतांत झाडे या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या बऱ्याच जाती आहेत. (R. V. Russell and Hiralal Tribes & Castes of Central Provinces Vol I. pp. 361; 249 to 255; and Tribes and Castes of Nizam Dominions, Vol. I. page 165.) 'झाडि' किंवा 'झाडे' या शब्दांचा अर्थ रसेल आणि हिरालाल यांनीं पुढीलप्रमाणें दिला आहे.

"A name often applied to the **oldest residents** of a Caste in any locality of the Central provinces."

यावरून "झाडे" म्हणजे **मूळचे रहिवासी** असा अर्थ स्पष्ट होतो. मरहट्टे, 'मर' (झाडे) हे लोक येथील (म्हणजे वरहाटांतील) मूळचे रहिवासी असा याचा अर्थ आहे. श्री समर्थ रामदास यांच्या देवीच्या एका आरतींत 'हाटक' असें महाराष्ट्रालाच उद्देशून उल्लेखिलेलें आढळतें. 'हट्टि' देशांतील या जनांस 'हट्टे' या नांवानेंहि संबोधण्यास हरकत नाहीं. 'हट्टे' हें नांव कांहींना काल्पनिक वाटेल. पण सुदैवानें 'हटगार' जन अजून या प्रदेशांत

प्रामुख्यानें असलेले आपणांस दिसून येतें. आज ' हटगार ' हा शब्द किंचित् मागें पडत असला तरी या भागांतील देशमुख, पाटील वगैरे घराणीं ' हटगार ' वंशीयच आहेत हें या भागांतील जनजातींचें यथातथ्य वर्णन करणाऱ्या ग्रंथांवरून कळून येतें. (Berar Gazetteer p. 202-222. Mr. Sherring's Vol. III p. 105; Tribes and Castes of Nizam's Dominion. Vol. I. See Hatgar and Dhangar; Enthoven Vol. I. p. 312 etc.) अशा रीतीनें आजहि हटगार या नांवानें ओळखलीं जाणारीं घराणीं आपणांस पुष्कळ आढळतात. हटगार यांतील उद्योग किंवा वृत्तिवाचक ' कार ' ' गार ' हा तद्धित प्रत्यय वगळला असतां ' हट ' (हट्ट) शब्द राहतो. हट्ट म्हणजे गौळवाडा; हट्टे म्हणजे गवळी, धनगर, धनवडे. हीं नांवें ' हटगार ' या शब्दाचेच पर्याय होत.

कर्णाटांतहि हट्टिकार जन आहेत. या भागांत हट्टिकार–दन(धन)गार जनाला आणखी एक पर्यायशब्द रूढ आहे; यांना ' हालुमतदवरु ' म्हणण्याची प्रथा आहे. हालु म्हणजे दूध. हालुची वृत्ती करणारे म्हणजे धनगर-गवळी असाच याचा अर्थ होतो. यावरून या हालुमतांच्या हटगार–धनगरांच्या जीविकेच्या पूर्वपरंपरेची कल्पना येण्यास हरकत नाहीं.

' हट्टे ' यांचे पूर्वज

' मरहट्ट ' हा शब्द कानडी आहे हें मागें दाखविलें आहेच. प्राचीन कानडींत ' ह ' कार वर्ज्य असून संस्कृतभाषीयांच्या संपर्कामुळें त्यांच्यांत ' ह ' काराचा उच्चार नवीनच रूढ झाला. यामुळें प्राचीन काळांत मागें जावें तसें ' हट्टि ' या शब्दांत ' ह ' काराच्या ऐवजीं ' प ' कार असणें स्वाभाविक आहे. यजुर्वेदांतर्गत रुद्राध्यायांत आलेल्या ' पत्ति ' जनांचा संबंध या ' हट्टि ' जनांशींच असावा असें खालीं उद्धृत केलेल्या प्रमाणांवरून दिसून येईल.

महाभारत व भागवतांतील वर्णनावरून यादवजन गोपालनवृत्तीचे होते हें सर्वमान्य आहे. " यादवं गोमहिषादिके धने " कोशांतील या विवरणावरून या जनांचें हें नांव कसें सार्थ आहे याचा बोध होतो. यादवजनांना अंधक–वृष्णिकुल असें दुसरेंहि एक नांव आहे असें पुराणें व पाली ग्रंथांवरून दिसून येतें. ' अंधस् ' शब्दाला निरुक्तांत रस, अन्न असा अर्थ सांगितला आहे.

अन्नासारखा रस म्हणजे दूध असाच अर्थ येथें अभिप्रेत असावा. प्राचीन संस्कृतांतील हा शब्द परभाषेंतून आलेला आहे असें दिसतें. याप्रमाणेंच रसार्थक हालु शब्दहि कानडी (व पूर्वद्राविड पालु) दुग्धवाचक आहे. अंध, अंधक असे उल्लेखिले जाणारे अंधकवृष्णिजन यादववंशीय धनगर होत. तमिळ प्राचीन ग्रंथांतून अंडर् जनांचा उल्लेख येतो. डॉ. एस्. कृष्णस्वामी अय्यंगार यांच्या मतें अंडर् व अंधक हे एकच आहेत; (The Satwats : Proceedings of the II Oriental Conference, 1922). आणि यांनाच आंध्र म्हणत असावेत असेंहि त्यांनीं सुचविलें आहे. कर्णाटांतील धनगरांत अंडे (कुरुब) अशी पोट जात आहे. गवळ्यांना इडैयर् असें तमिळ भाषेंतील नांव आहे. इडा-इळा-इरा (रस-दूध) यांचा धंदा करणारे ते इडैयर्. पुन्हा तमिळ 'इडैयर्' आणि कानडी 'हालुमतदवरु' हीं दोन्ही हटगार धनगर यांचींच पर्याय-नामें झालीं. अंडर् व अंडे या नांवाची जात तमिळ व कर्णाट या दोन्हीं प्रांतीं असून आंध्र या नांवावरून यांचें मुख्य माहेरघर तेलगु देश होता असें दिसून येतें. अंडर, अंडे हे हटगार धनगर असल्यानें आंध्रहि मूळ याच वृत्तीचे होते असें म्हणणें प्राप्त आहे. अंधकवृष्णींची पूर्वपरंपरा अशाप्रकारें गोपालनवृत्तीशीं जाऊन भिडते. वृष्णि शब्दाला बकरा असा एक अर्थ असून त्यांच्या पूर्वजांच्या धनगर वृत्तीचें तें सूचक असण्याचा संभव आहे.

आजच्या मराठ्यांतील पुष्कळ कुळांचा संबंध यादव वंशाशीं जाऊन पोंचतो. 'जाधव' हे यादव शब्दाचें एक रूप आहे. मराठे धनगरांत हंडेवजीर अशी एक पोटजात आढळते. मराठ्यांत 'भोजे' हि आहेत. भोजकवंश यादवांचीच एक शाखा होय. कालप्रवाहांत पुष्कळ बाहेरच्या जाति यादवांत व मराठ्यांत येऊन एकजीव झाल्या असल्या तरी, त्यांचा मूळ पिंड असलेला अतिप्राचीन गट, हा आर्य पूर्वकालीन पत्तिजनांपैकीं हटगार-धनगरांची एक शाखा असावीसें वाटतें.

डॉ. प्रिलस्की (Dr. Jean Przyluski) यांनीं Name of the God Vishnu & Krishna Legend या आपल्या लेखांत अंधकवृष्णि यादव वंश हा आर्येतर (द्रविडवर्गीय) होता असें संस्कृत, पाली भाषेंतील पुराणें व नाना जातककथा वगैरेंच्या आधारानें सिद्ध केलें आहे. त्या लेखाचे शेवटीं

" Diverse indications point to the Dravidian substrata having made itself felt in Mathura for a long time..." (Mythic Society Journal, Silver Jubilee Number page 48) असा निर्वाळा ते देतात. विष्णु-कृष्ण परंपरेविषयीं निराळ्या दिशेनें संशोधन करीत असतां गंगायमुनातीरीं (मथुरा) वसाहत करून राहिलेलीं यादव घराणीं आर्येतर वर्गीय (द्राविडवंशीय) होतीं या निर्णयाला ते येऊन ठेपले. प्रा. प्रिलस्की यांचा हा निर्णय पत्तिजनांसंबंधींच्या पूर्वी सांगितलेल्या मतास पोषकच आहे. यामुळेंहि पत्ति (हट्टि) या आर्येतरवर्गीय शब्दानें निर्दिष्ट होणारे लोक आणि प्रा. प्रिलस्की यांच्या संशोधनाप्रमाणें आर्येतर म्हणून ठरलेले अंधकवृष्णीय यादवकुल हे दोन्ही गोपालक एकच होत असें म्हणावयास प्रत्यवाय दिसत नाहीं.

यजुर्वेदांत (रुद्राध्यायांत) पत्तींचें नांव येतें. यजुर्वेदांतील हे 'पत्ति' ऋग्वेदांत कोणत्या नांवानें निर्दिष्ट झाले असतील ? ऋग्वेदांत यदूचें नांव सुमारें चौदा वेळां येतें. ऋग्वेदांतील यदुजन आणि महाभारतांतील यादवजन हे एकच होत असें पुष्कळांचें मत आहे. महाभारतांतील यादव हे आर्येतर पत्तिजन असतील तर ऋग्वेदांतील यदुजनहि अर्थात् आर्येतर असणारंच; आणि ऋग्वेदांतील यदु हे आर्येतर (द्रविडवर्गीय) असावेत असें कांहीं विद्वानांचें मतहि आहे. " नि तुर्वशं नि याद्वं शिशीय्यति भिग्वाम शं स्यं करिष्यत् ॥ " (७,१९,८)...हे इंद्रा तूं यादव आणि तुर्वश यांना अंकित कर " अशी प्रार्थना केलेली या मंत्रांत दिसते. शिवाय ' दासा...यदुः तुर्वः (१०-६२-१०). या उल्लेखांत तसेंच नवव्या मंडलांत (६२-२) यदुतुर्वश हे आर्यशत्रु शंबरासुराच्या पक्षांत आढळतात. यावरून यदु (तुर्वश) वंश हा मुळांत आर्येतर असावा हा तर्क बलवत्तर ठरतो. यदूंच्या बरोबर ऋग्वेदांत तुर्वशांचेंहि नांव येतें.

यदु तुर्वशांच्या बरोबर आणखी तीन नांवें कांहीं ठिकाणीं प्रामुख्यानें येतात. अनु, द्रुह्यु व पूरु हीं तीन नांवें मिळून यांना ' पंचजन ' म्हणण्याची प्रथा आहे. महाभारतांतील उल्लेखाप्रमाणें ही सर्व एकाच घराण्याची मंडळी (भावंडें) असावीत असें दिसतें. ययातीचे हे पांच पुत्र असें महाभारतांत वर्णन आहे. या सर्वांत पूरु हा वडील होय.

' मरहट्टा 'पासून मागें जातां जातां ' हट्टिकार ' पत्तिजनांपर्यंत आपण

येऊन पोंचतों. मराठ्यांतील भोज व जाधव-यादव या कुळींची परंपरा महाभारतकालीन यादवांपर्यंत भिडते. वऱ्हाड, मरहट्टांचें मूळ स्थान; हें भोज कुळाचें माहेरघर; यावरूनहि मरहट्टे व यादव वंशांचा घनिष्ट संबंध असलेला दिसून येतो. मरहट्टे-हट्टि-पत्ति हे जर आर्येतर द्रविडवर्गीय जन असतील तर त्यांचे पूर्वज यादव हेहि आर्येतरच असले पाहिजेत असें म्हणणें क्रमप्राप्त आहे. ऋग्वेदांतील वर नमूद केलेले कांहीं उल्लेख वरील तर्कास पोषक आहेत. प्रिलस्कींनीं स्वतंत्र दिशेनें केलेलें संशोधनहि अंधकवृष्णि यादव आर्येतर द्रविड वर्गीय असावेत हाच निर्णय देत आहे.

यदु-यादव हे जर आर्येतर द्रविडवर्गीय असतील तर त्यांचे बाकीचे तीन बंधुजनहि द्राविड शाखेचेच असणें संभवनीय आहे. वेदांतील यदु, तुर्वश, हीं नांवें कोणा एका व्यक्तीचीं नसून तीं जनवाचक विशिष्ट नांवें आहेत. पुढें महाभारतांत या वेदकालीन प्राचीन परंपरा कथारूपानें लिहिते-वेळीं त्यांना व्यक्तिरूप दिलें आहे. वेदांतील हीं नांवें कांहीं विशेषार्थसूचक आहेत. महाभारतांतील धर्म, भीम, धृतराष्ट्र वगैरे नांवें शीलगुणदर्शक असून व्यक्तींच्या विशिष्ट प्रकारांची (Types) निदर्शक आहेत. तीं पाळण्यांत ठेवलेलीं नांवें नव्हेत. यदु हें नांव गोपालक या अर्थाचें आहे. तुर्वश यालाहि असाच अर्थ असल्याचें दिसून येतें.

याच रीतीनें पूरु शब्दहि बराच उद्बोधक वाटतो. पूरु हा या पंचजनांत सर्वांत वडील असें महाभारतावरून कळतें. पूरु शब्दांत नगर या अर्थाच्या 'ऊरु' या द्रविडवर्गीय शब्दाचा पडसाद ऐकूं येतो. पूर किंवा पुर हें नांव देवांच्या विरोधी असुरांच्या संबंधांतच विशेषेंकरून आढळतें. त्रिपुरासुराची प्राचीन कथा सुप्रसिद्ध आहे. पुरंदर किंवा पुरघ्न असें इंद्राला असलेलें नांव वरील तर्कास पुष्टिच देत आहे. इंद्रविरोधी पूरु हे पुढें यदु-तुर्वशांप्रमाणें इंद्राच्या गोटांत गेले असल्यास आश्चर्य नाहीं. शेंकडों तुकडे करून लांडग्यांना चारलेल्या यतींच्यापैकीं कांहींनीं इंद्राची करुणा भाकून त्याला प्रसन्न करून घेतलें व ते पुढें इंद्रभक्त झाले हें अशाच प्रकाराचें आणखी दुसरें उदाहरण होय.

पूरु हे मोठमोठीं शहरें वसवून नागरिकतेच्या उच्चश्रेणींत असलेले जन असावेत. ९९ पुरांचा इंद्रानें नाश केल्याचीं वर्णनें आहेत. सुदास राजाशीं

झुंजत असलेल्या पूरु वगैरेंचा इंद्रानें नाश केला असें दाशराज्ञ कथेवरून कळतें. हरप्पा, मोहेंजोदारोसारखीं मोठमोठीं शहरें वसवून वैभवानें येथें वसाहत केलेल्या वेदपूर्व कालांतील जनतेच्या समस्येचा कांहींसा अर्थ येथें होण्यासारखा आहे.

सभोंवार कोट–किल्ले बांधून मोठ्या शहरांतून राहाणारे जन या अर्थानें ऋग्वेदकालीन ऋषींनीं यांना 'पूरु' असें नांव दिलेलें असणें शक्य आहे. आर्यपूर्वकालीन हरप्पा, मोहेंजोदारोसारखीं प्राचीन विशाल शहरें पाहिलीं तर " पूरु " या नांवाचें औचित्य लक्षांत आल्याविना राहाणार नाहीं. पूरूंचे दुसरे भाई अजून पशुपालन स्थितींतच होते हें त्यांच्या नांवावरूनच व्यक्त होत आहे.

भारतांत आलेल्या आर्यांना शहरें तर राहोत, चांगलीं घरेंसुद्धां अजून माहीत नव्हतीं असें वेदांतील वर्णनावरून कांहीं संशोधकांनीं तर्किलें आहे. ('The Aryans were a people who had never known a city. Their way of life is clearly presented in the Rigveda, and is far from being that of the complicated urban organisation.' (Pre-historic India, Stuart Piggot, Penguin Books p. 263) यावरून पूरु हे वेदपूर्वकालीन मोठ्या शहरी–संस्कृतीचे प्रतिनिधि असावेत असा तर्क करणें अनुचित होणार नाहीं. आणि पूरु जर आर्यपूर्व जन, तर त्यांचे दुसरे सवंगडी यदु–तुर्वश हे सुद्धां आर्येतर खचितच होत. हरप्पा नांवाचा उच्चार हडप्पा असा पंजाबींत आहे. हरप्पा–हडप्पाचें पडुधातुसाधित पाडा–पारा या ग्रामनामाशीं बरेंच साम्य पण आहे. हें ग्रामनाम किती प्राचीन आहे हें मात्र निश्चित नाहीं. या भागांतील चिनाब नदीचें प्राचीन नांव चंद्रभागा असें आहे. यांतील चंद्र शब्द आर्येतरवर्गीय पत्तिजनांच्या भाषेंतील आहे. हडप्पा–हरप्पाजवळ मिळालेल्या चित्रांपैकीं वृषभाचीं चित्रें लक्षणीय आहेत. ही संस्कृति पत्तिजनसंबंधी पूरूंचीच असणें असंभवनीय नाहीं.

'द्रुह्योः सुता वै भोजाः' यावरून द्रुह्यु हे यादवांपैकींच होत असें दिसतें. भोजराजे ययाति वंशांतील होते असें श्रीकृष्ण सभापर्वांत म्हणतो. अनूंच्याबद्दल विशेष माहिती मिळत नाहीं. पण ते बाकीच्यांत सामील झाले असें महाभारतांत सांगितलें आहे. तुर्वशहि असेच यादवांत विलीन होऊन गेल्याचे उल्लेख आहेत. मुख्य शाखा पूरु; तीसुद्धां जाऊन पुढें यादव नांवांतच सर्वांचा समावेश होऊं

लागला. श्रीकृष्णासारख्या तेजस्वी महापुरुषाच्या जन्मामुळें यादव कुळाचें महत्त्व वाढून बाकीचीं त्यांतच सामील झालीं असावींत.

मुळांत जरी हा यदुवंश (पस्तिजन, गोपालक) आर्येतर असला तरी पुढें आर्यांचा संपर्क वाढत गेला तसा या दोघांमधील विरोध कमी होत गेला हें पुढील काळांतील अनेक घटनांच्या कथांवरून कळून येतें. ऋग्वेदपूर्व काळींच यदुवंशीय पस्तिजनांचें आर्यीकरण होण्यास आरंभ झाला असावा असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे. याला 'चंद्रमस्' सारखे भाषिक पुरावेहि मिळतात. वेदकालीन 'पस्ति' या शब्दाचें, 'हट्टि' (हटगार) असें हकारयुक्त नवें रूपांतर पुढें आलें हें आर्यांच्या गाढ संपर्काचें द्योतक आहे. 'मऱ्हाटे' हे आर्य-द्रविड-वंशीय आहेत असें श्री. जाधवराव आदि आधुनिक विचारवंत जें म्हणतात त्याचें प्रत्यंतर वरील परंपरेमध्यें आपणांस पाहावयास मिळेल. गंगा-यमुनातीरीं शौरसेनी प्राकृत निर्माण होण्यास जो यादववंश कारण झाला तो मुळांत आर्यवंशीय नव्हता असेंच म्हणावें लागतें. कारण प्राकृतांतील ऱ्हस्व 'ए' 'ओ' कारादि स्वर आणि 'ळ' कारादि व्यंजनें संस्कृत भाषेला परकीय असून त्यांचा भरणा प्राकृतामध्यें तर विशेष दिसतो. प्राकृतांतील या वैलक्षण्याला कारण बाहेरचे परकीय द्रविड लोक असें म्हणण्याची प्रथा आहे. पण प्राकृत भाषा ज्यांच्यामुळें निर्माण झाली ते शौरसेनी यादव लोक म्हणजेच मुळांत आर्यीकृत झालेले पस्तिजन (हटगार-गोपाळ) हेच या उच्चारभेदाला कारणीभूत असावेत असें म्हणणें जास्त सयुक्तिक होणार आहे. या योगें शौरसेनी प्राकृताचा माहाराष्ट्रीशीं असलेला आत्मीय संबंध सुस्पष्ट होतो. आणि वररुचीच्या व्याकरणांत शेवटीं आलेल्या 'शेषं माहाराष्ट्रीवत्' या सूत्राची संगति लागते.

महाभारतांतील अनेक कथांच्या आधारानें पण ही गोष्ट जास्त स्पष्ट होते. ऋग्वेदकालींच यदु इंद्रभक्त झालेले कांहीं ऋचांवरून दिसून येईल. महाभारतांत कृष्ण हा ऋषिमुनींचा त्राता व याविरुद्ध त्याचे मामे कंस जरासंधादि राक्षसी वृत्तीचे होते अशीं वर्णनें येतात. जुन्या कांहीं चालीरीतींचे प्रकार यदुजनांत अजून राहिलेले पुराणकथेंतून डोकावतातच. मामाभाच्यांतील वैराचें कारण काय असावें हा एक विचारार्ह प्रश्न आहे. मुलाच्या मुलाऐवजीं मुलीच्या मुलाला जेथें वारसाहक्क येतो त्या समाजांत मामा-भाच्यामधील विरोध पितृप्रधान

कुटुंबपद्धतींत दिसून येणाऱ्या भावाभावांमधील विरोधाइतकाच तीव्र आणि तीक्ष्ण असतो. कंसानें (मामानें) जन्मापूर्वीपासूनच कृष्णाचा (भाच्याचा) द्वेष करावा या विलक्षण प्रकाराचें रहस्य पितृप्रधान कुटुंबपद्धतींतील आपणांस कळणें शक्य नाहीं. पुढें भगिनीसुत अभिमन्यूच्या अकालीं निधनास श्रीकृष्णच पर्यायानें कारण झाला अशी एक कथा स्त्री (लोक–) गीतांतून ऐंकावयास मिळते. यादवांतील ही रूढि त्यांच्यांतील अतिप्राचीन आर्यीकरण होण्यापूर्वीच्या मातृप्रधान कुटुंबपद्धतीचा एक अवशेष तर नसेल ना ?

. या तर्काला पोषक असा एक पुरावा पुराणांतरीं आढळतो. ययाति राजाच्या भोगविलासाच्या विविध कथा आहेत. त्यांपैकीं पद्मपुराणांतील भूमिखंडांत येणारी एक कथा येथे विचारार्ह आहे. ययातीनें पूरूस आपली जरा देऊन तारुण्य संपादिलें आणि अश्रुबिंदुमति नामक सुंदरीशीं विवाह केला. अश्रुबिंदुमतीनें ययातीस संपूर्णतया आपल्या आधीन ठेवण्याचा प्रयत्न केला आणि त्यांत तिला यश मिळालें. ययाति अश्रुबिंदुमतीशींच तीन्ही त्रिकाल रममाण होतो ही गोष्ट शर्मिष्ठा आणि देवयानी यांना कशी खपणार ? सवतीपुढें त्यांना हार खावी लागली आणि साहजिकच त्यांना फार खेद वाटला. शर्मिष्ठा आणि देवयानी यांनीं ययातीस त्यानें आपला संबंध सोडूं नये म्हणून खूप विनवून पाहिलें पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. आपल्या विनवण्या ययातीनें झिडकारल्या हें पाहून शर्मिष्ठा-देवयानी चिडल्या आणि त्यांनीं "तुझ्या वंशांतील पुरुष मातुलकन्यापरिणय करतील व मातृद्रव्याचे वांटेकरी होतील" असा ययातीस शाप दिला (६४. ८३, प्राचीन चरित्रकोश : ययाति पहा.).

मराठ्यांत मामाच्या मुलीशीं लग्न करण्याची चाल आजतागायत रूढ आहे. ही चाल द्रविडांच्या संपर्कानें मराठ्यांत आली अशी समजूत आहे. पण महाभारतकालीं यादवांत ही चाल होती हें सुभद्रा वगैरेंच्या वैवाहिक संबंधांवरून निश्चित दिसतें. येथें एक विचार येतो. आर्यांना कांहीं रूढि विचित्र वाटावयाच्या पण त्या सहजासहजीं मोडणें शक्य नव्हतें. अशाप्रसंगीं सदर रूढींना शापरूप बनवून त्यांच्यापासून आपला पिंड सोडवून घेणें ही एक पळवाट त्यांना सुचलेली आहे. प्रचलित नको असलेल्या रूढीस शापाचें निमित्त देऊन त्यापासून सुटका व तदनंतर समाधान (Rationalization) प्राप्त करून घेण्याचें प्रत्यंतर

पद्मपुराणांतील वरील उल्लेखावरून येत आहे. द्रविडनामक दुसऱ्या कोणा एका बाहेरच्या जातीच्या संपर्कानें ही चाल यादवांत नव्यानें आली असली तर ब्राह्मणांप्रमाणें ती कांहीं शाखांत कांहीं भागांतच रूढ असावयास पाहिजे होती; पण मराठ्यांत ही रूढि सर्रास आढळते. या कारणास्तव मुळांतच यदु, तुर्वसु, जनांत मातुलकन्यापरिणयाची चाल–मातृप्रधानकुटुंबपद्धति–रूढ असावी असें म्हणणेंच क्रमप्राप्त ठरतें.

कांहीं मराठ्यांत आतेच्या मुलीशीं (मामाच्या मुलीप्रमाणें) विवाह करण्याची चाल आहे. पण मामाच्या मुलीशीं लग्न करण्याची चालच अधिक रूढ असून दुसरी कांहीं थोड्या कुळांत राहिली आहे. ही चाल द्रविडांच्या प्रभावामुळें मराठ्यांत रूढ झाली असा कांहींचा तर्क आहे. पण हें योग्य वाटत नाहीं. द्रविडांच्या भाषेचे व चालीरीतींचे परिणाम आर्यांवर होण्याइतके द्रविड प्रभावी होते काय हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

आर्यांच्या प्रभावानें द्रविडांच्या चालीरीती पुष्कळ बदलल्या आहेत. द्रविडांचाहि आर्यांवर परिणाम झाला नाहीं असें नव्हे. जे परिणाम दिसतात ते द्रविड–प्रभावाचे द्योतक नसून अपरिहार्य रूढीचे निदर्शक आहेत. इंग्रजींत Bangle, Monkey, Saree वगैरे शब्द शिरले आहेत ते देशी भाषांच्या प्रभावामुळें नव्हे. प्रभावी भाषा ही तद्भाषिकांच्या सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक श्रेष्ठतेची निदर्शक असते. अशा कोणत्याहि कारणामुळें इंग्रजीवर देशभाषा प्रभावी परिणाम करूं शकलेल्या नाहींत. केवळ लौकिक व्यवहाराच्या अनुकूलतेकरितां इंग्रजीनें कांहीं शब्द उचलले आहेत. याच्या उलट देशभाषांवर मात्र इंग्रजीचा विविध प्रकारचा प्रभाव पडल्याचें दिसून येतें. देशभाषांतील शब्दरचना, वाक्यपद्धति, साहित्याचे प्रकार वगैरे नानाविध फेरबदल इंग्रजीच्या वर्चस्वाची साक्ष देत आहेत. आर्यांत झालेले बदल हे कसून झालेल्या विरोधाअंतीं केवळ अपरिहार्य म्हणून झालेले आहेत. द्रविडवर्गीयांत आरंभीं थोडा विरोध दिसला तरी पुढें ते स्वसंतोषानें आर्यतंत्र बनले व त्यांतच अभिमान मानूं लागले. उलट आर्यांनीं द्रविडांपासून घेतलेल्या गोष्टींवरहि, जणूं कांहीं त्या आपल्या पूर्वपरंपरेंतीलच आहेत असा वेष चढविला.

(रुद्र) शिव कोणत्या जनांचा देव याविषयीं आज वाद माजले आहेत.

' अग्निमीळें'तील 'ळ' काराचा उच्चार संस्कृतांतीलच असा आग्रह धरणारे थोडे नाहींत. याच्या उलट कानडी ही संस्कृतोद्भव भाषा असा समज प्राचीन कानडी साहित्यांत असल्याचें दिसून येतें.

मातुलकन्या विवाहाला निषिद्ध मानूनहि दक्षिणापथांत त्याला अपवाद मानणारें सूत्र पुढें आलें; तरी पण ही चाल सर्व ब्राह्मणशाखांनीं स्वीकारली नाहीं ती नाहींच. मराठ्यांत मात्र ही चाल नसलेली एकहि कुळी नाहीं, इतकेंच नव्हे तर कांहीं कुळांत वेली परतणेंची म्हणजे आते मामे बहिण भावंडांत विवाह करण्याची चालहि तगून राहिली आहे. याची संगति कशी लावावयाची ? यादवांच्या पुरातन रूढींपैकीं ही रूढि असावी व ती कांहीं कडव्या लोकांनींच आग्रहानें चालू ठेवली असावी असें मानणेंच जास्त तर्कशुद्ध आहे. मरहट्टीयांचें मूळ द्रविडवर्गीयत्व दर्शविणारी ही एक अवशिष्ट पुरातन रूढि आहे. कांहीं कुळांनीं आर्यांच्या अनुकरणांत पूर्व परंपरेस थोडी मुरड घालून श्रेष्ठ–कनिष्ठ-भावसूचक मातुलकन्या घेणेंची रूढि तेवढीच पुढें चालविली; पण जुन्यांत बदल न खपणाऱ्या परंपराप्रिय थोड्या घराण्यांनीं ती चाल जशीच्या तशी तगवून धरली. प्रभावी वर्चस्वाच्या परिणामा-मुळें शिष्टाचार बनलेल्या चाली बहुसंख्याकांत दिसतात व जुने संप्रदाय अगदीं थोड्या नाफेरवाल्यांत राहात असतात. डॉ. सौ. इरावतीबाई कर्व्यांप्रमाणें, 'हा द्रविडांचा प्रभाव' असें जर मानलें तर वेली परतणेंची चाल मराठ्यांत सार्वत्रिक हवी होती ('मराठी लोकांची संस्कृति' पान १९७, १९८, १९९). मराठ्यांतील ही चाल द्रविडांपासून त्यांनीं उचलली (पा. १९९) असें विधान त्यांनीं केलें असलें तरी नातेवाचक परिभाषेचा गाढ व्यासंग केलेल्या सौ. कर्व्यांचेंच पुढील वाक्य पहाः—' मराठी प्रदेशांत साधारणपणें मामाच्या मुलीशीं लग्न करण्याचा प्रघात आहे, (पण) **नातेवाचक शब्द तर मामाच्या किंवा आत्याच्या मुलींशीं लग्न करण्यास उचित असे आहेत** (पा. १८७). भाषेंतील मूळ नातेवाचक अर्थच जर साटेलोटें हा आहे तर यावरून मराठ्यांत आरंभा-पासूनच ही चाल असली पाहिजे असेंच ध्वनित होत नाहीं काय ? ही चाल आर्यांची नव्हे या विषयीं कोणाचा मतभेद नाहीं. यावरूनहि मराठे–यादवांचे पूर्वज आर्येतर पत्तिजन होत असेंच ठरत नाहीं काय ?

पत्तिजनांचा वंशविस्तार

पत्तिजन मुळांत आर्यवंशीय नसून पुढें क्रमानें त्यांनीं वैदिक परंपरा स्वीकारली आणि त्याबरोबरच त्यांच्या भाषा व चालीरीतींत फरक पडूं लागला. अशा रीतीनें मूळ पत्तिजनांत दोन तट पडणें अपरिहार्य झालें. पूर्वसंप्रदाय-प्रिय असा एक वर्ग, तर जसे कांहीं आपण संपूर्ण आर्यच आहोंत अशा अभि-निवेशानें सुधारणावादी बनलेला, प्रगतिशील अशा स्वरुपाचा दुसरा. या दोन्ही कमालीच्या भिन्न टोकांस सांधणारे मधले दुवे अगर गट क्रमानें पुढें येऊं लागले. महाभारत काळानंतरच्या सामाजिक व ऐतिहासिक घटनाप्रवाहांत असे बरेच पक्षोपपक्ष निर्माण झालेले आपणांस पाहावयास मिळतात.

हा यदुवंश (पत्तिजन) वेळोवेळीं निरनिराळ्या नांवांनीं कालपरिस्थिती-प्रमाणें डोकें वर काढण्याचा प्रयत्न करीत असतांना आढळतो. मध्यप्रांताचे राजे भोजवंशीय होते असा एक पुरावा पुराणांतरीं मिळतो. भोजकुल यादववंशीय आहे असें परंपरा सांगते. यादवसंबंधीय सात्यकी वगैरे शाखांच्या नांवांनीं राष्ट्रकूटादि कांहीं राजघराणीं कर्णाटमहाराष्ट्रांत होऊन गेलीं. रिस्टिक भोजकांचा उल्लेख अशोकाच्या शिलालेखांतून आढळतो.

आर्यीकरण पुढें जसें मोठ्या प्रमाणांत होऊं लागलें तसा दक्षिणापथांत मरहट्टांचा वंशविस्तार त्यांच्या प्रदेशाच्या विस्ताराबरोबरच झपाट्यानें होत गेला.

ब्राह्मण देशस्थ बनला

सुमारें दहाव्या शतकापर्यंत झालेल्या परिवर्तनास आर्यीकरण असें म्हणतां येईल. पुढें सुमारें दहाव्या–बाराव्या शतकानंतरच्या दक्षिणापथांतील या प्रकारच्या परिवर्तनास आर्यीकरण म्हणण्यापेक्षां महाराष्ट्रीकरण म्हणणेंच जास्त योग्य होणार आहे. मऱ्हाट्यांना कानडी आणि तमिळ लोक 'आरियरु' 'आरेरु' या नांवानें ओळखतात. या आरियरु (मऱ्हाटे) यांचा उल्लेख दुसऱ्या शतकाइतक्या प्राचीन तमिळ साहित्यांत आला आहे. कानडी आणि तमिळ लोक मऱ्हाट्यांना 'आरियरु' असें संबोधीत असले तरी मऱ्हाटे आपणांस 'मरहट्टे' किंवा मराठे या नांवानें उल्लेखितात. श्रीसमर्थ रामदासांच्या "मराठा तितुका मेळवावा" या वाक्यांत "मराठा" शब्द बऱ्याच विस्तृत अर्थानें

उपयोजिलेला दिसतो; इतक्या विस्तृत अर्थानें वापरलेला हाच पहिला प्रयोग होय असें वाटतें. या प्रकारच्या अर्थविस्तृतीच्या मागें थोडासा इतिहास आहे.

ब्राह्मणवर्ग सुमारें सातव्या–आठव्या शतकापर्यंत तरी दक्षिणापथांत कोठेंच स्थायिक–' देशस्थ ' बनलेला नव्हता. या काळापर्यंत ब्राह्मणांचीं आडनांवें गांवावरून किंवा स्थळांवरून रूढ झालेलीं दिसत नाहींत असें मत डॉ. देवदत्त भांडारकरांनीं नमूद केलें आहे. (Indian Antiquery Vol. IV p. 73-74) बऱ्याच काळापर्यंत वेदशाखेवरून ब्राह्मणांत निरनिराळे गट असलेले दिसून येतात. जुन्या ताम्रपटांतून वगैरे मिळणाऱ्या उल्लेखांवरून सुमारें नवव्या–दहाव्या शतकापर्यंत ब्राह्मण पूर्णपणें ' देशस्थ ' बनलेले आपणांस आढळत नाहींत. कल्याण चालुक्यांच्या शिलालेख–ताम्रपटांतून " मलेयाळ " पंडित " काश्मीर " ब्राह्मण " द्राविड " (तमिळ) ब्राह्मण अशा तऱ्हेचे उल्लेख मिळतात. कल्याणचा राजा सहावा विक्रम याच्या दरबारीं असलेला बिल्हण हा ' काश्मीरी ' पंडित म्हणून ओळखला जात होता.

दहाव्या–बाराव्या शतकाच्या सुमारास ब्राह्मण पूर्णपणें ' देशस्थ ' बनूं लागले. गौड ब्राह्मण, कऱ्हाड ब्राह्मण वगैरे नांवें या पुढील काळांतच आपल्यास मिळतात. ' होयसळ ' कर्नाटक किंवा कर्णाटकब्राह्मण हे होयसळ यादवांच्या वेळीं म्हणजे १३ व्या शतकानंतरच अस्तित्वांत आले असावेत हें त्या नांवांतील ' होयसळ ' पदावरून स्पष्टच आहे. देवगिरी आणि हळेबीडु यादवांच्या यादवींत एकेका ब्राह्मण शाखेनें प्रांताभिमान स्वीकारून अभिनिवेशानें कर्णाटक व महाराष्ट्रीय (मराठा) म्हणवून घेण्यास आरंभ केला असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे.

ब्राह्मण ' देशस्थ ' होईपर्यंत त्याला कोणत्याहि देशी भाषेचा विशेष अभिमान नव्हता. वैदिक परंपरा, गीर्वाणवाणी संस्कृत यांचाच काय तो पुरस्कार ते करीत. तिच्याच सेवेंत ते यावज्जीव धन्यता मानीत असत. प्राण गेला तरी बेहत्तर पण प्राकृत भाषेचा उपयोग म्हणून करूं नये अशा तऱ्हेची कडवी वृत्ति एकेकाळीं ब्राह्मणवर्गांत होती. ' प्राकृतं म्लेच्छभाषितम् । न श्रोतव्यं द्विजेनैतद्.....अधोनयति तत् द्विजम् '. गरुड पुराणांतील हें विधान ब्राह्मण वर्गाचा मनोभाव प्राकृत वगैरे संस्कृतेतर भाषांविषयीं कशा प्रकारचा होता हें

यंथार्थतेनें व्यक्त करतें. अशा रीतीनें प्राकृत भाषांकडे ढुंकूनहि पाहाण्यास सिद्ध नसलेला ब्राह्मणवर्ग एकादा अपवाद वगळून पुढील काळांत त्याच प्राकृत भाषेचा कैवारी, स्तुतिपाठक बनलेला पाहावयास मिळतो. केवळ गीर्वाण-वाणीच्या प्रेमानें तिच्याच सेवेंत मग्न होऊन राहिल्यास जगांत जीवन अशक्य-प्राय होणार हें सभोंवारच्या परिस्थितीवरून चाणाक्ष, दूरदर्शी विचारवंतांना कळण्यास वेळ लागला नसावा. पण बहुसंख्य ब्राह्मणांची मनोवृत्ति पालटण्यास बराच काळ गेला. व्यवहारांत प्राकृत व देशी भाषांचा वापर करण्यास कांहीं स्मृति वैगरे शास्त्रांनीं परवानगी दिली. जैन, बौद्ध हे बहुजनसमाजाला त्याच्या भाषेंतून ज्ञान देऊन आपल्या पक्षांत ओढूं लागले. अशावेळीं ब्राह्मण वर्गाला लोकसमाजापासून फटकून दूर राहाणें भयावह वाटलें असणें साहजिक आहे. अशा परिस्थितींत ब्राह्मणांना प्राकृताकडे वळल्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

प्राकृत भाषेचा पक्षपात स्वीकारल्यानंतर थोड्याच काळांत आणखी एक गमतीचें दृश्य दिसतें. भाषा ही कधींहि स्थिरस्वरूपाची नसते. प्रत्येक पिढींत ती थोडीफार बदलत जातेच; आणि दोनतीन पिढ्यांनंतरचे काळांत प्रचलित भाषेंत कमालीची तफावत पडते आणि भाषेंतला फरक सहजपणें उमगतो. जुनी पिढी या बदललेल्या भाषेकडे पाहून नाकें मुरडूं लागते. भाषा अवनतीस चालली आहे असें म्हणण्यापर्यंत त्यांची मजल जाते. प्राकृताच्या पुढील अवस्थेला 'अपभ्रंश' असें जें नांव मिळालें आहे तें याच मनःस्थितीचें द्योतक आहे. 'अपभ्रंश' म्हणजे पतन पावलेली भाषा असा अर्थ आहे हें वेगळें सांगावयास नकोच. संस्कृत प्रिय सुशिक्षित ब्राह्मणवर्ग या भाषेला तिरस्कारानें नांवें ठेवीत होता याला निराळ्या पुराव्याची जरूरी नाहीं. दहाव्या-बाराव्या शतकाच्या सुमारास या अपभ्रंशाच्या पोटीं मराठी जन्मास आली. अपभ्रंश म्हणजे आधींच पतित भाषा; आतां त्या अपभ्रंशापासून जन्मलेल्या मराठी भाषेविषयीं कितीसें प्रेम या संस्कृतप्रिय वर्गास असेल याची कल्पनाच केलेली बरी ! महानुभाव-पंथीय श्री चक्रधरांनीं देशभाषेंत लिहिण्यास नाराज असलेल्या आपल्या बड्या पंडित शिष्यांकडून प्राकृत जनांच्या उद्धारासाठीं मऱ्हाटींतूनच ग्रंथरचना करविली. तशांतच नरेंद्रासारख्या कविवर्यांना मऱ्हाटीविषयीं अभिजात आत्मीयता उत्पन्न झालेली त्यांच्या पुढील उद्‌गारांवरून दिसून येतें:— 'जिये भाषेचिये रसवृत्ती :

सा भाषांचे कुपे कीजेति निगुती। ते मऱ्हाटी कवण जाणे निरूती : जे रसांचें जीवन ' (४६). नरेंद्रांचें असें हें एकच उदाहरण नसून श्रीज्ञानेश्वरांनींहि " अमृतातेंही पैजेसीं जिंके " अशा तऱ्हेचे आत्मीयतेचे उद्‌गार काढले आहेत; हें जरी खरें असलें तरी सुशिक्षितांतील बहुजन अजून मराठीविषयीं अनुकूल नव्हते असेंच दिसतें. नाहींतर एकनाथांना " संस्कृत वाणी देवें केली। तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली। " असा खडखडीत सवाल टाकण्याची आवश्यकताच भासली नसती. तसेंच एकनाथांचे समकालीन दासोपंतांना मराठी भाषा कमी दर्जाची नाहीं असें नानातऱ्हेचीं उदाहरणें देऊन समजावून सांगण्याची जरूरी वाटली नसती.

कसेंहि असो. 'अनिच्छन्नपि...बलादिव नियोजितः' अशा तऱ्हेनें मराठीचा अभिमान स्वीकारल्याशिवाय कोणाहि व्यवहारी विचारवंताला गत्यंतर राहिलें नाहीं. मराठीच्या या अभिमानाबरोबर हळूहळू ब्राह्मणवर्ग स्वतःस 'मराठे' असेंहि म्हणून घेण्यास प्रवृत्त झालेला दिसतो. आणि आज एकेकाळीं आपण 'मराठे' म्हणवून घेण्यास नाराज होतों आणि मऱ्हाटीविषयीं दुजाभाव दाखवीत असूं याचाहि या वर्गास विसर पडला आहे. बाराव्या शतकानंतर मराठीस ब्राह्मण वर्गाचा जसजसा जास्त पाठिंबा मिळाला तसतसा महाराष्ट्राचा विस्तार गोदावरीच्या दक्षिणेस झपाट्यानें होत गेला. मरहट्टे ही एक विशिष्ट जात न राहातां मराठे बनण्यास सर्वच अहमहमिकेनें उत्सुक झालेले दिसतात. नुसते मराठे म्हणवून घेऊनच चालणार नाहीं तर सर्व प्रकारें बहुजन समाजांत एकरूप होऊन एकजात सर्वांनीं 'मराठे' होणें जरूर आहे, असा उपदेश (बऱ्याच ब्राह्मणांचा रोष पत्करूनहि) जाहीरपणें करणारे सुबुद्ध विद्वान् ब्राह्मण आज महाराष्ट्रांत पुढें येत आहेत हें 'मरहट्टां' तील विशेष होय.

★ ★ ★

: ४ :

जुळीं भावंडें : मरहट्टे आणि कानडे

कर्णाट आणि मऱ्हाटच्या निर्मितीस कारण झालेले मूळ प्राचीन लोक एकच होते, असें म्हटलें असतां पुष्कळांना आश्चर्याचा धक्का बसेल ! किंबहुना हा कांहीं तरी भ्राममूलक विचार आहे असें त्यांस वाटण्याची भीतिहि आहे. अलीकडील कर्णाट आणि मराठांतील तेढ आठवली तर या दोन्ही प्रांतांना 'जुळीं भावंडें' म्हणणें विचित्र वाटल्याशिवाय राहाणार नाहीं हें खरें. पण विरोध हें प्रेमाचेंच एक विकृत स्वरूप आहे. सूड जसा अन्यायाच्या प्रतिकाराचा आसुरी प्रकार आहे, तसेंच वैर हेंहि बऱ्याच वेळां प्रेमाचें एक विकृत रूप असतें. आणि आजच्या कर्णाट महाराष्ट्रांतील विरोधी भावांचा उगम त्यांच्या आरंभींच्या बंधुप्रेमांतच आहे हें ऐतिहासिक घटनांच्या सिंहावलोकनावरून सहज कळून येणार आहे.

यदु आणि तुर्वसु

मरहट्टे यांची पूर्वपरंपरा वेदकालीन यदु-जनांपर्यंत जाऊन पोंचते हें आपण मागील प्रकरणीं पाहिलेंच आहे. ऋग्वेदांत यदूंच्याबरोबर तुर्वशांचाहि जवळजवळ तितक्याच वेळां उल्लेख येतो. यदु आणि तुर्वश हीं दोन निरनिराळीं घराणीं असलीं तरी ते वेगळे जन नसून मुळांत एकच असावेत असा विद्वानांचा

तर्क आहे. कीथ आणि मॅक्डोनेल यांनीं यदु आणि तुर्वश हीं व्यक्तींचीं नांवें नसून हे विशिष्ट जन आहेत असें आपलें मत व्यक्त केलें आहे. " It is perfectly reasonable to hold that the Turvasas and Yadus were two distinct though closely allied tribes. " Macdonell and Keith (Vedic Index Vol. I & II, Yadu and Turvasa)

यदुजनांपासूनच विशेषेंकरून मरहट्टे यांचा विस्तार झालेला आहे हें खरें. मात्र यावरून कर्णाटक आणि यदुवंश यांचा संबंध आला नाहीं असें समजतां येत नाहीं. चालुक्य राष्ट्रकूटादि घराण्यांची वंशपरंपरा यादवजनांपर्यंत नेली जाते. डॉ. आळतेकरांनीं अभिजात कर्णाटकीय म्हणून ठरविलेला राष्ट्रकूट वंश यादववंशीय सात्यकी शाखेपासून निघाला असें त्या घराण्याच्या ताम्रपट व शिलालेखांवरून कळतें. म्हैसूरचें आजचें राजघराणें यदुवंशीय आहे हें सुप्रसिद्धच आहे.

मराठ्यांचा जसा यदुवंशाशीं विशेष संबंध होता तसा जुनी परंपरा पाहतां कर्णाटकीयांचा तुर्वसूंशीं घनिष्ट संबंध असलेला आढळून येतो. ययातीच्या शापानें पतित झालेले तुर्वसुवंशीय लोक दक्षिणेंत येऊन राज्य करूं लागले, असें सांगितलें जातें (महाभारत, आदिपर्व, अध्याय ८४). मत्स्य पुराणांत तुर्वसु वंशाच्या दक्षिणापथांतील कांहीं घराण्यांचा उल्लेख आला आहे.

' तुर्वसोऽस्तु सुतो गर्भो गोभानुस्तस्यचात्मजः ।
गोभान्नोऽस्तु सुतो वीरः त्रिसारिश्चापराजितः ॥
पांड्यश्च केरलश्चैव चोलः कर्णस्तथैवच ।
तेषां जनपदाः स्फीताः पांड्याश्चोलास्सकेरलाः ॥ ४८.५ ॥

वरील श्लोकांत पांड्य, केरल, चोल यांच्याबरोबर उल्लेखिले गेलेले कर्ण (जन) कर्णाटकीयच होत; कारण दक्षिणापथांतील पांड्य, केरळ, चोलांच्या जवळ या नामसादृश्याचा प्रदेश कर्णाटकाशिवाय दुसरा नाहीं. मनुस्मृतींत ' झल्लोमल्लां ' च्या बरोबर ' नट ' आणि ' करण ' यांचीं नांवें व्रात्य क्षत्रियांच्या यादींत आलीं आहेत (१०–२३). श्री. राजवाडेप्रभृति विद्वानांनीं नट आणि करण हे आजच्या कर्णाट जनांचे पूर्वज होत असें आपलें मत व्यक्त केलें आहे. मनुस्मृतींतील ' करण ' आणि मत्स्य पुराणांतील ' कर्ण ' हीं निरनिराळीं नांवें

नसून, एकच असावींत यांत शंका नाहीं. कण्ण जन कर्णाटकांत प्राचीन काळीं होते असें तेथील ग्रामनामांवरून निदर्शनास येतें. 'कण्ण-विषय, 'कण्ण-वाड, कण्ण-देश, कण्ण-नाड, कण्ण-पाडि (कण्णंबाडि)' वगैरे स्थलनामांतील कण्ण शब्द जनवाचक आहे. संस्कृतांतील 'कर्ण' याचा प्राकृतरूप "कण्ण" असें होतें., कण्णजन हे तुर्वसुवंशीय आहेत हें पुराणावरून आपणांस कळतें.

कर्णाटकांतील प्राचीन गंगवंशीय घराणें तुर्वसुवंशीय होतें. गंगातीराहून दक्षिणेला ते आले असें त्यांच्या वंशावळीवरून दिसतें. रा. ब. आर्. नरसिंहाचार्यांनीं या गंग घराण्याच्या वंशपरंपरेविषयींच्या आपल्या लेखांत वरील गोष्ट नमूद केली आहे (कर्णाटक साहित्य परिषद्-पत्रिका ऑक्टोबर १९२४). तुर्वसु वंशाचे राजे चोल, पांड्य, केरलादि राज्यें स्थापन करून दक्षिणेंत राहिले, असा पद्म पुराणांतहि आधार मिळतो. ही गोष्ट असंभाव्य नाहीं असें "Ancient Indian Historical Traditions" या आपल्या ग्रंथांत श्री. पार्जिटर म्हणतात. गंगांच्या प्रमाणेंच विजयनगरचा शेवटचा राजवंश तुर्वसुवंशीय होता असें कांहीं शिलालेखांवरून दिसून येतें (Ep. Indica IX p. 340).

अशाप्रकारें कर्णाट आणि मऱ्हाटांशीं यदु-तुर्वसूंचा, अतिनिकट संबंध असल्याचें सिद्ध होतें. यदु-तुर्वश या दोघांचा उल्लेख जुळ्या भावंडांप्रमाणें ऋग्वेदांत बहुतेक सर्वत्र आढळतो. जिथें जिथें म्हणून यदूंचें नांव येतें तिथें तिथें तुर्वशांचें नांव आलेंच. एकदोन ठिकाणीं मात्र-तुर्व (१०-६२-१०) आणि वश (१०-४०-७) अशीं पदच्छेदित नांवें आढळतात. आणि हा पदच्छेदहि एका दृष्टीनें फार उद्बोधक आहे. तुर्वश असें अखंड एकच नांव समजण्याचें यामुळें आतां कारण राहात नाहीं. तुर्व आणि वश असे दोन शब्द मिळून हें सामासिक पद बनलेलें आहे हें निश्चित ठरतें. वश जनांचा उल्लेख ब्राह्मणांत आहे (Vedic Index Vol.II 273). वशा याचा अर्थ गाई असाहि होतो. यामुळें वश (जन) म्हणजे पशुपालक-गवळी असा अर्थ करणें गैरवाजवी होणार नाहीं. यदु हे तर गवळी असल्याचें सुविख्यात आहे. यदूंच्या बरोबर उल्लेखिले जाणारे तुर्वश हेहि गोपालक वृत्तीचेच

असावेत हें सांगावयास नको. आणि तुर्वश यांतील वश (वशा) हा शब्द पशु-वसु म्हणजे गाईंचा निदर्शक असावा हें उघडच आहे. वेदांतील तुर्वश, महाभारतांत तुर्वसु या नांवानें ओळखले जातात असें विद्यानिधि श्री. चित्रावशास्त्री आपल्या प्राचीन कोशांत लिहितात.

यावरून इतिहा "यादवं गो (महिष्यादिके) धने" या वाक्याबरोबर 'यादः' शब्दाचा ..हि विशेष चिंत्य आहे. 'यादः' हा रसार्थक शब्द आहे. 'अंधस्', 'हालु' प्रमाणें या रसार्थक शब्दाचा दूध असा अर्थ होणें शक्य आहे. गोपालक वृत्तीच्या यादवांच्या नांवाचें रहस्य यामुळें जास्त खुलून व्यक्त होणार आहे. यदुजन-यादवांचे आप्तबांधव म्हणून निश्चित ठरलेल्या तुर्वशांचें नांवहि असेंच सार्थ असणें असंभवनीय नाहीं. तुर्वश किंवा तुर्वसु हा जोडशब्द आहे हें वर निदर्शित केलें आहे. यांतील वश किंवा वसु शब्दाची व्युत्पत्ति विचारार्ह आहे. समाजविकासक्रमाच्या इतिहासाचें साहाय्य घेतलें असतां या शब्दांचें कोडें सुगम रीतीनें सुटणार आहे. मानवाच्या प्रारंभिक स्थितींत, पाळलेलीं जनावरें हीच त्याची संपत्ति असें समजलें जात असे. सोनें-चांदी वगैरेंना महत्त्व पुढील काळीं आलें. जगांतील या सामाजिक विकासक्रमाच्या इतिहासाचें प्रतिबिंब स्पष्टास्पष्टरीतीनें प्रत्येक जनांच्या भाषेंतील शब्दांतून उमटलेलें आपणांस पाहावयास मिळतें. Cattle आणि Capital यांचा मुळांतील निकट संबंध हें याचप्रकारचें एक उदाहरण आहे. गोधन यावरूनच कानडींत 'दन' (गुरें) हा शब्द रूढ झाला आहे. हाच क्रम वशा–वसु (संपत्ति), पशु–वसु या शब्दनिर्मितीसहि कारण झाला असावा असा तर्क केल्यास चुकीचें होणार नाहीं. ऋग्वेदांतील 'अजाः' 'शिग्रुः' या प्रकारचीं जनवाचक सार्थ नांवें आठवलीं असतां यदुप्रमाणेंच तुर्वश–तुर्वसु हें नांवहि अर्थपूर्ण आहे असें दिसून येईल.

आता तुर्व याचा अर्थ काय असेल हा प्रश्न उद्भवतो. जुन्या द्रविड-वर्गीय भाषेंत 'तुरु' म्हणजे गोसमुदाय. कानडींत हा शब्द या अर्थानें आजहि व्यवहारांत आहे. गवळी या अर्थी 'तुरुकार' हा शब्द 'हट्टीकार' या शब्दाचें पर्यायरूप म्हणून कानडी भाषेंत रूढ आहे. बेळगांव जिल्ह्यांत बरींच देसाई घराणीं तुरुकारवंशीय आहेत. यावरून तुरुजनांचें अस्तित्व सिद्ध होत असून

ते गोपालक वृत्तीचे होते ही गोष्टहि स्पष्ट होते. वेदकालीन तुर्व (तुर्वश) जन हे आजहि कर्नाटकांत असलेल्या तुरुकार (हट्टीकार) जनांचे पूर्वज होत असें म्हटल्यास चुकीचें ठरणार नाहीं. तुरु (कार) या शब्दावरून तुर्वशांना यवन (तुर्की) बनविण्यापर्यंतहि कांहींची मजल गेली आहे! "यदोस्तु यादवा जाताः तुर्वसोर्यवनाः स्मृताः"!

तुर्वसु हे तुर्क लोकांपैकीं असावेत असा तर्क नामसादृश्यावरून सुचलेला दिसतो. कर्नाटकांतील 'तुरुकार' जातीलाहि असेंच तुरुक गणलें असलें तर नवल नाहीं; कारण तुर्वसुपेक्षां 'तुरुकार' हें नांव तुरुकला फार जवळचें आहे. तुरुकार हे मुसलमानांतून हिंदू झाले असावेत या समजुतीनें कांहीं लिंगायत उपजाती (पंचमसाली वगैरे) त्यांचेपासून दूर रहाण्याचा प्रयत्न करीत असत. तुरुकारहि आज लिंगायत झालेले आहेत. वीरशैव लिंगायत पंथ, प्रसारक धर्म असल्यानें कुरुब, रड्डि, वक्कलिग (कुणबी) वगैरे बऱ्याच उपजाती या नवीन धर्मांत समाविष्ट झाल्यानंतरहि त्यांनीं आपलें पूर्वीचें शाखानाम सोडलेलें नाहीं. यामुळें लिंगायतपंथाच्या प्रभावांत गेलेल्या प्राचीन जाति, जनांचीं नांवें आजहि आपणांस ऐकूं येतात. अशांपैकीं 'तुरुकार' हा एक वर्ग आहे. श्री शिवाजीच्या दक्षिणेंतील स्वारींत बेळगांव जवळ जिनें कसून विरोध केला व कांहीं काळ शिवाजीच्या सैन्यास थोपवून धरलें, जिच्या धैर्याचें व पराक्रमाचें शिवबासहि कौतुक वाटलें ती बेळवडी मल्लम्मा देसाईण वीर तुरुकार घराण्याची होती, असें तेथील जुन्या दप्तरांतून नमूद आहे. हे तुरुकार, जहागीरदार, देसाई सर्व पाटील–गौडा घराण्याचे आहेत. वक्कलिग, राड्डिपाटील घराण्याचे देसाई या भागांत आहेत. तसे हे तुरुकारहि पण तुरुक मुसलमानांपैकीं अशा कल्पनेनें बाकीचे यांना थोडें दूर ठेवीत असत. शेवटीं एका लिंगायत मठाधिकाऱ्याला ही समजूत खोडून काढण्याकरतां पुढाकार घ्यावा लागला. त्यांनीं एक लहानसें पुस्तक काढून, "तुरुकार–जन तुरकी–मुसलमान नसून ते तुर्कांचे अरी म्हणजे वैरी होते, त्यामुळें त्यांना 'तुरुकार' असें नांव प्राप्त झालें; अशा यवनविरोधी वीर जनांस मुसलमान समजणें खोडसाळपणाचें आहे" असें जाहीर केलें!

संस्कृत ग्रंथकर्ते जर तुर्वसूंना यवन गणूं लागले तर तुरुकार जन म्हणजे

तुरुक अशी भ्रांति सामान्य अज्ञ लोकांत उत्पन्न झाली असणें सहज आहे. पण जगांत अत्यंत प्राचीन ग्रंथ म्हणून निश्चित ठरलेल्या ऋग्वेदांतच यदु-तुर्वशांचें नांव नमूद असल्यानें हे सर्व तर्क सपशेल खोटे आहेत हें आपोआप सिद्ध होत आहे. पूर्वपरंपरा विच्छिन्न होऊन आपण अज्ञानांत कसे चांचपडत आहोंत हें यावरून थोडें तरी कळण्याजोगें आहे. मोहेंजोदारोसारखीं मोठीं शहरें व वेदांतील इतिहासवजा कांहीं माहिती उपलब्ध झाल्यानें आपणांस त्या काळच्या चित्रांच्या रेषा अंधुकपणें दिसूं लागल्या आहेत. काळ्याकभिन्न रात्रींत वीज चमकल्यानें आपणांभोंवतालीं अंधकार किती गाढ आहे याची जशी जाणीव येते तशीच आपल्या पूर्वपरंपरांविषयीं आज आपली स्थिति झाली आहे.

रिस्टिक-भोजक

वेदकाळांतील यदु-तुर्वसूंच्या जुळ्या नांवाप्रमाणें खिस्तशकारंभींच्या अशोक खारवेलादिकांच्या शासनांतून रिस्टिक-भोजक अशीं जोड नांवें आपणांस दिसतात. प्राचीन रिस्टिक-भोजकांच्या वसाहती एकमेकांच्या जवळ असाव्यात असा तर्क डॉ. बी. सी. लॉ यांनीं (Some Ancient Indian Tribes, Indian culture, 1935, p. 390) केला आहे. " The Rastrikas who were almost associated with the Bhojas must have occupied the adjoining tracts and it may be assumed that they were located in the very region where present Marathas have their habitat." भोजक हे वऱ्हाडचे, हें निश्चित आहे; यामुळें रिष्टिकांची वसाहतहि वऱ्हाडच्या आसमंतांत असावी असा तर्क करणें गैरवाजवी होणार नाहीं. रिष्टिक हे राष्ट्रकूटांचे पूर्वज होत असा कांहींचा तर्क आहे, आणि हा तर्क जर खरा असेल तर राष्ट्रकूटांच्या इतिहासांतील एक कोडें सहजपणें सुटतें. राष्ट्रकूट घराण्याची राजधानी मळखेड होती आणि राष्ट्रकूटांचें मुख्य केंद्र कर्णाटकाच्या भागांतच आढळतें व राष्ट्रकूट घराणें कर्णाटकीयच होय असें डॉ. आळतेकरांचें निश्चित मत आहे. राष्ट्रकूट कर्णाटकीय हें जर खरें असेल तर त्यांचीं प्राचीन घराणीं कर्णाटकांत न आढळतां वऱ्हाडांत कशीं ? याचें उत्तर म्हणून कर्णाटकांतून कांहीं घराणीं वऱ्हाडांत वसाहतीकरितां आलीं असें आज गृहीत धरावें लागतें. (Rashtrakutas and Their Times p. 4). पण भोजकांच्याबरोबर वऱ्हाडच्या

आसमंतांत रिष्टिकहि प्राचीन काळापासून मूळ धरून होते या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यानें आजपर्यंत या कोड्यास समर्पक उत्तर मिळालें नाहीं.

रिस्टिक-राष्ट्रिक कोण ?

"राष्ट्रिक" याचा अर्थ राष्ट्राचे-देशाचे (Indigenous, Native) असा होतो. राष्ट्रकूटांचे पूर्वज राष्ट्रिकच होत असें बऱ्याच विद्वानांचें निश्चित मत आहे. राष्ट्रिक म्हणजे या देशाचे मूळचे रहिवासी हा अर्थ जर खरा असेल तर, राष्ट्रिक हा शब्द, मुळांत कोणत्या तरी देश्य शब्दाचें भाषांतर असणें शक्य आहे. कारण या देशाचे मूळचे लोक आर्यांच्या पूर्वी संस्कृतेतर भाषेचे होते याबद्दल आतां सध्या तरी कोणाला शंका नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां राष्ट्रिक हा शब्द, या देशाचे, मूळचे या अर्थाचा संस्कृत शब्द असला पाहिजे. यामुळें तो भाषांतरित असणें शक्य आहे.

कर्णाटकांत "नाडव" अशी एक जात आहे. यांना विशिष्ट जात असें संबोधण्यापेक्षां 'जन' म्हणणेंच जास्त सयुक्तिक होईल. "नाडव" म्हणजे या देशाचा (नाडु=देश). राष्ट्रिक हा शब्द नाडव यांचेंच संस्कृत भाषांतर असावें असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे. राष्ट्रकूट राजा नृपतुंग (खि. श. ८१५) याचे नांवावर प्रसिद्ध असलेला 'कविराज मार्ग' नांवाचा एक अलंकार-शास्त्रावरील ग्रंथ उपलब्ध आहे. त्यांत नाडवांचें विशेष वर्णन दोन-तीन ठिकाणीं येतें. वास्तविक तो साहित्यशास्त्रावरील ग्रंथ आहे. असें असतांहि नाडवांविषयीं त्यांत येणारे उल्लेख गौरवपूर्ण अभिमानसूचक असावेत हें विचारार्ह नाहीं काय?

नाडव जन अभिजात रसिक असून विशेष शिक्षण नसतांहि 'काव्य परिणत-मति' होते असें नाडवांचें वर्णन त्यांत आरंभींच आलें आहे. आणखी पुढें एका ठिकाणीं असें वर्णन येतें:—

सुभटर्कळ् कविगळ् सु-
प्रभुगळ् चेल्वर्कळभिजनर्कळ् गुणिगळ् ॥
अभिमानिगळत्युग्रर्
गभीरचित्तर् विवेकिगळ् नाडवर्गळ् ॥२.२८॥

वरील वर्णनांतील " कळ् " किंवा " गळ् " हा बहुवचनार्थी प्रत्यय आहे हें जाणलें असतां व वर उद्धृत केलेल्या श्लोकांत ' चेल्वर् ' सोडून सर्वच शब्द संस्कृत असल्यानें मराठी जाणणाऱ्यांना त्याचा अर्थ लावणें कठिण होणार नाहीं. (अर्थः शूर, कवि, सुप्रभु, सुंदर, कुलीन, गुणी, अभिमानी, अतिउग्र गंभीर व विवेकी असे हे नाडव लोक आहेत.)

या खेरीज " उत्कटदर्पान् प्रियमोहनान् पदरौद्रान् पतंगवृत्तींश्च ॥ " अशा रीतीनें कण्णाडीय लोकांचें वर्णन नवव्या शतकांतील एका कवीनें केलें आहे (अपभ्रंश काव्यत्रयी, पान ९३).

या नाडवांना दक्षिण कन्नड जिल्ह्यांत ' बंटरू ' असें दुसरें एक नांव रूढ आहे. बंट म्हणजे भट, वीर. या बंट किंवा नाडवांचें गुणवर्णन थर्स्टन् याच्या " जक्षिणेंतील जाति आणि जन " या ग्रंथांत खालीलप्रमाणें दिलेलें आहेः

" They still retain their manly independence of character, they have strong well developed physique and they still carry their heads with the same hotty toss as their forefathers did in the stirring fighting days, where as an old proverb had it, ' the slain rested in yard of the slayer ' and where every warrior constantly carried his sword and shield. Both men and women of Banta community are among the comeliest of Asiatic races " (Castes and Tribes in Southern India Vol. I p. 149).

११०० वर्षांपूर्वीच्या ' कविराज मार्गा ' तील वर्णनांत व नवव्या-दहाव्या शतकांतील " अपभ्रंश काव्यत्रयीं "त आढळणाऱ्या उल्लेखांत आणि वर दिलेल्या एका आधुनिक संशोधकाच्या निरीक्षणांत किती आश्चर्यकारक साम्य ! जणूं कांहीं वरील कानडी व संस्कृत श्लोकाचें हें इंग्रजींत भाषांतरच ! !

दक्षिण कन्नड जिल्ह्यांत तुळु नामक कानडीची उपभाषा चालते. तुळु भाषेंत " वक्कल्मे "–शेतकरी–या अर्थी बंट शब्द वापरतात. राष्ट्रिक-राष्ट्रकूट " Indigenous Tribes " असें विन्सेंट स्मिथ यांनीं आपलें मत नमूद केलें आहे (Early History of India, page 430). ' रठिक ' शब्दाला Native असा अर्थ पालीकोशांत दिलेला आहे. राष्ट्रकूटांना ' कुडुंबी ' असें

विशेषण कांहीं ठिकाणीं आढळतें आणि त्यांच्या कांहीं शिलालेखांच्या आरंभीं नांगराचें चित्र काढलेलें असतें. हिंदुस्थान सरकारच्या शिलालेख संग्रह करणाऱ्या शाखेचे मुख्याधिकारी श्री. एच. कृष्णराव यांचें "राष्ट्रकूट–प्रमुखान् कुटुंबिनः" या वाक्यावर एक टिपण आहे :—

"The familiar phrase राष्ट्रकूट–प्रमुखान् कुटुंबिनः Which occurs in copperplate inscriptions, shows also that the Rashtrakutas were कुटुंबिनः i.e. cultivators, who enjoyed a higher social status than others of their community" (Epigraphica Indica XI pp. 342-343).

कुटुंबिन् हा शब्द द्रविडभाषावर्गीय मूळभाषेंतून बनला असावा असा कांहीं विद्वानांचा तर्क आहे. यांतील मूळशब्द 'कुडु' म्हणजे कूळ (शेतकरी) असा आहे. 'कुडु–वोक्कलिग' या जोड शब्दांत दोन्ही समानार्थी पदें आहेत. 'कुडु' शब्दांत येथें वरील अर्थ अभिप्रेत आहे. "कुडुव" यावरूनच कुणबी शब्द प्रचारांत आला असावा असें मला वाटतें. कुणबी हा शब्द कुळ यापासून निष्पन्न झाला असणें जास्त संभवनीय आहे असें आपलें मत रा. अत्रे यांनीं 'गांवगाड्यांत' नमूद केलें आहे. या सर्व आनुषंगिक पुराव्यावरून श्री. कृष्णराव यांनीं स्वतंत्रपणें शिलालेखांतील संदर्भावरून केलेला अर्थ यथोचित आहे असें म्हणावें लागतें.

राष्ट्रिक–रट्ट–रड्डि; रड्डि शब्दाची व्युत्पत्ति आज अशीच मान्य झाली आहे. पाटलांना तेलगु देशांत रड्डी असें पर्याय नांव आहे. पाटील किंवा गौड हा शब्द तेथें प्रचारांत नाहीं. रड्डि-राष्ट्रिक ही अवस्था गोपालकवृत्तीच्या पुढची आहे हें मानवसमाजाचा विकासक्रम जाणणाऱ्यांना सांगावयास नको. पाटील किंवा गौड या शब्दांत गोपालकवृत्तीचा जसा ध्वन्यर्थ आहे, तसा तो रड्डि या शब्दांत नाहीं. राष्ट्रिक–नाडव हा वसाहती करून स्थिर झाल्यानंतरची अवस्था सुचविणारा शब्द आहे. संस्कृत भाषेंत नाडव शब्दाचें **भाषांतर** राष्ट्रिक झालें. त्याचेंच **संस्कृतीकरण** नाट (< नाड) असें झालेलें आढळेल. मनुस्मृति वगैरे ग्रंथांतून 'करणां' च्या बरोबर नटांचाहि उल्लेख येतो. हे नट व्रात्य क्षत्रिय होत असा स्मृतिग्रंथांचा स्पष्ट निर्वाळा असल्यामुळें त्यांना नाच वगैरे करणाऱ्या नाटकी

नट्वगांत ढकलण्याचें धाडस कोणी करणार नाहीं अशी आशा आदे. नाडर् हें आडनांव व या नांवाची कुळी तमिळ देशांतहि आहे. नाट्टर (—People of the Country, Indigenous Tribes) म्हणजेच संस्कृतमध्यें राष्ट्रिक असा अर्थ होतो. ' Nattar (meaning: people of the Country) reported by some to be a main caste and some others a subcaste of Vellalas. Nearly all those who returned the name came from Salem and were cultivators '(थर्स्टन IV p. 140). कन्नड जिल्ह्याप्रमाणें शाल्यम्, कोइमत्तूर, जिल्ह्यांतहि नाडव होते असें मागील शिरगणतींत आढळून आलें आहे.

भोजांच्याबरोबर प्राचीनकाळीं उल्लेखिलेले रिष्टिक–राष्ट्रिक हे नाडव असावेत असें वरील सर्व गोष्टी लक्षांत घेतां दिसून येतें. भोजांचा उत्तरकालीन वसाहतीचा प्रदेश विदर्भ, तर त्यांच्या लगतच त्यांचे भाई रिष्टिक यांचा प्रदेशहि असावा हें युक्तच आहे. आणि आज खानदेश या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशाच्या जवळपासच हा रिष्टिकांचा देश असावा असा आमचा तर्क आहे. ' खानदेश ' या शब्दाची व्युत्पत्ति अजून समर्पकपणें लागलेली नाहीं. खानांपासून याला खानदेश असें नांव आलें हें मत आज कोणालाच मान्य नाहीं. कारण मुसलमान येण्यापूर्वीपासून हें नांव प्रचलित होतें असा पुरावा मिळतो. कन्न देश ही व्युत्पत्ति आज जवळजवळ सर्वमान्य आहे. पण यांतील कन्न या शब्दाचा अर्थ काय, याबद्दल काय तो मतभेद आहे. कन्न म्हणजे कण्ह–कृष्ण, कन्ह म्हणजे कृष्णाचा देश किंवा कृष्णवर्णाचा प्रदेश असे दोन अर्थ संभवतात. कृष्णाचा देश असें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. कृष्ण ज्या प्रदेशांत जन्मला त्या मथुरावृंदावनाला किंवा जिथें तो वैभवांत होता त्या द्वारकेच्या आसमंताला कृष्णाचें नांव यावयास हवें होतें. खानदेशाचा कृष्णचरित्राशीं कांहींच संबंध येत नाहीं. कृष्णाशीं संबंध नसलेल्या प्रदेशाला त्याचें नांव प्राप्त झालें असें म्हणणें पटण्यासारखें नाहीं.

जमिनीच्या रंगावरून याला कण्ह–कृष्ण–काळी जमीन असलेला देश हें नांव आलें असें कांहींचें मत आहे. देशाला भू–प्रदेशाची पहाणी केल्यानंतर पुन्हा नांव मिळालें असणें अगदींच असंभाव्य नसलें तरी देशाला नांव प्राप्त होण्याचा हा क्रम सामान्य तर खचितच नव्हे. कन्न, कान्न, हा शब्द कृष्णाशीं

जोडणें कितपत सयुक्तिक होईल याबाबत शंका वाटते. खानापूर (बेळगांव जिल्हा) येथील जमीन ही सुंदर तांबूस रंगाची आहे! अशा ठिकाणीं कृष्णाचा (रंग) आणि कन्नाचा (खन्न–खानचा) मेळ कसा बरें बसणार? येथें कन्न आणि कन्हची गफलत झाल्यानें हा घोटाळा उत्पन्न होत आहे. कन्नचें कृष्ण असें रूप होणें शक्य नाहीं. कृष्णचें प्राकृत रूप कन्ह आहे. खान हें खन्न, कन्न असेंच बनेल; कन्ह होणार नाहीं. कानडी आणि मराठी बोलींतील उच्चार-वैशिष्ट्य येथें लक्षांत घेणें जरूर आहे. कानडींतील कांहीं शब्दांतील अल्पप्राण मराठी भाषेंत महाप्राण होतात. प्रस्तुत येथें पुढील शब्द अभ्यसनीय आहेत.

कानडी	मराठी
किंडि	खिंडि, खिंड
कोब्बरे	खोबरें
कळ	खळें
काहिले	खाई (फोफाटा)
कणि	खाणि, खाण

वगैरे शब्दांत क चा ख बनलेला अनुभवास येईल. याचप्रकारें कन्न देश खानदेश होणें शक्य आहे.

'कन्न' या जनांवरून पुष्कळ प्रदेशांना नांवें आलेलीं आहेत, हें या पूर्वीच सांगितलें आहे. तशांतलाच खानदेश (कन्नदेश–खानदेश) हा एक प्रकार होय. कन्न (कर्ण अथवा नट) हे या प्रदेशांत वसाहत करून होते हें खानदेशाच्या पंचक्रोशींतील कांहीं ग्रामनामांवरूहि सिद्ध होतें. औरंगाबाद जिल्ह्यांत कन्नड असें एक तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. शिवाय इंदूर संस्थानांत कन्नड अशीं कांहीं गांवांचीं नांवें मिळतात. कन्नडगांव (नागलवाडी महाल), कन्नडपुरा (नेमाड जिल्हा, खरगोंन महाल), कानडगांव (कासरावद महाल), कान्यखेडी (महेश्वर महाल), कानडी (काळाधोंड महाल), कानाड्या (इंदोर महाल) वगैरे गांवें या भागांतील पुरातन आर्येतर कानडी भाषिक लोकांच्या वसतीचीं द्योतक आहेत, असें म्हणणें चुकीचें होईल काय? खानदेश गॅझेटियरमध्यें या भागांत कानडी गवळी वास्तव्य करून असल्याचा उल्लेख मिळतो :

" Kanadas are a peculiar race of drovers who sometimes visit the western forests of Khandesh.....They appear to be descended from Dravidian immigrants, but *(to our misfortune)* have no tradition to that effect and no special language. More civilized and respectable than most wandering herdsmen, they differ little from Maratha husbandmen, and in parts of Nasik, have taken entirely to agriculture. They have a peculiar breed of black and white cattle, *hatkar*, (हटगार = गुरें) which, though not large, are much prized for their strength and spirit....take good care of their cattle " (Khandesh Gazetteer page 105). नाशिकच्या गॅझेटियरमध्येंहि या कानड गवळ्यांचा उल्लेख येतो :

" The Cattle breeding tribes, the Kanadas....who formed a **fair proportion** of the people....mainly depend on their herds and flocks....the Kanadas were remarkably well off. Some Kanada hamlets with not more than three or four houses had as maney as 500 Cattle and 500 goats " (page 232). खानदेश, नाशिक, अहमदनगर या भागांतील गॅझेटियरवरून या प्रदेशांत कानड (गवळी) कालपरवांपर्यंतहि वास करीत होते हें सिद्ध होतें. नाशिक जिल्ह्यांत पुष्कळ ठिकाणीं " वीर गल्लु "–मराठींत ज्यांना वीरगळ असें म्हटलें जातें-वीरांच्या स्मारकांचे दगड आढळतात. (Memorial stones are found all over the District and are specially numerous near the Sahyadris....shivar has a remarkable group of memorial stones....one group of unusually large stones occur at Chousale....the faces are carved with rude figures, sometimes of one or more men on horse back, sometimes armed with swords....sometimes rude incriptions are carved under figures....

The people say that they were raised by the Villagers. The custom seems to have prevailed among all cultivating classes, especially among Kunabis, Kolis, and Vanjaris. Nasik Gazetteer page 647).

वीरांच्या स्मारकांकरितां अशाप्रकारें चित्रें कोरून दगड उभे करण्याची ही पद्धत हिंदुस्थानांत कर्णाटकीयांचें वैशिष्ट्य म्हणून मानली गेली आहे हें सुप्रसिद्धच आहे. "वीर गळ" यांतील "गळ" शब्द, कानडी "कल्लु" याचें मराठीकरण आहे. कर्णाटकीयांचें वैशिष्ट्य दाखविणारे हे वीरगळ, या भागांत एकेकाळीं कानडे लोक वास करीत होते याचा निःसंदिग्ध पुरावा आहे. गॅझेटियरमधील या भागांत कानड गौळी असल्याचा उल्लेख वरील विधानास पुष्टि देत आहे.

भोजकांच्या जवळच रिष्टिकांची वसाहत होती असें बी. सी. लॉ यांना आपल्या संशोधनांत आढळलें तें अगदीं बरोबर आहे. आणि भोजकांच्या जवळची रिष्टिकांची ती वसाहत म्हणजे वऱ्हाडच्या लगतचा कन्नदेश–खानदेश हीच होय. जवळपासच्या ग्रामनामांवरून व तेथें अजूनहि जिवंत असलेल्या कांहीं कानड गवळ्यांच्या शाखांवरून आणि नाशिक प्रदेशांतील वीरगळांवरून कन्नदेश–खानदेश हा कानड देशच होय असें आम्हांला वाटतें.

एकींतून बेकी

पत्तिजन-यदुतुर्वसूंच्या आर्यीकरणास फार प्राचीन काळीं (ऋग्वेदकाळापूर्वीपासूनच) आरंभ झाला. या आर्यीकरणामुळें यदु-तुर्वसू एकत्र आले. महाभारतांत एके ठिकाणीं असें लिहिलेलें आढळतें कीं तुर्वसूंचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन तें घराणें यदुवंशांतच सामील झालें. कर्णाटकीय राष्ट्रकूट यदुवंशाशीं संबंध जोडतात. ते तुर्वसु यदूंत विलीन झाल्याचें निदर्शक आहे.

पत्तिजनांना हट्टिजन किंवा हटगार असें प्रचारांत आलेलें नाव यदु-तुर्वसु वंश संपूर्णतया आर्यीकरणाच्या प्रभावांत आल्यानंतरचें आहे. पत्तिजनांच्या भाषेंतील 'प' काराचा 'ह' कार हा बदल आर्यांचा अत्यंत निकट संबंध आल्यानंतरचा आहे. याबद्दल पूर्वीच विवेचन केलेलें आहे. पत्तिजनांतील तमिळ आणि तेलगू शाखेनें जुना 'प' कार अजूनहि जशाचा तसा आपल्या भाषेंत राखला आहे. त्या भाषेंत अजून "हालु" "हुली" असे आरंभीं 'ह' कार युक्त शब्द बनले नाहींत. पाल् (दूध), पुलि (वाघ) अशाप्रकारें जुना 'प' कार आजतागायत त्यांच्यांत चालू आहे. पण कानडींत मात्र 'प' काराच्या

ऐवजीं 'ह' कार बहुतेक सर्वत्र प्रचारांत आला आहे. परंपराप्रिय कर्णाटकीयांनीं हा बदल अकराव्या बाराव्या शतकापर्यंत साहित्यांत डोकावूं न देण्याचा भगीरथ प्रयत्न केला असला तरी कित्येक शतकांपूर्वींच 'प' काराचा 'ह' कार होण्यास प्रारंभ झालेला आपणांस दिसून येतो.

मेघदूतांतील 'हित्वा हालां अभिमतरसाम्' या पंक्तींत येणारा 'हाला' शब्द देशीय आहे असें मल्लिनाथ आपल्या टीकेंत सांगतो. 'हालु' म्हणजे रस, दूध या अर्थीं 'पाल' हा शब्द कानडी वर्गाच्या भाषांतून बऱ्याच काळापासून रूढ आहे. या 'पाल' पासूनच 'हाला' शब्द संस्कृतांत गेला असा किट्टेल वगैरे अभ्यासू मंडळींनीं केलेला तर्क समर्पक आहे असें वाटतें. 'पारा' 'हारा' या प्रकारचा बदल 'पाला' 'हाला' प्रमाणें प्राचीन आहे. 'अग्रहार' वगैरे वरून हा शब्द संस्कृतमध्यें बऱ्याच प्राचीन काळीं शिरलेला दिसून येतो. 'जित्वा **हाटकं** नाम देशं गुह्यकरक्षितम्' असें महाभारताच्या सभापर्वांत राजसूय यज्ञाकरितां जिंकलेल्या देशांच्या यादींत एक नांव येतें. 'पाटक' यांतील 'प' चा 'ह' प्राचीन काळींच झालेला येथें पाहावयास मिळतो. आपल्याकडे रूढ असलेला पेठा शब्द (हट-हाटच्या पूर्वकालीन) पाट (क) चेंच एक रूप आहे. 'प' चा 'ह' कार सार्वत्रिक झालेला तेलगु आणि तमिळमध्यें दिसून येत नाहीं. कानडींतच तो संपूर्णतया दृष्टीस पडतो. आणि तदनुषंगानें तो मराठींतहि आढळतो. मरहट्टांतील 'हट्ट' हा शब्द यांचेंच निदर्शक होय. हटगार हट्टीकार हा शब्द मराठीप्रमाणें कानडींतहि आहे. मराठींत 'धनगर' हा शब्द आहे तर कानडींत 'दनगार' आहे. या व अशा अनेक कारणांवरून कानडी आणि मराठी यांच्यांतील भौगोलिक सामीप्य आणि जनांचे संबंध जितके निकटचे आहेत तितके ते तमिळशीं नाहींत हें साधार सिद्ध होत आहे. शिवाय तमिळनाड महाराष्ट्रापासून दूर आहे. एवढेंच नव्हे तर तेलगूचा संपर्कसुद्धां मऱ्हाटकर्णाटका इतका घनिष्ट नाहीं. 'प' काराचा 'ह' कार तेलगूमध्यें अजून घडून आलेला नाहीं.

यदु-तुर्वसु घराणीं महाभारतकाळीं विलीन झालीं. पण आर्यीकरणामुळें त्यांत पुन्हा वेगळे तट पडले. त्यांतील कांहीं पुरोगामी वृत्तीचे लोक जास्त उत्साहानें पुढें गेले असणें जसें शक्य आहे तसेंच कांहीं परंपराप्रिय लोक

जुन्यास चिकटून राहिलेले असणें वा अनिवार्य तितकाच बदल स्वीकारण्यास तयार झालेले असणेंहि संभाव्य आहे. हे दोन गट पुढील काळांत आढळून येतातच. महाभारताच्या काळानंतर रिस्टिक भोजक अशीं जुळीं नांवें आढळत असल्याचें वर सांगितलेंच आहे. खिस्तशकाच्या सुमारें दुसऱ्या शतकानंतर कर्णाट-महाराष्ट्रीयांचा उल्लेख, निःसंदिग्धपणें स्वतंत्र असा बऱ्याच काळापर्यंत मिळत नाहीं. शातवाहन कुंतल देशाचे राजे म्हणवितात. चालुक्यहि कुंतलाधिपति होते असें वर्णन आढळतें. कुंतल देश या मोघम नांवाखालीं मऱ्हाट-कर्णाटक या दोहोंचा उल्लेख पर्यायानें होत होता यांत शंका नाहीं. विदर्भापासून कर्णाटा-पर्यंतच्या सर्व प्रदेशास कुंतल असें नांव एकेकाळीं प्रचलित असल्याचें शिलालेखा-वरून समजून येतें. वरील राजवटींत महाराष्ट्र व कर्णाटाच्या सीमा अजून स्पष्टपणें निर्दिष्ट झालेल्या नसल्यामुळें दोन्ही देशांना लागू होणारें कुंतल हें मोघम नांवच त्यांनीं उपयोजिलें नसेल काय ? महाराष्ट्राचा विस्तार अजून मराठीकरणाच्या रूपानें चाललाच होता. बाहेरच्या प्रवाशांना कर्णाट व महाराष्ट्र या जुळ्या भावंडांना स्वतंत्रपणें ओळखणें जड जात असावें. हुएनत्सांगनें बादामी चालुक्यांचे विषयीं लिहितेवेळीं ' महोलोच '–महाराष्ट्र असें त्याचें वर्णन केलें आहे. बादामी आजहि संपूर्णतया कर्णाटांतील एक गांव आहे. चालुक्याच्या सैन्याला ' कर्णाटक-बलम् ' असें नामाभिधान असलेलें जुन्या ताम्रपट शिलालेखांवरून निश्चितपणें कळतें; असें असतां हुएनत्सांगला कर्णाटकी महाराष्ट्रीयासारखा भासावा याचें कारण काय ? जुन्या तमिळ साहित्यानें तमिळ देशाच्या उत्तरेला ' आरीय ' असल्याचें वर्णिलेलें आढळतें. ' प ' काराचा ' ह ' कार वगैरे भाषिक बदल ज्यांच्या भाषेंत होतात ते आपल्या उत्तरेकडील (वड्डुगर्) लोक ' आरिय ' असा कट्टर परंपराप्रिय तमिळांचा ग्रह झाला ! आणि कर्णाटकीयांनाच ' आरीय ' म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली !

हीं जुळीं भावंडें बऱ्याच काळापर्यंत विशेष हेवादावा न करितां स्वतंत्र पण एकत्र अशा प्रकारें बाराव्या–तेराव्या शतकापर्यंत नांदत आलीं. पैठणचे शातवाहन, बादामीचे चालुक्य, मळखेडचे राष्ट्रकूट आणि कल्याणचे चालुक्य या चारहि राजवटींत मराठीनें आपलें स्वतंत्र घर मांडलें नव्हतें. कर्णाटकीयांच्या राजवटींत ती कानडीजवळच वाढत गेली. वरील चार राजधान्यांपैकीं तीन तर

निर्विवादपणें आजहि कर्णाटकांत आहेत. पुढें देवगिरी–यादवांच्या उत्तरार्धांत मराठीला स्थिरस्थावरता येऊन मराठ्यांच्या अशा स्वतंत्र राजकारणास प्रारंभ झाला. तेराव्या शतकानंतर मराठीनें कानडीपासून पूर्णपणें अलग होऊन स्वतंत्र संसार मांडला. पुढें या जुळ्या भावंडांच्या अतिप्राचीन एकाच कुळाचीं दोनं निराळीं घराणीं झालीं; आणि आज कधींकाळीं यांच्यांत सोयरिक संबंध होते कीं नव्हते याची पुसट जाणीवसुद्धां पार विसरून जाण्याइतका फरक दिवसेंदिवस पडत चालला आहे.

★ ★ ★

: ५ :

भाषिक पुरावा

पत्तिजन—यदुतुर्वसु हे आर्येतर असल्यास त्यांची संस्कृताहून निराळी अशी एक स्वतंत्र भाषा असावी याबद्दल शंका राहात नाहीं. वेदांतील संस्कृत आणि कोल-मुंडा वर्गाच्या भाषेचे शब्द वगळले असतां आणखी एका प्रकारचे शब्द राहातात असें भाषाशास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे. अशा शब्दांना "द्रविडवर्गीय" शब्द म्हणण्याची आजवर प्रथा आहे. पण द्रविड म्हणजे कोण आणि त्यांना वेदकाळीं काय नांव होतें याचें निश्चयात्मक उत्तर अजून कोणाहि संशोधकाकडून मिळालेलें नाहीं. पण आज पत्तिजन—यदुतुर्वसूंच्या या अभ्यासांत द्राविड समस्येचा उलगडा होत आहे असें मला वाटतें. द्रविड म्हणजे तमिळ एवढाच अर्थ होत असल्यानें आणि वेदांत द्रविड हा शब्द आढळत नसल्यानें निश्चितार्थ व्यक्त करण्याच्या दृष्टीनें, केवळ तमिळजनवाचक संदिग्धार्थी व अनुचित असा द्रविड हा शब्द जितक्या लौकर उपयोगांतून काढून टाकतां येईल तितक्या लवकर तो काढणें अगत्याचें आहे. या द्राविड नामक वर्गांत तमिळ, तेलगु, कानडी, मल्याळम् वगैरे सर्व भाषांचा समावेश केला जातो. या गटांतील मूळ भाषेचे लोक कोण हा प्रश्न अद्याप निश्चितपणें सुटलेला नाहीं. वेदकाळीं या गटाच्या मूळभाषेचे कांहीं लोक होते एवढ्या तर्कावरच आज समाधान मानणें जरूर आहे. या लोकांचें निश्चित नांव आणि त्यांची पुढील परंपरा वगैरेबद्दल कांहींच कळत नाहीं. पण यापूर्वीच्या विवेचनावरून पाहतां,

यदुतुर्वसु–पत्तिजन हेच आजपर्यंतचे तथाकथित " द्राविड " वर्गीय लोक होत असें म्हणावें लागतें आणि या लोकांची वेदकाळांतील भाषा ही आजच्या कानडी, तमिळ, तेलगु वगैरे वर्गाच्या सर्व भाषांची मूळ भाषा होती असें ठरतें.

वेदकाळीं आर्यांचा संपर्क आणि संबंध जसजसा वाढत गेला तसतसा त्यांच्या भाषेंत फरक पडत गेला. दोन भिन्न भाषिकांचा संबंध आला असतां परस्परांवर त्याचे परिणाम झाल्याशिवाय राहात नाहींत. त्याप्रमाणें संस्कृतावर या पत्तिजनांच्या भाषेचाहि कांहीं परिणाम घडलेला आहे. " चंद्रमस् " हा जोड शब्द दोघांच्या घनिष्ठ संबंधाचें द्योतक आहे. चंद्र+मस् यांत एकाच अर्थाचे दोन शब्द आहेत. मस्–मास, Month, Mehn, Moon वगैरे शब्द आर्यवर्गीय भाषेमधील आहेत. तसेंच चंद्र हा शब्द आर्येतर पत्तिजनांच्या भाषेंतील आहे असें निश्चितपणें वाटतें. यदुतुर्वसु घराणें चंद्रवंशीय आहे अशी प्रतीति आहे. याचा येथें कांहीं संबंध नसला तरी यावरून चंद्रपूजेशीं त्यांचा निकट संबंध आहे हें सूचित होतें. या घराण्यांत चंद्राची पूजा फार पूर्व काळापासून चालत आलेली आहे. पौर्णिमापूजा, देवीचे उत्सव आजहि महाराष्ट्र–कर्णाट जनांचे वैशिष्ट्यनिदर्शक आहेत. चंद्र हा शब्द मुळांत संस्कृत नाहीं. इंडो–जर्मानिक भाषांतून याशीं संबंधित (Cognates) दुसरे शब्द मिळत नाहींत. ऋग्वेदांत चंद्र (Moon) या अर्थी हा शब्द उपयोजिला नाहीं. तांबूस किंवा सोनेरी तांबूसपणा अशा वर्णनात्मक विशेषणाच्या रूपानें हा शब्द आलेला आहे. प्रा. वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या मतें चंद्र या शब्दाचा उच्चार ऋग्वेदकाळीं आजच्याहून बराच निराळा होता. अग्निश्चंद्र, वसुश्चंद्र इत्यादि शब्दांतून आढळणाऱ्या चंद्र शब्दांतील ' च ' काराचा उच्चार ' च ' आणि ' श ' यांच्यामधील कांहीं विशेष उच्चार असावा असा त्यांचा तर्क आहे, आणि तो अगदीं योग्य आहे असें वाटतें. इंग्रजीमधील ' C ' चा उच्चार याच्याशीं तुलनीय आहे. ' C ' मध्यें क, च, श, या तीनहि तऱ्हेचा उच्चार निरनिराळ्या शब्दांत आपणांस मिळतो. पत्तिजनांच्या मूळभाषेंत ' चंद्र ' यांतील "च" काराचा उच्चार असाच कांहींसा असावा असें वाटतें. तमिळमध्यें " चेन् " चा उच्चार "शेन्" असा होतो. कानडीमध्यें चेन् आणि केन् हीं दोन्हीं रूपें आढळतात. शेन्–चेन्-केन् याचा मूळ अर्थ तांबडा असा आहे. ऋग्वेदांतील

चंद्र शब्दाचा अर्थ हाच आहे. यामुळें चंद्र शब्द मुळांत शेन्–चेन्–केन् याच वर्गांतून निष्पन्न झाला असावा असें वाटतें. हरिश्चंद्र, वसुश्चंद्र यांत 'श' काराकडे झुकत असलेला उच्चार पुढें "च" काराकडे वळत गेला याला आर्यवर्गीयांचा संपर्कच कारण असावा. मृध्रवाचा म्हणजे अस्पष्ट उच्चाराचे असा टोमणा पूरु वगैरेंना मिळालेला आहे. दाक्षिणात्यांचे उच्चार अस्पष्ट, अनिश्चित असतात अशी संस्कृतांत फार प्राचीन काळापासून म्हण आहे. मृच्छकटिकांत त्याचा पडसाद ऐकूं येतो. आर्यवर्गीय भाषेच्या प्रभावांत आलेल्या कानडींत 'श' कार युक्त 'च' काराचा अनिश्चित उच्चार बराच नष्ट होऊन केवळ 'च' कारच राहिलेला आहे. तमिळमध्यें मात्र कानडींतील 'चेन' चा उच्चार अजून दोनहि तऱ्हेनें केला जातो. आर्यांच्या संपर्कानें पत्तिजनांच्या भाषेंत जसा फरक पडत गेला, तसाच आर्यांच्या भाषेवरहि पत्तिजनांच्या भाषेचा कांहींसा तरी परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. संस्कृतीकरणापासून चंद्र, अरणी वगैरेंसारखे शब्द आर्यांच्या भाषेंत शिरले. प्राचीन कानडींत 'प' काराचा 'ह' कार झाल्याचें कारण आर्यांचा संपर्क होय हें यापूर्वीच सांगितलें आहे. अशा प्रकारें आर्यजनांच्या संपर्कानें पत्तिजनांच्या मूळ भाषेंत बराच फरक पडूं लागून मूळ भाषेचें स्वरूप बदलूं लागलें.

कानडी आणि महाराष्ट्रीयांचा घनिष्ठ संबंध

दोन भिन्न भाषिकांचे व्यापारव्यवहाराचे संबंध जसजसे वाढत जातील तसतसा त्यांतून कांहीं मध्यस्थांचा एक द्विभाषिक वर्ग निर्माण होतो. ज्ञात असलेल्या दोन भाषांत राजकीय, सामाजिक, किंवा धार्मिक वर्चस्व असलेल्या भाषेचा वरपगडा होतो आणि दुसरी भाषा खालीं दबली जाते. परभाषा आत्मसात् करतेवेळीं मूळ भाषेंतील, ज्यांना एका अर्थानें विकृत म्हणतां येणार नाहीं, (कारण ते मुद्दाम वेडावण्यासाठीं केलेले नसतात.) पण ज्यांना व्याकरण दृष्ट्या विकृत म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं असे कांहीं शब्द प्रचारांत येऊं लागतात.

पत्तिजन वेदकाळानंतर 'हट्टिजन' झाले; या हट्टिकार–हटगार मधूनच मरहट्टे यांच्या एका गटानें वर उचल खाल्ली. या मरहट्टे यांचीच भाषा 'माहाराष्ट्री' (प्राकृत) होय.

१२१२५
२७।८।५७

पत्तिजनांच्या आर्यीकरणाबरोबरच. त्यांच्या भाषेच्या आर्यीकरणासहि आरंभ झाला. पत्तींच्या भाषेंत संस्कृत शब्द जास्त जास्त डोकावूं लागले. ह्या संस्कृतांतील संयुक्ताक्षरें आणि श, ष, स वगैरेंचे उच्चार त्यांना जमेनात; यामुळें संस्कृत शब्दांना, आपलें रूप बदलून, पत्तिजनांच्या उच्चारपद्धतीला अनुरूप होईल असें स्वरूप धारण करावें लागलें; आणि त्यांच्या भाषेंत त्या शब्दांनीं तशा स्वरूपांतच स्थान मिळविलें. कानडी भाषेंतील तद्भव प्रकरणाचा अभ्यास केला असतां या विधानाची सत्यता कोणासहि पटेल.

पत्तिजनांच्या भाषेंत मुळांत कोणतीं स्वर-व्यंजनें होतीं, त्यांची वर्णमाला कशा प्रकारची असावी, याची बरीचशी अटकळ आजच्या तमिळ वर्णमालेवरून करितां येण्याजोगी आहे. तमिळमध्यें, वर्गीयाक्षरांतील पहिलें आणि शेवटचें अशीं दोनच अक्षरें आढळतात. क, ञ; च, ङ; ट, ण; त, न; प, म. संस्कृताशीं संबंध आल्यानंतर पत्तिजनांच्या भाषेंत संस्कृतवर्णमालेंतील सर्व उच्चार क्रमाक्रमानें रूढ झाले आणि संस्कृत शब्द जसेच्या तसे उच्चारणें सोपें होत गेलें.

हे सर्व बदल होण्यास हजारों वर्षांचा कालावधि लागलेला आहे. या दरम्यानच्या अवस्थेंत भाषा-मिश्रणाचे पुष्कळ प्रकारचे प्रयोग होऊन गेले असावेत. अशा प्रयोगांतूनच आज उपलब्ध प्राकृत भाषा निर्माण झालेल्या आहेत. दोन भिन्न भाषांच्या संपर्कांत धार्मिक, सामाजिक, राजकीय महत्त्व प्राप्त झालेली भाषा अन्यभाषिकांकडून आस्थेनें अभ्यासली जाते. शक्य तों मुळांतील उच्चारास अनुसरूनच श्रेष्ठ गणल्या गेलेल्या परभाषेंतील शब्द उच्चारण्याचा प्रयत्न केला जातो. आरंभीं हा प्रयत्न सिद्धीस जात नाहीं; तथापि कांहीं काळानंतर मूळ उच्चारानुकरण शक्य होतें. कानडींत 'कार्य' या शब्दाचे "कारिय" आणि 'कज्ज' असे दोन तद्भव आहेत. आर्य याचेहि असेच दोन उच्चार आहेत. 'आरिय' आणि 'अज्ज', कारिय, आरिय या पहिल्या प्रकारच्या उच्चारांत कार्य, आर्य अशीं संस्कृतांतील संयुक्ताक्षरें उच्चारण्यास जड जात असल्यामुळें, त्यांच्या सुलभीकरणाकडे असलेला कल स्पष्ट दिसतो. पण 'कज्ज' व 'अज्ज' वगैरेंत सुलभीकरणापेक्षां प्रौढीकरणाकडेच प्रवृत्ति असलेली दिसून येते. तमिळमध्यें शिरलेल्या संस्कृत शब्दांना सोपें रूप देण्याकडे त्या लोकांची जास्त प्रवृत्ति दिसते. अग्नि याचा तद्भव तमिळमध्यें 'अक्किनी' होतो

तर प्राकृताप्रमाणें कानडींत "अग्गि" असा शब्द रूढ आहे. "अग्गिनी" हें रूपहि क्वचित् आढळतें. पण 'अग्गि' यालाच साहित्यांत व व्यवहारांत जास्त प्राधान्य मिळालेलें दिसतें.

जोंपर्यंत कानडींत संस्कृतासारखी वर्णमाला सिद्ध झालेली नव्हती, तोंपर्यंत संस्कृत शब्द कानडींत मूळ स्वरूपांत प्रवेश करूं शकत नव्हते. प्रारंभीं 'आरिय' 'अगिनी' सारखीं सोपीं रूपें, तमिळप्रमाणें कानडींतहि रूढ झालीं असावींत. पण तो काळ लवकरच मागें पडून संस्कृतचीं प्राकृत रूपेंच कानडींत प्रामुख्यानें प्रचारांत येऊं लागलीं. कानडीचें तद्भव प्रकरण म्हणजे प्राकृत भाषेचें एक छोटें व्याकरणच होय. पुढें संस्कृताप्रमाणेंच कानडीची वर्णमाला पूर्णपणें बनल्यानंतर तद्भवांची आवश्यकताहि दिवसेंदिवस कमी होऊं लागली आणि त्यांचेऐवजीं संस्कृत शब्दच कानडी बोलींत आणि साहित्यांत जसेच्या तसे वावरूं लागले. 'अग्गि' 'कज्ज' 'दिट्टि' 'गब्भ' वगैरे प्रकारचे तद्भव शब्द मागें पडून 'अग्नि' 'कार्य' 'दृष्टि' 'गर्भ' वगैरे शुद्ध रूपेंच व्यवहारांत उपयोजिलीं जाऊं लागलीं.

परकीय भाषेंतील उच्चारांचें जसेंच्या तसें अनुकरण करण्यांत कर्णाटकीय साऱ्या हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहेत. संस्कृत शब्दांच्या शुद्ध उच्चाराविषयीं महाराष्ट्रीय कर्णाटकीयांना हार जाणार नाहींत हें खरें असलें तरी इंग्लिश व इतर परभाषेच्या उच्चाराविषयीं महाराष्ट्रीय तितकीशी आस्था बाळगीत नाहींत अशी आज सर्वत्र समजूत आहे. सामूहिक अभिमान–स्वदेश किंवा स्वजन यांचा अभिमान–जास्त असलेले लोक परभाषेविषयीं तितकी आस्था बाळगीत नसतात. सामूहिक अभिमानापेक्षां वैयक्तिक प्रतिष्ठेची दृष्टिच जेथें प्रभावी असते तेथें परकीय भाषेचा अभ्यास मोठ्या आस्थेनें होत असतो, असें मत भाषा व संस्कृतीचे विख्यात अभ्यासू व्होस्लेर यांनीं आपल्या ग्रंथांत मांडलें आहे. त्यांत बराच तथ्यांश आहे. हट्टिकारांत अशा प्रकारची व्यक्तिनिष्ठ मनोवृत्ति असलेल्या गटाच्या भाषेंत आधीं प्राकृतांतल्या आणि नंतर संस्कृतांतल्या शब्दांचा भरणा जास्त होत गेला. पुढील आर्यीकरणांत आपल्या (नवीन) प्राकृतमय भाषेविषयीं सामूहिक अभिमान असणाऱ्यांचाच एक निराळा गट निर्माण झाला आणि तोच महाराष्ट्रीय प्राकृतास कारण झालेला मरहट्टे यांचा होय. बाकी जे राहिले

त्यांचा गट म्हणजे कानडी हट्टीकारांचा, कानडी भाषेच्या आरंभिकांचा होय. कानडींत संस्कृत आणि प्राकृत शब्दांचा भरणा शेंकडा ५०-६० टक्क्यांहूनहि जास्त कसा याचा उलगडा याहून दुसऱ्या रीतीनें होणें शक्य नाहीं. सामाजिक व राजकीय प्रतिष्ठेस कारण होणारी दुसरी भाषा **जशीच्या तशी** आत्मसात् करण्याची प्रवृत्ति आजहि दुसऱ्या कोणत्याहि प्रांतापेक्षां कर्णाटकांत जास्त आहे. आपल्या भाषेंत नसलेले इंग्लिशमधील कांहीं उच्चार कानडींतही करतां यावेत म्हणून कांहीं नवीन अक्षरें बनविण्याचा प्रयत्न बेंगळूरच्या कांहीं विद्वानांनीं केला आहे. हिंदीमध्यें येणाऱ्या उर्दूतील 'क'चे एकापेक्षां जास्त उच्चार आहेत आणि ते कानडींत जसेच्या तसे लिहून दाखविण्याचा प्रयत्न आज कर्णाटकांत कांहीं मंडळी करूं इच्छित आहेत. हीं सर्व उदाहरणें सुशिक्षित कानडी वर्गांत परभाषेविषयीं अभावितपणें आढळून येणाऱ्या आस्थेचीं निदर्शक होत.

परभाषेविषयीं आसक्ति व आपुलकी वाढत जाईल तसा स्वभाषेविषयींचा आदर व अभिमान कमी होऊन आपल्या भाषेच्या हेळसांडीस आरंभ होतो. स्वभाषेंतील शब्दांचे उच्चार व लकबी वगैरे, आसक्तीनें आत्मसात् करीत असलेल्या नव्या भाषेच्या वळणावर जातात. उत्तर कर्णाटकांतील कानडी उच्चार-पद्धति व भाषाशैली इतर भागाहून निराळी होण्यास हेंच मुख्य कारण आहे. सांगली, सोलापूर भागांतील कानडी भाषेंत हाला (दूध), मसरा (दही), याका (एके), याना (येनु) अशाप्रकारचे बरेच शब्द आकारान्त झालेले ऐकावयास मिळतील. याच प्रवृत्तीची पुढील पायरी म्हणजे दुसरी भाषाच पूर्णपणें आपली बनवून घेणें.

'हे आम्हांसी कानडे'

प्राकृत भाषेंत पुष्कळ "देशी" शब्द आहेत असें हेमचंद्रादि तज्ज्ञांनीं ठरविलें आहे. "देशी" याचा अर्थ संस्कृताशीं संबंध नसलेल्या या देशांतील दुसऱ्या भाषा असाच करणें जरूर आहे. कारण 'देशी' गणलेल्या शब्दांची व्युत्पत्ति संस्कृत शब्दांनीं दाखविणें शक्य होत नाहीं. मेघदूत (पूर्व मेघ ४९) काव्यांत 'हाला' शब्द आल्याचें मागें सांगितलेंच आहे. "अभिप्रयुक्त-देशभाषापदमित्यत्र सूत्रे हालेति देशभाषापदमप्यतीव कविप्रयोगात्साधु" असें वामन नामक पंडिताचें वाक्य, मल्लिनाथ मेघदूतावरील आपल्या

टीकेंत देतो. 'हाला' शब्दाची व्युत्पत्ति देशीय पालू (प्राचीन कानडी) शब्दापासून झाली. संस्कृतमध्यें या शब्दाची व्युत्पत्ति लागत नाहीं. प्राचीन पत्ति भाषेंतील पाल् हा शब्द संस्कृत भाषिकांच्या संपर्कानें 'हालु' असा परिवर्तित होऊन कानडींत आज व्यवहारांत आहे. हा 'हालु' शब्दच संस्कृतांत 'हाला' या रूपांत शिरला असें म्हणावें लागतें. हालु हा शब्द कानडीमध्येंच असून तमिळ तेलगूमध्यें दूध या अर्थी हा शब्द 'ह' कार युक्त नाहीं. जुना 'प' कार युक्त "पाल्" हा शब्दच त्या भाषेंत अजूनहि रूढ आहे. यावरून संस्कृतांत शिरलेल्या 'हाला' शब्दास पत्तींतून आर्यीकरण पावलेला 'हट्टि' कार वर्गच कारण झाला असावा असें म्हणणें क्रमप्राप्त होतें. याचप्रमाणें प्राचीनकाळीं संस्कृतमध्यें शिरलेल्या इतर बऱ्याच देशी शब्दांना आधीं हट्टि-कारच (कानडीजन) कारण असावेत असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

गंगायमुनातीरीं बनत चाललेल्या प्राकृताचा उगम कशा रीतीनें झाला असावा याची कांहींशी कल्पना वरील विवेचनावरून येण्यासारखी आहे. प्राकृताला 'माहाराष्ट्री' असें जें एक नांव मिळालें तें राष्ट्रावरून नसून 'मरहट्ट' या लोकांवरून आहे. आधीं राष्ट्र बनून नंतर त्या राष्ट्रांतील भाषा निर्माण झाली असें दर्शविणारा एकहि ऐतिहासिक पुरावा मिळत नाहीं. ती भाषा बोलणाऱ्या जनांवरूनच हें नांव या भाषेला प्राप्त झालें असावें; 'माहाराष्ट्री' प्राकृत हें नांव वररुचीच्या काळाइतकें प्राचीन असून त्या नांवाच्या राष्ट्राचा मात्र कुठेंहि मागमूस नसावा हें आश्चर्य नव्हे काय? 'माहाराष्ट्री' प्राकृतास 'मरहट्टे' जन कारण होत याबद्दल शंका नाहीं. यामुळें या प्राकृताशीं त्याच्या आरंभापासून कानडीचा निकट संबंध होता हें सिद्ध करण्याची आतां जरूरी राहात नाहीं. संस्कृताच्या परिणामानें पत्तिजनांच्या जुन्या भाषेंत फरक पडूं लागला, तेव्हांपासूनच कानडीच्या उगमाला प्रारंभ होतो. शैंद्र (श्वंद्र), पत्ति, (हट्टि), वगैरे शब्दांच्या उच्चारांत फरक पडून नव्या भाषेच्या निर्मितीस आरंभ होतो. त्याला स्पष्ट पूर्ण भाषेचें असें स्वरूप येण्यास बराच कालावधि लागला असावा यांत शंका नाहीं; आणि या मधल्या काळांत संस्कृतांतील पुष्कळ शब्द पत्तिजनांच्या भाषेंत शिरत शिरत तद्भव व तत्सम शब्दांची संख्या वाढत जाऊन पुढें तेच या नवभाषा-निर्मितीस कारण झाले असावेत.

यादवांच्या वसतिस्थानाविषयीं स्पष्ट कल्पना आल्याशिवाय प्राकृत–माहाराष्ट्री प्राकृताच्या निर्मितीची व वाढीची चांगली कल्पना येणें शक्य नाहीं. गंगायमुनातीरीं यादवांच्या वसाहती होत्या. त्या त्यांच्या 'हाटां'तून (घोष–पल्ली) प्राकृत भाषेनें बाळसें धरलें असें सामान्यपणें सांगितलें जातें. पण महाभारतकाळींच यादवांच्या निरनिराळ्या शाखा द्वारका, विदर्भापर्यंत पसरून स्थायिक झाल्या होत्या असें अनेक पुराव्यांवरून निश्चितपणें कळतें. कालयवनादि शत्रूंचा त्रास चुकविण्याकरितां श्रीकृष्ण द्वारकेंत येऊन स्थिर होतो. सुरक्षततेकरितां आश्रयास जाणारे, अगदीं अपरिचित स्थळीं जाणें शक्य नाहीं. वेळप्रसंगीं आपल्या नात्याची जवळची मंडळी पाठिंब्यास आहेत अशा प्रकारच्या सर्वतोपरी परिचित किंवा जेथें विश्रब्धतेनें राहाणें शक्य आहे अशाच स्थळीं शत्रूचा मारा चुकविण्याकरितां कोणीहि जाईल. या दृष्टीनें विचार केला असतां श्रीकृष्णानें सौराष्ट्र–द्वारका पसंत केल्याचें कारण काय हें चांगलें ध्यानांत येण्याजोगें आहे. लाट, सौराष्ट्र देश म्हणजे नाट (नाडव) राष्ट्रिकांचें माहेरघर–या प्रदेशास मिळालेलीं नांवें हेंच याचें प्रत्यंतर आहे. नाट राष्ट्रिक हे भोजक यादवांचे संबंधी ही गोष्ट ऐतिहासिक काळांतील रिस्टिक भोजकादि उल्लेखांवरूनहि सिद्ध होत आहे. भोजक हे विदर्भाचे जन. यावरून गंगा–यमुना ते द्वारका–विदर्भापर्यंतचा प्रदेश, हे हट्टे जन व्यापून होते असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अशा या प्रमुख जनांची बोली (प्राकृत) त्यांच्या वर्चस्वाबरोबर देशांत सर्वत्र लवकरच प्रसृत होऊं लागली.

हिमालय प्रदेशांत 'हाटक' नांवाचा देश होता असा महाभारतांतील एक उल्लेख मागें आलाच आहे. बंगालच्या एका भागाला गौड देश असें नांव असलेलें आढळतें. गौड देश असें नांव या देशाला कां पडलें असावें हें विचार करण्याजोगें आहे. संगीतांत गौळ नांवाचा एक राग आहे. देशांच्या नांवांचे कानडा, सौराष्ट्र, अरबी वगैरे जसे राग आहेत तसा गौळ हा देशावरून नांव मिळालेला एक राग आहे. गौड, गौळ अशा दोन प्रकारांत हा शब्द रूढ आहे. प्राचीन काळीं गौळजनांच्या वसाहतीवरून त्या प्रांताला हें नांव मिळालें असण्याचा संभव आहे. गोपाल-गोवळ-गौळ हा शब्द हट्टि-हट्टिकार याचा संस्कृतोत्पन्न पर्यायशब्द आहे. बंगालमध्यें वसाहत केलेले हे गौळ (जन) पत्तिजनांची एक शाखा असावी असें म्हणावें लागतें. याला बंगालच्या भाषा व

इतिहासांत पुष्कळ बलवत्तर पुरावा मिळतो. "मागधी अपभ्रंश भाषेनें बंगाल्यांत त्याहि पूर्वी असलेल्या द्राविडी, कोल आणि मॉंखमेर, तिबेटोब्रर्मन या भाषा मागें टाकून त्या जागीं आपलें वर्चस्व वाढविलें. बंगाली भाषेंतील उच्चारपद्धति, शब्दरचना, वाक्यपद्धति व शब्दसंग्रह वगैरेंशीं द्राविडीचा आजहि घनिष्ठ संबंध असल्याच्या अचूक खुणा दाखवितां येतात. तथापि हें साम्य फक्त बंगाली भाषेशींच आहे असें नसून उत्तरेकडील इतर आर्य-हिंदी भाषांतूनहि हाच प्रकार आढळतो असें डॉ. सुनीतिकुमार आपल्या 'बंगाली भाषेचा उद्गम व विकास' या पुस्तकांत लिहितात.

गौड असें एकेकाळीं कांहीं भागास नांव असलेल्या या बंगालकडील, बंगाली भाषा व रीति यांच्यावर दूरगामी परिणाम करणारे असे हे द्रविड म्हणजे कोण हे तमिळ, का तेलगु, का कर्णाटकी किंवा या शाखेचे दुसरे कोणी लोक? याचा निश्चित निर्वाळा कुठल्याहि संशोधनांत अजून पुढें आला नाहीं. पण ही संदिग्धता अजून किती दिवस चालू राहावयाची?

गौहट्टी, बारहट्ट, नयहट्टि वगैरे या भागांतील 'हट्टया' पाहिल्यास– या ग्रामनामांची दखल घेतल्यास हे द्रविड कोण तें कळण्यासारखें आहे. या भागांतील ग्रामनामांच्या शेवटीं, अनेक ठिकाणीं आढळणारा 'पारा' हा शब्द लक्षांत घेतां 'प'काराचा 'ह'कार होण्याच्या पूर्वीपासूनच पत्तिजनांची वसाहत या भागांत होण्यास आरंभ झाला होता असें म्हणावें लागतें. 'ह'कारयुक्त हट्टी वगैरे रूपांतरें, हीं पुढील काळांतील हट्टिकारांच्या प्रभावाचीं द्योतक आहेत. हे हट्टिकार म्हणजे कर्णाट-महाराष्ट्रीयांचे पूर्वज होत. बंगालमध्यें १०७० पासून १११९ पर्यंत सेन नांवाचें घराणें राज्य करीत होतें. या घराण्याच्या ताम्रपटांतून ते आपणांस "ब्रह्म–क्षत्रिय", "कर्णाटक–क्षत्रिय" असें विशेषण लावून घेत असें आढळतें (Vincent Smith, Early History of India, p. 434–35). या वंशांत बल्लाळ नांवाचे राजे झाले. बल्लाळु शब्दाला पराक्रमी पुरुष असा कानडींत अर्थ आहे. बल्लाळपूर नांवांचें एक गांव बंगालच्या या भागांत होतें; तें नांव पुढें 'विक्रमपूर' असें बदलल्याचें ऐतिहासिक कागदपत्रांवरून दिसून येतें. 'बल्लाळपूर' चें विक्रमपूर हें उघड उघड भाषांतर आहे. या भागांत 'ऊरा',

'पल्लि' वगैरे शब्द असलेलीं ग्रामनामें आढळतात. मिथिला (बिहार) येथें होऊन गेलेला नान्यदेव, आपणांस 'कर्णाटक–कुल' क्षत्रिय म्हणवितो. ('नान्य certanily was a Karnatak King of Mithila & contemporary with Vijayasen.' V. Smith.) या नान्यदेवाचे वंशज नेपाळमध्यें कांहीं काळ राज्य करीत होते असें त्या देशाच्या इतिहासावरून उघडकीस आलें आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां, या गौड देशांत आपल्या भाषा व चालीरीतींचा सुस्पष्ट ठसा उमटविणारे या हट्टिकारांशिवाय दुसरे कोण असणार ?

गौळ शब्द गौड झाला हें गृहीत धरण्यांत 'ळ'काराचा 'ड'कार झाला असें म्हणावें लागतें. 'ड'काराचा 'ळ'कार झालेला सर्वत्र दिसतो. पण 'ळ'काराचा 'ड'कार क्वचितच झालेला आढळतो. तरी पण अशीं उदाहरणें नाहींत असें नाहीं. तमिळपासून द्रविड शब्द झाला असें आज गृहीत धरलें जातें. तमिळ-दमिळ-द्रमिड-द्रविड; या ठिकाणीं 'ळ'कारापासूनच 'ड'कार झाला असें स्वीकारणें भाग आहे. गौड आणि गौळ अशा दोनहि प्रकारें एकच नांव उच्चारलेलें आजहि आपणांस ऐकावयास मिळतें. चंद्र, अरणि, मटची सारखे शब्द ज्या भाषेंतून वैदिक वाङ्मयांत आले ती भाषा बोलणारे लोक त्यावेळीं उत्तरापथांत-पंचनद देशांत होते हें निराळें सिद्ध करावयास नको. यजुर्वेदांतील पत्ति, ऋग्वेदांतील यदु-तुर्वसु हे आर्येतर असून वरील प्रकारच्या चंद्रवर्गाच्या संस्कृतेतर शब्दांना तेच कारण होत.

उत्तर हिंदुस्थानांत हट्टीकारांची वसाहत एके काळीं होती हें जरी खरें असलें तरी आर्यीकरणांत ते पूर्णपणें हतप्रभ झाले. पण नर्मदेच्या दक्षिणेस त्यांनीं आपलें वैशिष्ट्य राखून आजवर आपला प्रभाव कायम ठेवला आहे. याच कारणास्तव या प्रदेशास पंचद्राविड देश असें म्हणण्याचा प्रघात आहे. 'मरहट्टे हा हट्टीकारांतील एक छोटासा विभाग होय. नर्मदा ते कावेरी या भागांत हट्टीकारांचीं वसाहतसूचक ग्रामनामें पुष्कळच आहेत. नीलगिरी ओलांडून कोईमत्तूर–सेलम्–(शाल्यम्) जिल्ह्यापर्यंत हट्टि (ग्रामें) आढळतात. हट्टि हा शब्द तमिळमध्यें मिळत नाहीं. दक्षिणेंत जेथपर्यंत हट्टि (ग्रामें) आहेत तेथपर्यंत हट्टि यांचें वर्चस्व होतें किंवा तो प्रदेश त्यांच्या कक्षेंत होता हें

निश्चित ठरतें. दक्षिणेस हट्टिग्रामें असलेल्या प्रदेशांत आज जरी तमिळ भाषा चालत असली तरी त्याकाळीं ती नव्हती. नर्मदेच्या दक्षिणेस व पूर्वेसहि जेथपर्यंत हट्टि (ग्रामें) आहेत तेथपर्यंत हट्टिकारांचा विस्तार होता हें निश्चित आहे. आज ज्याला कर्नूल म्हणतात तो कण्णनूर जिल्हा या हट्टिकारांच्या पूर्णशः प्रभावाखालीं होता. श्रीशैलाच्या भोंवतालच्या प्रदेशाला 'कण्ण विषय', 'कर्णाट + विषय' अशीं नावें असल्याचें ताम्रपटावरून कळतें. या भागास 'कर्णाट सीमा' असें नांव असल्याचें डॉ. एन्. वेंकटरमणय्या यांनीं आपल्या लेखांत नमूद केलें आहे (Andhra Historical Journal Vol. 10–p. 95).

प्राकृतभाषा पत्तिजनांच्या गोष्ठांत उदय पावली तरी सुसंस्कृत साहित्यिकांच्या साहाय्यानेंच पुढें ती चांगलें बाळसें धरून वृद्धिंगत होऊं लागली. जैन व बौद्ध मतप्रसारकांनीं या भाषांना आधीं जवळ केलें. संस्कृत भाषा व साहित्य यांच्या बाहेर पाहाण्यास तयार नसलेला ब्राह्मणवर्ग दिवसेंदिवस सभोंवतालच्या समाजापासून दूर दूर होऊं लागला. यामुळें समाजांतील आपल्या स्थानमानास धक्का बसत आहे हा कटु अनुभव येतांच हा वर्ग खडबडून जागा होऊन प्राकृताकडे आपुलकीनें पाहाण्यास तयार झाला.

प्राकृतांत अशा प्रकारचे दोन स्थूल प्रवाह दिसतातहि. जैन, बौद्धांनीं पोसलेली भाषा निराळी; तर वैदिक किंवा हिंदु मतानुयायी यांनीं प्रचारांत आणलेली प्राकृत भाषा निराळी. बौद्ध व जैन साहित्य विशेषतः पाली-अर्धमागधी भाषेंत आहे तर वैदिक परंपरेंतील विद्वानांनीं रचिलेले ग्रंथ माहाराष्ट्रींत विपुल मिळतील.

पंचनद देशांतून वैदिक संस्कृतीचें केंद्र हालल्यानंतर तें विदर्भ देशांतच बहुतकाळपर्यंत प्रकर्षानें स्थिर झालेलें दिसतें. त्यानंतर तें केंद्र कांची, (कांहीं काळ कल्याण व नंतर) विजयनगरकडे झुकलें. मुसलमानांच्या तावडींतून हिंदु संस्कृतीचें संरक्षण केल्याचें श्रेय जसें विजयनगरास आहे तसें दक्षिणापथांत जैन मताच्या प्रसारास टक्कर देण्याचें कार्य विदर्भ–महाराष्ट्रानेंच केलें. विदर्भीय विद्वानांनीं आधीं माहाराष्ट्रीस, नंतर मऱ्हाटीस उचलून धरून वैदिक–हिंदु धर्माचें अस्तित्व कायम राखलें. मरहट्टाचें–विदर्भ–महाराष्ट्र–मराठी झालें. या स्थित्यंतरांत हा सर्व इतिहास सामावलेला आहे.

मरहट्टाच्या आर्यीकरणास आरंभ झाल्यावर देशनामाचें पहिलें रूपांतर विदर्भ असें झालें. विदर्भ हें राजाचें नांव असें हरिवंशांत नमूद आहे. पण तें मऱ्हाटचें संस्कृतीकरण होऊन 'महाराष्ट्र' हा शब्द बनण्यापूर्वीचें, मध्यंतरकालीन एक रूप आहे. वऱ्हाटचें विदर्भ असें स्थित्यंतर झालें असणेंहि असंभवनीय नाहीं. महाभारतादि प्राचीन ग्रंथांतून वऱ्हाटचा विदर्भ असाच उल्लेख येतो. या प्रदेशाचा विदर्भ असा उल्लेख असला तरी जनांचें नांव महाराष्ट्रीय असें आधीं रूढ झालें असलें पाहिजे. पण पहिल्या रूढीला मागें टाकून दुसरें देशवाचक नांव साहित्यांत चालू होण्यास आणखी कांहीं काळ लागला असल्यास नवल नाहीं. वऱ्हाट–विदर्भाशिवाय कोठेंहि महाराष्ट्राची बैठक दिसत नाहीं. "महाराष्ट्रीय" मरहट्टे हे संपूर्णपणें वैदिक किंवा हिंदु संस्कृतीच्या कक्षेंत आले होते. आणि त्यांच्या पाठिंब्यानें ब्राह्मणांनीं कर्णाटांतून जैन धर्मास मागें हटविलें व महाराष्ट्राची मर्यादा वाढविली. सर्वत्र हिंदूंतील विद्वानांनीं याच आपुलकीनें माहाराष्ट्री (प्राकृता)ची जोपासना केली. रसाळ ग्रंथसंपत्तीची भर पडून ही भाषा अखिल भारतांत सन्मान पावली. पुढें मराठी सुद्धां, कर्णाटकांत या प्रकारच्या भावनांची पार्श्वभूमि मिळाल्यानेंच झपाट्यानें वाढत गेली.

वऱ्हाट हें मरहट्टयांचें मूलस्थान (प्रथममहाराष्ट्र) होय. मरहट्टे हे पूर्णपणें आर्यांच्या प्रभावांत विरून गेले तसे, ते 'आरिय' बनले आणि आर्यांचा प्रभाव मरहट्टाच्या बाहेर (वऱ्हाट) जसजसा जास्त वाढूं लागला तसतसा आरिय जनांचा विस्तारहि मोठा होत गेला. मरहट्टांचें संस्कृतीकरण होऊन महाराष्ट्र असें नांव द्रुताक्षर न्यायानें जरी पुढें आलें तरी क्रमानें तें नांव सार्थ होऊं लागलें! कर्णाट–हें नांव 'कण्ण' जनांवरून आलें हें निश्चित असलें तरी एका अर्वाचीन कवीनें अभावितपणें तर्कानें सुचविलेली पुढील व्युत्पत्ति बरीच खरी ठरली आहे. "कर्णे अटति"– कानास ऐकूं येतें, म्हणजे सुप्रसिद्ध आहे (पण डोळ्यांना दिसत नाहीं म्हणजे प्रत्यक्षांत नाहीं) अशा अर्थानें त्या कवीनें लावलेली व्युत्पत्ति निराळ्या अर्थानें (कर्णाट क्षीण होऊन) खरी ठरण्यासारखी परिस्थिति यावी हें अजब होय!

बाराव्या शतकापर्यंतचा कर्णाट–महाराष्ट्र संबंध नीट लक्षांत येण्यास आजची या दोन्ही प्रांतांतील तेढ बरीच आडवी येत आहे. बाराव्या शतकापूर्वी

संस्कृत भाषेविषयीं तर राहोच, प्राकृत किंवा मराठी भाषेविषयींसुद्धां कर्णाटकांत कोणत्याहि प्रकारचा दुजाभाव नव्हता. इतकेंच नव्हे तर या भाषा शिकणें आवश्यक असें समजलें जात असे. जुने कानडी महाकवि स्वतःस "उभय-भाषाविशारद" असें मोठ्या अभिमानानें म्हणवितात. कानडी भाषा आर्यभाषा-वर्गांतीलच आहे अशी प्राचीन कानडी ग्रंथकारांची समजूत होती. "संस्कृतं प्राकृतं अपभ्रंशं पैशाचिकं एंब मुरुवरे भाषे गळोळ् पट्टुव" संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश आणि पैशाची अशा साडेतीन भाषांपासून झालेली (कानडी) भाषा असें दहाव्या शतकांतील नागवर्मा नामक छंदःशास्त्रज्ञ लिहितो. नागवर्माची ही समजूत त्याच्याहि बऱ्याच पूर्वीपासून रूढ झालेली असावी. बादामी चालुक्य, विजयादित्य याच्या एका ताम्रपटांत (खि. श. ६९९) कानडीला प्राकृत भाषा म्हटलेलें दिसून येतें. "अतःपरं प्राकृतभाषया वर्णान्येतानि दत्तानि" असें लिहून पुढें दान दिलेल्या प्रदेशाच्या सीमा कानडींतून दिलेल्या आहेत. कानडीलाच प्राकृत भाषा म्हणण्याची पद्धत कर्णाटकांत सोळाव्या, सतराव्या शतकापर्यंतहि आढळते. आंडय्य नामक कवीनें (खि. श. १२३५ आपण अस्सल कानडींतच काव्य रचणार असा विडा उचलून) "कब्बिगर काव" नांवाचें काव्य रचलें. पण हें काव्य प्राकृत पदभूयिष्ठ असल्याचें आपण पाहतों. याप्रमाणें प्राकृताविषयीं कर्णाटकीयांची इतकी आपुलकी होती कीं, ही परकीय भाषा आहे असें त्यांच्या स्वप्नींहि आलें नाहीं. प्राकृताविषयीं जी आपुलकी तीच पुढें बऱ्याच काळपर्यंत मराठीविषयीं होती. कारण त्या काळीं भाषा हा राजकारणाचा किंवा प्रांतीयतेचा विषय नव्हता. धार्मिक व साहित्यिक आनंदाचें तें एक साधन होतें. विचार-वाहनांचें साधन या एकाच दृष्टीनें त्या काळीं कानडी लोक या संस्कृत आणि प्राकृत भाषांकडे आपुलकीनें पाहात असत.

कानडी ही प्राकृतोद्भव भाषा अशी कर्णाटकी विद्वानांची ठाम समजूत झाल्यानें त्या भाषेंत संस्कृत आणि प्राकृत शब्दांची रेलचेल होण्यास कोणतीच आडकाठी राहिली नाहीं. कानडी व्याकरणप्रक्रिया संस्कृत भाषेसारखीच बनली. कार, गार, वंत, वळ (पाल-वाल-वाळ-वळ) वगैरे प्रत्यय संस्कृतापासून कानडींत घेतलेले आहेत. मारामारी, हाणाहाणीसारखे समास कानडींत रूढ करण्याचा प्रयत्न परवांपर्यंतहि झाला. पण तो कानडी बोलीशीं विसंगत

ठरल्यामुळें आज मार्गेंच पडला आहे. वाक्यांतील क्रियाप्रत्यय आणि नाम-विभक्तिप्रत्यय वगळले तर सबंध वाक्यें संस्कृत प्राकृत शब्दांनीं भरलेलीं कानडी प्रौढ कवींच्या काव्यांतून पदोपदीं आढळतील.

यामुळें कानडी भाषेंत बाराव्या–तेराव्या शतकापर्यंत प्राकृत अशा समजुतीनें रूढ केलेले शब्द पर्यायानें मराठी भाषेच्या पूर्वसिद्धीसच कारण झाले. आधुनिक मराठीचीं प्राथमिक रूपें मराठी साहित्यांत आढळलीं पाहिजेत. पण तीं आजहि कानडी बोलींत व साहित्यांत विखुरलेलीं आहेत. मराठींतील, तेल, पीठ, गाभ(ण) वगैरे शब्द मूळ संस्कृत असून मराठींत येण्याच्या पूर्वी त्यांची प्राकृतमधील मध्यम अवस्था उच्चारशास्त्राच्या दृष्टीनें आवश्यक ठरते.

१	२	३
संस्कृत	**प्राकृत**	**मऱ्हाटी**
तैल	तेल्ल	तेल
पिष्ठ	पिट्ठ	पीठ
गर्भ	गब्भ	गाभ
कर्पट	कप्पड	कापड वगैरे.....

त्यांतील तिसरा प्रकार मराठींत रूढ असून मधलीं रूपें जुन्या मराठी साहित्यांतदेखील विशेष आढळत नाहींत. पण ते शब्द नित्य व्यवहारांतील कानडी बोलींत आजहि रूढ आहेत. ज्ञानेश्वरी वगैरे जुन्या ग्रंथांतून आढळणारीं नीच, चोख, आगळ, सान, दिठी, जेठी, साद, वगैरे शब्दांचीं पूर्वरूपें कानडी बोलींत आजहि जिवंत आहेत.

मऱ्हाटी	कानडी	संस्कृत
नीच	निच्च	नित्य
चोख	चोक्क	—
आगळा	अगळ	अर्घ
जेठि	जट्टि	—

सान	सण्ण	—
दिठी	दिट्ठि	दृष्टि
साद	सद्द (सद्दु)	शब्द वगैरे.....

हे मऱ्हाटींतील शब्द आजच्या (तिसऱ्या) स्वरूपांत एकदम व्यवहारांत आलेले नाहींत. उच्चारशास्त्राच्या दृष्टीनें त्यांची मधली एक अवस्था गृहीत धरावी लागते. ती गृहीत धरलेली अवस्था काल्पनिक असत नाहीं; तर ते शब्द भाषेंत जिवंत असावे लागतात. आज कानडींत हे शब्द रूढ आहेत. मऱ्हाटी प्रत्यय लागलेलीं दिट्ठि, जेट्ठि अशीं रूपें मराठींत कोठेंहि आढळत नाहींत. या प्राकृत रूपांचे मराठीकरणाचे प्रयोग सबंध कर्णाटकांत चाललेले होते. आणि तशा प्रयोगांतूनच निष्पन्न झालेलीं वाक्यें कर्णाटकी साहित्य व शिलालेख यांतून आढळतात.

मऱ्हाटी भाषेंत कानडीचीं जुनीं रूपें आणि कानडींत मऱ्हाटीचीं प्राथमिक रूपें निश्चितपणें आढळतात. यावरून या दोन प्रांतांच्या जनांमध्यें पूर्वी अतिशय निकट संबंध होता व या दोघांच्या बोलींत सामान्य असे पदप्रयोग बरेच होते हें कबूल करावें लागतें. मराठी बोली अजून मूर्त रूपास येण्यापूर्वीपासून या दोन जनांत अशा प्रकारचा घनिष्ठ संबंध होता असेंहि यावरून निश्चितपणें ठरतें. ख्रिस्ती सनाच्या सुमारें पहिल्या शतकांतील गाथासप्तशतींत गल्ल, पोट्ट, तुप्पसारखे कानडींतहि रूढ असलेले शब्द बरेच आहेत. मराठींत सेंदणें हा शब्द अनुस्वारयुक्त आहे. कानडींत बाराव्या शतकांत तो अनुस्वारयुक्त होता असें केशीराजाच्या शब्द–मणिदर्पणावरून कळून येतें. पण तो शब्द आज अनुस्वार-रहित (सेदु) आहे. याचप्रकारचें आणखी एक उदाहरण 'कुरंब' शब्दाचें. चांदा–भंडाराकडील या कानडी जातीचें नांव ग्रियर्सन्नें "कुरुंबर" असें दिलें आहे. सेंदणेंप्रमाणें बाराव्या शतकापर्यंत हा शब्द अनुस्वारयुक्त होता. पुढें तो अबिंदुक (कुरुब) झाला. याप्रकारचीं आणखी पुष्कळ उदाहरणें देतां येतील. या सर्वांवरून बाराव्या शतकानंतर या दोन प्रांतांतील संघटन कमी कमी होत जाऊन पुढें तें जवळजवळ संपुष्टांत आलें असल्याचा इतिहास ताजा आहे.

पंप महाकवीचें (इ. स. ९३२) आदिपुराण नामक सुंदर काव्य आहे.

त्यांतील संस्कृत आणि प्राकृत शब्दांचें प्राचुर्य पाहिलें असतां मराठी बोलीची पूर्व-भूमिका आपणांस स्पष्टपणें आढळेल. याच कवीचें 'विक्रमार्जुनविजय' नामक दुसरें एक रम्य काव्य आहे. या काव्यांत त्यानें कानडी भाषेवरील आपलें प्रभुत्व चांगलेंच व्यक्त केलें आहे. तो ग्रंथ अस्सल कानडी भाषा व शैलीचें निधानच आहे. या काव्यांत एके ठिकाणीं द्रोणाचार्यांच्या तोंडीं 'अरे होय जन्नाप्पा' असे उद्‌गार घातले आहेत. कल्याणी चालुक्य राजा सोमेश्वर यानें लिहिलेला 'मानसोल्लास' किंवा "अभिलषितार्थचिंतामणि" नांवाचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. त्या काळची सामाजिक स्थिति जाणूं इच्छिणाऱ्यांना हा ग्रंथ फार उपयुक्त आहे. संधिविग्रही (परराष्ट्रमंत्री) कसा असावा हें सांगतेवेळीं 'प्रगल्भो मतिमान् दक्षः **सर्वभाषाविशारदः**' असें तो लिहितो. संधिविग्रही मंत्र्याला सर्व भाषा येणें जरूर होतें. यामुळेंहि कर्णाटकांत प्राकृत-मराठी अभ्यासिली जात होती. हस्ति-शिक्षकानें आपल्या हत्तीला कसें शिक्षण द्यावें याचें याच ग्रंथांत असें विवरण आहे : हत्तीला मागें सरकावयास सांगावयाचें झालें तर "हेडे हेडेति वक्तव्यम्" हड, हट् हाच शब्द याच अर्थानें मराठींत अजूनहि उपयोजिला जातो. "याचनार्थं महामात्रो दे, दे, शब्द उदीरयेत्" "कस्यापि ग्रहणे वाच्यो **घे, घे** शब्दं मतंगजः" "ईदृशी प्रथमा भाषा शिक्षयेत मतंगजम्."

कल्याण चालुक्यानंतर कर्णाटकची राजधानी होयसळांच्या वेळीं हळेबीडु येथें गेली. इ. स. १२१० च्या सुमारास हळेबीडु होयसळ दरबारांतील राजकवि जन्नानें 'अनंतनाथ पुराण' नांवाचें कानडी काव्य लिहिलें आहे. त्यांत प्रतीहारी "उठि उठि मागा बैस जा तू हळू" अशी सूचना देतो. हें वर्णन अस्सल कर्णाटाच्या गाभ्यांतील हळेबीडु दरबारांतील कवीनें आपल्या अभिजात कानडी काव्यांत घातलें आहे, हें लक्षांत घ्यावें. कवीनें आपल्या डोळ्यांनीं पाहिलेल्या व कानांनीं ऐकलेल्या गोष्टींचें हें चित्रण नसेल काय? इ. स. १२३६ च्या सुमारास झालेल्या आंडय्यानें अस्सल कानडींत ग्रंथरचना करण्याची शपथ घेतली होती याबद्दल मागें सांगितलेंच आहे. प्राकृत आणि कानडी या भाषा अभिन्न आहेत अशी त्याची दृढ समजूत नसती तर त्यानें आपल्या काव्यांतून प्राकृत शब्द सढळ हातानें पेरले नसते. संस्कृत आणि

कानडी शब्दांचें सामासिक पद बनविण्याविषयीं कानडी व्याकरणकारांचा विरोध आहे. पण त्याच व्याकरणकारांनीं कानडी आणि प्राकृत शब्दांचे हवे तसे मिश्र समास बनविण्याची मुभा दिलेली आहे. आंडय्यानें आपल्या काव्यांत राउतांच्या तोंडीं घातलेलीं वाक्यें या ठिकाणीं मननीय आहेत. "झा रे, जझारे हळू रे, हो ! हो ! मझा" यांतील 'जा' शब्द तोंडीं 'झा' असा महाप्राण बनलेला दिसतो. या उदाहरणावरून अस्सल कर्णाटकाच्या केंद्रांतूनहि मऱ्हाटीचे प्रयोग चालले होते, मऱ्हाटी भाषा कांहीं ठिकाणीं उपयोगांत होती हें कुणालाहि कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

ही पार्श्वभूमि लक्षांत घेतल्याशिवाय श्रवणबेळगोळच्या एकमेवाद्वितीय प्राचीन मऱ्हाटी शिलालेखाचें कोडें उलगडणार नाहीं. श्रवणबेळगोळ महाराष्ट्रापासून अत्यंत दूर आहे. मराठी शिलालेख ज्याअर्थी तेथें आहे त्याअर्थी तेथपर्यंत महाराष्ट्र पसरला होता असें म्हणण्याचें धाडस आजपर्यंत कोणत्याहि कडव्या महाराष्ट्रीयानें सुद्धां केलेलें नाहीं. "चामुंडरायें सुत्ताले करवियले" हें वाक्य मराठीच नव्हे असे म्हणणारे कांहीं कन्नडिग आहेत. तें वाक्य गुजराथी आहे असें सिद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. श्रवणबेळगोळ गोमटेश्वर हें जैनांचें क्षेत्र आहे. गुजराथी जैनभक्त येथें यात्रेकरितां येत असत, त्यांना समजावें म्हणून हें वाक्य गुजराथी असावें असा त्यांचा तर्क आहे. हा तर्क क्षणभर खरा असें मानलें तरी यापूर्वी उद्धृत केलेल्या मऱ्हाटी वाक्यांची संगति कशी लागणार ?

कर्णाट-महाराष्ट्रांतील आजची अतीतटीची मनोवृत्ति, प्राचीन कर्णाट-महाराष्ट्रांतील वस्तुस्थिति आकलन होण्यास बरीच आड येत आहे. आजचा हा प्रांताभिमानाचा चष्मा बाजूस सारल्याशिवाय त्या काळची वस्तुस्थिति नीट लक्षांत येणें शक्य नाहीं. कानडी आणि मराठी या दोनहि भाषांचा आणि साहित्याचा अभ्यास तटस्थ वृत्तीनें केल्यास आपल्या सांस्कृतिक इतिहासांतील बरींच कोडीं सहजगत्या सुटणार आहेत. चांदा, भंडारा जिल्ह्यांत कुरुंब आणि होलेय जातीचे ४-५ हजार लोक असून ते कानडी भाषा बोलतात असें ग्रियर्सन आपल्या Linguistic Survey of India (Vol. IV, page 446) या ग्रंथांत लिहितात, आणि ही भाषा विजापुराकडील आजच्या बोलीशीं जुळणारी आहे असा आपला स्पष्ट निर्वाळा देतात ! महाराष्ट्रापासून अति दूर असलेल्या

श्रवणबेळगोळच्या दहाव्या शतकाच्या शिलालेखांतील मन्हाटी वाक्य हें जसें महाराष्ट्रापुढें एक कोडें आहे, तसें आजच्या कर्णाटकापासून खूप दूर असलेल्या वऱ्हाडांतील चांदा भंडारा जिल्ह्यांतील कानडी भाषिकांचें अस्तित्व हें कोडें कर्णाटकीयांपुढें आहे. आजच्या या दोन प्रांतांतील प्रांताभिमानाच्या दृष्टि-कोनांतून याचें समर्पक उत्तर मिळणें मुळींच शक्य नाहीं.

देवगिरी आणि होयसळ येथील उत्तरकालीन यादवांच्या यादवीनें (इ. स. १२०० नंतर) कर्णाटक–महाराष्ट्रांतील प्रांतीय स्वरूपाच्या तेढीस प्रारंभ झाला. तोंपर्यंत मन्हाटीविषयीं कर्णाटकीयांत दुजाभाव कधींच नव्हता. "आरे अरसु" (ओरे भाषा श्रेष्ठ) अशी मराठी भाषेविषयीं एक म्हण असून ती म्हण एकेकाळच्या कर्णाटकीयांच्या मन्हाटीविषयक दृष्टिकोनाची निदर्शक आहे. यादवकाळांनतर कर्णाट–महाराष्ट्रांतील राजकीय तेढीमुळें दोन्ही प्रांतांतील पहिलें सख्य कमी कमी होत चाललें. गुलबर्गा, अहमदनगर, विजापूर येथील मुसलमानी राज्यकर्त्यांनीं कर्णाटकावर राज्य करण्याकरितां कर्णाटकीयांपेक्षां मन्हाटी भाषिकांस जवळ केलें. हे मुसलमानी राजे, विजयनगरचे प्रतिस्पर्धी होते. कर्णाटकी विजयनगरच्या राजकर्त्यांशीं झगडण्यास कानड्यांपेक्षां मन्हाटे त्यांना जवळचे वाटले असल्यास नवल नाहीं. यामुळेंहि मराठीचें संवर्धन कर्णाटकांतच झालें, हें येथें पुन्हां लक्षांत घेण्याजोगें आहे. पण येथपासूनच दोन्हीहि भाषिकांमध्यें तेढ सुरू झाली. मराठीविषयीं कर्णाटकीयांच्या बदललेल्या मनोवृत्तीच्चे पडसाद १७ व्या शतकांतील 'अप्रतिम वीरचरिते' नामक ग्रंथांत आपणांस दिसून येतात. राजकीय आक्रमक वृत्तीमुळें या दोघांत एक प्रकारची तेढ पुढें वाढत गेली, तरी सुद्धां औरंगजेबाच्या हल्ल्यापासून आत्मसंरक्षणाकरितां निघालेल्या राजारामास केळदीच्या कर्णाट राजांनीं, त्या खुनशी सम्राटाचा रोष होणार हें जाणूनहि आश्रय दिला हें विसरतां कामा नये. यापूर्वी, शहाजीनें बेंगळूर वगैरे भागांत जो विजय मिळविला तो कोणा एका उपऱ्या विजेत्यानें नव्यानेंच या भागांत येऊन केलेला दिग्विजय नव्हे. या दोन्ही प्रांतांत पूर्वापार चालत आलेली अंतर्गत आत्मीयता, बंधुभाव यांमुळेंच शहाजीचें या भागांत स्वागत झालें. अभिजात कर्णाटकी आणि मरहट्टे यांत असलेल्या प्राचीन घनिष्ठ संबंधाचेंच तें प्रत्यंतर आहे.

ज्ञानेश्वरांनीं 'हे आम्हांसी कानडे' असें जरी म्हटलें तरी या वाक्यावरूनच, एके काळीं या लोकांस कानडी कळत होतें हेंच सिद्ध होतें. "हे आम्हांसी कानडे" असें म्हणण्यांत ज्ञानेश्वरांचा मराठीचा अभिमान व्यक्त होतो; तसेंच कानडीपासून दूर राहाण्याची उत्तरयादवकालीन प्रवृत्तिहि ध्वनित होते. "हे आम्हांसी तेलगु" किंवा "हे आम्हांसी द्रविड" असें न म्हणतां "हे आम्हांसी कानडे" असें म्हणण्याचा अर्थच हा कीं एके काळीं कानडी त्यांना समजत होतें. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांतून कानडी शब्द विखुरलेले आहेत ही गोष्ट महाराष्ट्रीयांस आजहि मान्य आहे. ज्ञानेश्वरीच्या भाषेवर कानडी भाषेची दाट छाया असल्याचें संशोधकांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. यावरून "हे आम्हांसी कानडे" याचा अर्थ एवढाच कीं कानडी वर्चस्वांतून बाहेर पडण्यास मराठी या सुमारास प्रयत्न करूं लागली. श्री. विष्ठल रामजी शिंदे यांनीं कानडी व मराठी या तुलनात्मक प्रबंधांत हाच निर्णय दिलेला आहे. यादवांचे पंतप्रधान हेमाडपंत (हेमाद्रि) यांनीं मराठीच्या उद्धाराकरितां मनःपूर्वक आरंभ केला. मोडी लिपि सुरूं करण्याचें श्रेय हेमाडपंतांना दिलें जातें. वैशिष्ट्यपूर्ण शिल्पकलेस महाराष्ट्रांत नव्यानें यांनींच प्रारंभ केला असें सांगितलें जातें. महाराष्ट्रांत हेमाडपंती देवळें बऱ्याच ठिकाणीं आहेत. ही कला आणि लिपि त्यांनीं दक्षिणेंतून–लंकेंतून आणली अशी दंतकथा महाराष्ट्रांत प्रचलित केली गेली. श्री. विष्ठल रामजी शिंदे यांच्या मतें या दोन्ही कला हेमाडपंतांनीं कर्णाटापासून घेतल्या. हळेबीडु वगैरे ठिकाणीं असलेली वास्तुपद्धति ही महाराष्ट्रांत अनुसरली गेली. मोडी हा शब्दच मुळांत कानडी आहे. मोडी म्हणजे पद्धत, रीत, लकब असा अर्थ आहे. मोडीचा मूळ शब्द 'मुरी' असा आहे. 'मुरी' म्हणजे मोडणें. अक्षरें मोडून एकापुढें एक सलग रीतीनें लिहिण्याची पद्धत ती मोडी. या दोन्ही गोष्टी इतक्या स्पष्ट असतां त्या लंकेंतून आणल्या असें म्हणण्याची आवश्यकता कां वाटावी? ज्यांच्या राजकीय सामाजिक वर्चस्वांतून बाहेर पडावयाचें आहे त्यांचा आपल्याशीं मुळींच संबंध नाहीं असें म्हणण्याचा मानवी स्वभावच आहे. ब्रिटिश लोकांविषयीं हीच प्रवृत्ति कांहीं काळ होती. तसेंच कानडीच्या बाबतींतहि झालें. कानडी भाषेपासून दूर राहाण्याच्या महाराष्ट्रीयांच्या प्रयत्नांतून अशा तऱ्हेची दंतकथा उद्भवली.

देवगिरी राजांच्या राजवटींत, तेराव्या शतकाच्या सुमारासच मऱ्हाटीच्या उत्कर्षास आरंभ झाला ही गोष्ट निर्विवाद आहे. यामुळें मऱ्हाटीच्या आद्यप्रवर्तकत्वाचें श्रेय देवगिरी यादवांस देण्यास हरकत नाहीं. मऱ्हाटीच्या उत्कर्षास कारण झालेल्या या यादव घराण्याचे शिलालेख शेंकडा ९९ पेक्षांहि जास्त कानडींत असावेत याचा अर्थ काय ? मऱ्हाटी चांगलें अंग धरून चालती बोलती होऊन व्यवहारांत व्यवस्थितपणें येण्यास समर्थ होईपर्यंत त्यावेळीं परम उत्कर्ष पावलेल्या कानडीचाच राजव्यवहारांतून स्वीकार करणें देवगिरीच्या यादवांन भाग होतें. आजचें इंग्रजीचें अशाप्रकारचें उदाहरण ताजें आहे. खि. श. ११४४ याच्या पूर्वीचे असे सुहाच शिलालेख मऱ्हाटींत उपलब्ध असून त्यांतील श्रवणबेळगोळ व सीताबर्डी हे दोन फारच त्रोटक आहेत (डॉ. तुळपुळे म. साहित्यपत्रिका अंक ९९, १९५१). अंबेगांवचा (११४४) लेखसुद्धां प्रौढ भाषेचा नमुना म्हणतां येणार नाहीं. असें असलें तरी होयसळ यादवांविरुद्ध मराठीच्या ध्वजाखालीं विरोधी गट निर्माण करण्यास मऱ्हाटी भाषाभिमानाचा उपयोग करून घ्यावा लागला. हें केलें नसतें तर देवगिरी यादवांचें राजकारण तें कसलें ?

देवगिरी यादवांच्या घराण्यांतील लस्तियव्वा, धाडियप्पा वगैरे तऱ्हेच्या पूर्वजांच्या नांवांवरून कानडीचा पगडा त्यांच्यावर किती होता हें बिनचूक कळून येईल. तेराव्या शतकांत महादेवराय, रामराय, यांच्या वेळीं हें घराणें कानडी वर्चस्वांतून बरेंच बाहेर पडलें. मराठी नांवांतील 'राया' चें 'राव' या पुढील काळांतच झालें. ज्ञानेश्वरादिकांना मऱ्हाटीच्या अभिमानानें 'हे आम्हांसी कानडे' असें मानणें आवश्यक झालें; तरी पण अनेक शतकांचे कानडी-मराठींतील दृढ संबंध एकदम तोडून टाकणें दोघांनाहि शक्य नव्हतें.

"मज संस्कृतीं नाहीं अभ्यास । कर्नाटक कवि कुमारव्यास ।
त्याचेनि आधारें ग्रंथविलास । प्रारंभिला या हेतु" ॥ ५५ ॥
(उद्योगपर्व)

मराठी भाषिकांना संस्कृत भाषेप्रमाणें कानडी काव्यें हि ज्ञानदायी व स्फूर्तिप्रद होत असत हें चंद्रात्मज रुद्राच्या या ओवीवरून कळून येईल. चंद्रात्मज रुद्र

नामक कवि कुमारव्यासाच्या कानडी महाभारतांतील भीष्मपर्व वाचून मुग्ध झाला. यामुळें मराठी भाषिकांकरितां त्या मनोहर काव्याचें भाषांतर केल्याचें तो सांगतो. (आजगांवकर कृत मराठी कवि-चरित्र पाहा). मराठीचे महाकवि मुक्तेश्वर (इ. स. १६५०) व कुमारव्यासांच्या पुढील कवितांतील साम्य अभ्यसनीय आहे :—

मुक्तेश्वर सभापर्व

कवळोनि अभिप्राव सर्व । मागां कथिलें आदिपर्व ।
आता अपूर्वापूर्व । सभापर्व परियेसा ॥ १३ ॥

मुक्तेश्वर कवी भारत । टीका प्रांजळ व्यक्त ।
जेविं वेदाचा मथितार्थ । श्रुतिपुराणें बोलती ॥ १४ ॥

जो राजयातें वीररसु । विप्रवर्योतें वेदसारांशु ।
तत्त्वार्थ बोध परमहंसु । योगेश्वरु भावीति ॥ १५ ॥

बुद्धियुक्तीचा सागरु । ऐसे मानिती मंत्री चतुरु ।
विलासियातें शृंगारु । सुरतानंदुवर्धका ॥ १६ ॥

विद्याप्रवीण शास्त्रमंडित । कौतुकें मानिती कर्णामृत ।
दोषादोषीं यांचे आर्त । पुरवी गंगेसारिखे ॥ १७ ॥

पर्वतांमाजीं कनक मेरु । तडागांमाजीं क्षीरसागरु ।
महाराष्ट्रांसी काव्यगुरु । हा गौरवू ये ग्रंथीं ॥ १८ ॥

मुक्तेश्वराच्या या भागाशीं कुमारव्यास कवीच्या कानडी महाभारतांतील उद्योगपर्वाच्या मंगल चरणांतील खालील श्लोक ताडून पहावेत. (कुमारव्यासाचा काळ श्री. गोविंद पै यांच्या मतें १२३०-३५ पर्यंत ठरतो. आणि कांहींच्या मतें १५०० च्या पुढें निश्चितपणें जात नाहीं.)

अरसुगळिगिदुवीर, द्विजरिगे
परम वेदद सार, योगी-
श्वरर तत्त्वविचार, मंत्रीजनके बुद्धिगुण ॥

विरहिगळ शृंगार, विद्या-
परिणतरलंकार, काव्यके
गुरुवेनलु, रचिसिद कुमारव्यास भारतव ॥

वेद पारायणद फल, गं-
गादि तीर्थ स्नान फल, कृ-
च्छ्रादितपसिन फलवु, ज्योतिष्टोम याग फल ॥
मेदिनिय नोलिदित्त फल, व-
स्त्रादि कन्यादान फल बहु-
दादरिसि भारत दोळोंदक्षरव केळिदरिगे ॥

कानडींत राघवांक कवीनें षट्पदीवृत्तामध्यें लिहिण्याचा प्रघात पाडला. छंदाचा हा प्रकार बाराव्या शतकानंतर फार लोकप्रिय झाला. मराठींतहि या षट्पदींत लिहिलेल्या कविता प्रा. पोतदार, श्री. खरे वगैरेंच्या संशोधनांत आढळल्या आहेत. या नवीन छंदाच्या प्रकारानें मराठी विद्वानांत मोठें कुतूहल निर्माण केलें होतें.

भाऊबंदकींत शब्दांची वांटणी आणि भाषेस निराळें वळण देण्याचे बुद्धिपुरस्सर प्रयत्न

सतराव्या शतकापर्यंतहि मराठी कवि कानडी भाषेचा अभ्यास करीत असत हें दाखविण्यास हीं उदाहरणें पुरेशीं आहेत. आणि प्राकृताच्या निमित्तानें कानडी साहित्यिकांनीं आठव्या-दहाव्या शतकापासूनच मराठी भाषा बनण्यास कशाप्रकारें साहाय्य केलें याबद्दल मागें सांगितलें आहे. १३ व्या शतकाच्या शेवटीं किंवा पंधराव्या शतकाच्या आरंभीं झालेल्या कुमार व्यासाच्या ग्रंथांत त्याच्यावर असलेला मराठीचा पगडा उठून दिसतो. त्यानें वापरलेल्या शब्दांना प्राकृत म्हणून त्यांची वासलात लावण्याची कांहींजण खटपट करतील; पण अशा रीतीनें डोळ्यांवर कांतडें ओढून घेऊन सत्य स्थिति पाहाण्यास भिणें हें कांहीं नैतिक धैर्याचें लक्षण नव्हे. त्या काळीं मराठी राजरोसपणें व्यवहारांत होती व प्राकृत भाषा कधींच मागें पडली होती. शहाणपण, झोंप, राहाणी, चौऱ्यांशी, गयार (गचाळ), विटाळ, बोळेतन (भोळेपणा), लावकरु

(लावालावी करणारे, चहाडी करणारे), खेप, खरे, वगैरे शब्दांना प्राकृत म्हणून वेळ मारून नेणें कितीसें युक्त होईल? 'हे आम्हांसी कानडे' असें जरी ज्ञानेश्वरांनीं म्हटलें तरी महाराष्ट्रांत कानडी शिकणारे होते हें सिद्ध होतें. आणि कर्णाटकीयांत मराठीपासून चार पावलें दूर राहाण्याचा प्रयत्न चालला होता तरी ते मराठीच्या कक्षेंतून बाहेर पडूं शकले नाहींत. तेराव्या शतकानंतर कानडी आणि मराठी भाषांच्या विकासाचा सूक्ष्मपणें अभ्यास केल्यास एक मौजेची गोष्ट उघडकीस येते. पंप, रन्न वगैरे कानडी कवींनीं 'ळ' काराच्या अनुप्रासांचा आपल्या काव्यांत मनोहर रीतीनें उपयोग केलेला आहे. "अविरळ मळयानिळ कंपितंगळ्" (पंप भारत), "बाळकेळीलीळे" (शांतिपुराण ५,२५) अशा प्रकारचीं वाक्यें जुन्या प्रौढ कानडी शैलीचीं निदर्शक आहेत; कमळ, जळ वगैरेंतील 'ळ'कार त्यावेळीं शिष्टमान्य होता. पण चौदाव्या-पंधराव्या शतकानंतर कमल, जल असे प्रयोग होत जाऊन 'ळ'काराची जागा 'ल'कारानें काबीज केली असें दृष्टीस पडतें. महानुभाव साहित्यांत, ज्ञानेश्वरांच्या पूर्वी 'आगळा' वगैरे शब्द 'ळ'कारयुक्त आढळतात. पण ज्ञानेश्वरीच्या शुद्ध व प्राचीन म्हणून श्री. राजवाडे प्रभृतींनीं छापलेल्या आवृत्तींत 'ळ'कार संपूर्ण वर्ज्य केलेला दिसतो. आगळासारख्या शब्दांतूनसुद्धां ज्ञानेश्वरांनीं 'ल' कारच उपयोजिलेला आढळतो. ज्ञानेश्वरांचे समकालीन कानडी साहित्यिक 'ळ'काराचा सर्रास उपयोग करीत असल्यामुळें मराठीचें वैशिष्ट्य दाखविण्याकरितां सर्वत्र 'ल'काराचा उपयोग करण्याची आवश्यकता त्यांना भासली नसेल ना? कारण ज्ञानेश्वरांनीं आरंभ केलेला हा 'ल'कार पुढील पिढ्यांनीं स्वीकारलेला दिसत नाहीं. त्यांच्या पूर्वी महानुभावांतहि तो नाहीं. कमळ, सकाळ, वेळ वगैरे 'ळ' कार मराठींतच दृढमूल झाले आणि कानडींत पुन्हा 'ल'कारानें प्रवेश केला!

कानडी व मराठींतील 'ल'कार 'ळ'कारांच्या प्रकाराप्रमाणेंच आणखी पुष्कळ शब्दप्रयोग, पुढील काळीं (तत्पूर्वी दोघांत प्रचलित असून) व्यवहारांतून वगळले जाऊन त्यांची भाऊबंदकींत वांटणी झाल्याप्रमाणें दिसतें. शब्दरूपांत थोडा फरक होऊन नव्या स्वरूपांत कांहीं शब्द प्रचारांत आले. मुदल (मोदलु), कैवारसारखे शब्द कानडींतून मागें पडले. निरि, माड (माडि) शब्दांचें नीरिगे, माळिगे असें रूपांतर झालें.

पूर्वीचे जिव्हाळ्याचे निगडित संबंध

कानडी आणि मराठींतील पुष्कळ शब्द या दोन्ही भाषिकांच्या निकट संबंधाचे निदर्शक आहेत. यापूर्वी सांगितल्याप्रमाणें कोल–काठी, चूल–वैल, कींव–काकुळती, ओली–शेला वगैरे दोन्ही भाषांपासून बनलेले मराठींतील समानार्थक जोड–शब्दहि या म्हणण्यास पुष्टि देतात. या प्रकारचे जोड शब्द कानडींतहि रूढ आहेत. उदाहरणार्थ : छप्पन्न–ऐवत्तारु, नडु–मध्यें वगैरे. या शिवाय दोन्ही भाषांतून पुष्कळ भाववाचक शब्द परस्परांनीं घेतलेले आहेत. मराठी संख्यावाचक शब्द कानडींत सर्रास शिरलेले दिसतात. 'बाहत्तर–नियोग' 'तेत्तीस कोटि' 'एक्कसर' 'अठरा कचेरी' वगैरे संख्यावाचक शब्द कानडी साहित्यांतून व लोकभाषेमधून हरघडी कानीं पडतात. दुसऱ्या भाषेंतील संख्यावाचक शब्द स्वीकारणारी भाषा त्या भाषेची विशेष ऋणी असते असें तुलनात्मक भाषाशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे.

दोन भिन्न भाषिकांच्या संपर्कांत सामान्यतः नित्य व्यवहारांतील आपल्या भाषेंत नसलेल्या आवश्यक वस्तूंच्या नांवांची उसनवारी करणें अनिवार्य होऊन बसतें. याहूनहि जास्त परिणाम झालेल्या ठिकाणीं नामपदांच्याबरोबर दुसऱ्या भाषेंतील संख्यावाचक शब्दहि येऊं लागतात. पण परभाषेंतून धातु जसेच्या तसे उचलून घेतलेले मात्र फारच क्वचित् ठिकाणीं आढळत असतील. तुलनात्मक भाषाशास्त्रांतच हा प्रकार विलक्षण आहे असें म्हणावें लागतें. या प्रकारचें असामान्य दृश्य मऱ्हाटींत पाहावयास मिळतें. मऱ्हाटींत कानडी धातु आपणांस आढळतात. उदाहरणार्थ : किडणें, मुरकणें, अडकणें, मिरविणें, कालविणें, कुटणें वगैरे; हे शब्द संस्कृतापासून आले असें मानतां येत नाहीं. किडु, मुरकु, अडकु, मेरे, कलसु, कुट्टु, वगैरे धातु कानडी वर्गाच्या तमिळ, तेलगु वगैरे भाषांतहि आहेत. म्हणून हे धातु आर्यवर्गीयांच्या भाषेंतील नव्हत याबद्दल शंका नाहीं. कानडी आणि संस्कृत या दोनहि भाषांचा संबंध कैक शतकांचा असून कानडीमध्यें संस्कृत धातु जसेच्या तसे आलेले नाहींत आणि येत नाहींत. इसु, सु, प्रत्ययादि संस्कार होऊनच ते कानडींत येऊं शकतात. संस्कृत 'गम्' धातु मराठींत गमणें असा होतो खरा, पण कानडींत तो शब्द शिरतांना 'गमिसु' असा संस्कार पावतो. इंग्रजी भाषेचा सखोल परिणाम

आज सर्वच भाषांवर झालेला आपण पाहातों. तिच्यांतील पुष्कळ नामपदें देशभाषेंतून जशींच्या तशीं शिरलेलीं आहेत. पण धातूंना तसा प्रवेश नाहीं. "मोटार ड्राइव्हली" असें कधीं कोणी म्हटल्याचें ऐकिवांत नाहीं. पण "मोटार ड्राइव्ह केली" असें वाक्य ऐकिवांत येतें. यांतील 'मोटार' हें नामपद असल्यानें जसेंच्या तसें घेतलें. पण 'ड्राइव्ह' हा शब्द धातु रूपांत मराठींत येऊं शकला नाहीं. अशाप्रकारची उपजत प्रवृत्ति प्रत्येक भाषिकांत असतां मराठींत असे कानडी धातु कसे?

मराठे आर्योंद्रविडियन् आहेत असें श्री. भास्करराव जाधव यांनीं प्रतिपादिलें आहे. असें गृहीत धरल्याशिवाय वरील विचित्र प्रकाराचा उलगडा होऊं शकत नाहीं. याच कारणाकरितां या दोन भाषिकांना जुळीं भावंडें असें मागील प्रकरणीं संबोधिलें आहे. श्री. जाधवराव मराठ्यांना आर्योंद्रविडियन् म्हणतात हें खरें; पण त्यांना मरहट्टे यांची वैदिक काळापर्यंतची परंपरा उमगली नसल्यामुळें मराठे मुळांत आर्यवर्णीय अशी त्यांची समजूत झालेली आहे. आर्यवर्गीय मराठ्यांनीं द्रविडवर्गीय बायका करून घेतल्या; त्यामुळें पुढची संतति आर्य-द्रविड बनली असें त्यांचें म्हणणें आहे. पण यदुतुर्वसूंची ऋग्वेदकाळापूर्वी-पासूनची परंपरा आणि यादव हे मातृप्रधान कुटुंब–पद्धतीचे होते हा पुराणांतर्गत पुरावा लक्षांत घेणें जरुरीचें आहे.

आपल्या प्राचीन वेदव्यासादि पुराणेतिहासलेखकांनीं वास्तव घटनांचें संपूर्णतया यथावत् वर्णन करण्याची पद्धत स्वीकारलेली नाहीं. प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींचें संकेतरूपानें किंवा प्रातिनिधिक रूपानें एकादें उदाहरण घेऊन पुढें चालू लागण्याची प्रथा सर्वत्र आढळते. महाभारतांत यदुतुर्वसूंच्या आर्यीकरणाच्या प्रकाराचीहि सूचना अशीच दिली गेली आहे. देवयानी शुक्राचार्यांची कन्या म्हणजे ब्राह्मणकन्या; हिचा ययातीशीं विवाह होतो. हा प्रतिलोम विवाह होय. आर्य वधूपासून ययातीला झालेला मुलगा यदु. अशा रीतीनें यदुसंतति-यादव हे 'आरियरु' झाल्याची साक्ष पुराण देत आहे. अशा आरिय यादवांच्या गौळवाड्यांत जन्म पावलेल्या प्राकृत भाषेंत दिसून येणारे संस्कृतेतर ऱ्हस्व 'ए', 'ओ' आणि 'ळ' वगैरे उच्चार जमेस धरले असतां हा यादववंश मुळांत तथाकथित द्रविडवर्गीय पत्तिजनच होय असें म्हणणें जास्त समंजस होणार

नाहीं काय ? आणि यामुळेंच आर्यीकरणांत त्यांच्या भाषेचें स्वरूप पूर्णपणें बदललें तरी कानडी वर्गीय धातु मराठींत जसेच्या तसे राहिले असणें हेंच जास्त संभवनीय नाहीं काय ?

मराठींत कानडी धातु आहेत ही गोष्ट श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांनीं यापूर्वीच 'मराठी आणि कानडी यांचा परस्पर संबंध' या आपल्या महत्त्वाच्या लेखांत विशद केली आहे. इतकेंच नव्हे तर मराठे आणि कानडे यांच्यांत 'कांहींतरी विशेष' आनुवंशिक संबंध असल्याशिवाय खालील शब्दांची देवघेव होणें शक्य नव्हतें असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. "नात्याचे अव्व (आवा, आवु), अप्प (बप्पा, आप्पा, आबा) वगैरे शब्द, आणि बोट्टु (बोट), पोट्टे (पोट), तले (ताळू) वगैरे अंगवाचक शब्द जेव्हां दोन भाषांत सामान्यपणें आढळतात तेव्हां त्यापैकीं जी जुनी असते तिच्याशीं नवीचा निकट आनुवंशिक संबंध आहे असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं" अशा निर्णयाला श्री. शिंदे येऊन ठेपले आहेत.

पण हा आनुवंशिक संबंध कशा प्रकारचा आहे याची श्री. शिंदे यांना कल्पना नव्हती. तुलनात्मक भाषाशास्त्राच्या पुराव्यावरून त्यांना अनिवार्यपणें वरील प्रकारचा निर्णय घ्यावा लागला. यदु–तुर्वसूंच्या कुळकथेकडे त्यांचें लक्ष गेलें असतें तर त्यांच्याकडूनच या विचाराची सांगता कधींच होऊन गेली असती आणि कानडी व मरहट्ट यांची समस्यापूर्ति होऊन मराठी संस्कृतीच्या बऱ्याच गुंतागुंतींचा उलगडा झाला असता.

कानडी आणि मराठीचा संपर्क (आजच्या बऱ्याच लोकांना वाटतो तसा) सांगली, मिरज फार तर पुणें या भागांतला एवढाच असता तर वरील प्रकारचा मूलगामी संबंध आपल्या दृष्टीस पडता ना. वऱ्हाड-नागपूरकडील भाषेंतहि हे धातु कां असावेत बरें ? चालुक्यराष्ट्रकूटादि राजवटींत दोन्ही भाषिकांचा निकट संबंध आल्यामुळें मऱ्हाटींत शिरलेलीं कानडी किंवा कानडींत शिरलेलीं अनेक मऱ्हाटी नामपदें किंवा संख्यावाचक शब्द यांचा फार तर उलगडा होईल; पण मऱ्हाटीमधें कानडी धातु कसे आले याचें कोडें कांहीं उलगडणार नाहीं. मऱ्हाटी भाषा जन्मतेवेळीं तेथेंच जवळपास कानडीहि प्रचलित होती असें

म्हणणें अनिवार्य ठरतें. दोनहि भाषांचा सराव असलेल्या कुटुंबांतील लहान मुलांच्या भाषेंतच हा प्रकार दृष्टीस पडतो. द्विभाषिकांचीं मुलें दोनहि भाषांचे धातु उचलून बोलतात असें आढळतें. यामुळें हा विचित्र प्रकार पुन्हां आपणांस मऱ्हाट–कर्णाट शेजारीं होते या मूळ मुद्यावर आणून सोडीत आहे. एकमेकांशेजारींच वाढलेल्या प्राचीन रिस्टिक भोजकांच्या वसाहती, प्रथम मऱ्हाट म्हणजे वऱ्हाड हें जर खरें असेल तर मऱ्हाटच्या शेजारचा कन्नदेश–खानदेश हा मुळांत कानड देशच होय. यावरूनहि कर्णाट–मऱ्हाटचे मूळ जन जुळीं भावंडें असावेत असें म्हणणें सयुक्तिक ठरत आहे.

★ ★ ★

: ६ :

देव देवता

[रुद्र-शिव, मलय्या-मल्हारी, श्री देवी, यल्लूआई वगैरे]

अति पुरातन काळापासून कर्णाट–मरहट्ट जनांच्या निकट संबंधाचा–जुळेपणाचा स्पष्ट पुरावा देणाऱ्या कांहीं देवतांचा विचार येथें प्रस्तुत आहे. त्यांत अतिपुरातन रुद्र–शिवाचा विचार आधीं येतो. रुद्र हा 'पत्तीनां पतिः' असें वेदांतच आलें आहे. रुद्राध्यायांत स्तेनादि अनेक जनसमूहांप्रमाणें पत्तींचाहि देव रुद्र असल्याचें वर्णन आहे. यामुळें पत्तीजन अनेकांतील एक, सामान्य जन असावेत असा बोध होतो. पत्तींच्याशिवाय आलेलीं दुसरी नांवें निरखून पाहिलीं तर त्यांचें महत्त्व कितीसें असणार हें त्या नांवांवरूनच कळणार आहे. स्तेन, कुलुंच, आरण्य, तस्करादि नांवांवरून त्या लोकांचें सामाजिक महत्त्व काय हें फोड करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. या जनांना पुढील काळांत कोठें सन्मान्य असें ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाल्याचेंहि आढळत नाहीं. तरीपण रुद्राला "तूं चोरांचा देव, तूं बेरडांचा देव, तूं वनचरांचा देव" अशातऱ्हेनें वैदिक ऋषींनीं वर्णिलें आहे तें कां?

रुद्र–शिव : अवैदिक देवता

या वर्णन–प्रकारावरूनच रुद्राविषयीं वैदिक आर्यांची मनोवृत्ति काय

होती हें उघड होत आहे. आजहि ब्राह्मणांतील सर्व शाखा रुद्रोपासक नाहींत. शैव पंथ स्वीकारलेल्यांशिवाय बाकीच्या ब्राह्मणांत रुद्राला महत्त्व नाहीं. शैवांतहि कांहीं कट्टर वगळले तर त्यांतील ब्राह्मणवर्गाच्या संकल्पमंत्रांतून वगैरे विष्णु किंवा नारायणाला प्रामुख्य असलेलें दिसतें. श्रीमत् शंकराचार्यांनीं नारायणाची उपासना सांगितली आहे. त्यांची चर्पटपंजरी गोविंदाचें स्तवन करणारी असल्याचें सुविख्यात आहे. ब्राह्मणांनीं शिवालयाचें पुजारीपण करूं नये, केलें असतां त्यांचें कल्याण होत नाहीं, अरिष्ट येतें, अशी भावना मागील पिढीपर्यंत जुन्या परंपराप्रिय लोकांत दृढ होती. शिवाचे पुजारी सामान्यतः गुरव असत. खुद्द ऋग्वेदांतहि इंद्राच्या मानानें रुद्राचीं अशीं फारच थोडीं सूक्तें आहेत. संपूर्ण अशीं तीनच सूक्तें रुद्राचीं आहेत. शिवाय रुद्राला उद्देशून केलेल्या प्रार्थनाहि पाहाण्याजोग्या आहेत : "नमस्ते रुद्र मन्यव उतो त इषवे नमः । (वा. सं. १६–१) मा नो महान्तमुत मा नो अर्भकं मा न उक्षन्तमुत मा न उक्षितम् मा नो वधीः पितरं मोत मातरं मा नः प्रियास्तन्वो रुद्र रीरिषः ॥ मा नस्तोके तनये मा न आयौ मा नो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः । वीरान् मा नो रुद्र भामितो वधीर्हविष्यंतःसदमित्वा हवामहे ॥ (१. ११४. ७–८)

"हे रुद्रा तुझ्या कोपाला नमस्कार असो (–का. वा. लेले) हे रुद्रा, तूं आमच्यांतल्या मोठ्यांचा किंवा लहानांचा जीव घेऊं नकोस, आमच्यांतल्या वाढत असलेल्यांचा किंवा वाढलेल्यांचाहि तूं जीव घेऊं नकोस. तूं आमच्या पित्यास किंवा मातेस मारूं नकोस किंवा आमच्या स्वतःच्या प्रिय शरीरासहि दुःख देऊं नकोस. तूं आमच्या पुत्रांना किंवा पौत्रांना किंवा आमच्या नोकर-चाकरांना ठार करूं नकोस, हे रुद्रा तूं रागावून आमच्या वीरांना मारूं नकोस. आम्ही हवि घेऊन तुझी सर्वकाळ प्रार्थना करीत असतों" (सिद्धेश्वर शास्त्री-कृत ऋ.)

या प्रार्थनेंत रुद्राच्या उग्रपणाला भ्यालेली मनोवृत्ति व्यक्त होत आहे. इंद्राच्या प्रार्थनेंत ओतप्रोत भरलेली आपुलकी यांत नाहीं. हा रुद्र त्रासदायक होऊं नये म्हणून पीडानिवारणार्थ विशेषेंकरून ही प्रार्थना केलेली दिसते.

नवीन जागीं कोठें बिऱ्हाड बदलल्यास तेथील वास्तुदेवता, ग्रामदेवता

कोपूं नये म्हणून त्यांनाहि आपल्या मुख्य देवतांनंतर नैवेद्य वगैरे देण्याचा प्रघात आजहि आपल्यांत आहे. अशातऱ्हेनें हिंदूंच्या देव्हाऱ्यांत पुष्कळ दुय्यम दैवतांनीं कानाकोपऱ्यांतून जागा मिळविली आहे. वेदकाळीं वैदिकांना रुद्रालाहि अशाच प्रकारें मान्यता द्यावी लागली असावी असें दिसतें.

वरील मंत्रांत, "रुद्रा तुला हविस् आम्ही देतों" अशी प्रार्थना आहे खरी; पण रुद्राला इंद्रादींच्या समवेत यज्ञांतील हविर्भाग केव्हांच दिला जात नाहीं. यज्ञांत रुद्राला खरोखर स्थान नाहीं. तरीपण त्याचा क्रोध कमी व्हावा म्हणून कीं काय यज्ञांत इंद्रादीस्तव हवन झाल्यावर शेवटीं "रुद्राय पशुपतये स्वाहा" असें म्हणून अवशिष्ट भाग देऊन टाकतात व क्रियेनंतर (अपउप-स्पृश्य) हात धुतात. हवि अर्पण करण्याचा हा प्रकार पाहिला तर त्यांत जिव्हाळ्यापेक्षां जुलुमाचा रामराम जास्त दिसतो. अमंगळ, अशुभकारक म्हणून गणलेल्या ग्रहाला जसें मंगळ हें नांव दिलें गेलें आहे तसें रुद्रालाहि त्याचप्रकारें शिव (मंगलकारक) हें विशेषण लावलें असल्याचें भाष्यकार सांगतात. शिव हें विशेषण लावण्यांत त्या मंत्रद्रष्ट्या वैदिकांच्या मनाच्या आंतल्या कप्यांत या देवतेविषयीं दडलेला अनादर व भीतिच व्यक्त होत नाहीं काय?

वेदांतील वर्णनावरून त्याच्या रूप आकाराचा कांहींसा बोध होतो. या प्रकारच्या स्वरूपवर्णनावरून तो वैदिकांचाच एक स्वतंत्र देव असावा असा तर्क करण्यास जागा आहे. पण रुद्राला पुढीलकाळीं प्रामुख्यानें रूढ झालेल्या शिव या नामाभिधानावरून मुळांत हे दोन देव एकच असावेत असें वाटतें. वर विवरण केल्याप्रमाणें वैदिकांकडून गौणस्थान मिळालेल्या रुद्राचें पुराणांतून आलेलें वर्णन मुळाशीं ताडून पाहिलें असतां वेदांतून वर्णिलेला रुद्रच पुराणकाळीं शिव या नांवानें पुढें आला आहे असें दिसतें. यावेळीं शैवमत प्रसार पावूं लागलें असलें तरी पुराणांतून आलेलीं शिवाचीं वर्णनें फारशीं हृद्य नाहींत. माध्वांत शैवांना निंदाव्यंजकरीतीनें असुर म्हटलें जातें. वेदांत रुद्राला 'असुर' असें द्व्यर्थी विशेषण लावलेलें आढळतें. पुराणांतून शिव हा असुरांचा पक्षपाती असल्याचीं वर्णनें जागोजाग येतात. रावणादि राक्षस म्हणून प्रसिद्ध असलेले जन परम शिवभक्त होते. भागवतांत (४.२.१८–३१) येणारे पुढील श्लोक चिंत्य आहेत :—

अयं तु देव यजन इन्द्रोपेन्द्रादिभिर्भवः ।
सहभागं न लभतां देवैर्देवगणाधमः ॥ १८ ॥

भवव्रतधरा ये च ये च तान् समनुव्रताः ।
पाखंडिनस्ते भवन्तु सच्छास्त्रपरिपंथिनः ॥ २८ ॥
नष्टशौचा मूढधियो जटाभस्मास्थिधारिणः ।
विशन्तु शिवदीक्षायां यत्रदैवं सुरासवम् ॥ २९ ॥

....
एष एवहि लोकानां शिवः पन्थाः सनातनः ॥ ३१ ॥

या वरील श्लोकांत शैवपंथाविषयीं भागवत संप्रदायी ब्राह्मणांच्या काय भावना होत्या किंवा आहेत हें दिसून येतें. भागवत संप्रदायांतच नव्हे तर मूळ वेदांतच रुद्राला मानाचें स्थान दिलेलें आढळत नाहीं. शिवभक्त आचार-विहीन होतील, ते पाखंडी असतील, सुरापान करतील, जटाभस्म धारण करणारे असे हे मूर्ख लोक तुझे भक्त होतील आणि इन्द्रादिकांबरोबर तुला हविर्भाग मिळणार नाहीं, अशा प्रकारचें वर्णन भागवतांत येतें. शैव संप्रदायांत वरील प्रकारच्या अनाचारास अवकाश आहे किंवा होता हें या पंथाचा इतिहास जाणणाऱ्यांस सांगावयास नको. ही वास्तव घटना असतां त्यावर पांघरूण घालण्याकरितां भागवतकारांनीं दक्षाच्या तोंडीं वरील शाप घातला आहे. वस्तुस्थिति अननुकूल किंवा कांहींशी गौण असतेवेळीं ती समंजस वाटावी याकरितां पुराणिक शापाचा किंवा वराचा उपयोग करीत असतात. कुंतीला झालेल्या संततीबद्दल विचित्र वाटूं नये म्हणून दुर्वासाकडून तिला वर मिळाल्याची एक कथा पुराणकर्त्यांनीं तयार केली. यदु-तुर्वसुवंशीय कांहीं शाखा अजूनपर्यंत मद्यमांसभक्षक होत्या. पण तें लोकांना सह्य होण्याकरितां ययातीच्या शापाचें निमित्त पुढें करण्यांत आलें. पुराणलेखनांतील हें तंत्र लक्षांत घेतां, शैव अनाचारी होतील असा जो दक्षाचा शाप म्हणून भागवतांत सांगितलेला आहे त्याचें खरें रहस्य समजेल. त्याचा अर्थ एवढाच कीं, शैवांत तशाप्रकारच्या आचार-विचारांची मंडळी होती.

शाक्तसंप्रदायी लोक आंत आल्यानंतर शैवांत अशाप्रकारचे अनाचार

बोकाळले असण्याचा संभव आहे. योनि-लिंगपूजक शाक्तसंप्रदाय शैवांहून निराळा असून तो कालांतरानें शैवहि बनला असण्याचा संभव आहे. यामुळें मुळांत शैव पंथ हा वैदिक संप्रदाय असणें शक्य आहे असें कोणी म्हणूं शकतील, पण शिव हा शब्द मुळांत संस्कृत नसून आर्येतर द्रविडवर्गीय भाषेंतून आलेला आहे. याकरितां शिव देवता आणि शैवपंथ हा वैदिकमार्गाहून निराळा आहे असें म्हणणें जरूर वाटतें. वेदांत रुद्राचें आणि पुराणांतून शिवाचें वर्णन वाचलें असतां तो आर्यपक्षपाती देव आहे असें धैर्यानें सांगणें शक्य नाहीं.

रुद्र आणि शिव हे एकाच अर्थाचे दोन भिन्न शब्द

सायणाचार्य वेदभाष्यांत रुद्र शब्दाची सहा प्रकारें व्युत्पत्ति सांगतात. एकापेक्षां अधिक व्युत्पत्त्या सांगण्याची आवश्यकता कां उत्पन्न होते ? कोणतीहि एक समाधानकारक वाटत नसल्याची ती खूण नव्हे काय ? अलीकडील तुलनात्मक भाषाशास्त्रज्ञांच्या प्रयत्नानें या शब्दाची निश्चित व्युत्पत्ति कळणें शक्य झालें आहे. रुद्र म्हणजे ओरडणारा, भीकर शब्द करणारा या प्रकारच्या अर्थापेक्षां आर्यभाषावर्गाच्या तुलनेनें कळून येणारी रुद्-rUddy, रुधिर ही व्युत्पत्ति जास्त समंजस वाटते. यामुळें रुद्र म्हणजे तांबडा असा मूळ अर्थ निश्चित ठरतो. 'असौ यस्ताम्रोऽरुण उत बभ्रुः सुमङ्गलः।' (वा. सं. १६.६) रुद्राच्या या वर्णनांत त्याच्या तांबडेपणाचे विविध प्रकार सुव्यक्त होत आहेत. "रुद्रोवा एष यदग्निः।" हें तैत्तिरीय संहितेंतील (५. ४. १.) वचनहि वरील विधानास पोषक आहे. तांबूस हा रुद्र शब्दांतील मुख्यार्थ असून पुढें त्याला निराळे आनुषंगिक अर्थ येत गेले.

रुद्राला पुराणकालीं शिव असें नांव सर्वत्र रूढ झालेलें दिसून येतें. पण वेदांत शिव हा शब्द देवतावाचक नाहीं. तथापि रुद्राला शिव हें विशेषण लावण्याची प्रथा प्राचीन आहे. 'शतरुद्रीयां'त शिव शब्द अनेक ठिकाणीं येतो. रुद्र-शिव असें जोड नांव नंतर रूढ झालें. वीरशैवांत मुलांना शिवरुद्रप्पा हें नांव ठेवण्याची चाल आहे. रुद्र आणि शिव हे दोन्ही शब्द एकाच देवाचीं नांवें असून ते शब्द मात्र निरनिराळ्या भाषांतून आलेले आहेत. पहिला (रुद्र) शब्द आर्यभाषावर्गातील तर दुसरा आर्येतर पत्तिजनांच्या तथाकथित द्रविड भाषा-वर्गातील आहे.

चंद्रमस्चा विचार

शिव शब्दाचा मूलगामी विचार करण्यापूर्वी चंद्रमस् शब्दाचा थोडा छडा लावणें जरूर आहे. चंद्र आणि मास् असे त्यांत दोन शब्द असल्याचें मागें एकवार सांगितलेंच आहे. प्रा. वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं चंद्र-शब्दविषयक आपल्या लेखांत वेदांतील पृथुश्चंद्र, हरिश्चंद्र, अधिश्चंद्र, गुरुश्चंद्र, विश्वश्चंद्र वगैरे उदाहरणांवरून सुचलेला एक महत्त्वाचा शोध नमूद केला आहे. All this leads me to the conclusion that the original word was श्चंद्र in the pre-Vedic times, that by the time of Rigveda, it had shed its श् and that it showed its original spelling in some cases but its absence in others (अभिचंद्रान्, सचंद्र. etc.) shows that चंद्र had become popular and that no attempts could dislodge it. This is the only explanation intelligible to me (Proceedings of the Fifth Oriental Conference Vol. I, page 273).

आज रूढ असलेला चंद्र शब्दाचा मूळ उच्चार वेदपूर्वकाळांत श्चंद्र असावा असा तर्क प्रा. राजवाडे यांनीं केलेला असून तो अगदीं बरोबर आहे.

चंद्र शब्दाचा अर्थ मॅक्डोनेल आणि कीथ असा देतात :—"चंद्र appears to denote gold in certain number of passages from Rigveda onwards (Vedic Index Vol. I, p. 254). ऋग्वेदांत उषेला चंद्र हें विशेषण लावलें आहे. उषा ही आधीं तांबूस पण येतायेतां पांढरेपणाकडे झुकणारी आहे हें सांगणें नकोच. चंद्र शब्दाला सुवर्णासारखा रंग असा अर्थ मॅक्डोनेल सांगतो. सुवर्णाच्या रंगांत तांबूस पिवळसर आणि किंचित् पांढरेपणाहि सामावलेला आपण पाहातों. यामुळें चंद्र शब्दाला पुढें पुढें पांढरा असा अर्थहि आला असल्यास नवल नाहीं. चंद्र शब्दाला सुवर्ण आणि कापूर असे अर्थ कोशांत आढळतात. चंद्र शब्दामधील 'च'काराचा शकाराशीं संबंध असलेला अजून कांहीं शब्दांतून आपल्याला पाहावयास मिळेल. शिन्दूर शब्दाचा तद्भव कानडींत चेन्द्र झाला अशी जुन्या पंडितांची समजूत आहे. तेथें चकाराचा शकाराशीं संबंध असलेला पुरावा तर मिळतोच, शिवाय चेन्द्र–शेन्द्र याचा

मूळ अर्थ काय असावा याचा सुगावा लागतो. 'चेन्द्र' किंवा शेन्दूर हें तांबडें असतें हें जाणण्यास आज कोणत्याहि ग्रंथाच्या आधाराची आवश्यकता नाहीं, ही एंक (प्रत्यक्ष प्रमाण असल्यामुळें) समाधानाची गोष्ट आहे. यावरून चेन्द्र आणि शिन्दूर यांतील साहचर्य पटण्याजोगें आहे. कर्णाटांत शेन्दूराला चेन्द्र म्हणतात. महाराष्ट्रानें शिन्दूर या शब्दांतील प्राचीन काळाचा शकारयुक्त उच्चार कायम टिकविला तर कर्णाटकांत त्या पुढील काळांतील 'च'कार युक्त उच्चार रूढ आहे.

चन्द्र शब्दाचा उच्चार वेद-पूर्व काळीं श्चन्द्र असा असावा या प्रा. राजवाडे यांच्या तर्कास शिन्दूर आणि चन्द्र असे हे एकाच अर्थाचे उच्चारसादृश्याचे दोन शब्द बळकटी आणीत आहेत. अशाच तऱ्हेचा आणखी पुरावा दुसऱ्या कांहीं शब्दांतूनहि मिळूं शकतो. उदाहरणार्थ चंपक शब्दच घ्या. चंपक या नांवाचें औचित्य आपणांस केवळ संस्कृत भाषेवरून कळणें शक्य नाहीं. पांचव्या प्रकरणांत आरंभीं सुचविल्याप्रमाणें या शब्दांतील 'चेन्' किंवा 'शेन्' या मूळ शब्दाचा अर्थ लक्षांत घेतल्यास चेन्पक शब्दांत सामावलेल्या अर्थाचें स्वारस्य आपल्यास कळणार आहे. चेन् किंवा शेन् म्हणजे सुवर्णासारखा रंग हा अर्थ पत्तिजनांच्या सर्व भाषांतून आजहि निरनिराळ्या स्वरूपांत आढळतो. चेन्पक म्हणजे सोन्याच्या रंगाचें फूल–चांफा; या फुलांत मुळांतच हा अर्थ असूनहि तो मराठी भाषिकांच्या लक्षांत येत नसल्यामुळें त्याला सोनचांफा म्हणण्याची पाळी आली! चेन्पक शब्दाला कानडींत 'सन्पगे' हा प्रतिशब्द आहे. 'चेन्पक' शब्दाचा तद्भव 'सन्पगे' अशीच समजूत आहे. पण असा उच्चारभेद असलेल्या शब्दांना तद्भव म्हणणें योग्य होणार नाहीं. एकाच शब्दाचे हे दोन भिन्न उच्चार आहेत.

पत्तिजनांच्या मूळ भाषेंत 'च' कार आणि 'श' कार या दोन्हीचाहि उच्चार असलेलें एक अक्षर त्या वर्णमालेंत असावें. हें आज तमिळ भाषेंतील अशा प्रकारच्या विशिष्ट अक्षरावरून ठरविणें शक्य आहे: 'ச' या अक्षराचा उच्चार तमिळ भाषेंत 'श' आणि 'च' असा दोन प्रकारें केला जातो. प्रा. राजवाडे यांनीं सुचविल्याप्रमाणें वेदपूर्वकाळीं 'श' व 'च' मधील उच्चार शेन्दुर–चेन्द्र, सन्पगे–चेन्पक, अशांसारख्या शब्दांतून स्वतंत्र दोन अक्षरांत आज रूढ झालेला

दिसतो. पुढील काळांत कर्णाटक-महाराष्ट्रांतून यांतील एकेक उच्चारच प्रचलित राहिलेला दिसतो. "हे आम्हांसी कानडे' अशी वृत्ति धारण केल्यास चेन्द्र, चेन्पक, शेन्दूर या शब्दांतील औचित्याच्या आनंदास आम्ही पारखे होऊं. मराठीशीं आपलें कर्तव्य काय म्हणून दुर्लक्ष केल्यास कानडी शब्दांचा पूर्वेतिहास, त्यांच्या अर्थांची वाढ, उच्चारांतील बदल वगैरे कळणें मुष्किलीचें होईल. प्रा. राजवाडे यांना पत्तिजनांच्या भाषांचा परिचय नसल्यामुळें त्यांच्या लेखांत या महत्त्वाच्या शोधाबरोबर एक मोठी गोमहि पण नकळत तशीच राहिली आहे. प्रा. राजवाड्यांच्या मतें चन्द्र आणि मास् हे दोन्ही शब्द आर्यभाषावर्गीयच आहेत. ते लिहितात :—

"चंद्र and मा: both meaning the Moon belonged to two separate groups of the Aryan race. As in course of time these groups merged into one big race, so did their languages or dialects. Hence the existance of synonyms. Some of these synonyms came unconsciously to be combined. Hence the origin of tautological compounds as चंद्रमा: (चंद्र + मास्). One comes across such instances in Marathi, though by their very nature, they number very few." (page 277.)

वरील अवतरणांतील चंद्र आणि मास् हे दोन्ही शब्द आर्यवर्गीय भाषेमधील आहेत असा जो राजवाड्यांनीं तर्क केला आहे तो मात्र निराधार आहे. कारण इंडोजर्मानिक् दुसऱ्या भाषेमध्यें चंद्र शब्द आढळत नाहीं. मास्-Moon, Mehn अशा प्रकारचे मासच्या लगतचे (एकाच कुळीचे) शब्द तेथें आहेत. वाल्डे आणि पोकर्नीच्या इंडोजर्मानिक कोशांत चंद्र शब्द मिळत नाहीं. संस्कृतांतसुद्धां चंद्र शब्दाला आरंभीं आजचा (चंद्र=Moon) हा अर्थ नव्हता. या विषयीं मॅक्डोनेल आणि कीथ यांचें मत विचारार्ह आहे. चंद्र, चंद्रमस् are the names of the Moon, the latter occuring onwards from the Rigveda, the former being first used in this sense by the Atharvaveda. Very little is said about the Moon in Vedic literature, except as identified with Soma, both alike being described as waxing and waning."

चंद्र शब्द विशेषणाप्रमाणें ऋग्वेदांतून वगैरे आरंभीं वापरला आहे. प्रा. राजवाडे यांनीं सुचविल्याप्रमाणें दोन भिन्न भाषिकांचा संबंध रूढ होत जातो तसे दोन भिन्न भाषांमधील समानार्थक शब्द मिळून एक सामासिक शब्द बनतो अशीं उदाहरणें सर्वत्र आढळतात. प्रा. राजवाडे यांनीं सांगितल्याप्रमाणें मराठींत असे जोडशब्द महानुभाव साहित्यांत आणि ज्ञानेश्वरींत सांपडतात. चक्रधरांच्या लीळाचरित्रांत नुसता कोल (काठी) शब्द वापरलेला आहे. कोल हा मराठी भाषेंतील शब्द नव्हे. नंतर त्याचा अर्थ मराठी लोकांना कळणें ज्ञानेश्वरांच्या वेळीं कठिण झालें असावें. तेव्हां कोल याचा अर्थ कळण्याकरितां मराठींतील काठी हा शब्द पुढें मांडणें अवश्य झालें. ज्ञानेश्वरींत कोल–काठी हा शब्द आपणांस पाहावयास मिळतो. याचप्रकारें ओली–शेला हें एक दुसरें उदाहरण होय. वल्ली हा शब्द कानडींत पांघरण्याचें वस्त्र या अर्थी आजहि सामान्यजनांच्या भाषेंत रूढ आहे. ओली हा शब्द लीळाचरित्रांत येतो, पण नरेंद्रकृत रुक्मिणी स्वयंवरांत ओली–शेला हा जोडशब्द दृष्टीस पडतो. चंद्रमस् शब्दहि अशाचप्रकारें रूढ झाला असावा.

रुद्रहि तांबडा, तर शिवहि तांबडा

चंद्रमस्प्रमाणें रुद्र–शिव हाहि जोडशब्द आहे असें मला वाटतें. वेद-पूर्वकालीन पत्तिजनांचा देव शिव असून वेदांत शिव शब्दाचें भाषांतर होऊन शिवानें रुद्र हें संस्कृत स्वरूप धारण केलें असावें. शिन् किंवा चेन् या शब्दाला मुळांत तांबडा असा अर्थ असल्याचें मागें सांगितलेंच आहे. 'चेन्बु' म्हणजे तांबडें भांडें–तांब्याचें भांडें–असा अर्थ आहे. तांब्या (ताम्र) प्रमाणें 'चेन्बु' (चेन्) शब्द अर्थपूर्ण असून चेन्बु म्हणजे तांब्यासारखें भांडें अशाच अर्थानें हा शब्द दक्षिणेंत रूढ आहे. यावरून संस्कृत मानलेल्या शंभु शब्दांतील खऱ्या अर्थाची सूचना आपणांस मिळत आहे. शिव आणि शंभु या दोन्ही शब्दांच्या मुळांत शिन् शब्द आहे. शंकराचाहि असाच अर्थ लागतो. शेन् (मंगल) करणारा–शंकर. शिन् याचा अर्थ तांबडा असा होतो. यामुळें या शब्दांचें औचित्यहि जास्त खुलून दिसतें. आपल्या देवतांच्या मूर्ति निर्माण करण्यांत बरीच सांकेतिक भाषा वापरली आहे यांत शंका नाहीं. देवतामूर्तींतील संकेताचा निश्चित अर्थ कळण्यास अजून निश्चयात्मक पुरावा पुढें आलेला नाहीं. मूर्तींतील

संकेतहि कांहीं निरर्थक नाहींत. त्या संकेतांत कांहीं विशेष अर्थ आहे असें निश्चितपणें सांगतां येईल. आपल्यांतील या संकेतांचा अर्थ सांगणारी परंपरा नष्ट झाल्यामुळें त्या संकेतांपासून आज आपणांस कांहीं बोध होणें कठिण झालें आहे. शिवाच्या मूर्तीला (तिसरा) अग्निनेत्र कां, याचा उलगडा अजून कोणी केलेला दिसत नाहीं. तसेंच शिवावरील चंद्र हें कशाचें सूचक हाहि एक तर्काचा विषय होऊन बसला आहे. आर्यांनीं अग्निस्वरूपांत शिवाला पाहिलें. 'रुद्रोवा एष यदग्निः' (तैत्तिरीय ५.४.१) शिवस्वरुपाचीं अशीं वर्णनें आहेत. आर्यांना अग्नींत शिव दिसला, तर शेन्, चेन्, केन्–चंद्र हा शिवाचा प्रतीक होऊन पत्तिजनांना दिसला असावा. या कारणानें अग्नि व चंद्र हे दोन्ही संकेतरूपानें रुद्र–शिव–रूप रचण्यांत समाविष्ट झाले आहेत. चंद्रवार हा अजूनहि शिवाचा वार म्हणून बहुजन समाजाकडून मानला जातो. सोम–प्रदोष शैवव्रतांतील एक महत्त्वाचें व्रत आहे. सोम (चंद्र) वार हा शिवाचा वार समजला जातो तें कांहीं निष्कारण नव्हे.

शिव म्हणजेच मंगलकारक

रुद्र हा उग्र अशी आर्यांची कल्पना, आणि त्याचा उग्रपणा कमी करण्याकरतां त्याला शिव हें मंगलकारक विशेषण लावलें गेलें असावें अशी एक समजूत आहे. पण शिव शब्दांतील रहस्य निराळेंच आहे. शिवकुळीचे (Cognates) सर्व शब्द लक्षांत घेतां तें रहस्य चांगलें लक्षांत येईल. शिन् किंवा शेन् हा शब्द केन् आणि चेन् अशा स्वरूपांतहि पत्तिजनांच्या निरनिराळ्या भाषांतून रूढ आहे. शेन्, चेन्, केन् या तीन्ही शब्दांचा मूलार्थ तांबडा हाच आहे. केन्पासून केन्पु हा शब्द लाल या अर्थी कानडींत रूढ आहे. चेन् किंवा चिन् यापासून निष्पन्न झालेले पुष्कळ शब्द कानडींत आजहि रूढ आहेत. चेन्न याचा अर्थ छान असा आहे. मला वाटतें मराठींतील छान हा कानडींतील चेन्न यांचेंच एक रूप आहे. आधुनिक मराठींतील छान हा शब्द जुन्या मऱ्हाटींत 'चांग' या रूपानें वावरत असलेला आढळतो. 'महानुभाव साहित्य' 'ज्ञानेश्वरी' वगैरे ग्रंथांतून 'चांग' हा शब्द हरघडीं येतो. महाराष्ट्र शब्द कोशांत 'चांग' शब्दाचा कानडी 'चेन्न' (सुंदर) या शब्दाशीं संबंध दाखवितात. पण छान हा शब्द अरबी भाषेंतून आला असावा असें त्यांना

वाटतें. तें कांहीं असो, चांग शब्द तरी चेन्न शब्दाच्या जवळचा आहे यांत शंका नाहीं. चेन्न म्हणजे चांगला असा व्यावहारिक अर्थ असून, मुळांत त्याचा तांबडा असा अर्थ आहे.

आर्य आणि पत्तिजनांच्या दृष्टिकोनांतील कांहीं एक विशिष्ट फरक या ठिकाणीं स्पष्ट होत आहे. आर्यांना शुभ्र वर्ण प्रिय, तर पत्तिजनांचा तांबडा रंग आवडता आहे. गौरी ही आर्यांची सौंदर्यदेवता. गौरवर्ण असलेली ती गौरी. गोरेपणा हें आर्यांत सौंदर्याचें लक्षण मानलें जातें. शुभ आणि शुभ्र हे एकाच धातूपासून निष्पन्न झालेले शब्द आहेत. आर्यांना शुभ्र रंग शुभसूचक वाटतो. यामुळें आर्यांच्या वर्णनांत शिव कर्पूरधवल 'गौरांग' झाला; पण रुद्राध्यायांतील वर्णनावरून हा मुख्यतः कोणत्या जनांचा देव हें कळून येण्याजोगें आहेः 'पत्तीनां पति' (रुद्र). शिव हा मुळांत 'गौरांग' नव्हे, कारण शिव म्हणजे लाल, तांबडा असा तेथें अर्थ आहे. आधुनिक तज्ज्ञ रुद्र शब्दाचाहि तांबडा असाच अर्थ करतात. 'चांगला आहे' असें म्हणावयास कानडींत 'चेन्नागिद्दाने' असें म्हणतात. 'चेन्न' आणि 'केन्न' हे दोन्ही एकच शब्द आहेत. 'चेन्नागिद्दाने' याचा अर्थ लालसर, रक्तवर्णयुक्त असा होतो. लालपणांत पत्तिजनांना सौंदर्य सांठविलेलें दिसत असे. लक्ष्मीच्या सौंदर्याचें वर्णन करतेवेळीं 'तप्त-कांचनसन्निभाम्' आणि 'सूर्याभाम्, चंद्राभाम्' असें म्हटलेलें आहे. कानडींत मुलींच्या सौंदर्यसूचक वर्णाबद्दल बोलतांना 'कैंपगिद्दाळे'—लालसर आहे, गव्हासारखा तांबूस रंग आहे असें अजूनहि म्हणतात; तर ब्राह्मणांत ती गोरी आहे असें सांगण्याची चाल आहे. यावरून या दोघांच्या सौंदर्याच्या कल्पनांतील मूळ फरक लक्षांत येईल. छान-चांग म्हणजे लाल असा अर्थ आतां निश्चित ठरतो. सुंदर, शुभकारक म्हणजे चांगलें, तेंच तांबडें; हाच अर्थ शिव शब्दांत सामावलेला आहे. बाहेरून त्याला मंगलकारक असा अर्थ चिकटविण्याची जरूरी नाहीं. तर मुळांत धात्वर्थच तसा आहे.

शिवदर्शन होणें म्हणजे त्याच्या धात्वर्थाप्रमाणें लाल दर्शन होणें. ध्यानावस्थित योगिजनांना ज्योतिस्वरूपांत होणाऱ्या दर्शनाला शिवसाक्षात्कार झाला असें मानण्याची परंपरा आहे. अंतश्चक्षूंस होणाऱ्या या साक्षात्काराप्रमाणें बहिश्चक्षूंस होणाऱ्या दर्शनाचेहि कांहीं चमत्कारिक प्रकार आहेत. सृष्टवस्तूंतील

तांबूस रंगाचे पदार्थ–विशेष त्यांना जास्त आवडते झालेले दिसतात. 'सु–वर्ण' हें अशापैकींच एक आहे. सुवर्णाला कानडींत चिन्न असा अर्थ आहे. चिन्न हा शिन्–चिन् या शब्दाच्या वर्गीतील होय. 'कोल्ह्याचें तोंड पाहणें' हें शुभदायक आहे अशी एक जुनी समजूत आहे. कोल्हा या शब्दानें या रुढींतील मर्म लक्षांत येणें शक्य नाहीं. जंबुक किंवा शंबुक असे दोन पर्याय शब्द कोल्ह्यास संस्कृतांत आढळतात. शिव म्हणजेहि कोल्हा. कोल्हा दिसणें म्हणजे तांबडें (चांग) दर्शन. जंबुकेश्वर नांवाचीं शिवालयें बऱ्याच ठिकाणीं आहेत. शंबु (शंभु) आणि जंबु शब्द तुलनीय आहेत.

गणपति हा शिवपुत्र हें सुविख्यात आहे. गणपतीच्या अंगाला सेंदूराची उटी कां यार्चे मर्म यावरून कळण्याजोगें आहे. वेदांतून मरुतांना 'रुद्रीय', 'रुद्रपुत्र', असें संबोधलेलें आहे. नारदीयपुराण पूर्वभाग (७९–३५३) यांत मारुति हा रुद्रांश असें वर्णन केलेलें आहे. मारुति रुद्रपुत्र असल्याचें दर्शविण्याकरितांच त्याच्या सर्वांगाला शेंदूर फासण्याची प्रथा महाराष्ट्रांत पडली नसेल ना? विभीषणकृत असें प्रसिद्ध असलेल्या 'हनुमत्स्तोत्र' यांत 'वडवानल हनुमान् देवता' 'महावीर रुद्रावतार' अशीं विशेषणें आहेत. मारुतीच्या अभिषेकाचे वेळीं रुद्राध्यायांतील मंत्र म्हणण्याची प्रथा आहे. समर्थ रामदासकृत—"भीमरूपी महारुद्रा..." हें स्तोत्र सुविख्यात आहे. यांतील महारुद्रा हा शब्द मननीय आहे.

'कालाग्नि,' 'कालरुद्राग्नि' हीं विशेषणेंहि लक्षांत घेण्याजोगीं आहेत. श्रीसमर्थांच्या या वर्णनांत वेदकाळापासून या रुढींत सामावलेल्या शिवरुद्रांतील मूळ लालपणाच्या अर्थाचा पुरेपूर साक्षात्कार घडत आहे. "असौ यः ताम्र अरुण उतबभ्रुः" असें सांगून पुढें जें सुमंगल पद वापरलें जातें तें 'शिव' शब्दाचा अर्थ विशद करणारें विवरणात्मक भाष्य आहे. शिव म्हणजे लालसर. असें लालसर दर्शन आकस्मिक रीतीनें घडणें हें शुभसूचक, मंगलकारक असें मानलें जातें. चंद्राप्रमाणें शिव हा शिन्–चेन् या मूळ शब्दापासून बनलेला शब्द हें जर निश्चित ठरेल तर ज्या पत्तिजनांच्या भाषेंतील हा शब्द, त्या पत्तिजनांचाच तो मूळ देव असावा हें स्वतःसिद्धच होईल.

हट्टिकारांचा हाटकश्वेर

पत्तींच्या जिवाभावाचा देव म्हणूनच शिवाला 'पत्तीनाम् पति' असें वैदिक ऋषींनीं संबोधिलें आहे यांत शंका नाहीं. पत्तिजन पुढें हट्टे किंवा हटगार या नांवानें ओळखले जाऊं लागल्यानंतर त्यांच्या देवाचेंहि तशाच प्रकारचें नामांतर झालें असल्यास नवल नाहीं. पत्तींचा पति तसें हट्टींचा पति–तो हाटकेश्वर होणें साहजिक आहे. नाशिकच्या त्र्यंबकेश्वराला हाटकेश्वर असें पर्याय नांव एकेकाळीं होतें हें मागें सांगितलें आहेच. हाटकेश्वराचीं क्षेत्रें दक्षिणापथांत (नर्मदा ते कावेरी) अनेक आहेत. गुजराथेंत वडनगर येथें हाटकेश्वराचें प्राचीन प्रसिद्ध देवस्थान आहे. श्रीशैलमल्लीनाथालाहि हाटकेश्वर असें नांव असल्याचें यापूर्वी आलें आहे. पेशवे दप्तरांतून गोकर्णाला हाटकेश्वर म्हटल्याचें आढळतें. या प्रदेशांना गोपराष्ट्र किंवा गोराष्ट्र अशीं नांवें कांहीं काळ होतीं. गोवा या नांवाचें शहर गोकर्ण भागांतच आहे. नाशिकच्या भोंवतालच्या प्रदेशाची महाभारतकाळीं गोपराष्ट्रांत गणना होत होती. या भागांतील गोदा नदी त्या प्राचीन गोपराष्ट्राच्या नांवाची ग्वाही आजहि देत आहे. (वैद्यकृत महाभारताचा उपसंहार, नकाशा पहा. १९१८.) गोदानदी, गोपराष्ट्र आणि त्र्यंबकेश्वराला असलेलें हाटकेश्वर असें पर्याय नांव या तीन्ही गोष्टी या भागांतील प्राचीन हट्टिकार वसाहतीची स्पष्ट साक्ष देत आहेत.

वऱ्हाट (मरहट्ट) हें नांव हट्टिकारवरून आलें असलें पाहिजे; या पूर्वी केलेल्या विवेचनाला त्र्यंबकेश्वराचें हाटकेश्वर हें नांव पुष्टि देत आहे. हट्टिकारजन एकेकाळीं येथें प्रामुख्यानें वसाहत करून राहिले होते म्हणूनच या प्रांताला हाटक हें नांव रूढ झालें असलें पाहिजे हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. मागें सुचविल्याप्रमाणें रामदासांच्या एका आरतींत आलेला 'हाटक' देश तो हाच!

नाशिक खानदेशांतील कानड गवळ्यांच्यासंबंधीं मागील प्रकरणीं विवेचन आलें आहे. आतां या भागांतील वीरगळांविषयीं आणखी एकदोन गोष्टींची येथें आठवण देणें अप्रस्तुत होणार नाहीं. वीरगळ हें प्राचीन हट्टिजनांचें वैशिष्ट्य आहे. या प्रकारच्या स्मारक शिला तेलगू किंवा तमिळांत नाहींत. श्री. पी. टी. श्रीनिवास अय्यंगार व डॉ. एस्. कृष्णस्वामी अय्यंगार यांनीं अनुक्रमें

History of Tamils आणि Some Contributions of Southern India to Indian Culture या ग्रंथांत हे वीरगळ वडुकरांचें म्हणजे कर्णाट (महाराष्ट्र) जनांचें वैशिष्ट्य होय असें प्राचीन तमिळ साहित्यांतील आधारांवरून विवरण केलें आहे. हट्टिकार गौळि यांचें वैशिष्ट्य दाखविणारे हे वीरगळ नाशिक जिल्ह्यांत पुष्कळ आहेत असें तेथील गॅझेटियरवरून कळतें.

कर्णाटांत तर या प्रकारच्या स्मारक शिला नसलेले जिल्हेच आढळणार नाहींत. या शिलांच्या खालीं एकदोन ओळीच कोरलेल्या असतात "...तुरुवं मगुळ्चि पगेयं कोंदु सग्गमं संदोन्" अशा प्रकारचें वाक्य त्या शिलेवर असतें. "अमुक गांवच्या गौडानें आपल्या गांवच्या गाई पळवून नेणाऱ्या शत्रूंचा संहार करून त्या परतवून आणून येथें स्वर्गारोहण केलें," अशा प्रकारें कोरलेल्या या वाक्यावरून हे वीरगळ (स्मारक शिला) कोणाचे आणि कशाकरितां रोंवले गेले असावेत यावर चांगलाच प्रकाश पडतो.' नाशिक जिल्ह्यांतील या शिला (वीरगल्लु) हट्टिकार वीरांच्या धैर्य–शौर्याचें, त्यागाचें व आत्मबलिदानाचें अमर स्मारकच होत. या वीरांबरोबर कांहीं ठिकाणीं त्यांच्या सतींनीं सहगमन केलेलें असलें. अशा सतींच्याहि स्मारक शिला कर्णाटांत जागोजाग आढळतात. यांना "मा(हा) सती कल्लु" (महासतीचा दगड) अशी संज्ञा आहे. अशा कांहीं ठिकाणीं देवीची कल्पना करून जत्राहि भरत असते. वीर (देव) पूजेचा हा प्रकार थोड्या निराळ्या तऱ्हेनें धनगर-मराठ्यांत आजहि प्रचलित आहे. टाकाची पूजा हा प्रकार कर्णाट–महाराष्ट्रांत या जनांत आहे. स्मारकावर शिवलिंग स्थापून देवालयेंहि बांधलेलीं आढळतील. नाशिक जिल्ह्यांतील वीरगल्लु व खानदेश नासिक, नगरकडील कानड गौळी वगैरे गोष्टींवरून त्या भागास हट्टिकारांचें माहेरघरच म्हणणें अयोग्य होणार नाहीं; आणि म्हणूनच याला हाटक देश असें नांव आलें. नाशिक खानदेश विभागांत हट्टिकार जनच प्रमुख, प्रबळ व बहुसंख्य असावेत. यामुळेंच या जनांवरून त्यांच्या आराध्यदेवतेला हाटकेश्वर असें नांव मिळालें असणें शक्य आहे.

कालेश्वर–कल्लेश्वर

या संदर्भानें शिवाच्या आणखी एका नांवाच्या अर्थावरहि नवीन प्रकाश

पडत आहे. कर्णाटाच्या खेड्यापाड्यांतून तेथील शिलालेखांत उल्लेखित "मूल-स्थान कल्लेश्वरा" चीं देवालयें आढळतात. "कल्लय्या" हें नांव कर्णाटकांत फार रूढ आहे. 'कल्लु' म्हणजे दगड हा अर्थ येथें नसावा असें वाटतें. हीं स्वयंभू स्थानें आहेत असें पुष्कळ ठिकाणीं सांगितलें जातें. या स्वयंभू शिवाच्या स्थानाविषयीं सर्वत्र–सामान्य अशी एक कथा सांगितली जाते : गुराख्यांनीं गाई चरावयास नेल्या असतां रानांत एका वारुळाशेजारीं किंवा एका दगडावर गाइस पान्हा फुटून दुधाची धार येणें; या गोष्टीचें आश्चर्य वाटून गुराखी किंवा गांवकरी यांनीं ती जागा शोधून पाहणें आणि तेथें स्वयंभू शिवाचें जागृत स्थान आहे असें आढळून येणें, अशाप्रकारची दंतकथा असलेलीं शिवालयें गांवोगांव पुष्कळ ठिकाणीं दिसतात. या स्वयंभू शिवाचा याप्रमाणें दुधाशीं येत असलेला संबंध चिंत्य आहे. कल्–कळ् हा कंदमिळ वर्गांतील प्राचीन शब्द आहे. हा रसार्थक शब्द असून 'पालु' प्रमाणें याचा दूध असा अर्थ आहे. कल् यावरून कल्लेश्वर म्हणजे दुधाचा देव. हट्टिकारांचा देव या अर्थाचा हा आणखी एक शब्द. कर्णाट व तमिळ देशाच्या प्राचीन इतिहासांत 'कळ्ळर्' 'कळवर्' जन व या नांवाचें एक राजघराणेंहि होतें याविषयीं पुरावा मिळतो.

शिलालेखांतून आढळणाऱ्या "मूलस्थान कल्लेश्वरा" चीं देवळें डोंगरावर किंवा पर्वतावर आढळलीं असतीं तर कल्लु याचा अर्थ दगड असा करणें सयुक्तिक झालें असतें. पण बळ्ळारी विजापूर वगैरे भागांत शिलालेखांत आढळणारा कल्लेश्वर डोंगरावर नसून साध्या जमिनीवर आहे. 'कल्लेश्वर' नांवाचीं आणखी कांहीं रूपें आढळतात. "कल्मेश्वर" यांत याचे संस्कृतीकरणाचा प्रयत्न दिसतो. कल्मेश्वराला 'कल्लिनाथ' असें नांव वीरशैव वचनांतून वगैरे येतें. जुन्या वीरशैव काव्यांतून हें नांव आलें आहे. 'कल्लेश्वर', 'कालेश्वर' वगैरे नांवें ठेवण्याची प्रथा दक्षिणेंत रूढ आहे. कल्लय्य नांवाच्या व्यक्ति वीरशैवांत पुष्कळ आहेत. कल्लप्पा हें सर्व जातीच्या लोकांत रूढ आहे. कल्लचीं काल, काळ हीं रूपें होत. कालेश्वर, काळेश्वर, हें नांव उज्जयिनीच्या (महान्) काळेश्वराची आठवण आणून देतें. आणि हा कालेश्वर हट्टिकारांचा कुळदेव असणें संभवनीय आहे.

इंदूर, खानदेशाच्या पंचक्रोशींत प्राचीन काळीं हट्टिकारांच्या शाखेपैकीं

कण्ण नामक जनांची (नट किंवा राष्ट्रिकांचे संबंधी) वसाहत होती आणि खानदेश या नांवांत कण्णजनांचा निर्देश आहे हें मागील प्रकरणीं दाखविलें आहे. Nattar (नाट्टर) the title of certain castes as कळ्ळर् etc. असें थर्स्टन सांगतो. या कण्ण शब्दाचें 'कळ्ळ' हें पूर्वरूप आहे. कानडी बोलींत ळ' काराचा 'ण' कार होतो. (उदाः–मुळुगु–मुणुगु, सरपळी–सरपणी, वगैरे). यावरून कण्णजनांचें जुनें नांव 'कळ्ळ असें होतें हें सिद्ध होतें. कळ्ळर् व कळवर् जनांच्या अस्तित्वाविषयीं वर लिहिलें आहे. 'कळवर्' 'कळभ्रर्' या नांवाचें घराणें इतिहासांत नमूद आहे (History of Tamils page 536). वातापी चालुक्यांनीं कळभ्रांचा पाडाव केल्याचें इतिहास सांगतो.

कळ्ळ–हें कण्णचें प्राथमिक रूप असून पुढें 'ळ' काराचा 'ण' कार होऊन 'कण्ण' रूप सिद्ध झालें. धारवाड जिल्ह्यांत व म्हैसूरकडे कण्णेश्वराचीं देवालयें आहेत. कण्णेश्वर नांवामुळें कांहीं संशोधकांना या कण्णाचा कृष्णाशीं संबंध जोडण्याचा मोह उत्पन्न झाला. कण्णेश्वराचें कृष्णेश्वर असें नामांतर सुद्धां झालें. पण हा घोटाळा साक्षेपी तज्ज्ञांच्या लक्षांत आल्याविना राहिला नाहीं. कण्णचें संस्कृतीकरण होऊन कर्ण होऊं शकतें; कृष्ण होणें शक्य नाहीं. कृष्ण व्हावयास कण्ह असें मूळ रूप असावयास पाहिजे (Ep. Carnatica IX. HR 30, & XI Dg. 94, 96, 103 etc.). कन्न शब्दाचा कृष्ण शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं असें डॉ. ल्युडर्स यांनीं स्पष्ट विवरण केलें आहे. " ...the Kanarese equivalent is कन्नर where as both कन्न and कण्ण represent the Sanskrit कर्ण " (Ep. Ind. IV. p. 336). कन्न (कण्ण) चा कण्हशीं घोटाळा केल्यानेंच खानदेशाचा कृष्ण देश बनविण्याची चूक झाली आहे. असो.

उज्जयिनीचा कालेश्वर या भागांतील अतिपुरातन कळवर्–कण्णरजनांचें अस्तित्व दर्शविणारा देव आहे असें वरील विवेचनावरून दिसून येईल.

लिंग आणि शिव भिन्न आहेत

शिव ही देवता वेदपूर्वकालीन म्हणजे पत्तिजनांची आहे हा विचार बऱ्याच विद्वानांना मान्य आहे. पण शिव आणि लिंग हे एकच अशी कल्पना

अजून बरीच सार्वत्रिक असलेली दिसते. मोहेंजोदारो, हराप्पा वगैरे ठिकाणीं मिळणाऱ्या लिंग आणि योनिप्रतीकांचा संबंध शैव पंथाशीं लावण्याचा प्रयत्न बऱ्याच विद्वानांनीं केला आहे. पण यांत वैचारिक गोंधळ दिसतो. मुळांत हे दोन्ही पंथ निरनिराळे असून कालक्रमानें त्यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न झालेला आहे. हरि आणि हर यांमध्यें ऐक्य दाखविण्याकरितां हरिहर देवता प्रचारांत आली. तसाच प्रकार लिंग आणि शिव या देवतांमध्येंहि झाला असावा. वेदपूर्वकाळींच, शिव आणि लिंग हे दोन्ही अभिन्न स्वरूपांत प्रचारांत असल्यास, वेदांत शिवरुद्राचें वर्णन करतेवेळीं त्याच्या लिंगरूपाचाहि उल्लेख यावयास पाहिजे होता. पण वेदांतून तसें वर्णन कुठेंच आढळत नाहीं. पुराणांत हा प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो. वेदांतील " शिश्नदेवाः " (७. २१. ५) या वाक्यांत लिंगपंथीयांविषयीं तिरस्कार ध्वनित होतो असें पुष्कळ आधुनिक विद्वानांचें मत आहे. रुद्रशिवाविषयीं थोडीतरी आत्मीयता वैदिक साहित्यांत आढळते. पण पुराणकाळपर्यंत लिंगमाहात्म्य वर डोकें काढूं शकलें नाहीं; तोंपर्यंत तें गुप्तपणें आंत दबूनच होतें. लिंग शब्दाची व्युत्पत्ति संस्कृतांत मिळत नाहीं. तो शब्द आस्ट्रो–एशियाटिक् भाषेंतून आला असें कांहीं विद्वानांचें मत आहेः– " It is clear from what has been written, that the history of a word like **Linga** is not without importance for the study of religion.....A series of study meant to prove that a certain number of myths, legends and tales of Aryan India, have been borrowed from Astro-Asiatic people. (Pre–Aryan and Pre–Dravidian. pages 8-15)

लिंग शब्द ज्या भाषेंतून आला त्या लोकांकडूनच हा पंथ उचलला गेला असणें शक्य आहे. हिंदुधर्मांतील समन्वयाकडील आत्यंतिक प्रवृत्ति लक्षांत घेतां निरनिराळ्या देवांचें एकीकरण कसें होत गेलें हे चटकन् लक्षांत येईल. कर्णाटकांत शिवाचे आत्यंतिक वीरभक्त आहेत, त्यांना वीरशैव असें नांव आहे. यांनाच लिंगवंत असेंहि दुसरें एक नांव रूढ आहे. एकाच विशिष्ट जातीला एकापेक्षा अधिक नांवें आलीं असल्यास त्याच्या मागील कारणपरंपरा अभ्यसनीय असते. कारणाशिवाय कोणतीहि गोष्ट रूढ होत नसते. या पंथास रूढ असलेलीं हीं दोन नांवें लिंगपंथ व शिवपंथ हे दोन निराळे मार्ग असल्याचें

सुचवीत आहेत. या दोन्ही पंथांचा समन्यय झाल्यानंतर त्या जातीला तीं दोन्ही नांवें प्रचारांत आलीं. आजच्या वीरशैव उर्फ लिंगायतांत दोन कडवे पक्ष आहेत. एक पक्ष आपणांस पंचाचार्यांचा म्हणवितो; दुसरा श्री बसव अल्लमांच्या शून्य सिंहासनाच्या पंथांत मोडतो. पहिल्या पंथांत आराध्यब्राम्हणहि आहेत. ते कांहीं होम हवनें सुद्धां करतात. पण दुसऱ्यांस वैदिक आचार बिलकुल खपत नाहींत. जुन्या कांहीं ग्रंथांतून 'लिंगिनः' यांच्याबद्दल जितका तिरस्कार दाखविला आहे तितका शैवांच्याबद्दल नाहीं. तसें जर असतें तर वेदांतून रुद्रशिवाचें वर्णन आलेंच नसतें. भागवतांतील शैवपंथीयांविषयींचा तिरस्कार, लिंग आणि शिव या दोन्ही पंथांच्या ऐक्यानंतरचा असला पाहिजे. वेदांत रुद्राविषयीं इंद्र–अग्नीइतकी आपुलकी दिसत नसली तरी शिश्नदेवाइतका तिरस्कार खचित नाहीं.

पण कालप्रवाहांत ओघाओघानें आपण आधीं तिरस्कारानें टाकलेल्या गोष्टी स्वीकारण्याची पाळी येते. वेदकाळीं रुद्रशिवाला जवळ करून लिंगपंथ दूर केला. श्वेताश्वतरोपनिषदांत रुद्राचें आत्यंतिक वर्णन आलें आहे. पण त्या काळापर्यंतहि शिवाला लिंग असें व्यक्तपणें कुटेंहि म्हटलेलें नाहीं. वैदिक साहित्यांत शिव या अर्थी लिंग शब्द कोठें आढळत नाहीं. पण "वह्नेर्यथा योनिगतस्य मूर्तिः न दृश्यते नैवचलिंग नाशः (१. १२). या श्लोकांत श्वेताश्वतरोपनिषद कर्त्यानें लिंग आणि योनि हे दोनहि शब्द फारच सूचक रीतीनें व बहारीनें योजिलेले आहेत. काष्ठगर्भांत सूक्ष्मरूपानें असलेला अग्नि, दृष्टीस पडत नसला तरी लिंग (संकेत) रूपांत तो असतो. लिंगस्य–सूक्ष्मरूपस्य, असा शांकरभाष्यांत लिंग शब्दाचा अर्थ केलेला आहे. श्वेताश्वतरोपनिषदांतील काष्ठयोनि व अग्निलिंग या शब्दयोजनेंत बरेंच मार्मिक कौशल्य दाखविलेलें आहे. त्याकाळीं लिंगयोनिपंथ (शाक्तपंथ) अस्तित्वांत होता हें या विशिष्ट उल्लेखावरून कळण्याजोगें आहे. पण तो पंथ शिष्टमान्य असा अजून झालेला नव्हता. त्याकाळीं अजून बऱ्याच शुद्ध शैवपंथीयांना, लिंगरूपांत शिवाची आराधना पसंत नसावी. यामुळेंच शिवाला लिंग म्हणण्याचें धाडस या उपनिषत्कर्त्यास झालें नाहीं. "अंतः शाक्तः बहिः शैवः" हा प्रकार शंकराचार्यांच्या काळापर्यंतहि दिसतो. योनिलिंगपंथ हा गौणमार्ग आहे–वाममार्ग आहे अशी त्या काळींच काय अजूनहि समजूत

आहे. पण योनिलिंगपंथहि क्रमानें वरचढ झाला. अशावेळीं शिव हाच प्रत्यक्ष लिंग असें सांगून या पंथाला शिष्टमान्य करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

मल्लय्या-मल्हारी

मराठे मुळांत शिवभक्त. खंडोबा मराठ्यांचा मोठा आवडता देव. या देवाचें खंडोबा हें नांव अर्वाचीन आहे; पण त्याचें प्राचीन नांव मल्हारी-मार्तंड असें आहे. खंडोबाच्या जत्रेंत 'येळुकोटी' बरोबर 'हरहर महादेव', 'जय मल्हारी' अशा गर्जनाहि ऐकूं येतात. महाराष्ट्राच्या प्राचीन साहित्यांत खंडोबा हें नांव मिळत नाहीं. मल्हारी हा शब्द महानुभाव साहित्यांत आढळतो. महाराष्ट्रांत या देवतेस मल्हारी, मैराळ, मल्हारी-मार्तंड म्हाळसा-मार्तंड वगैरे निरनिराळीं नांवें आहेत.

खंडोबा-मल्हारी हा शिवाचेंच दुसरें रूप आहे, अशी भाविक लोकांची श्रद्धा आहे. पण खंडोबाची मूर्ति पाहिली तर त्यांत शिवाच्या स्वरूपाशीं संलग्न अशा महत्त्वाच्या दोन गोष्टींचा अभाव उठून दिसतो. शिवाचें वाहन नंदी, पण खंडोबाचें वाहन घोडा! शिव हा त्रिशूलधारी, तर खंडोबा खड्गधारी! खंडोबा हा वीरांचा देव असें समजलें जातें; शिव हा भोळा शंकर, केवळ वरदान करण्यांत प्रख्यात असलेला देव आहे. शिवाय असुरांचा संहारक तर नव्हेच. मणि-मल्लासुरांचा खंडोबा (मल्हारी) नें नाश केल्याचें पुराणांत वर्णन येतें. विरोधकांच्या संहाराकरितां शिव पुढें आलेला क्वचितच आढळतो. तशा वेळीं वीरभद्र किंवा सेनानी षण्मुखाची तशा कामावर योजना केली जाते. यामुळें खंडोबा हा शिवाचाच अवतार असणें कसें शक्य आहे अशी शंका चाटून जाते.

खड्गधारी खंडोबा हा कार्तिकेय नव्हे

खंडोबाचा संबंध 'स्कंद' शब्दाशीं कांहींजण लावतात. 'स्कंद' असें षण्मुखाचें एक नांव आहे. या दोन्ही शब्दांतील साम्यावरून खंडोबाला 'स्कंद' (कार्तिकेय) बनविण्याची खटपट कांहींनीं केली आहे. ओपर्टनामक साहेबांकडून असा प्रयत्न प्रथम झाला असें दिसतें. ते आपल्या ग्रंथांत म्हणतात: "He (कार्तिकेय) is everywhere revered as household deity and

numerous temples are erected for his worship. The shepherds claim him as tutelary deity. He is most frequently represented as riding on horse-back, attended by a dog and accompanied by his wife म्हाळसा, another form of पार्वती. As he generally carries in his hand a big sword, his name is popularly derived from *khande* (sword),(डॉ. ए. पी. करमरकर यांच्या Religions of India या ग्रंथावरून उद्धृत. खंड १, पा. १६४).

ओपर्टनीं शेवटच्या वाक्यांत खंडोबा हें नांव त्या देवतेच्या हातांतील खड्गावरून आल्याचें नमूद केलेंच आहे. शिवाला त्याच्या धनुष्यावरून 'पिनाकी' किंवा 'त्रिशूली' अशीं निरनिराळीं नांवें आलीं आहेत. पण शिव खड्गधारी होता अशी परंपरा पुराणांत आपल्याला आढळत नाहीं. तर मग खड्गधारी आणि अश्वारोही अशी ही कोणती देवता असावी ?

ओपर्टसाहेबांना, या देवाला कार्तिकेय म्हणजे खंडोबा असें म्हणतांना खरोखर दोन गोष्टींची अडचण भासावयास हवी होती. त्यांच्याच वरील अवतरणांत या दोन विसंगती उघडपणें नमूद आहेत. पण त्या त्यांच्या ध्यानांत आल्या नाहींत. कारण त्यांना पूर्वपरंपरा इतक्या सूक्ष्मपणें माहीत असणें शक्य नाहीं. पण आपल्याकडील विद्वानहि त्याचीच री ओढतात तेव्हां मात्र त्यांची कींव येते. कार्तिकेयाचें वाहन मयूर. पण ओपर्टनीं ज्याला खंडोबा ठरविलें तो अश्वारोही आहे. शिवाय, खंडोबासमवेत असलेल्या स्त्रीमूर्तीचें नांव म्हाळसा असें तेच स्पष्ट सांगतात ! आणि ही म्हाळसा म्हणजे पार्वतीचें दुसरें स्वरूप असें ते स्वतःच पुढें म्हणतात. आतां पहिली गोष्ट : कार्तिकेय हा ब्रह्मचारी आहे. स्त्रीयांनीं कार्तिकेयाचें दर्शनहि घेऊं नये अशी पूर्वापार चाल आहे. तशांत खंडोबाबरोबर असलेली स्त्री पार्वती, कार्तिकेयाची पत्नी म्हणणें तर अत्यंत विसंगत आहे ! पार्वती ही स्कंदाची–कार्तिकेयाची आई होय. याकरितां खंडोबा म्हणजे स्कंद–कार्तिकेय, असें भारतीय परंपरा जाणत असलेला कोणीहि म्हणूं धजणार नाहीं.

मल्हारी-खंडोबाला कार्तिकेय म्हणणें श्री जाधवरावांनाहि पसंत नव्हतें. 'किर्लोस्कर' मासिकाच्या एका अंकांत लिहिलेल्या 'खंडोबा' वरील लेखांत

त्यांनीं याकरितांच खंडोबा शब्दाला दुसरी व्युत्पत्ति सुचविली आहे, असें मला स्मरतें. शिवाला 'खंडपरशु' असें पर्यायनांव असून त्याचाच पर्याय खंड्या, खंडोबा झाला असावा, असें त्यांचें मत आहे. पण खांडेय किंवा खंडोबा हें नांव त्याच्या खड्गावरून आलें असल्यानें या व्युत्पत्त्यांच्या परिश्रमाचें कारण राहात नाहीं.

महानुभाव-साहित्यांतून वगैरे आढळणाऱ्या जुन्या 'मल्हारी' या नांवाच्या ठिकाणीं खंडोबा हें नांव कसें पुढें आलें असावें ? या देवतेच्या हातांतील खड्गावरून हें नांव रूढ झालें असणें शक्य आहे; नवरात्रांत महानवमीच्या दिवशीं आयुधपूजा करण्याची चाल आहे; त्यांत खड्गास असलेल्या महत्त्वामुळें या दिवसाला 'खंडेनवमी' असें म्हणण्याची रूढि आहे. महानुभाव भास्कर कवीच्या 'रुक्मिणीस्वयंवर' काव्यांत एके ठिकाणीं 'खांडेबाहो' असा प्रयोग येतो. खंडोबा हें नांव कसें प्रचारांत आलें असेल याची सूचना वरील 'खांडेबाहो' या वाक्प्रचारावरून मिळण्याजोगी आहे. 'खांडेबाहो' मल्हारी हा पुढें 'खंडोबा' असा ओळखला जाऊं लागला असणें शक्य आहे.

कर्णाटांत मल्लय्या : महाराष्ट्रांत मल्हारी

खंडोबा हें नांव कर्णाटांत प्रचारांत नाहीं. खंडोबाऐवजीं मल्हारी जास्त रूढ आहे. पण कानडी लोकांत याहूनहि कांहींसें निराळें 'मल्लय्या' असें नांव सर्रास प्रचारांत आहे. खंडेराव, मल्हारी किंवा मल्हारराव हीं नांवें ब्राह्मणवर्गांत किंवा मराठ्यांतच आढळतील. कानडी ब्राह्मणांत मल्हार हें नांव आहे, पण खंडो हें नांव केवळ मराठी भाषिकांतच रूढ आहे. यावरून कर्णाट व महाराष्ट्र हे एकमेकांपासून दूर झाल्यानंतर, महाराष्ट्रांत या देवाला खंडो हें नांव प्रचलित झालें असलें पाहिजे. पण मल्हार हें नांव याहून प्राचीन आहे. हे दोनहि प्रांत अजून अलग नसतांना-कर्णाटांत महाराष्ट्रीकरण चालूं असल्यावेळीं या प्रदेशांत मल्हारी हें नांव लोकप्रिय झालें असलें पाहिजे. देशस्थ ब्राह्मणांत (देशस्थ म्हणविणारे या दोनहि प्रांतांचे आहेत) मल्हारी हें अनेकांचें कुलदैवत आहे. आणि कर्णाटकांत हीं घराणीं तुंगेच्या उत्तरेस विशेष दिसतील.

कर्णाटकीयांत महाराष्ट्रीकरण चालूं असतेवेळीं हें नांव नर्मदेच्या दक्षिणेस प्रचारांत आलें असावें. या विधानास पुष्टि देणारीं कांहीं कारणें आहेत. कर्णाटांतील मूळ जनांची ज्यांनीं परंपरा राखिली आहे असें म्हणतां येईल, त्या लोकांत मल्हारी हें नांव रूढ नाहीं. लिंगायतांत व कुरुब (कानडी धनगर) वगैरेंमध्यें मल्लय्या, मल्लप्पा, मल्लेश, मल्लिनाथ, मल्लिकार्जुन अशीं नांवेंच आढळतील. मल्लप्पा नांवाचे कांहीं ब्राह्मणहि आंत आंत खेड्यांत गेल्यास मिळतील; पण मल्हारी नांव कानडी जनांत मिळणार नाहीं. हे लोक या देवास 'मल्लय्या' या नांवानेंच भजतात.

अशा प्रकारें या देवतेस जुनीं दोन नांवें झालीं : मल्लय्या व मल्हारी; आणि हीं नांवें कर्णाटाचें व महाराष्ट्राचें वैशिष्ट्य दाखविणारीं आहेत हेंहि निदर्शनास आलें. या नांवांचा अर्थ जाणला असतां या प्रांताचेंच हें वैशिष्ट्य कां याचाहि बराच उलगडा होणार आहे.

मले + अय्य असे दोन शब्द मिळून मल्लय्य हें पद बनलें आहे. मूळ पत्तिजनांच्या भाषेंत मले म्हणजे पर्वत. 'अय्या' हें पद सन्मानार्थी आहे. मलयदेव म्हणजे पर्वत–देव. यावरून मूळ कानडी लोकांचे पूर्वज पर्वतपूजक होते असें दिसतें. मल्लय्य याप्रमाणें पर्वतप्प, गुड्डप्प, गिरियप्प वगैरे याच अर्थाचीं निराळीं नांवें या जनांत लोकप्रिय आहेत. पर्वतरूपानें यांची ही शिवपूजा आहे. आपलीं गुरेंढोरें चरण्याकरितां व आश्रयाकरितां जागा देणाऱ्या पर्वतांना हट्टिकार-गोपालक देवतास्वरूप मानून पूज्यभाव दाखवितील हें स्वाभाविक आहे. रुद्राला 'गिरीश', 'गिरित्र' वगैरे विशेषणें यजुर्वेदांत आलीं आहेत. यामुळें मल्लय्य, गुड्डप्प, पर्वतप्प, गिरियप्प वगैरे हीं सर्व शिवाचींच पर्यायनांवें ठरतात. रुद्राला हीं नांवें असल्याचें वेदांत आलें असलें तरी ब्राह्मणवर्गांत हीं विशेष प्रचारांत आलेलीं नाहींत. शतकानुशतकें या नांवांचा वारसा ज्यांनीं जतन करून ठेवला त्या जनांचाच हा मूळ देव असें म्हटल्यास चूक होईल काय?

मारुति व हनुमंत या नांवांचा विचारहि वरील विधानास पुष्टि देत आहे. कर्णाटांत मारुति असें नांव वापरीत असलेले विशेषतः महाराष्ट्रीयच होत. मराठे किंवा ब्राह्मण यांशिवाय, अस्सल कानडी घराण्यांत मारुति शब्द ऐकावयासहि मिळणार नाहीं. ते हणमंत या नांवानेंच संबोधतील. याशिवाय

आणखी एक गोष्टहि विचारार्ह आहे. वैदिक परंपराभिमानी महाराष्ट्रीयांत मरुत् परंपरेच्या मारुति या नांवाला प्राशस्त्य आहे हें खरें; तरी देशावर ब्राम्हणांत चुकूनहि मारुतिभट किंवा मारुतिराव मला तरी आढळले नाहींत. हणमंतराव आहेत; पण तें नांवहि कर्णाटाकडून आलेलें असेंच आढळेल. मरुत् हा परिवारगण, सेवक वर्ग; अर्थात् अब्राह्मण. भूतबाधा वगैरे अरिष्ट निवारणार्थ हा देव पूजिला तरी त्याचें स्थान तेवढेंच.

मल्हारी इंद्र असावा

मल्लय्य हा शिव (रुद्र) तर मग मल्हारी कोण ? 'मल्हारीमाहात्म्य' नांवाचें पुराण आहे. मल्लांचा नाश केल्यानें या देवतेस 'मल्हारी' असें नांव प्राप्त झाल्याचें वर्णन त्यांत येतें. हे मल्ल कोण ? मलयवासी ते मल्ल. हे मल्ल आर्यांना विरोध करणारे असावेत. अगस्तीच्या चरित्रांत विंध्यपर्वताच्या विरोधाची कथा येते. अगस्तीनें विंध्याला नमविल्याचें सांगितलें जातें.

ऋग्वेदांत पर्वतदेवता येते. पण यजुर्वेदीय (वाजसनेय) संहितेप्रमाणें पर्वताचा रुद्राशीं स्पष्ट संबंध सांगितला नाहीं. ऋग्वेदांत इंद्राबरोबर तीन वेळां पर्वताचें नांव येतें. तेथें 'इंद्रा–पर्वता' ही जोडदेवता उल्लेखिली आहे (१, १२२, ३; १३२ आणि ३, ५३.१). या ठिकाणीं पर्वत ही देवता आहे (Here Parvata seems to be a Mountain God) असें मॅक्डोनेल् यांनीं आपलें मत नमूद केलें आहे (Vedic Mythology, p. 154).

ऋग्वेदांत येणाऱ्या वर्णनांतून ऐतिहासिक वास्तव घटना कोणत्या, यांचा निश्चित तर्क करणें फारच बिकट आहे. यदुतुर्वशांसारख्या ऐतिहासिक वाटणाऱ्या जनांविषयींचे उल्लेख घेतले तरी त्यांत काव्यमय स्वर्गीय भराऱ्या जागोजाग मध्यें येतात. इंद्राचा रथ भूमीवर चालतो आहे असें म्हणावयाच्या आंत तो अंतरिक्षांत उड्डाण करतो ! ऐतिहासिक गोष्टी अशा प्रकारें काव्यात्मक रीतीनें वर्णावयाचा हा साहित्यप्रकार भारतीयांनीं पुढेंसुद्धां चालू ठेवला. व्यास–वाल्मीकींनीं लिहिलेल्या भारत–रामायणांतील घटना ऐतिहासिक आहेत असें सर्वांना वाटत असलें तरी ते ग्रंथ, इतिहास म्हणून स्वीकारण्यास कोणीहि तयार होणार नाहीं. कालिदास, पंप वगैरे कवींनींहि ऐतिहासिक काळांत हीच

प्रथा पुढें चालविली. रामाला साहाय्य करणारा मारुति (मरुतांचा वंशज) मानव असावा असें बहुतेक संशोधकांना वाटतें. पण त्या वर्णनांत मानवोचित वास्तव भाग किती व कविकल्पना किती याचें पृथक्करण करणें फार गुंतागुंतीचें आहे.

तें कांहीं असलें तरी, अशा प्रकारच्या वर्णनामागें कांहीं अंशीं वास्तव घटना असते. तशा घटनेवर कवि पुढें आपल्या प्रतिभेनें रूपकें रचतात. अगदींच निराधार, केवळ कविकल्पनेचीं वर्णनेंहि थोडीं असूं शकतात. पण कांहीं वास्तव घटनेवर रचलेला काव्यभाग कोणता हें जाणणें अगदींच अशक्य नाहीं. रुद्राचे अनुयायी मरुत् यांना ' पृष्णिमातरः ', ' रुद्रपुत्र (रुद्रिय) ' असें वर्णिलेलें आहे. रुद्राविषयींची त्यांची आत्यंतिक ' वीरभक्ति ' सुविख्यात आहे. वेदांत यांना 'वीराः' असें कांहीं ठिकाणीं म्हटलें आहे. भूलोकांतील कोणाशींच दुरूनसुद्धां या रुद्रभक्त मरुतांचें साम्य नाहीं असें म्हणतां येत नाहीं. वेदांतील मरुत् झंझावाता-प्रमाणें आकाशगामी आहेत खरे; पण त्या वेळीं कांहीं जन तरी रुद्रोपासक होतेच ना ? तशांच्या सोयरीकसंबंधांची पुसट पुसट तरी आठवण देणारी त्या जनांची पिढी आज अगदींच नामशेष झाली असेल काय ? कर्णाटं-तील वीरशिवभक्त आपली पूर्वपरंपरा वेदपूर्वकालापर्यंत असल्याचें सांगतात. सर्व वीरशैव हे आर्यपूर्व जनांचे वंशज म्हणणें ही परमावधीची अतिशयोक्ति होईल. पण त्या त्यांच्या म्हणण्यांत कांहींच तथ्य नाहीं असें म्हणून तें मुळांतच खोटें ठरविणें समंजसपणाचें होणार नाहीं. वीरशैवदीक्षा घेतलेल्या बाहेरच्या अनेक जनांचा यांत प्रवेश झाला आहे यांत शंका नाहीं. पण मुळांत या पंथाची पूर्वपरंपरा वेदकालाइतकी तर खासच जुनी आहे. आपण शिवपुत्र (शिवाचीं लेकरें) अशी यांच्यांत आजहि जिवंत श्रद्धा आहे. वृषभ (बसव) हा आपला माता-पिता (पृष्णिमातरः) असाहि त्यांचा विश्वास आहे. शिवाविना अन्य दैवतास (' एको हि रुद्रः ') ते भजत नाहींत. शिवगणांपैकीं आपण आहोंत अशी त्यांची भावना आहे. या जनांच्या स्वभावांतील उत्साह, कडवेपणा, तीव्रता पाहिली तर रुद्रगणाची अंधुक छाया यांच्या रीतिरिवाजांत दिसते. हिंदु-स्थानांत (मरुत्पुत्र) मारुतीची विशेष उपासना व देवळें कर्णाट व महाराष्ट्राबाहेर नाहींत. रामायणकालीन किष्किंधा याच भागांत असल्याचें संशोधक सांगतात.

ऋग्वेदांतील पर्वताविषयींचीं वर्णनेंहि अशीं वास्तव-अवास्तवतेच्या मिश्रणानें गुंतागुंतीचीं झालीं आहेत. इंद्रानें पर्वतावर हल्ला करून त्यांचा फडशा पाडल्याचीं वर्णनें जागोजाग येतात. पण ऋग्वेदांत ढगांना त्यांच्या रूपसादृश्यावरून पर्वत असें म्हटलेलें अनेक ठिकाणीं दिसतें:

त्वं तमिंद्र पर्वतं महामुरुं वज्रेण वज्रिन् पर्वशश्चकर्तिथ ।
अवासृजो निवृताः सर्तवा अपः
सत्रा विश्वं दधिषे केवलं सहः ॥ १. ५७. ६

"हे वज्रधारी इंद्रा, तूं त्या मोठ्या आणि विस्तीर्ण पर्वताचे तुकडे तुकडे करता झालास. त्यानें अडवून ठेवलेल्या उदकांना वाहण्याकरितां तूं खालीं सोडता झालास. खरोखर, सर्व बळ तुझ्याच ठिकाणीं एकवटलें आहे" (सिद्धेश्वरशास्त्री, ऋ. भा.). अशा प्रसंगीं पर्वतांना 'मेघ' असा अर्थ जरूरच आहे; पण हा अर्थ सर्वत्रच लागू होत नाहीं. 'इंद्रापर्वतौ' या जोडदेवतेंत 'पर्वत' दैवतवाचक आहे.

इंद्र पुरांचाहि वैरी आहे. पुरेंसुद्धां वेदांत पर्वतांप्रमाणें रूपकेंच आहेत. तरी पण या लौकिक घटना असाव्यात असें मानणें चुकीचें होणार नाहीं. कवि आपल्या उपमानोपमेयाकरितां जे शब्द वापरतो त्यामागें त्याच्या भावना दडलेल्या असतात. पुरें आणि पर्वत यांविषयीं ऋषींना आपुलकी नव्हती, त्याविषयीं विरोधच असावा; आणि त्यांचा तो विरोध त्यांनीं आपण रचलेल्या रूपकांतून पर्यायानें व्यक्त केला असावा; पुढील काळच्या पौराणिक कथा वगैरे परंपरागत गोष्टींची पुष्टि मिळत असल्यानें, अशा प्रकारच्या तर्काला बराच अवकाश आहे.

या दृष्टीनें मल्लासुर म्हणजे पर्वतेयांचा नाश करणारा देव म्हणजे तो इंद्रच असावा, असें वाटतें. इंद्र व पर्वत यांच्या विरोधाचे पडसाद भागवतपुराणांत (१० वा स्कंध) एके ठिकाणीं कानीं पडतात. यादवांनीं (आर्यीकरणांत) इंद्रपूजा करण्यास आरंभ केला होता. पण श्रीकृष्णानें पर्वतपूजेची जुनी परंपरा चालू ठेवण्याचें मनांत आणलें आणि यादवांना पर्वतपूजा करण्यास सांगितलें; यामुळें इंद्रास राग आला. अशा प्रकारची एक कथा भागवतांत येते. या व

एका वैदिक देवतेवर आर्येतर रुद्र (शिव) देवतेचें कलम केलेलें असणेंहि शक्य आहे. कारण रुद्राच्या चित्रणांत असें कांहीं थोडें मिश्रण दिसतें खरें.

इंद्राप्रमाणें रुद्र जरी रणरसिक देव नव्हे तरी 'इंद्रापर्वता' देवतेचें खालील वर्णन पाहाः–" हे इंद्र–पर्वतहो, पुढें होऊन लढणारे तुम्ही, आमच्याशीं लढूं इच्छील त्याला त्याला ठार करा, त्याला त्याला वज्रानें मारा; जें वज्र नष्ट झालेल्यासहि मारूं इच्छितें तें गहन स्थलींहि जातें. हे शूरा, तूं आमच्या शत्रूंना सर्व बाजूंनीं विदारून टाक, सर्व बाजूंनीं विदारून टाक " (ऋ. १.१३२·६–सिद्धेश्वरशास्त्री, ऋ. भा.). या वर्णनावरून हा शत्रुसंहारक वीर, वीरांचा देव आहे हें उघड दिसतें. "अस्माकं शत्रून् परि शूर विश्वतो दर्मा दर्षीष्ट विश्वतः " या वाक्यांत 'हे शूर !' या संबोधनांत त्या संयुक्त देवतचें ऐक्य (एकत्व) व्यक्त होतें. मल्हारी–मल्लय्या असें जोडनांव प्रचारांत असलें तरी या निराळ्या देवता असें मानलें जात नाहीं. कानडी लोकांना यांत शिवाचें दर्शन होतें, तर महाराष्ट्रीयांना तेथें मल्हारी (इंद्र) दिसतो. हें त्यांच्या स्वभावविशेषास अनुसरूनच आहे.

मल्हारीची पत्नी ती म्हाळसा. चक्रधर–'लीळा–चरित्रां' त एका व्यक्तीस 'माल्हाबाईची आण' घातल्याचा उल्लेख आढळतो. गदोनायकाच्या बायकोचें नांव म्हाळसाई होतें. माळप्पा, माळव्वा हीं नांवें कर्णाटकीयांत फार जुनीं आहेत. पर्वत किंवा डोंगर या अर्थाचे मलय–माड–माळ हे शब्द आजहि रूढ आहेत; यावरून 'माळव्वा' चें संस्कृत भाषांतर पार्वती होय. तसेंच 'माळव्वा'चें संस्कृतीकरण होऊन 'महालसा' किंवा 'म्हाळसा' असें झाल्याचें निराळें सिद्ध करावयास नको.

मल्लय्या–मल्हारी या नांवाची देवता तमिळ देशांत नाहीं. तेलंगणांतहि या देवतेचे भक्त क्वचितच आढळतात. कर्णाटक–महाराष्ट्रांतून तेथें गेलेल्या कांहींचा हा देव आहे. कर्णाटक–महाराष्ट्रांत नर्मदा ते गोदावरी आणि पूर्वेस श्रीशैल येथपर्यंतच्या प्रदेशांतील जनांची ही मुख्य देवता आहे. मल्हारी–मल्लय्या, मल्लिनाथ, मल्लिकार्जुन, गुड्डप्प, पर्वतप्प वगैरे निरनिराळ्या नांवांखालीं ही देवता पूजिली जाते. या देवतेचें नांव आणि आरत्या, 'एळुकोटी' वगैरे गर्जना यांचा एकत्र विचार केला असतां मल्लय्य ही देवता मुळांत पत्तिजनांचीच

असावी असें म्हणावें लागतें. नंतर इंद्रा-पर्वता या स्वरूपांत या दोन्ही देवतांचा 'कूडल-संगम' (आर्य-द्रविड) झालेला दिसतो. तेलगु, तमीळ या दुसऱ्या कोणत्याहि जनांपेक्षां कर्णाटीयांशींच महाराष्ट्राचा जिव्हाळ्याचा संबंध दाखविणारी ही देवता आहे. विठ्ठल, दत्त, व्यंकोबा यांसारख्या देवता बाराव्या शतकानंतर पुढें आल्या. त्यानंतर त्या कित्येकांच्या कुलदेवता बनल्या. पण मल्हारीच्या भक्तांची परंपरा मात्र या दोन प्रांतांत फार पुरातन आहे. दोनहि प्रांतांना अशी निगडित करणारी ही देवता या प्रांतांच्या एके काळच्या ऐक्याचें प्रतीकच नव्हे काय ?

मल्हारी-मार्तंडांत सूर्योपासनेचा अवशेष

कर्णाटकांतील बहुजनसमाजाच्या पूजनांत मार्तंड नाहीं. कांहीं ब्राह्मणांचें कुलदैवत मात्र या नांवाचें आहे. मार्तंड म्हणजे सूर्य. 'इंद्रा-पर्वता' हें संयुक्त नांव जसें निरनिराळ्या दोन देवता एकत्र आल्याचें दाखवितें, तसें मल्हारी-मार्तंड हें आणखी दुसऱ्या दोन देवांच्या निरनिराळ्या उपासना-मार्गांचें संमीलन किंवा एकीकरण होऊन एक देव बनला असल्याचें निदर्शक आहे. एकाच देवतेंत निरनिराळ्या पुष्कळ देवता येऊन शिरलेल्या आपणांस दिसतात. (रुद्र) शिव याचें मूळ शुद्ध स्वरूप लाल तांबूस ही कल्पना बाजूस राहून, पुढील काळांत पुष्कळच निरनिराळ्या देवतांच्या कल्पना शिवावर आरोपित झालेल्या तज्ज्ञांनीं साधार सिद्ध केल्या आहेत. डॉ. कीथ यांनीं 'Syncretism of different beliefs' याविषयीं लिहितांना आपलें हें मत नमूद केलें आहे (The Religion and Philosophy of the Vedas and Upanishads, p. 148). भक्तांच्याकरितां शिव स्मशानवासी बनला. शिव आणि यम हे दोन्ही जवळ जवळ एक अशी भ्रांति निर्माण होण्याजोगीं वर्णनें आलीं; भव, शर्व, महादेव वगैरे आणखी निरनिराळ्या प्रकारच्या देवता शिवांत अंतर्भूत झाल्याचें संशोधकांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे (डॉ. कीथ यांचा वरील ग्रंथ पाहा). लिंगहि शिवांत तादात्म्य पावल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे. त्याप्रमाणेंच मल्हारी-मार्तंडांत मार्तंड या रूपानें सूर्योपासना 'इंद्रापर्वता' च्या पंथांत विलीन झालेली आहे.

सूर्योपासना ही कांहीं आपल्या देशांत नवीन नाहीं. वैदिक लोक सूर्योपासक होते. पण वेदकालीन अग्नि व सूर्य यांच्या उपासनेची तऱ्हा निराळी

आणि इ. स. चौथ्या--पांचव्या शतकांच्या सुमारास, भारतांत प्रसृत झालेल्या सूर्योपासनेची रीत निराळी. पूर्वी सूर्याची मूर्तिपूजा नव्हती. गुप्त-वाकाटकांच्या वेळीं सूर्याच्या मूर्तिपूजेस आरंभ झाला. ही मूर्तीची कल्पना परकीय असल्याचें डॉ. आळतेकरांचें मत आहे ('Vakataka-Gupta' By R. C. Mujumdar & Dr. Altekar). सूर्योपासनेची ही लाट हिंदुस्थानाबाहेरून आली असावी असें सूर्याच्या तत्कालीन निरनिराळ्या मूर्तींवरून निश्चितपणें सांगतां येईल. चौथ्या-पांचव्या शतकांतील सूर्याच्या मूर्ति कोटबूट घातलेल्या आढळतात. पण हिंदुस्थानांत अशा तऱ्हेचा पेहराव असलेली दुसऱ्या कोणत्याहि देवतेची मूर्ति नाहीं. हा परकीय प्रभाव आहे हें जाणण्यास कोणत्याहि विशेष परिश्रमाची किंवा बुद्धिमत्तेची जरूरी नाहीं.

हा प्रभाव कशाचा असावा ? आपल्यांत प्रत्येक देवतेला एकेक पुराण असणें हें ठरलेलेंच आहे आणि त्या पुराणांतून पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी सूक्ष्म संकेतानें सुचविलेल्या आढळतात. मल्हारी हें नांव कां आलें असावें याचा उलगडा मल्हारीच्या पुराणांतच होतो. मल्लासुर नांवाच्या दैत्याचा संहार केल्यामुळें या देवतेस मल्हारी नांव आलें असें त्यांत वर्णिलें आहे. या मल्लांचा (म्हणजे मलय--पर्वतेयांचा) वैरी हा मल्हारी (इंद्र) हें ठीक झालें. त्याच पुराणांत 'मणि' या नांवाच्या आणखी एका दैत्याचा उल्लेख येतो. मणि हें काय प्रकरण आहे, याचा उलगडा करण्याचा प्रयत्न अजून झालेला दिसत नाहीं. माझ्या मतें मणीचा संबंध मल्हारीशीं नसून मार्तंडाशीं विशेष येतो. मल्हारीबरोबरच मार्तंड असें जें नांव जोडलें जातें तें सूर्योपासनेचें निश्चित सूचक आहे.

तिसऱ्या शतकांत इराणमध्यें मित्रपंथ (Mithraism) विशेष प्रबळ होता. या मित्रपंथाचा 'मणि' या नांवाचा एक मोठा प्रचारक त्या काळांत होऊन गेला. त्यानें त्या देशांतील विरोधास न जुमानतां मित्रपंथाचा म्हणजे सूर्योपासनेचा प्रचार केला. विरोधकांकडून शेवटीं त्यास मरणहि प्राप्त झालें, तरीहि त्याच्यानंतर त्याचा पंथ जगांतील निरनिराळ्या देशांतून प्रसार पावला. तेथील धर्मावरदेखील या मणिपंथाचा फार दूरवर परिणाम झाल्याचें सांगतात. तिसऱ्या शतकांत उदय पावलेल्या मणिपंथीय सूर्योपासनेचा प्रचार गुप्तांच्या

काळांतील परकीय स्वाऱ्यांबरोबर भारतांतहि झाला असणें अशक्य नाहीं. कारण त्या काळांतील सूर्याच्या मूर्ति म्हणजे या स्वाऱ्यांचें जणूं काय प्रतीकच !

जेव्हां जेव्हां दुसऱ्या पंथाच्या वर्चस्वापुढें आपला टिकाव लागत नाहीं असें स्पष्ट होतें, तेव्हां तेव्हां आपल्या पूर्वपरंपरेस विशेष विसंगत न होईल अशा रीतीनें त्या पंथांतील महत्त्वाचा भाग आत्मसात् करून घेणें हें हिंदु-धर्माचें सनातन वैशिष्ट्य आहे. आजपर्यंतच्या समन्वयाचे प्रकार याच धर्तीवर झालेले आहेत; आणि ते याच मनोवृत्तीचे निदर्शक आहेत. आपल्या देशांत पूर्वकाळीं सूर्योपासना होती. नित्य पठणांत असलेला गायत्रीमंत्र सूर्योपासनेचाच एक प्रकार होय. मणिपंथाकडून सूर्योपासना घेतली तरी त्यांतला मणि–राक्षस मारून टाकला ! परकीयांच्याकडून कोणतीहि गोष्ट घेतली असें म्हणणें स्वाभिमानास बोंचक ठरतें. मल्लासुराबरोबर मणि हा दैत्यहि त्या पुराणांत मारला गेला; पण सूर्याची मूर्तिपूजा आपण पत्करली. राष्ट्रकूटांच्यावेळीं कर्णाट–महाराष्ट्रांत पुष्कळ सूर्य–देवालयें होतीं. त्रैपुरुष देवालयाचा उल्लेख प्राचीन शिलालेखांतून येतो. देवळांत ओळीनें तीन गर्भागारें (गाभारे) असून शिव–विष्णूंबरोबर तिसरी देवता ब्रह्मा किंवा सूर्य ही स्थापिलेली असे. या देवतेंत एक श्रेष्ठ, एक कनिष्ठ अशी उच्चनीचतेची कल्पना अद्याप प्रसृत झालेली नव्हती, हें या सर्व देवता एकाच पंक्तींत बसविलेल्या असत यावरून स्पष्ट होतें. भानापूर, भास्करपूर, सुरेबान (सूर्यवन) वगैरे ग्रामनामें एकाकाळच्या सूर्योपासनेच्या लोकप्रियतेची साक्ष पटवितात. सातव्या–आठव्या शतकांतील जिवंत कानडी बोलींत रूढ असलेल्या सूर्यवाचक 'नेसर्' वरून आलेलीं नेसरिगेसारखीं ग्रामनामें कर्णाटांत आजहि आहेत.

कांहीं देवी : महिषासुरमर्दिनी–जगदंबा

जगदंबा हें नांव बरेंच संदिग्ध आहे. कोणत्याच विशिष्ट देवीचा या नांवापासून बोध होत नाहीं. लोकजननी महामाता, एवढाच यापासून अर्थबोध होतो. सिंहवाहिनी, महिषासुरमर्दिनी, परमेश्वरी किंवा वैष्णवी, लक्ष्मी, या दोघीहि त्या त्या भक्तांच्या दृष्टीनें जगदंबाच. पण जगदंबा नांवानें यांपैकीं कोणी एक विशिष्ट देवता असा अर्थ होत नाहीं. हिंदूंतील समन्वयी मनोवृत्ति

पुन्हां येथें स्पष्टपणें दिसून येते. कोल्हापूरच्या देवीला महालक्ष्मी म्हणण्याचा प्रघात आहे. गोंधळांत, कोल्हापूरची अंबाभवानी असें नांव कानीं येतें. आजच्या वीरशैव आणि वीरवैष्णवांच्या दृष्टीनें शैव–वैष्णव नांवाचा असा हा गोंधळ माजलेला वाटेल; पण मागें एके काळीं हरिहरांत भेद मानला जात नव्हता याचें हें प्रत्यंतर आहे. इ. स. १०४९ सालचा शिरूर (तालुका–बागलकोट) गांवचा शिलालेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत पुढील वाक्य आलेलें आहे :—

" रुद्रार्धांगोत्संगनिवासिनी, सिंहवाहिनी, श्रीमत् कोल्हापूर पीठाधिष्ठिते श्रीमन् महालक्ष्म्या देव्याः पादपद्मोपजीवी पाशुपताचार्य प्रभुराजवर्मन्॥ (Bombay Karnatak Inscriptions). येथें त्या कोल्हापूरच्या देवीला लक्ष्मी आणि पार्वती या दोनहि नांवांनीं संबोधिलेलें पाहावयास मिळतें. पण प्रस्तुत जगदंबा म्हणजे महिषासुरमर्दिनी या स्वरूपांतील देवतेचाच येथें विचार कर्तव्य आहे.

या देवीच्या नांवांतील महिषासुरमर्दिनी हें विशेषण येथें चिंत्य आहे. यापूर्वी विद्वान् संशोधक श्री. वि. का. राजवाडे यांनीं आपल्या प्रतिभेनें सुचविल्याप्रमाणें या देवीनें मारलेला महिषासुर हा सांकेतिक शब्द आहे. एके काळीं महिष-जन या देशांत फार माजले होते. या देवीच्या वरप्रसादानें कांहींनीं या जनांचा नाश केला. म्हणून ही देवता महिष जनांचा नाश करणाऱ्या या लोकांची कुलस्वामिनी बनली (राजवाडे लेखसंग्रह ३ : पृ. २४६–२५४). मल्लासुराचा नाश करणारा देव जसा मल्हारी तशी महिषांचा नाश करणारी देवी ती महिषासुरमर्दिनी. ही पूर्वपरंपरा मल्हारीइतकी प्राचीन दिसत नाहीं; कारण मल्लजनांइतके महिषजन पुरातन नसावेत. (" शालिवाहन शकाची पूर्वपीठिका " ले. प्रा. मिराशी, ' नवभारत ' १९५१ जानेवारी, या लेखांत महिषजनांविषयीं माहिती आहे.)

म्हैसूर राजघराण्याची कुलदेवता महिषासुरमर्दिनीच आहे. म्हैसूरचे राजे आपला संबंध यदुवंशाशीं लावतात. शिवछत्रपतींची कुलदेवता महिषासुरमर्दिनीच होती. नवरात्रोत्सव म्हणजे या महिषासुर मर्दिनीचाच उत्सव होय. विजयनगरच्या राज्यांत त्या राजांच्याकडून महानवमी उत्सव फार भव्यपणें साजरा केला जात असे. ' महानवमी दिब्बा ' या नांवानें प्रसिद्ध असलेली टेकडी अजून प्रवाशांना

तत्कालीन वैभवदर्शन करीत उभी आहे. त्या दिव्यावर दरबार भरत असलेली जागा वगैरे भव्य स्थळें तेथें दाखविण्यांत येतात. पंपभारतांत (इ. स. ९३२) भगवतीच्या (स्थापना) उत्थापनाचा उल्लेख एकीकडे येतो. एकूण या देशांतील राजघराण्याची कुलदेवता तीच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. "महानवमी दिवाळी" हा वाक्संप्रदाय पंपभारतांत आला आहे. एक बाई एका खेडुतास नर्म विनोदांत म्हणते : 'आहा ! तूं आलास ! तर मी महानवमी-दिवाळी केल्याविना कशी बरें राहूं ?" "साधु संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा" हें तर महाराष्ट्रांत सर्वश्रुत महावाक्य बनलें आहे. या प्रकारच्या वाक्प्रचारांतून महानवमीचा उत्सव, राजापासून रंकापर्यंत कर्णाट-महाराष्ट्रांत सर्वांचाच होता हें सिद्ध होतें.

प्रा. मिराशींचें संशोधन जमेस धरल्यास महिषक व हट्टिकार गवळी यांचीं घर्षणें दक्षिणेंतच झालीं असलीं पाहिजेत. हें जर खरें असेल तर महिषासुर-मर्दिनी (काली) देवी येथूनच गौड (गौळ) देशास गेली असणें शक्य आहे. बंगालचा आजचा राष्ट्रीय उत्सव नवरात्रच आहे. बंगालच्या सांस्कृतिक इतिहासांत द्रविड प्रभाव विशेष आहे असें त्या देशाचे विद्वानच लिहितात. महाराष्ट्र-कर्णाटकांतच महिषासुर मर्दिनीचें माहात्म्य विशेष आहे ही गोष्टहि, बंगालमधील तथाकथित 'द्रविड' म्हणजे कोण यावर चांगलाच प्रकाश पाडणारी होईल. "द्रविड" या संदिग्ध शब्दानें न होणारा अर्थ येथें स्पष्ट होईल. श्रीरामदासांनीं स्तविलेली हाटकदेवी गौडदेशीं गेली तर शाक्तांची 'गौडबंगाली' विद्या (त्यांनीं तिबेट, चीनकडून स्वीकारलेली) कर्णाट-महाराष्ट्रांत आली असा हा संस्कृतीचा विनिमय झालेला दिसतो. अकरा-बाराव्या शतकांतील नाथपंथीय कानफाट्यांबरोबर चेटुक-माटुकाच्या गौडबंगाली विद्येचे वारे इकडेहि वाहात आले.

कर्णाट-महाराष्ट्रांत हट्टिकारजनांतून राजघराणीं पुढें आल्याबद्दल मागें सुचविलेंच आहे. पत्तिजन हे गोपालक होते हें पुन्हां सांगण्याचें कारण नाहीं. पत्तिजनांच्या पूर्वापार चालींवरून पूर्वी महिषकांत आणि गोपालक हट्टिजनांत हाडवैर असावें असें दिसतें. आज 'गवळी' हें नांव सर्रास रूढ असलें तरी ते महिषपालकच असल्याचें आपणांस दिसेल. हटगार मराठे यांनीं गाईच्या

दुधाशिवाय दुसऱ्या दुधास स्पर्शहि करितां कामा नये अशी चाल एकेकाळीं मल्हाडकडे रूढ होती असें रसेल लिहितो. कर्णाटांतहि हटगारांत कांहीं घराणीं गाईशिवाय कोणतेंहि दूध न विकणारीं आढळतात. हट्टि व दन हे शब्द गाई बैलांचेच निदर्शक आहेत. ब्राह्मण ग्रंथांतून यजनक्रियेस गाईचेंच दूध तूप लागतें. म्हशीचें पवित्र समजलें जात नाहीं असें, सूत्रकालीन समाजव्यवस्था-विषयक ग्रंथांत श्री. व्ही. एम्. आपटे लिहितात. वसुवारसासारखे सण अजूनहि जिवंत आहेत. म्हशींची पूजा कधीं कोठें चुकूनहि केली जात नाहीं. उलट रेडा बळी दिला जातो. आपल्या देशांत महिषजन एकेकाळीं होते असा खचित पुरावा मिळतो. कर्णाटक–महाराष्ट्रांत म्हैसवाडी, म्हैसूर, एम्मिगनूर, कोणनतंत्रिगे, कोणनकेरे (कोण=रेडा) वगैरे गांवें या जनांचें एकेकाळचें अस्तित्व सुचवितात. कर्णाटकांतील धनगरांत 'एम्मेनवरु' असा एक गट आहे. महाराष्ट्रांत म्हसे असें आडनांव मिळतें (नवभारत, १९५१ फेब्रुवारीचा अंक, पान ५२). वर उल्लेखिलेला गाई–म्हशीविषयक तीव्र पंक्तिप्रपंच लक्षांत घेतां या देवीच्या महिषासुरमर्दिनी या स्वरूपांतील रहस्य चांगलें स्पष्ट होईल. एकेकाळीं गोपालक (हटगार) आणि महिषक यांच्यांत तीव्र विरोध होता हें स्पष्ट आहे. महिषासुरमर्दिनीच्या कृपेनें या गोपालक हट्टिकारांनीं महिषकांवर विजय मिळविला खरा पण महिषांनीं हार खाऊनहि मात केली आणि हटगारांनीं जिंकूनहि हार खाल्ली. जेते जित झाले आणि जित जेते झाले!! हटगार नांवाला गवळी राहिले आणि घरीं सर्व म्हशीच आल्या!! हाच प्रकार मल्हारी देवतेबद्दलहि झाला. शिवाचें नांव राखलें पण आंत आला नांव बदलून इंद्र!!

महिषासुर मर्दिनीला "कोलासुर भयंकरी" असेंहि एक विशेषण पुराणांत आढळतें. कोल–मुंडांचा हिनें संहार केला. कोल–मुंड हे फार प्राचीन जन आहेत. कोल–कोल्ह व मुंड हीं नांवें आरंभीं असणारीं गांवें कर्णाट-महाराष्ट्रांत पुष्कळ आहेत. विशेषतः कोल नांवाच्या गांवांतून बरींच प्रसिद्ध अशीं देवीचीं क्षेत्रें आहेत. उदाहरणार्थ : कोलार, कोल्लूर, कोल्हापूर वगैरे. आपल्यांतील देव–देवतांच्या या प्रकारच्या नांवांवरून आपल्या संस्कृतीच्या वाढीच्या इतिहासावर बराच नवीन प्रकाश पडतो.

श्रीदेवी-लक्ष्मी

शतपथ ब्राह्मणांत श्रीदेवीचें नांवं येतें. श्रीचा उल्लेख ऋग्वेदांतहि आहे. पूर्वी लक्ष्मीचें मुख्य नांव श्री असेंच असावें. लक्ष्मीपेक्षां श्री या नांवानें देवीची पूजा विशेष चालते. शाक्त पूजेंत श्रीचक्राची उपासना येते. लक्ष्मी हें नांव अलीकडे जास्त प्रचारांत आल्यामुळें श्री हें नांव मागें पडलें.

देवी भवानीची पूजा मुख्यतः दोन कारणांकरितां केली जाते. एक तर अरिष्टनिवारणार्थ किंवा संपत्ति-संतति-प्राप्त्यर्थ. श्री मंगळागौरीच्या पूजेचा प्रकार हा पहिल्या वर्गांत मोडतो. ती देवी साधारणपणें मंगळादेवी अशी ओळखली जाते. अमंगळ निवारण व्हावें हा यांत हेतु; यावरून मंगलकर्ती देवी अशा अर्थानें हें नांव आलें असावें असा तर्क होण्याचा संभव आहे. पण अमंगळ, अशुभसूचक म्हणून प्रसिद्ध असलेल्या मंगळ ग्रहावरून नांव प्राप्त झालेल्या मंगळवारीं मुख्य पूजन होत असलेल्या देवीचें हें नांव आहे. मंगळाईचीं देवस्थानें आढळतात. मंगळूर, मंगळापूर, मंगळगट्टी, मंगळवाड (वेढे) वगैरे मंगळावरून आलेलीं स्थलनामें होत. मंगळूरला मंगळादेवीचें मोठें देवालय आहे.

गोकर्ण-मंगळूर प्रवासांत मला एक विशेष आढळून आलें : त्या भागांतील पुष्कळ कुणबी वगैरेंचीं नांवें वारांचीं (ग्रहावरून आलेलीं) असतात. आपल्याकडे ही प्रथा लुप्त झाली आहे. कांहीं थोडीं नांवें तशीं प्रचारांत आहेत. तेथें शुक्र, शनि, बुध अशीं नांवेंहि मिळतात. शनियप्पा=तनियप्पा झालेला आहे. त्याप्रमाणें शुक्राप्पाचें तुक्कप्पा रूप होतें. महाराष्ट्रांत तुका हें नांव रूढ आहे. पण त्याचें मर्म मात्र स्पष्ट झालेलें दिसत नाहीं. प्रसिद्ध तुकारामावरून हें नांव रूढ झालें असें समजून तुका म्हणजे (तुकणें=जोखणें) वाणी असा अर्थ त्याच्या जातीवरून कांहींनीं कल्पिला आहे.

तुळजापूरच्या भवानीला तुकाई असें नांव आहे. तुळजापूर-कोल्हापूर येथें शुक्रवार हा मुख्य पूजेचा दिवस आहे. लक्ष्मीचा पति विष्णु (बालाजी) त्याचाहि वार म्हणून शुक्रवार प्रसिद्ध आहे. यावरून तुक्क हें नांव मुळांत शुक्र याचा तद्भव असून हें अंबाभवानीचें पर्यायनाम ठरतें. अंबण्णा, अंबप्पा,

अंबादास वगैरे नांवें अंबाबाईच्या भक्तीचीं सूचक आहेत. तसें तुकप्पा, तुकोबा नांवहि कुलस्वामिनी देवीचें सूचक आहे.

श्रीदेवीचा संबंध पुन्हां चंद्राशींच येऊन भिडतो. "हिरण्यवर्णाम्, हेममालिनीम्, हिरण्मयीम्" अशाप्रकारें तिचें वर्णन श्रीसूक्तांत केलें आहे. या देवीचें चंद्राम् असेंहि विशेषण तेथें आढळतें. देवजुष्टाम् हें विशेषण तर विचाराई आहे. चंद्रांतील अमृत घेऊन उरलेला चंद्र असा कांहींजण याचा अर्थ लावतात. श्रीदेवीचा चंद्राशीं संबंध सुचविणारा हा अर्थ आहे. "चंदला-परमेश्वरी" नांवाची देवता पुष्कळ घराण्यांचें कुलदैवत आहे. निजाम हैदराबादकडे या देवीचें मोठें क्षेत्र आहे.

श्रीसूक्तांतील वर्णनावरून श्रीदेवीचा हिरण्यवर्णाशीं विशेष संबंध आहे हें निदर्शनास येतें. यामुळें श्री शब्द हां यापूर्वी विवरण केलेल्या शिन् शब्दापासून निष्पन्न झाला असावा असें मानण्यास जागा आहे. आर्यांच्या देवांत स्त्री देवतांना महत्त्वाचें स्थान नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे. ऋग्वेदांत आज आपण पूजीत असलेल्या लक्ष्मी, पार्वती वगैरे देवतांचा मागमूसहि नाहीं. राका, सिनीवाली गुंगूसारख्या कांहीं देवतांचीं नांवें येतात; पण त्यांना वेदांत कांहीं महत्त्व असल्याचें दिसत नाहीं. वरीलपैकीं सिनीवाली हें नांव अभ्यसनीय आहे. 'Siniwali looks to me like a foreign word' असे उद्गार लोकमान्य टिळकांनीं आपल्या एका लेखांत काढले आहेत (Bhandarkar Commemoration, Vol. page 40). सिनीवाली हा संस्कृत शब्द नव्हे. या शब्दांतील पूर्व भाग सिनी याचा त्याच्या रूप व अर्थ-साद्दश्यावरून, शिन्, या पूर्वोल्लेखित पत्तिजन भाषेंतील धातूशीं संबंध आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सिनीवाली याचा अर्थ पाहिला म्हणजे 'शिन्' शींच याचा निश्चित संबंध आहे असें स्पष्टपणें म्हणावेसें वाटतें. अमावास्येच्या आदल्या दिवसाचा (चतुर्दशीचा) चंद्र असा अर्थ सिनीवाली या शब्दाला आहे. 'सिनी चंद्रकला' असें भानु दीक्षित यांनीं आपल्या अमरकोशाच्या टीकेंत सांगितलेलें आहे.

यदुतुर्वसु चंद्रवंशीय असें सांगण्यांत पुराणिकांचा कांहींतरी हेतु असावा असें दिसतें. कारण चंद्राची पूजा या जनांतील आजच्या पिढीपर्यंतहि चालत आली आहे. सर्व महिन्यांच्या पौर्णिमा या सणासारख्या महत्त्वाच्या आहेत.

'शिन्' शब्द सिनीवालीशीं संबंधित असेल तर ही चंद्रपूजा भारतीयांकडून बाहेरच्या देशांत गेलेली आहे, असें परदेशांत चंद्राशीं संबंधित असलेल्या रूढि-प्रघातांना पाहून म्हणावेसें वाटतें. Sabbath ह्या शब्दाच्या उत्पत्तीविषयीं एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकांत (11th Ed.) असें म्हटलें आहे : The word has nothing to do with fasting in the sense of enjoying repose....The grammatical form of Sabbath suggests a transitive sense; 'the divider' and apparently indicates Sabbath as dividing month. याचा अर्थ महिन्याचे पंधरा पंधरा दिवसांचे दोन भाग झाले. कोणती विशिष्ट तिथि चंद्रपूजेची मानावी याबद्दल (पौर्णिमा, चतुर्दशी, प्रतिपदा वगैरेंसंबंधीं) वाद असला तरी चंद्राचा संबंध या Sabbath शीं आहे असें तज्ज्ञ सांगतात. "Sinai" (The Biblical Mountain) याचा संबंध चंद्राशींच येतो. As sin means 'moon', this fast has been connected with the name of sinai असें कांहींचें मत आहे. पण कांहीं विद्वानांना हें संमत नाहीं. (पहा Encyclopidia Britanica XI Edition.) Sabbath चा मूळ अर्थ महिन्याचे दोन भाग आणि त्या काळचा व्रतोपवास असा असल्याचें तज्ज्ञांचें मत आहे. म्हणजे वद्य चतुर्दशीच्या चंद्राची पूजा आणि उपवास यांत ध्वनित होतात. हिंदूंत प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्दशीलाच शिवरात्र म्हणण्याची पद्धत आहे; माघ महिन्यांतील वद्य चतुर्दशीला महाशिवरात्र म्हणतात. चतुर्दशी म्हणजे शिनीवाली, अर्थात् शिनीवालीचा संबंध शिवाशीं आला. शिन् शब्दाचा संबंध शिवाशीं आल्याचें मागें सांगितलेंच आहे. शिन्, चेन्, केन् या शब्दांच्या परस्परसंबंधाकडेहि येथें लक्ष देणें जरूर आहे. "सर्वमंगलमांगल्ये **शिवे** सर्वार्थसाधके" असें श्रीचें केलेलें वर्णन योग्यच आहे. सर्वमंगल म्हणजे चांगलें (चांग=छान्=चेन्=तांबूस हे मागें दिलेले अर्थ येथें लक्षांत घ्यावे म्हणजे शिव शब्दाचा अर्थबोध होईल.)

वरील उताऱ्यावरून चंद्राशीं संबंध असलेल्या या देवतेची उपासना पत्तिजनांपासून आर्यांनीं घेतली असली पाहिजे असें म्हणणें चुकीचें होईल काय?

एकवीरा-एल्लम्मा

परशुरामाची आई, जमदग्नीची पत्नी रेणुका हिची पूजा कर्णाट-महाराष्ट्रांत

सर्वत्र आहे. पण निरनिराळ्या ठिकाणीं या देवीला निरनिराळीं नांवें आढळतात. कांहीं ठिकाणीं एल्लम्मा तर कांहीं ठिकाणीं रेणुका अशा स्वरूपांत ही देवी दृष्टीस पडते. या दोन प्रांतांतच या देवतेच्या पूजेचा प्रसार इतका कां असावा हा एक विचाराचा प्रश्न आहे. केवळ जमदग्नीची पत्नी म्हणून कांहीं हिची पूजा होत नाहीं. कदाचित् परशुरामाची आई म्हणून पूजिली जात असेल तर त्यांत थोडें तथ्य आहे. एकवीरा हें नांव याचें सूचक असावें.

कर्णाटकांत रूढ असलेल्या एल्लम्माच्या पूजाप्रकारावरून या उत्सवांत रेणुकेपेक्षां भूमातेची पूजाच अभिप्रेत दिसते. चैत्रपौर्णिमेस होणाऱ्या उत्सवांत ही देवी सुवासिनी होते आणि मार्गशीर्ष पौर्णिमेस ती विधवा होते अशी समजूत आहे. मार्गशीर्षांत पिकांची कापणी वगैरे होऊन भूमीचें सौभाग्य नष्ट होतें. तर चैत्रमासापासून वसंतऋतूची पालवी फुटते. यांत ऋतूंची, निसर्गाची पूजाच मुळांत असावी असें दिसतें. आणि या ऋतूंच्या पूजेचा आरोप या देवीवर केलेला दिसतो.

एल्लम्माचे सर्व उत्सव नेमके पौर्णिमेसच असतात हा केवळ काकतालीय न्यायच असेल का ? तें कांहीं असो, हे उत्सव म्हणजे कर्णाट-महाराष्ट्रांचें वैशिष्ट्य आहे; हा या दोन जनांतील जुन्या मैत्रीचा अवशेष आहे. यल्लम्मा या शब्दाचा अर्थ आज बऱ्याच जणांना उमगत नसेल. यल्ल म्हणजे सर्व, अम्मा म्हणजे माता; यल्लम्मा म्हणजे सर्वांची माता–जगदंबा. लीळाचरित्रांत काऊळगांवीं एकवीरा असल्याचा उल्लेख आहे. यल्लु आई हें नांव महाराष्ट्रांत आजहि आढळतें. कर्णाटकांतील यल्लम्माच्या क्षेत्रास वऱ्हाडपर्यंतचे भक्त येतात. श्री चक्रधरांच्या शिष्यांत यल्हंभट आणि यल्हाई असल्याचें लीळाचरित्रावरून दिसतें. श्री. चक्रधरांचें वास्तव्य अस्सल महाराष्ट्रांतच होतें असें त्यांचे चरित्रकर्ते अभिमानानें सांगतात. त्या प्रांतांतील शिष्टमंडळींतहि यल्हंभट, यल्लु-आई या नांवाची मंडळी होती हें निश्चित होतें. लोकप्रिय देवांचीं नांवें मुलांना ठेवतात हें लक्षांत घेतां ही देवता वरहाट–खानदेशीं बरीच वर्चस्वी व प्रबळ होती असें म्हणावें लागतें. अंबा (देवी) तुका (देवी) प्रमाणें यल्लु (देवी) वरून स्त्रियांचीं तर खरेंच, पण पुरुषांचींहि नांवें महाराष्ट्रांत खुद्द वरहाट प्रांतीं रूढ होतीं; आणि तीं ब्राह्मणांपर्यंत येऊन पोंचलीं होतीं असें श्री. चक्रधर शिष्यांच्या नांवांवरून

दिसतें. कर्णाटकांत यल्लंभट हें नांव अजून रेणुकाभक्तांत रूढ आहे. यल्लम्माच्या ऐवजीं संस्कृत नांव एकवीरा, हें पुढें प्रचारांत येऊं लागलेलें दिसतें.

अशाप्रकारें कर्णाट-महाराष्ट्रांतील मर्गजा (मरगव्वा), मरी आई (मारेम्मा) वगैरे आणखी कांहीं देवतांचा उल्लेख करतां येईल. पण सध्यां विस्तारभयास्तव येथेंच थांबणें बरें.

★ ★ ★

: ७ :

धर्मपंथ

महाराष्ट्रांतील निरनिराळ्या संप्रदायांचा अभ्यास विशेष आस्थेनें अलीकडे चालला आहे. पण ऐतिहासिक कालानुक्रमानें भिन्नभिन्न मतांच्या तुलनात्मक अभ्यासास अजून आरंभ झालेला नाहीं. त्यामुळें महाराष्ट्र संस्कृतींतील या विषयींचीं कांहीं स्थळें अजून तशींच संदिग्ध राहिलीं आहेत. उदाहरणार्थ मुसलमानांचा महाराष्ट्रांतील धर्मपंथांशीं आलेला संबंध हें एक अजून न सुटलेलें कोडें आहे. श्री जनार्दन स्वामींना मुसलमान अवलियाच्या रूपानें दत्ताचा साक्षात्कार झाला अशी एक दंतकथा आहे. पण हिंदु देवानें मुसलमान अवलियाचें रूप धारण करून दर्शन देणें, हें आजच्या मुसलमानांबद्दल असलेल्या तिरस्काराच्या दृष्टिकोनामुळें कांहीं पंडितांना आश्चर्यजनक वाटतें व त्या उद्वेगांत ते कांहींतरीच भरमसाट लिहीत असतात. कानफाटे म्हणून तिरस्कृत ठरलेले नाथसंप्रदायी ज्ञानेश्वरांसारख्यांचे गुरु कसे होतील ही शंका बलवत्तर होऊन कांहींनीं ज्ञानेश्वरांचे गुरु असलेले नाथच निराळे असा वाद उत्पन्न केला आहे. हीं अशीं कोडीं बरींच आहेत. त्या सर्वांचा निर्देश करण्यापेक्षां, ऐतिहासिक पार्श्वभूमीवरून विहंगावलोकन केल्यास हीं कोडीं आपोआपच सुटलेलीं दिसतील.

गुरुदत्त मार्ग

महाराष्ट्रांत महानुभाव पंथ, वारकरी संप्रदाय, श्रीरामदास पंथ वगैरे पंथ, कालाच्या ओघांत निरनिराळ्या नांवांनीं पुढें आलेले आहेत. आपापल्या पंथांचीं वैशिष्ट्यसूचक अशींच त्यांचीं तीं नांवें आहेत खरें; पण "गुरुदत्त मार्ग" असें या सर्वांना लागू होणारें जास्त अन्वर्थक व समावेशक नांव सुचवितां येईल. गुरूंनीं दिलेला आणि शिष्यांनीं पुढें चालविलेला असा हा "गुरुदत्त मार्ग" होय. *

श्रीगुरुदेवदत्त

"श्रीगुरुदेवदत्त" या शब्दाबरोबर कांहीं एका विशिष्ट देवाची मूर्ति डोळ्यांसमोर उभी राहाते. तीन तोंडांच्या श्रीदत्तमूर्तीचें चित्र महाराष्ट्रांत तर सुविख्यात आहे. या चित्रांतील तीन तोंडें हीं ब्रह्मा, विष्णु, महेश्वराचीं, असें सांगितलें जातें. काषायांबर धारण केलेल्या या त्रिमूर्तीजवळ एक गाय उभी असते आणि बाजूस चार कुत्रीं चितारलेलीं दिसतात. गोमाता ही पृथ्वीची सूचक अशी एक समजूत आहे. पण बाजूस उभ्या असलेल्या या कुत्र्यांचा अर्थ काय ?

बाजूस असलेल्या या चार कुत्र्यांना पाहिलें असतां, दत्त ही देवता वैदिक संप्रदायाची कशी असेल अशी एक शंका मनास चाटून जाते. कुत्रा हा वैदिकांना न आवडणारा अपवित्र प्राणी. त्याचा स्पर्श झाला असतां सचैल स्नान करावें अशी धर्मसूत्रांत आज्ञा केलेली आहे.

'शुनोपहतः सचैलोऽवगाहेत' तसेंच,

शुना दृष्टस्तु यो विप्रो नदीं गत्वा समुद्रगाम्
प्राणायामशतं कृत्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥

---

* हें नांव कसें सार्थ आहे हें प्रथम नवभारतमधील एका लेखांत मी स्पष्ट केलेलें आहे. (पहा : नवभारत, सप्टेंबर १९४९.) 'गुरुमार्ग' हें नांव डॉ. सौ. इरावतीबाई कर्वे यांच्यासारख्या चिकित्सक विचारवंतांनाहि मान्य झाल्याचें कळतें. (मराठी लोकांची संस्कृति, पा. २५२, ५३.)

सुवर्णरजताभ्यां वा गवां शृंगोदकेन वा ।
नवैश्च कलशैस्स्नात्वा सद्य एव शुचिर्भवेत ॥
(बोधायन धर्मसूत्र. १२४–१२५)

हें धर्मसूत्र ख्रि. पू. ५०० ते २०० च्या सुमारास रचलें गेलें असावें असें तज्ज्ञांचें मत आहे.

अग्निहोत्री वगैरे श्रद्धाळु वैदिक मतानुयायी मंडळींत ही परंपरा अजूनहि रूढ आहे. कुत्र्यासारख्या अपवित्र प्राण्यास जवळ बाळगणारा देव आणि त्यांतूनहि संन्यासी ! हा वैदिक मार्गी असणें शक्य आहे का ?

दत्ताच्या चित्रांतील तीं कुत्रीं, कुत्रींच नव्हेत; तर कुत्र्याच्या रूपानें वेद दत्ताला अनुसरीत आहेत असें सांगितलें जातें. पण कोणत्याहि वैदिक देवतेच्या पाठीशीं कुत्रीं (वेद) आहेत असें सुचविलेलें आढळत नाहीं. मल्हारी मार्तंडाजवळ कुत्रें आहे. पण तें कुत्रें वेदसूचक आहे असें सांगितलेलें ऐकिवांत नाहीं. आणि मल्हारी मार्तंड ही देवता मुळांत (मल्लयदेवता) आर्यांची नसून पत्तिजनांची आहे. पत्तिजनांचा कुत्रा हा आवडता प्राणी आहे. तमिळ साहित्यांत वडुकर हट्टिकार यांचें वैशिष्ट्य म्हणून त्यांच्या गल्लमिशा व त्यांचीं कुत्रीं यांचें वर्णन येतें (Some Contributions of South India) विदर्भांत वाघमारे कुत्रे (माचलः) असल्याचें वर्णन जैमिनीय उपनिषद् ब्राह्मणांत येतें (Vedic Index Vol. II p. 297). हटगार–धनगरांना कुत्र्यांची आवश्यकता किती असेल ही सहज जाणतां येणारी गोष्ट आहे. 'श्वपतिभ्यः' हें रुद्राचें वर्णनहि येथें आठवावें. यावरूनहि रुद्र–गिरिश आर्येतरांचाच देव हें पुनः निदर्शनास येत आहे.

वेद हे अपौरुषेय; त्या वेदांना संपूर्ण अनुसरणें ही वैदिकांची निष्ठा आहे. असें असतां वेदच अनुयायी होऊन, अवधूत, निरंजन अशा दत्तामागें कुत्र्याप्रमाणें पाठीस लागावेत या संकेतामध्यें (Symbolism) कांहीं तरी विशेष खोंच खास आहे. छायेप्रमाणें येथें वेद पाठीमागें जातात; पण वेदांस अनुसरून हा देव जात नाहीं असाच ध्वन्यर्थ या चित्रांतून निघत नाहीं काय ? त्रिमूर्ति दत्ताच्या कल्पनेमागें ब्रह्मा, विष्णु, महेशांच्या ऐक्याची सूचना आहे. पण त्या देवाला तीन तोंडें होतींच अशी कांहींची समजूत आहे.

पण पुराणांत या कल्पनेला आधार मिळत नाहीं. श्रीभागवतादि पुराणांत दत्ताचें नांव येतें. वेदांतून दत्ताचा उल्लेख नाहीं. पुराणांतून येणाऱ्या दत्ताची कथा अशी आहे : अत्रिऋषीपासून अनसूयेस दहा पुत्र झाले. त्यांपैकीं दत्त हा एक; ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या अंशानें अत्रीस झालेल्या एकेका मुलांत-- ब्रह्मा-सोमरूप; विष्णु-दत्तरूप; व रुद्र-दुर्वासरूप; असे निरनिराळे तीन पुत्र जन्मास आले. यावरून दत्त हा केवळ विष्णूचा अवतार हें स्पष्ट होतें. असें असतां आज सर्वत्र प्रसिद्ध असलेल्या दत्ताच्या चित्रांत त्रिमूर्तींना एकत्रित केलेलें दिसतें. हें असें का ?

गुरुदत्त आणि यतिपंथ

दत्त हा एक यति म्हणून सर्वश्रुत आहे. यतिपंथ मुळांत वैदिकमार्गी नसावा असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे. अग्निपूजा हें आर्यांचें वैशिष्ट्य आहे. पण यति हे निरग्नि आहेत. अग्नि म्हणजे शिखी. ब्राह्मणांची शिखा ही ब्राह्मणांच्या शिखी-(अग्नि)च्या उपासनेचें सूचक आहे. शिखा नष्ट झाली कीं द्विजत्व नष्ट होतें. यति होण्यानें ब्राह्मणांची शिखा व यज्ञोपवीत या दोन्हींवरहि धाड येते. निरग्नि हा शब्द शिवीप्रमाणें वैदिक वापरीत असत. शिखा व उपवीत हे दोन्ही संकेत झुगारून अशाप्रकारें निरग्निपणा स्वीकारावयास सांगणारा पंथ वैदिक असणें शक्य आहे का ?

इन्द्र हा यतींचा वैरी होता असें तैत्तिरीय संहितेवरून कळतें (६. २-७-१). इंद्रानें यतींना मारुन लांडग्यांस चारलें (ऐतरेय ब्राह्मण ७-२८). कांहीं यति शरण आल्यानें इंद्रानें त्यांचें संरक्षण केलें, अशा प्रकारचाहि एक उल्लेख मिळतो. यावरून पुढें जरी यतिपंथाला वैदिकांनीं जवळ केलें असलें तरी पूर्वी तो मार्ग वैदिकांना संमत नव्हता हें चांगलेंच ध्वनित होत आहे.

'यतिसंप्रदाय अवैदिकांचा होय असें श्री. रमाप्रसाद चंदा यांनीं, मोहेंजोदारोविषयक आपल्या एका लेखांत प्रतिपादिलें आहे.

The later Vedic literature-repeatedly refers to a legend which shows that the Yatis incurred the hostility of Indra and were destroyed as a consequence. The Yaties were not originally priests of the Vedic cult like the Bhrigus and

Kanwas, but non-Vedic rites were practised by the indegenous pre-Aryan population of the Indus Valley. In the legend of the slaughter of the Yatis by Indra we probably hear an echo of the conflict between native priesthood and intruding Rishis in the proto-historic period..As applied to a priest, Yati can only mean a person engaged in religious exercises such as tapas, austerities and Yoga. Von Schroeder understands by the term a magician priest or a Shramana. The marble statuette of Mohenjo-Daro, with head, neck and body quite erect and half shut eyes fixed on the tip of the nose, has the exact posture of one engaged in practising Yoga. These Yatis primarily the Yogis receded into the background, were gradually reduced to the condition of the out-caste religious mendicants or Vratyas. (Survival of the Prehistoric Civilization of the Indus Valley; Memoir of the Archaeological Survey of India No. 41 of 1921).

शुद्ध वैदिक मार्ग, यतिपंथाशीं विरोधी आहे. कारण यज्ञसंस्था वैदिक मार्गाचा पाया आहे आणि अग्निहोत्री हा गृहस्थाश्रमीच असावा लागतो. पूर्व मीमांसा ही कट्टर वैदिक मतानुयायी आणि संन्यासपंथाविरुद्ध आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद यांच्या नंतरच्या काळीं उपनिषदें पुढें आलीं. उपनिषदांत तत्त्वज्ञानाला कांहीं निराळीच दिशा लागली. उपनिषदें यतिपंथाला पोषक आहेत. यांतील तत्त्वज्ञान वेदांतील विचारांपेक्षां भिन्न आहे. हा औपनिषदिक संन्यासमार्ग म्हणजे यज्ञसंस्थेच्या उत्कर्षाच्या वेळीं कांहीं काल मागें पडलेला वेदपूर्वकालीन यतिपंथच होय. वैदिक यज्ञयागादींचें महत्त्व कमी होतांच पुनः त्या यतिधर्मानें डोकें वर उचललें. यतिपंथ हा संपूर्णपणें यज्ञसंस्थेच्या विरुद्ध असल्यानें आर्यांनीं बराच काळपर्यंत यतींना यज्ञभूमीच्या आंत पाऊल टाकूं दिलें नाहीं. पण आपल्या देशांतील समन्वय बुद्धि अशा वेळीं केव्हांहि पुढें सरसावत असते. 'यज्ञ' शब्दाच्या अर्थामध्यें बदल करून यज्ञ म्हणजे केवळ अग्निक्रियाच नव्हे तर त्यांत याहून पुष्कळ गोष्टींचा समावेश होतो, असें प्रतिपादन होऊं लागलें. कौषीतकि वगैरे उपनिषदांतून अशा

प्रकारचीं मतें प्रतिपादिलेलीं आपणांस पाहावयास मिळतील. या यज्ञ शब्दाचा अर्थ किती व्यापक झाला आहे याचा पुरावा भगवद्गीतेमध्यें चांगलाच मिळतो.

अशा प्रकारें यज्ञ शब्दाचा अर्थ बदलून घेण्याची आवश्यकता कां उत्पन्न झाली असावी ? अग्नींत आहुति घालणें वगैरे प्रकारानेंच यज्ञ होतो असें नव्हे तर जगांत चाललेल्या सर्व क्रियाहि यज्ञपरच आहेत, असें प्रतिपादण्याची एका काळीं आवश्यकता उत्पन्न झाली. आपल्यांतून जुन्या पद्धतीच्या यज्ञसंस्थेचा तिरस्कार करून बाहेर फुटून जात असलेल्या मंडळींना कांहींसें समाधान देऊन आपल्यांतच ठेऊन घेण्याचा हा प्रयत्न होता. वेदांतून विवरण केलेल्या पद्धतीनें होमहवन करण्याचें सोडलें तरी तुम्ही ईश्वरार्पण बुद्धीनें जें करीत आहां तें सर्व कांहीं यज्ञच होय, असें म्हणून विरोधी पक्षाचें सांत्वन करण्याची पाळी यावी यांत यतिपंथाचा विजय झाला हें कबूल केलेंच पाहिजे. "वेदवादरताः" "त्रैगुण्य-विषया वेदाः" हीं गीतेंतील वाक्यें कट्टर वैदिकमार्गीय पूर्वमीमांसेवर टीका करणारीं आहेत. हे उल्लेख यतिपंथाच्या विजयाचे निदर्शक आहेत.

यतिपंथ हा शैव पंथीयांच्या कडून आर्यांना उचलावा लागला असें वाटतें. ब्राह्मणांतील संन्यासपंथास अनुकूल मनोवृत्तीचे लोक शैव पंथीयांतच विशेष आहेत. यति पंथ हा अतिपुरातन काळापासून वैदिक मार्गांतील एक महत्त्वाचें अंगच जर असतें तर ब्राह्मणांतील सर्व वर्गांकडून सारख्याच रीतीनें त्याचा स्वीकार केला गेला असता. पण आज तशी स्थिति दिसत नाहीं. ब्राह्मणांतील माध्व आणि श्रीवैष्णवांत सर्रास कुणालाहि संन्यास घेण्याची परवानगी नाहीं. विरक्ति उत्पन्न होतांच संन्यास घेण्यास हरकत नाहीं अशी शैवांत रूढि आहे. मोक्षाकरितां शेवटीं संन्यास घेण्याची चाल शैवांत जशी सर्रास एकेकाळीं होती, तशी माध्वांत आणि श्रीवैष्णवांत कधींच नव्हती. या दोन्ही पंथांत पीठाधीश मात्र संन्यासी असतात. आपल्या पंथाच्या रक्षणार्थ आणि प्रसारार्थ शांकरमठांच्या नमुन्यावर हीं पीठें अस्तित्वांत आलेलीं आहेत. अशा कांहीं मठांव्यतिरिक्त माध्व आणि श्रीवैष्णवांत कोणी व्यक्तिशः संन्यास घेण्याच्या प्रवृत्तीस कोठेंहि उत्तेजन दिलेलें दिसत नाहीं. यामुळें हा संन्यास–पंथ शैवांच्या कडूनच रूढ झाला असावा असें म्हणणें जरूर वाटतें. आणि तो वेद–पूर्वकालीन असावा हेंहि अनुषंगानें सिद्ध होतें. संन्याशांच्या शाटीचा काषाय

रंग हें शैवांचें (शिव=लाल) वैशिष्ट्य आहे. कट्टर द्वैती, शैव–शाक्त–विरोधी व पंचकृष्णास परम दैवत मानणाऱ्या चक्रधरांनीं काळें वस्त्र आपल्या पंथाचा संकेत असें ठरविलें. दिगंबर जैनांत श्वेतांबर आहेत. बौद्धांचें वस्त्र पिवळें आहे. औपनिषद तत्त्वज्ञान, यज्ञविरोधकांस पचवून घेण्याच्या दृष्टीनें आवश्यक झालें तरी पुढें जैन आणि बौद्ध धर्मांचा प्रसार झाला तो झालाच. जैनांनीं आणि बौद्धांनीं कांहीं काळ आपलें वर्चस्व गाजविलें. पण पुनः गुप्त राजांच्या वेळीं यज्ञसंस्थेचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न झालेला इतिहासांत नमूद आहे. अश्वमेधादि यज्ञ पुनः होऊं लागले. तरीपण या प्रयत्नांना यावें तसें यश आलें नाहीं आणि तें येणें शक्यहि नव्हतें. यज्ञसंस्थेचा बोजवारा गीतेच्या वेळींच उडालेला होता. आपण हरलों नाहीं हें दाखविण्याकरितां चातुर्वर्ण्य आणि यज्ञसंस्था यांचें कसेंबसें नांव राखून विरोधी मतांस आपल्यांत जागा करून देणें हिंदु धर्मास अवश्य झालें. यति धर्मास चतुर्थाश्रम म्हणून मान्यता मिळाली.

मूळ खरे आश्रम तीनच असें दिसतें. आर्यांना तीन आंकडा विशेष प्रिय आहे. त्रयी विद्या त्रिवित्करण, वगैरे उदाहरणें पाहावीं. वर्णहि आधीं तीनच. चौथ्या शूद्राचा समावेश शेवटीं झाला. तसें ब्रह्मचर्य, गृहस्थ व वानप्रस्थ हे तीनच आश्रम. चौथ्या संन्यासाश्रमास "अत्याश्रम" असें नांव आहे. अत्याश्रम म्हणजे आश्रमधर्मांपलीकडचा असा अर्थ होतो.

यतिपंथ वर्णाश्रम मानीत नाहीं. म्हणजे तो वर्णाश्रमसंस्थेला विरोधी आहे. देवास सर्वस्वीं शरण जाऊन परमेश्वराचा दास किंवा सेवक या भावनेनें यावज्जीव आयुष्य कंठणें यतिपंथाचें मुख्य लक्षण आहे. यतिपंथाचा प्रसार समाजांत जसा जास्त झाला तसा लोकांचा यज्ञपंथावरील विश्वास उडाला. यामुळेंच जैन व बौद्ध मतांचा सर्वत्र फैलाव होण्यास अवसर मिळाला.

यज्ञसंस्थेचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न फसल्यानंतर वैदिक धर्मानें, संन्यासमार्गास आपल्या विचारांत सामावून घेऊन जैन व बौद्ध पंथ हाणून पाडण्याचा प्रयत्न केला आणि त्याचें चिह्न म्हणजेच योगमार्गीय अवधूत 'दत्त पंथ' होय.

श्रीशंकराचार्य आणि यतिपंथ

चातुर्वर्ण्याचें वावडें असलेला यतिपंथ आत्मसात् करण्याचा प्रयत्न श्रीशंकराचार्यांसारख्या मेधावी महापुरुषानें मोठ्या खुबीनें केला आहे. त्यांच्या दिग्विजयावरूनच प्रतिपक्षास त्यांनीं हाणून पाडलें हें सांगावयास नको. पण शांकर दिग्विजय ग्रंथांतील एक गोष्ट फार सूचक अशी आहे; ती कथा वाचतांना श्रीशंकराचार्यांच्या सबंध कार्याचा डोलारा हादरल्यासारखा वाटतो. ती गोष्ट अशी : काशीस गंगास्नान करून श्रीशंकराचार्य परत येत होते. वाटेंत समोरून एक अस्पृश्य गृहस्थ त्यांना धडकून निघाला. तो जवळ येतांच श्रीशंकराचार्य "शिवशील" असें म्हणाले. तें ऐकून तो हरिजन म्हणाला, "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः" अशा तऱ्हेचें तत्त्वज्ञान प्रतिपादन करणाऱ्या आपल्या तोंडीं शिवाशीव, विटाळ ही भाषा कशी ?"

या पेचांतून श्रीशंकराचार्यांनीं कशी सोडवणूक करून घेतली याचें यथार्थ वर्णन—वास्तव सत्य त्या चरित्रलेखकानें नमूद केलेलें नाहीं. अंगावर शेकणाऱ्या अशा प्रकारच्या प्रतिकूल पेचप्रसंगांतून निसटण्याकरितां कांहीं तरी "चमत्कार" (अघटित घटना) घडून आल्याचें सांगण्याची क्लृप्ति लढविण्याची प्रथा पौराणिकांनीं बऱ्याच जुन्या काळापासून रूढ केली आहे. प्रस्तुत प्रसंगीं पुराण लेखक मोठ्या अडचणींत आलेला आहे. यतिपंथीय तत्त्वज्ञानास अनुसरून भेदाभेद न करितां अस्पृश्यांस श्रीशंकराचार्य शिवले, असें म्हणावें तर वर्णाश्रम धर्माचा पाया खचणार ! श्रीशंकराचार्यांनीं अस्पृश्यास आपल्या सावलीसहि उभें राहूं न देतां त्याला दूर हाकललें असेल, तर श्रीमत् शंकराचार्यांनीं काश्मीर ते रामेश्वरपर्यंत प्रवास करून ज्या तत्त्वज्ञानाचा डंका पिटविला, त्याच्या अगदीं विरुद्ध त्यांचें वर्तन केल्याचा आरोप त्यांचेवर येणार ! या कैचींतून निसटण्यास, श्रीशंकराचार्यांच्या समोर परीक्षेकरितां उभी ठाकलेली व्यक्ति अस्पृश्य नसून प्रत्यक्ष काशी विश्वेश्वरच तो वेष धारण करून तेथें आल्याची बतावणी करणें, पुराणिकांस जरूर झालें. श्रीशंकराचार्य याप्रसंगीं कसे वागले हें, तेथें आलेला गृहस्थ श्रीविश्वेश्वराचा अवतार असें सांगण्यानें कांहीं स्पष्ट होत नाहीं. पण ज्ञानी सिद्ध पुरुष अशावेळीं चातुर्वर्ण्याचीं बंधनें पाळीत नसत असाच आज-पर्यंतचा इतिहास आहे.

निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः" अशा तऱ्हेच्या वचनावरून चातुवर्ण्यव्यवस्था न पाळण्याची ज्ञानी सिद्धांची वृत्ति उघड होत आहे. आणि बृहत्स्तोत्ररत्नाकरांत दिलेल्या श्रीमत् श्रीशंकराचार्यकृत मनीषा-पंचकांतील "चांडालोस्तु स तु द्विजोस्तु गुरुरित्येषा मनीषा मम" या श्लोकावरून श्री शंकराचार्यांनीं त्यावेळीं अस्पृश्यता पाळली नाहीं असेंच म्हणावें लागतें.

सनातनी वैदिक मताला, यतिपंथास दूर सारणें अशक्य झालें. धरलें तर चावतें, सोडलें तर पळतें, अशी अवस्था येऊन ठेपली. या प्रसंगांतूनहि हिंदूंच्या समन्वयबुद्धीनें वाट ही काढलीच. यतिपंथाला सोवळें करून आश्रम व्यवस्थेंत शेवटीं जागा दिली. आणि सिद्ध-बुद्धांना मुक्तावस्थेंत वर्णाश्रमाचे कोणते नियम बंधनकारक होत नाहींत असा नियम सांगून त्यांना अपवादांत गणलें.

गुरुमार्ग

वैदिक संप्रदाय आणि यतिपंथ यांतील आणखी एक महत्त्वाचा भेद लक्षांत ठेवण्याजोगा आहे. वैदिक मार्ग, विचार-स्वातंत्र्यवादी आहे. बुद्धीची उपासना येथें मुख्य आहे. वैदिकांच्या नित्य उपासनेंतील गायत्री मंत्रांत "धियो यो नः प्रचोदयात्" अशी प्रार्थना केली जाते. वैदिक मार्गांत 'धी' (बुद्धी) ची उपासना मुख्य आहे. विवेकाला-विचाराला पटेल अशाच गोष्टी मान्य करण्याची प्राचीन ऋषींची आज्ञा आहे. "यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि। यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि" ॥ (तै. उ.) या आज्ञेंत शिष्यानें सतत जागृत बुद्धि ठेवावी व गुरूपासून ग्राह्य तेवढेंच घ्यावें, असें स्पष्ट बजावलें आहे. डोळे मिटून गुरूनें सांगितलेलें एकूण एक आचरण्याचा आदेश दिलेला नाहीं. गुरूची थुंकी झेलणें वैदिक संप्रदायास मान्य नाहीं.

'श्रद्धा ही एकमेव उद्धारक शक्ति आहे. गुरूचें वाक्य हेंच वेदवाक्य. गुरुमुखाशिवाय कोणालाहि ज्ञान होणें शक्य नाहीं. गुरूहून श्रेष्ठ दुसरें कोणी नाहीं' अशी यतिपंथाची विचारसरणी आहे. "गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णुः, गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुस्साक्षात् परब्रह्म" अशा तऱ्हेची दृढ श्रद्धा असणें या मार्गाचें

वैशिष्ट्य आहे. "शिष्यादिच्छेत् पराजयम्" या तऱ्हेच्या मनोवृत्तीला या मार्गांत कुठेंहि थारा नाहीं.

गुरु हेंच दैवत मानणारा तो गुरुमार्ग. एके काळीं हा पंथ निरीश्वरवादी असावा असें मानण्यास पुष्कळ जागा आहे. या मार्गांत गुरुच देवतेचें स्थान बळकावतो. गुरु हा देवाचा प्रतिनिधि असें सांगितलें जातें.

गुरुः पिता गुरुर्माता गुरुरेव परः शिवः ।
शिवे रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन ॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः
गुरुरेव परं तत्त्वं तस्मात् गुरुमुपाश्रयेत् ॥

हें गुरुमाहात्म्य बुद्धिप्रधानांना कधींच पटणें शक्य नाहीं. बुद्धिप्रधानांचें मत कोणा एका व्यक्तीस सर्वगुणपरिपूर्ण, अनंतगुण युक्त, पूर्ण-प्रज्ञ मानण्यास तयार नसतें. सार्वकालिक सर्वव्यापी अशा अव्यक्त शाश्वत तत्त्वाकडे त्यांच्या मनाचा कल असतो. भावनाप्रधानांना अव्यक्त अमूर्त तत्त्वाचें आकलनच होऊं शकत नाहीं; त्यांचा कल विशेषेंकरून साकार, सगुण, चालत्या-बोलत्या वस्तुविशेषांकडे असतो. अव्यक्त महान् तत्त्वाला फार तर "सहस्रशीर्षा पुरुषः" असें कांहींसें व्यक्त रूप कल्पून धीमान् आपल्या भावनांचें समाधान करीत असतो. पण भावनाप्रधान व्यक्ति मर्त्य वस्तूंतच अव्यक्त महान् तत्त्वांना आवाहन करून आपल्या बुद्धीला तेथेंच गुंगवून ठेवते. पहिला तत्त्वज्ञानी, तर दुसरा भक्तियोगी. पहिला ज्ञानमार्गी, तर दुसरा गुरुमार्गी.

गुरुसंप्रदायांत, आपण मानलेल्या गुरूंत किंवा वीरांत देवत्व कल्पून त्याच्या प्रतीकाची, समाधीची पूजा करणें हें एक महत्त्वाचें अंग समजलें जातें. समाधीवर लिंगाची किंवा मूर्तीची स्थापना करून तेथें देवत्वाचा आरोप केलेला पुष्कळ ठिकाणीं आपणांस पाहावयास मिळतो. "वीरगळ" (वीरगल्लु) व टांक हें याच प्रकारचें आणखी एक उदाहरण आहे. धी-उपासक वैदिक मार्गांत अशा प्रकारें समाधि-पूजेचें प्रस्थ माजविलेलें कोठेंच आढळणार नाहीं. वशिष्ठ विश्वामित्रादि प्राचीन वैदिक ऋषींच्या (ते जर यति असते तर)

समाधीचें अवशेष कोठें ना कोठें नाममात्र तरी असलेले आपणांस पाहावयास मिळाले असते. बुद्ध-महावीरांच्या पंथांप्रमाणें एकाच गुरूच्या परंपरेनें उदय पावलेला हा वैदिक मार्ग नव्हे. अनेक ऋषींच्या दर्शनाचें सम्यक् फळ म्हणजे वेद होत. पूर्वसूरींचें चांगलें तेवढें घेऊन भविष्याकडे आशावादी होऊन मार्गक्रमण करणारा हा वैदिक मार्ग आहे. या विजिगीषु वृत्तीनें पुढें सरसावणाऱ्या मनोवृत्तीच्या या लोकांत, वाटेंत येईल ते विरोध पचवून पुढें पाऊल टाकण्याची युयुत्सुवृत्तिहि ठळकपणें दिसून येते. समाधिपूजेला, भूतपूजेला त्यांच्या विचारांत थारा नाहीं.

पण गुरुमार्गांत तर "गुरुपरतें अन्य दैवत नाहीं" हें दाखविण्याच्या उद्देशानेंच दत्ताचें अर्वाचीन चित्र पुढें आलेलें आहे. त्या प्रतिभाशाली चित्रकारानें निरनिराळ्या संकेतांनीं त्यांत संपूर्ण गुरुमहिमा वर्णिलेला आहे. हें चित्र म्हणजे जसें कांहीं गुरुचरित्राचें सारच आहे. भागवतादि पुराणांतून मुळांत दत्त हा विष्णूचाच अंश असें स्पष्ट असतां गुरु हाच विष्णु, गुरु हाच ब्रह्मा, गुरु हाच शिव एवढेंच काय गुरु म्हणजेच परब्रह्म वस्तु असें ध्वनित करण्याची त्या चित्रकाराची इच्छा त्यांतील प्रत्येक प्रतीकांतून पूर्णपणें व्यक्त होत आहे. दत्ताला दाखविलेलीं ब्रह्मा-विष्णु-महेश-सूचक तीन तोंडें; दत्तमूर्तीजवळच कृपा याचीत उभी असलेली पृथ्वीरूपी गाय, गुरूच्या तोंडून येईल तें वेदवचन हें सुचविण्याकरितां गुरूच्यामागें सावलीप्रमाणें (कुत्र्यासारखे) धांवणारे चार कुत्रे हे वेद, आणि केवल आत्मानंदाकरितां संसारबंधनांतून बाहेर पडलेला हा गुरु हें सुचविणारी त्याची भगवी कंथा, झोळी व कुबडी हे सर्व संकेत अर्थपूर्ण नाहींत असें कोण बरें म्हणेल ?

कालचक्रांत परस्परविरोधी विचारांच्या समन्वयाची आवश्यकता उत्पन्न होऊन परिस्थिति अनिवार्य झाल्यानें, वेद कुत्र्याप्रमाणें गुरूच्या मागें धांवतात असें दाखविणाऱ्या चित्राची, कट्टर सनातनी घरांतून पूजा होत असलेली आपण पाहात आहों ! अशाच प्रकारें समाधिपूजा (भूतपूजा) हीहि आमच्या डोक्यावर बसलेली आज आपणांस दिसत आहे.

धर्मसंप्रदायांची ही पूर्वपरंपरा, पार्श्वभूमि माहित नसल्यास आपल्या देशांतील ऐतिहासिक काळांतील निरनिराळ्या धर्मपंथांच्या उलाढालीचा सरळ

अर्थ करणें शक्य नाहीं. महाराष्ट्रांतील महानुभाव वगैरे धर्मपंथांचा आढावा घेण्यापूर्वी त्याहून आधीं झालेल्या कांहीं धार्मिक चळवळींचा इतिहास जमेस धरणें जरूर आहे. नवव्या-दहाव्या शतकाच्या सुमारास सबंध भरतखंडांत सिद्ध किंवा नाथ संप्रदायाचें फारच मोठें वर्चस्व होतें. महायान बौद्ध पंथ मागें पडून यांतून पुनः एक नवीन लाट निर्माण झाली. बौद्ध धर्माच्या शेवटच्या या अवस्थेंत तो जवळ जवळ हिंदु धर्माचें दुसरें स्वरूपच बनला; किंवा हिंदु धर्मानें बौद्ध धर्म पचविण्याकरितां कांहींसा कायापालट केला असें म्हटलें तरी चालेल. यामुळें सिद्ध किंवा नाथपंथ हा लोकांस परकीय वाटला नाहीं. मत्स्येंद्र-गोरख प्रणीत हा पंथ हिंदुस्थानभर पसरला होता. या पंथांत गुरूचें स्थान कांहीं और आहे. हिंदु देवदेवतांना त्या मतप्रणालींत कोठेंच थारा नाहीं. वर्णाश्रम धर्म किंवा जातिभेद ते मुळींच मानीत नाहींत. आत्मसाक्षात्कार हेंच जीवनांतील एकमेव साध्य आहे; संसार केवळ माया; आत्मसिद्धीस विरागी (बैरागी) होणें कर्तव्य आहे; अशी ही नाथ संप्रदायाच्या विचाराची दिशा आहे. आत्मदर्शनाकरितां योगसाधन करण्यास हा पंथ सांगतो. हठयोगाची देह-शुद्धीकरितां जरूरी आहे; पण हा हठयोगच कांहीं साध्य नव्हे. किंबहुना 'मनोलययोग' हेंच या पंथाचें सार आहे.

उत्तरकालीन बौद्धधर्माच्या पकडींतून बाहेर पडतां पडतां हिंदु धर्मास त्याचे कांहीं परिणाम भोगावे लागले. त्यांत कांहीं बरे तर कांहीं वाईट असणें साहजिक आहे. नाथ संप्रदायांत जातिबंधन नसल्यानें त्या पंथाचे योगी जगभर आपल्या योगमार्गाच्या प्रसारार्थ हिंडूं शकले. नाथ योग्यांनीं युरोपचा प्रवास सुद्धां केलेला आहे. या पंथानेंच तिबेटला भारतीय संस्कृति नेली. हिमालयांतील गुरखे गोरखनाथाचे शिष्य असें सांगितलें जातें. गोरखनाथाच्या कांहीं अंतेवासी शिष्यांनीं अफगाणिस्तान, खोरासान वगैरे प्रांतांतून आपल्या पंथास अनुयायी मिळविले होते. अफगाणिस्तानांत त्यांनीं आपले मठ स्थापून वतनें संपादन केलीं होतीं. यावरून नाथपंथांत मुसलमान शिष्यांचाहि समावेश झाला होता, हें निर्विवाद आहे. (Gorakhnath & Mediaeval Mysticism).

नाथ संप्रदायाच्या या अखिल भारतीय लाटेनें, आध्यात्मिक दृष्ट्या

जातिभेद नाहींसा होऊन एकजिनसी देश होण्याची शक्यता आपल्या भरत-खंडांत दिसूं लागली. बंगाल ते सिंध व काश्मीर ते रामेश्वरापर्यंत या संप्रदायानें आपला प्रभाव गाजवला. त्या बरोबर जातिभेदांतील तीव्रताहि कमी होऊन अध्यात्मसाधनांत सर्व–मानव–ऐक्य शक्य आहे हें या नाथ पंथानें दाखवून दिलें. नाथ पंथाच्या या प्रभावाचे पडसाद अकराव्या शतकाच्या पुढील काळीं हिंदुस्थानच्या प्रत्येक प्रांतांतून निनादित झालेले त्या त्या प्रांतांच्या धार्मिक चळवळींच्या इतिहासांत नमूद आहेत.

नाथ संप्रदायाकडून सर्व जाती मोडून एक जात करण्याचा प्रयत्न अभावितपणें झाला. तसेंच त्यांच्या धार्मिक आचरणावर तत्पूर्वी होऊन गेलेल्या पुष्कळ धर्मपंथांचे परिणामहि झालेले दिसतात. नाथगुरूंच्या यादींत आदिनाथ, पारसनाथ वगैरे कांहीं जैन परंपरेचीं नांवें आढळतात. "मलधारण व्रता" सारखे कांहीं जैनधर्मीय आचार बऱ्याच नाथयोग्यांच्या नित्य आचरणांत दिसून येतात. बौद्ध धर्माचा परिणाम तर याहूनहि विशेष आहे. मनोलय योग किंवा सहज योग–शून्यसंपादन हें या पंथाचें ध्येय असून नाथ-पंथानें ही साधना बौद्ध धर्मांपासून घेतलेली आहे. सिद्ध (नाथ) आज जरी शैव व वैष्णव आहेत तरी त्यांचा जास्तींत जास्त वारसा बौद्ध धर्माकडेच पोंचतो. तिबेटांत हा पंथ बौद्ध धर्माचीच शाखा असें समजलें जातें. पण त्यानें हिंदुस्था-नांत किंचित् निराळें स्वरूप धारण केलें, आणि हिंदुधर्मांत जागा पटकावली.

आपल्या देशांत नाथपंथांत कांहीं शैव तर कांहीं वैष्णव असे दोन प्रकार दृष्टीस पडतात. शिव किंवा विष्णूचे हे उपासक असें समजलें जात असलें तरी गुरूहून श्रेष्ठ अन्य दैवत नाहीं हीच त्या पंथांतील आत्यंतिक श्रद्धा आहे. मराठी नवनाथचरित्रांत मत्स्येंद्राला गुरुसाक्षात्कार झाला, असें लिहिलें आहे. हा गुरु कोण ? तो आत्रेय दत्त गुरुच असेल का याबद्दल शंका वाटते. कारण नाथपंथाची पूर्वपरंपरा बौद्ध धर्माशीं जाऊन भिडते.

अनसूयापुत्र आत्रेय दत्तापासून वैदिक मार्गांतर्गत गुरुपंथास आरंभ झाला असावा. या दत्ताच्या आईचें नांव "अनसूया" असें मोठें अर्थगर्भ आहे. जैन व बौद्ध परंपरा आपल्यांत पचवून वैदिक पंथास उचलून धरणारा हा गुरु दत्त असूयारहित अशा या आईच्या पोटींच जन्मला. अनसूयेचा हा पुत्र

गुरुकृपा 'दत्त' आहे, असें गुरुचरित्रांतील याच्या जन्मकथेवरून कळून येण्याजोगें आहे. आत्रेय दत्त–मार्ग हा नाथपंथाप्रमाणेंच सर्वसंग्राहक वृत्तीचा आहे. मुसलमानांत दत्तभक्त आढळतात. बाबा बुडणगिरी (म्हैसूर) हें दत्तक्षेत्र असून तेथील पुजारी मुसलमान आहे. यात्रेस हिंदु आणि मुसलमान दोघेहि जातात. आधुनिक काळांत दत्ताचे अवतार समजले गेलेले अक्कलकोटचे महाराज व निजाम राज्यांतील श्री माणिकप्रभु यांच्या अनुयायी वर्गांत मुसलमान शिष्य बरेच आहेत. हा गुरुमार्ग, अवधूत–निरंजन पंथ आहे. वैदिकांना अशा रीतीनें अवधूत–निरंजन, दिगंबर गुरुमार्गहि शेवटीं जवळ करावा लागलाच ! "करतलभिक्षा तरुतलवासः" अशा वृत्तीच्या निरंजन पंथीय दिगंबर यतींना जात कूळ वगैरे कोणतींहि बंधनें आडवीं येत नाहींत.

आत्रेय दत्त पंथापूर्वी एक निरंजन सिद्धपंथ रूढ होता. अनसूयेकडे भिक्षेकरितां येणारे यति या पंथाचेच होत. त्यांनीं अनसूयेकडे मागितलेल्या भिक्षेचा प्रकार हा शाक्त–सिद्ध पंथाचा आहे. गुरुमाहात्म्यांत दत्तगुरूच्या "विकृत्याचरणांचें" वर्णन आलें आहे. त्यावरून हा पंथहि मद्यादि पंच–मकार साधनेस प्रतिकूल दिसत नाहीं. पण आत्रेय दत्त पंथानें वैदिक परंपरेपासून फटकून दूर न जातां जवळ येण्याचें ध्येय ठेविल्यानें तो पुढें कालक्रमनों आत्यंतिक सोवळा बनलेला आज नरसोबावाडी, गाणगापूर वगैरे ठिकाणीं दृष्टीस पडेल.

नाथ पंथ व आत्रेय दत्तमार्ग यांचा अवलंब करून या संसारांतून लौकर मुक्त होण्याकरितां लाखों स्त्री पुरुष प्रांतोप्रांतांतून बाहेर पडले. सामाजिक बंधनांची आडकाठी त्यांना विशेष नसल्यानें आणि मुमुक्षु वृत्तीनें बाहेर पडलेली सर्व मंडळी सारख्याच उच्च दर्जाची असणें शक्य नसल्यानें या गुरुमार्गाला लौकरच अवनतीची कळा आली. मनोविजय मिळविलेला पाहाण्याकरितां "विकृत्याचरण" करण्याची चाल या मार्गांत एकेकाळीं सर्रास रूढ झालेली दिसते. स्त्रीसंगांत राहून निःसंग वृत्ति आपणांत भिनलेली सिद्ध करून दाखविणें; अपेयपान, अभक्ष्यभक्षणादि सिद्धगुरूंच्या आचारांकडे त्या गुरूंतील कांहीं शक्तिविशेषांना मान देऊन किंवा भिऊन दुर्लक्ष करण्याची संवय आपल्या लोकांच्या अंगीं भिनून गेलेली आहे. असें असतांहि कानफाटे हा शब्द निंद्य

वर्तनाचा द्योतक झाला. यावरून त्या काळीं या मार्गांत किती अनाचार माजला असावा याची सूचना मिळते.

गुरुमार्गाचे दक्षिणापथांतील विविध पर्याय

बाराव्या शतकाच्या मध्याला गुरुमार्गांतील शैव शाखेनें कांहींसें नवीन रूप धारण करण्यास आरंभ केला. त्याचेंच पर्यवसान पुढें वीरशैव धर्माच्या पुनरुत्थापनांत झालें. वीरशैव लिंगायत मतावर नाथ संप्रदायाचा प्रभाव बराच झालेला आहे. बाराव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेलेल्या बसवादि प्रथम गणांचा गुरु अल्लमप्रभु हे नाथ पंथांतील एक योगी होते, असें हठयोग प्रदीपिकेंत नमूद केलेल्या गुरुपरंपरेच्या नांवांतील उल्लेखांवरून कळून येतें. हा अल्लमच निराळा असें कांहीं वीरशैवांचें मत होतें. पण अल्लमप्रभूंच्या चरित्रावरील प्रभुलिंग लीले" या कानडी काव्यग्रंथास समकालीन असा चौदाव्या शतकांतील "नवनाथचरित्रमु" नांवाचा एक तेलगू ग्रंथ उपलब्ध झाला आहे. तो मद्रास विश्वविद्यालयाकडून छापून प्रसिद्धहि झाला आहे. त्या तेलगू ग्रंथांतील शैव नवनाथांच्या यादींत मत्स्येंद्र–गोरखांच्या बरोबर कांहीं नांवांनंतर पुढें अल्लमांचें नांवहि येतें. आणि त्या ग्रंथांत वर्णिलेलें अल्लमाचें चरित्र कानडींत 'प्रभुलिंगलीलें' त आलेल्या चरित्राहून कांहीं निराळें नाहीं. यावरून लिंगायत मतोद्धारक अल्लम प्रभु हे पूर्वी नाथ संप्रदायांतील एक योगी होते हें निश्चित होतें.

वीरशैवांच्या साधनेचें परमध्येय "शून्य–संपादन" हें असल्याचें समजतें. शून्यसंपादन हा मनोलय योगाचाच एक पर्याय आहे. शून्याची परिभाषा बौद्ध धर्मांत व नाथ संप्रदायांत आहे. "निजलिंग न्याहाळितां" तत्स्वरूप होऊन परमसिद्धि मिळते असा श्री गोरखाचा उपदेश आहे. तोच उपदेश आणखी विविध रीतींनीं व अर्थगर्भित सूत्रांनीं (कानडींत ज्यांना 'वचन' (Aphorisms) म्हणतात) श्री अल्लमप्रभूंनीं लिंगायतांना केलेला आहे. लिंगायत वीरशैवांनीं "षट्स्थल" पद्धतीची नवीन भर साधन–मार्गांत घातली.

"निःशब्दं ब्रह्म उच्यते" असें श्री प्रभूंचें वचन आहे. त्यांनीं दगडाच्या व धातूच्या मूर्तिपूजेवर आणि निरर्थक तीर्थयात्रांवर कठोर टीका केलेली आहे.

जीव, आत्मा व परमात्मा (किंवा महान् आत्मा) यांतील शेवटच्या पदावर आरूढ झालेल्यांना माहेश्वरसिद्धि मिळाली असें मानण्यांत येतें. महान् आत्म्याच्या अनुसंधानांत विहरण करणाऱ्यांना महात्मा असें म्हणण्याची रूढि असल्याचें प्रभुलिंगलीलेंतील वर्णनावरून कळतें. या अशा महात्म्यांनाच वीरशैव पंथांत आदर्श म्हणून गणलें जातें. ईश्वरार्पण बुद्धीनें सर्वसमर्पण योग आचरणाऱ्यांना "शिवशरण" असें नांव आहे. शिवशरणांनीं लिंग धारण करावयाचें असतें. शिवशरण हे मुक्तजीवी असल्यानें पंचसूतकांचीं बंधनें त्यांना लागू नाहींत. वर्णाश्रमधर्मांतील जातीचें सूतक, जन्माचें सूतक (सुवेर), मरणाचें सूतक, विटाळशीचें (मासिक) सूतक असले शिवाशिवीचे प्रकार वीरशैव पाळीत नाहींत. वीरशैव धर्माला, या पंथाचे अभिमानी अभ्यासु श्री. सिद्धरामप्पा पावटे यांनीं "अतिवर्णषडाश्रम" असें दुसरें एक नांव सुचविलें आहे. आहे. रुद्रालाच सर्वश्रेष्ठ ठरविणाऱ्या श्वेताश्वेतरांत "अत्याश्रमा"चें नांव येतें. अत्याश्रमी म्हणजे तीन आश्रमांपलीकडचा–यति, संन्यासी. या पंथाला यतिपंथ असें म्हणणेंहि योग्य होणार आहे. जंगम (यति) गुरूंचें स्थान या पंथांत अद्वितीय आहे. "जंगमो जगदीश्वरः" अशा आत्यंतिक श्रद्धेनें या गुरूंशीं प्रत्येक वीरशैव लिंगायतानें वागलें पाहिजे असा दंडक आहे. गुरुपुत्र, गुरुपाद, मरी (पिल्लू किंवा पुत्र) अशा प्रकारचीं वीरशैवांतील नांवें त्यांच्या गुरुभक्तीचीं सूचक आहेत. गुरुपादोदक-प्रसाद स्वीकारण्यांत प्रत्येक भक्त धन्यता मानतो. संपूर्ण शिवव्रत घेतलेल्या भक्तानें जंगम गुरूंना आपलें धनकनकादि सर्वस्व अर्पून आपल्या जन्माचें सार्थक करून घ्यावयाचें असतें. श्री बसवांनीं या प्रकारचें व्रत आचरल्यानें ते गुरुपरीक्षेच्या दिव्यांतून यशस्वी रीतीनें बाहेर पडल्याचें बसवचरित्रांत वर्णिलेलें आहे.

शिवशरणांनीं यावज्जीव "सर्वजीवस्नेहभावानें" जीवनयात्रा करणें हें या शिवानुभव मार्गाचें एक लक्षण आहे. श्री अल्लमप्रभूंची इष्टदेवता "गुहेश्वर" किंवा "गुहेश्वरालिंग" असें त्यांच्या प्रत्येक वचनांतील शेवटच्या मुद्रिकेवरून कळतें. गुहेश्वर हा शब्द श्री अल्लमांनीं मोठा मार्मिक आणि अर्थपूर्ण असा योजिलेला आहे. नाशवंत स्थावर (शिव) लिंगाची पूजा करूं नये अशी शिवशरणांना आज्ञा आहे. चैतन्यमय जंगमलिंगाची–ज्योतिर्लिंगाचीच

उपासना त्यांनीं करावयाची असते. प्रत्येक व्यक्तीच्या हृदयगुहेंत अंतर्हित असलेली ही चैतन्यमूर्ति, हिच्या मनननिदिध्यासांत आसक्त असणें, मग्न होण्याची साधना अविरतपणें चालूं ठेवणें हें प्रत्येक शिवशरणाचें कर्तव्य आहे. अशाप्रकारच्या आत्मानुसंधानांत असणाऱ्या साधकांना समाजांत फार मोठा मान आहे. गुरु केल्यावांचून आत्मसिद्धि नाहीं अशी या पंथाची श्रद्धा आहे. गुरुवर्गाला किंवा आत्मज्ञान्यांना "शिवा" असें संबोधण्याची चाल आहे. ऋग्वेदांतील "शिवाः" नांवाचे जन आर्येतर असल्याचें तज्ज्ञांना आढळून आलें आहे. गुरुवर्गाला किंवा आत्मज्ञान्यांना "शिवा" म्हणण्याची वीरशैवांतील ही चाल फार जुनी असावी यांत शंका नाहीं. ऋग्वेदांतील "शिवाः" हा शिवभक्त जंगम (परिव्राजक) वर्गच नसेल ना? ही विचार करण्याजोगी गोष्ट आहे.

वीरशैवांचे "त्रेसष्ट पुरातन" गुरु आहेत अशी एक परंपरा तमिळ देशांतसुद्धां प्रसिद्ध आहे. पण वैदिक काळापासूनच्या त्या गुरूंची नांवनिशीवार परंपरा विसरली गेली असली तरी या 'पुरातनांची' पूजा या पंथांत न चुकतां चालते. "गणाराधना" हें यांचें वैशिष्ट्य आहे. "गण" शब्द संस्कृतेतर (द्रविड) भाषेंतील आहे असें डॉ. सुनीतिकुमार चतर्जींचें मत आहे. जंगम 'गणंगळूं' ची सामूहिक पूजा वीरशैवांत आजहि आहे. हे शिव "गण" कोण असावेत हें ऋग्वेदांतील एका ऋचेवरून चांगलें लक्षांत येण्याजोगें आहे. शिवाचें वर्णन करतेवेळीं "त्रिषष्ठीः त्वा मरुतः" या मंत्रांत शिवाच्या त्रेसष्ट मरुद्गणांचा उल्लेख येतो. परिव्राजक (=जंगम) पंथाचा उल्लेख छांदोग्योपनिषदाइतका जुना आहे. याज्ञवल्क्य शेवटीं परिव्राजक झाल्याचें कळतें. अशी ही शैव "वीरां" ची परंपरा पुरातन असल्याचे धागेदोरे आपणांस आजहि आढळतात.

शिवशरण बनून आत्मोद्धार करण्यास स्त्रियांनाहि मुक्तद्वार आहे. याज्ञवल्क्यांनीं मैत्रेयीला दिलेलें आत्मज्ञान येथें चिंत्य आहे. श्री अल्लमांच्या अनुयायी वर्गांत महदांबिका (महादेवि अक्का) म्हणून एक श्रेष्ठ शिष्या होऊन गेली. कल्याण शहरीं असलेल्या श्री अल्लमप्रभु व श्री बसवराज यांचेकडे अनुभवसिद्धि मिळविण्याकरितां संसारांतून उठून अत्यंत आर्त मुमुक्षु

भावानें हिनें धांव घेतली; तिला त्या आर्त स्थितींत अंगावरील वस्त्राचीहि शुद्ध नव्हती. दिगंबर वेषांतच श्री प्रभूंकडे ती आली, अशीं वर्णनें आढळतात. श्री अल्लमांनीं तिच्यावर उपरोधी टीका करून आल्या रीतीची जाणीव दिली; तिच्याशीं चर्चा करून ती आपल्या परीक्षेंत उतरल्यानंतर तिला गुरूपदेश दिला आणि भावसमाधि प्राप्त करून दिली. श्री अल्लमप्रभूंना केवळ कार्यसिद्धि किंवा अणिमादि अल्पसिद्धींच्या मागें लागलेल्या लोकांविषयीं अत्यंत तिटकारा असे. त्यांनीं आपल्या प्रवासांत असल्या लोकांची चांगलीच कानउघाडणी केली व अनेकांना सन्मार्गास लावलें. महदांबा, नागांबा, मुक्ताईसारख्या योगिनी शिष्या व श्री बसव, चन्नबसवादींच्यासारखे अनुभावी शिष्य यांच्या 'साहाय्यानें अल्लमप्रभूंनीं त्यावेळीं मोठीच धर्मक्रान्ति घडवून आणिली. या कार्यांत श्री बसवण्णा यांचा भागहि फार मोठा आहे.

त्यावेळच्या समाजाला या क्रान्तीचा अर्थ कळला नाहीं. शिवचरणांच्या प्रेरणेनें होऊं घातलेला जातिभेदाचा उच्छेद वर्णाश्रमीयांना बिलकूल खपला नाहीं. श्री अल्लम–बसवांच्या उपदेशानें ब्राह्मणांच्या मुलींचा अस्पृश्य मुलांशीं राजरोस विवाह होण्यापर्यंत मजल गेली. त्यामुळें समाजांत फार जोराची खळबळ उडून अराजकतेनें डोकें वर उचललें. राज्यक्रांतिहि घडून आली. श्री बसवादि कांहींनीं जलसमाधि घेतली व श्री अल्लमप्रभू, महदांबा, वगैरेंनीं श्रीशैल येथें "कदळीबनीं" प्रवेश केला.

महानुभाव संप्रदाय

वीरशैव चळवळीनंतर (इ. स. ११६०) सुमारें ६०–७० वर्षांनीं महानुभाव पंथ उदयास आला. पहिल्या चळवळीचें उगमस्थान कल्याण तर दुसऱ्या चळवळीचें ऋद्धिपूर. कल्याण–चालुक्यांच्या अस्तमानानंतर नुकतीच राजाची गादी बळकावून स्वतःची राजवट स्थापन करणाऱ्या महादंडनायक बिज्जळाच्या कारकीर्दीत पहिली चळवळ उदयास आली. त्या काळीं राजधानी कल्याण हें दक्षिणापथांतील अत्यंत महत्त्वाचें राजकीय आणि सांस्कृतिक केंद्र बनलें होतें. त्याच्या तुलनेनें, ऋद्धिपुराचें महत्त्व कांहींच नाहीं. श्री गोविंद प्रभूंच्या वास्तव्यानेंच महत्त्व पावलेलें ऋद्धिपुर हें वऱ्हाडांतील एक सामान्य गांव आहे. श्री. चक्रधरांच्या पंथास देवगिरी यादवांकडून शेवटीं कांहींशी मान्यता

मिळाली. महानुभाव पंथ, प्रा. कोल्ते म्हणतात त्याप्रमाणें, अस्सल महाराष्ट्राच्या गाभ्यांत, वऱ्हाडांत उगम पावला.

वीरशैवपंथ, तत्पूर्वकालीन सिद्ध, शाक्त, व काळामुख वगैरे पंथांना आपल्यामध्यें सामावून घेऊन विस्तार पावला. या पंथाच्या उपदेशानें, लोकांत त्या वेळच्या शैवाचारांतील, वाममार्गी शाक्त पंथांतील अनाचार नाहींसे झाले; मद्य–मांसापासून लोकांना परावृत्त करून बहुजनसमाजाच्या राहाणीची पातळी उंच केली. कानडी भाषेंतच या धर्म–प्रचारकांनीं आपले ग्रंथ लिहून भाषेंत नवीन प्रकारचें साहित्य निर्माण केलें. साहित्याचे कांहीं नवे प्रकारहि पुढें आले. पण ब्राह्मण भिक्षुक आणि या नव्या चळवळीच्या अग्रभागीं असलेले जंगम (वीरशैव भिक्षुक) यांच्या, समाजांतील अनुयायी वर्ग आपल्याकडे खेंचून आपलें वर्चस्व राखण्याच्या स्पर्धेमुळें या चळवळीच्या पार्श्वभूमींत कांहींसें जातिद्वेषाचें बीज पेरलें गेलें. नवमतस्थापनेच्या उत्साहाच्या आवेशांत उत्पन्न होणाऱ्या कडवेपणाचें आरंभींचें बाळकडू वीरशैव धर्माच्या अनुयायी वर्गांत अजूनहि आपला प्रभाव दाखवीत आहे.

महानुभाव पंथाच्या प्रसाराकरितां खटपट करतांना श्री. चक्रधरांनीं आपल्या आधीं थोड्याच वर्षांपूर्वी झालेल्या वीरशैव चळवळीपासून कांहींच धडे घेतले नसतील हें शक्य नाहीं. आधींच्या मतप्रचारकांकडून झालेल्या चुका आपल्याकडून न व्हाव्यात यासाठीं बरीच दक्षता चक्रधरांनीं बाळगली असें म्हणावेसें वाटतें. कारण जातिभेदनिर्मूलनांत वीरशैवांनीं दाखविला तितका उत्साह, आवेश चक्रधरांत दिसत नाहीं. चक्रधरांनाहि वर्णाश्रमांतील वैषम्य, जातिभेद मान्य नव्हते. तरीपण त्यांचीं पाळेंमुळें उखडून टाकण्याकरितां त्यांनीं चंग बांधलेला दिसत नाहीं. वर्णाश्रमांत राहाणाऱ्यांनाहि त्यांनीं आपल्या अनुयायी वर्गांत अवकाश करून दिला. स्त्रियांनीं मासिक विटाळ पाळूं नये असें लिंगायतांप्रमाणें श्री चक्रधरांनाहि वाटत होतें; पण पाळूंच नये असा त्यांनीं दंडक घातलेला दिसत नाहीं.

महानुभाव पंथांतील कांहीं पारिभाषिक शब्द आधीं वीरशैवांनीं वापरलेले आहेत. महात्मा, अनुभाव, स्थळ, वचन, दासोऽहम् अशा प्रकारचीं कांहीं उदाहरणें सांगतां येतील. श्री चक्रधरांनाहि श्री अल्लमांप्रमाणें मूर्तिपूजा

मान्य नव्हती. " दैवते पाटी भरूनि अवघी पाणियांत घातली । मग तयासि बोधू झाला ॥" अशी चक्रधरांची एक लीळा वर्णिली आहे (उत्तरार्ध पान ६). याप्रमाणें दोघांत कांहीं साम्य असलें तरी दोघांच्या तत्त्वज्ञानांत पुष्कळच फरक आहे.

महानुभाव पंथावर बाद्ध व जैन मतांचा प्रभाव बराच झालेला आहे. त्यांतूनहि बौद्ध धर्मापेक्षां जैन धर्माची छाया नाथ संप्रदायावर विशेष आहे. ही गोष्ट, तज्ज्ञांच्या संमतीकरितां, मी नवभारताच्या पूर्वी उल्लेखिलेल्या अंकांत प्रथम थोडक्यांत पुढें मांडली (सप्टेंबर अंक १९४९) डॉ. पेंडसे यांनीं "महाराष्ट्र संस्कृती" वर लिहिलेल्या आपल्या ग्रंथांत (प्रथम आवृत्ति) महानुभावांवर बौद्ध धर्माची छाया आहे असें आपलें मत व्यक्त केलें आहे. पण प्रा. सरदार यांनीं सह्याद्रि मासिकांत या विषयावर सुंदर विस्तृत लेख लिहून महानुभाव पंथ जैन धर्माचा किती ऋणी आहे हें निदर्शनास आणून दिलें आहे (सह्याद्रि १९५०).

श्री. चक्रधरांनीं उपदेशिलेली अहिंसा जागोजागीं जैनांच्या विचाराची आठवण करून देते. पारध्याकडून सशास जीवदान देवविणें; विंचू, साप अशा प्राण्यांनाहि न मारतां दूर सोडून देणें; अशा लीला श्री चक्रधरांच्या चरित्रांत वर्णिलेल्या आहेत. कोणाचाहि आत्मा तळतळूं न देण्याबद्दल श्री चक्रधर किती दक्षता बाळगीत हें सुप्रसिद्ध आहे. पण याहूनहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे "पचन–पाचनांतहि" हिंसा न व्हावी असें श्री चक्रधरांचें मत होतें. जोग्यांनीं लीसपूस करूं नये, घाणीनें लिडबिडलेलें असावें अशी त्यांची आज्ञा होती. याप्रकारच्या मलधारण विधींत दोन उद्देश आहेत. एक म्हणजे लीसपूस करण्यानें कामुकता वाढेल, भोगेच्छा वाढेल अशी भीति; आणि दुसरा, अंगावरील घाणीच्या साफसुफीमध्येंहि, जशी पचन–पाचनांत हिंसा होते तशी सूक्ष्म जंतूंची हिंसा घडेल अशी शंका. महानुभाव पंथ द्वैत मताचा आहे. जीव–परमात्मैक्य त्यांना मान्य नाहीं. देवदेवतांमध्यें तारतम्याच्या पुष्कळ पायऱ्या केल्या जातात. याचें माध्व (वैष्णव) मतांतील तारतम्यांशीं बरेंच साम्य आहे. ज्या अर्थानें शांकर मताला प्रच्छन्न बौद्ध म्हणतां येईल, त्याच अर्थानें माध्व मताला प्रच्छन्न जैन म्हणणें योग्य होईल. माध्व (वैष्णव) मताचे प्रवर्तक

श्री मध्वाचार्य हे श्री चक्रधरांनंतरचे आहेत. दोघांत एका पिढीचें तरी अंतर आहे. श्री मध्वाचार्यांचा जन्म १२२० किंवा १२५० इसवीच्या सुमारास झाल्याचें कळतें. यावरून श्री चक्रधर निःसंशयपणें आधींचे ठरतात. यामुळें द्वैतमताचे आद्य प्रवर्तक श्री चक्रधरच ठरतात. माध्व संप्रदायी मंडळींत विशेष प्रचारांत असलेलें "आचार्य" हें उपपद हयग्रीवाचार्य, नागणाचार्य वगैरे महानुभावांनीं आधीं रूढ केलेलें आहे. महानुभावांच्या तत्त्वज्ञानांत व माध्व मतांत बरेंच साम्य आहे. माध्वांची विचार-प्रणाली जैन विचारसरणीला जवळची आहे, तर महानुभावांची आचारपद्धति जैनांप्रमाणें आहे. द्वैतमतप्रवर्तक हे दोघेहि महापुरुष, जैनमताचा विशेष प्रभाव असलेल्या प्रदेशांतच जन्मले. गुजरात ही चक्रधरांची जन्मभूमि तर कर्णाटक (उडुपी) हें मध्वाचार्यांचें जन्मस्थळ.

श्री चक्रधरांना "नग्नदेव", "जिनवीर", "गोमटदेव", वगैरे पर्याय नांवें होतीं असें त्यांच्या चरित्रकारांनीं लिहिलें आहे. गोमट हें नांव श्रवणबेळगोळ (म्हैसूर) च्या भव्य जैन तीर्थंकर मूर्तीचें आहे, हें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. महानुभावांनीं जैनांपासून अहिंसा तत्त्व स्वीकारलें व दया–धर्मावर जोर दिला. माध्वांनीं यज्ञांतील हिंसा सोडून दिली व पिष्ट पशूचा बली देण्याची प्रथा रूढ केली.

जैन धर्माप्रमाणें महानुभाव संप्रदायावर नाथ पंथाचा परिणामहि विशेष झालेला आहे. दक्षिणापथांतील नाथ संप्रदायाचें कालमानाप्रमाणें बदललेलें हें एक नवें रूपच होय, असें म्हणणें कांहीं फारसें बरोबर नाहीं. वीरशैव पंथानें नाथ संप्रदायांतील शैव परंपरा थोड्याफार फरकानें पुढें चालविली, तशी महानुभावांनीं त्यांतील वैष्णव परंपरा उचललेली दिसते. नाथ संप्रदायाच्या पायथ्याशींच महानुभाव संप्रदायाचा उगम झालेला आहे. लीळाचरित्राचे संपादक श्री नेने यांच्या लक्षांत ही गोष्ट आली नसावी, असें नाहीं; पण, त्यांच्या त्याच ग्रंथाच्या प्रस्तावनेवरून, त्यांनीं तसें स्पष्टपणें कबूल करण्याचें टाळल्यासारखें वाटतें. महानुभाव संप्रदायांतील पुष्कळ चालीरीति नाथ संप्रदायांतील चालीरीतींशीं जुळतात; दोघांनाहि वर्णाश्रमधर्म मान्य नाहीं. शिवाशीव व विटाळाचा विधिनिषेध नाहीं. स्त्री–विषयक खंती दोघांतहि तितकीच आहे. 'चित्रींचीहि स्त्री न देखावी' अशी चक्रधरांची आज्ञा आहे. तरी पण नाथ योग्यांना

योगिनी शिष्या असत! महानुभावांत श्री चक्रधरांच्या परिवारांतच बऱ्याच स्त्रियांचा घोळका होता हें लीळाचरित्रावरून दिसून येतें. या दोन्ही पंथांचा आदर्श परिव्राजक वृत्तीचा संन्यास धर्म हाच आहे. श्री चक्रधरांनीं आपल्या संन्यासी शिष्यांना "जोगी" म्हटलें आहे. उदा : 'जोग्यांनीं लिसपूस करूं नये.'

वैदिक संप्रदायी लोकांनीं लिहिलेल्या नवनाथभक्तिसार वगैरे ग्रंथांतून मत्स्येंद्रगोरखादींना श्रीगुरुदत्तकृपा झाल्याचीं वर्णनें आहेत. महानुभावांचें दैवतहि श्री दत्तच आहे. श्री चांगदेव राऊळ द्वारावतीकर यांना श्री दत्तांनींच व्याघ्ररूपानें दर्शन देऊन सिद्धि दिली, असें सांगितलें जातें. श्री चांगदेव हे योगी होते. 'राऊळ', 'गोसावी' ही पदवी नाथ संप्रदायी योग्यांच्या नांवापुढें आढळते. महानुभावांचे आदिगुरु असें मानलेल्या श्री गुंडम प्रभूंना श्रीदत्तप्रासादिक श्री चांगदेव राऊळांकडूनच दीक्षा मिळालेली आहे. श्री चक्रधरांच्या देहांत श्री चांगदेव राऊळांनींच (परकाया) प्रवेश केला अशी एक कथा आहे. ही कथा भाकड कथा म्हणून समजली तरी श्री चक्रधरांना श्री गुंडम प्रभूंकडून "शक्ति प्राप्त झाली" याबद्दल वाद नाहीं. या सर्व हकिगतीवरून महानुभावांची गुरुपरंपरा श्री अवधूत निरंजन दत्तापासूनच सुरू होते हें कुणालाच अमान्य करणें शक्य नाहीं.

श्री चक्रधरांना नाथ संप्रदायाच्या उधळीनाथ योग्याकडून "शिल्प विद्या" प्राप्त झाली असें लीला चरित्रांत वर्णन आहे. हा उधळीनाथ योगी 'नाथ' संप्रदायांतील आहे. चक्रधरांनीं श्रीपर्वतांवर बारा वर्षें तपश्चर्या केली असें त्यांच्या चरित्रावरून कळतें. श्रीपर्वत हें मल्लिनाथ(ज्योतिर्लिंग)चें सुप्रसिद्ध क्षेत्र आहे आणि हें नाथ–सिद्ध पंथांतील योग्यांचें फार मोठें केंद्र समजलें जातें. तेलगु भाषेंतील 'नवनाथचरित्रमु' हा ग्रंथ त्या परंपरेंतील श्रीशैलामधील एका योग्याच्या आदेशावरूनच लिहिला गेला आहे. सिद्ध–योगी, गुहाप्रवेशा-(देह विसर्जना) करितां श्रीशैलाकडे धांव घेत असत. श्रीगुरुचरित्रांत नृसिंह सरस्वतींनीं श्रीशैल पर्वतावर जाऊन "कदळीबनीं" प्रवेश केला असें वर्णन आलें आहे. त्यापूर्वी १००–१५० वर्षें अल्लमप्रभूंनींहि श्रीशैलावरच "कदळी बनीं" प्रवेश केल्याचा उल्लेख मागें आला आहे. 'गुरुदत्त' मार्गांतील सिद्धांचा

श्रीशैल पर्वताशीं असा हा घनिष्ठ संबंध आहे. क्रिस्ताब्दापूर्वीपासूनच सुविख्यात असलेलें नागार्जुन कोंडा हें ठिकाण श्रीशैल पर्वताच्या परिसरांतच आहे. नागार्जुन हा बौद्ध धर्मांतील एक नांवाजलेला महायोगी, सिद्धपुरुष होता. मंजुश्री मूलकल्प नांवाच्या बौद्ध ग्रंथांत श्रीशैलाचा उल्लेख येतो. त्या काळीं श्रीशैल बौद्धभिक्षूंचें मोठें केंद्र असणें शक्य आहे. आणि तीच परंपरा पुढील सिद्ध गोसाव्यांनींहि चालविली असें दिसतें. श्री चक्रधरांच्या परिवारांत नाथोबांसारखे योगसाधक होते. स्वतः चक्रधरांची राहाणी व करणी नाथ संप्रदायी योग्याहून फारशी निराळी नव्हती हें लीळाचरित्रावरून दिसून येण्याजोगें आहे.

श्री चक्रधरांच्या गुरूंचें नांव गुंडम प्रभू किंवा गुंडम राऊळ असें होतें. "नाथ"या शब्दाऐवजीं अल्लमांनीं आपल्या नांवापुढें प्रभु असें लावलें. तो प्रभु शब्द गुंडमांनीं स्वीकारलेला दिसतो. गोस्वामी (गोसावी) म्हणजे इंद्रियांवर प्रभुत्व मिळविलेला असा अर्थ या ठिकाणीं होतो. 'नाथ' हा 'गोसावी' याचाच प्रतिशब्द आहे. नाथ म्हणजे स्वयंनाथ. स्वयं हा आधींचा शब्द रूढ बोलींत लुप्त होऊन नाथ एवढेंच व्यवहारांत राहिलें. नाथ शब्दहि मागें पडून त्याच अर्थीं प्रभु शब्द वापरांत आला. नंतर देव किंवा ईश्वर शब्द प्रचारांत आला. ज्ञानदेव किंवा ज्ञानेश्वर हें याचें उदाहरण आहे. गुरुमार्गांतील नवनव्या प्रकरणांचा आरंभ सुचविणारे हे शब्द ऐतिहासिक दृष्ट्या आपल्या संस्कृतीचें आकलन करण्यास महत्त्वाचे साहाय्यक आहेत.

गुंडम राऊळ या नांवावरून आपणांस कांहीं गोष्टी कळण्याजोग्या आहेत. गुंडू, गुंडप्पा, गुंडेराव अशा तऱ्हेचीं नांवें कर्णाटकांतच आजहि विशेष रूढ आहेत. गुंड म्हणजे (वाटोळा) दगड. मुलांचा अपमृत्यु टळून कशीं तरी तीं जगोत या उद्देशानें, मुलें न जगणाऱ्यांच्या घरीं अशीं नांवें ठेवण्याचा कर्णाटकांत प्रघात आहे. गुंडम राउळांना गुंड हें नांव ठेवण्यास त्यांच्या घरांत असेंच कांहीं कारण असावें असें वाटतें. गुंडमांतील अम हा शब्द विचारणीय आहे. राव, पंत वगैरेंप्रमाणें हा एक सन्मानार्थी शब्द आहे. अम्म, अण्ण, अप्प, अक्क वगैरे शब्द अंकित नांवापुढें लावून संबोधण्याचा प्रघात एके काळीं विशेष होता. नवव्या-दहाव्या शतकांतील कानडी काव्यांत अम्म हा शब्द आर्य किंवा तात अशा अर्थानें वापरलेला आहे. शिलालेखांतूनहि

अशीं नांवें आढळतात. आधीं पुं-स्त्रीलिंगी असलेला अम्म शब्द अर्वाचीन काळीं त्यांतील अर्थ संकुचित होऊन केवळ स्त्रीलिंगी बनला आहे. अल्लम (इ. स. ११६०) यांतील सन्मानार्थी अम शब्द गुंडम (इ. स. १२५०) या नांवांतहि आढळतो. अल्लमप्रभु आणि गुंडमप्रभु या दोन्हींतील साद्दश्य महत्त्वाचें आहे.

अवधूतू गुंडम राउळ, शबरी मनु अजगिरी
जिराब्राई खेचरी, देमादेवी ॥ तत्त्वसार-८७७

वरील श्लोकांत दिलेल्या अवधूत पंथांतील योग्यांच्या आणि योगिनींच्या यादींत श्री गुंडम प्रभूंचें नांव आलेलें आहे. यावरून महानुभाव संप्रदायाचा उगम नाथपंथांतून झाल्याबद्दल शंका रहात नाहीं. "तथापि गुंडम राउळ उर्फ गोविंदप्रभू हे नाथपंथीय म्हणून त्यावेळीं व त्यानंतरहि कधीं प्रसिद्ध नव्हते" असा प्रा. कोलते यांनीं आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. पण दुसरी कोणी "गुंडम राऊळ" अशी व्यक्ति महानुभाव पंथाबाहेर त्या काळीं असलेली अद्यापि निदर्शनास आलेली नाहीं. श्री गुंडमप्रभु तर नाथयोग्याप्रमाणें "बालवत्, पिशाचवत्" आचरण करीत असत. अशा प्रकारचें आचरण योग-साधनांतील एका विशिष्ट अवस्थेचें आहे. अशा योग्याकडूनच चक्रधरांनीं दीक्षा मिळविली आहे आणि मत्स्येंद्र-गोरखादिकांची परंपरा ज्या गुरुदत्ता-पासून सुरू झाली असें नवनाथभक्तिसारांत वर्णिलें आहे, तो श्रीदत्तच गुंडमांचा परम गुरु होय. यामुळें नाथसंप्रदाय व महानुभाव संप्रदाय ह्या एकाच मुळीच्या दोन शाखा आहेत किंवा महानुभाव संप्रदाय हा नाथ पंथाचाच आणखी एक पर्याय होय असें म्हणणें भाग आहे.

श्री चक्रधर हे "गुरुदत्त मार्गा" तील एका नव्या प्रकरणाचे निर्माते होते असें म्हणणें अधिक योग्य होईल. यांजपासून "गुरुदत्त-मार्ग" पुढें चालूं राहिला तरी कांहीं नवीन प्रथाहि त्यांनीं आरंभिल्या. "पंचकृष्ण" हें आराध्य दैवत मानलें. या पंथाचें दत्त हें मूळ कुलदैवत असलें तरी, चक्रधरांनीं श्रीकृष्ण हें आपलें इष्ट दैवत पुढीलांचें कुल-दैवत केलें. सूक्ष्मपणें पाहिल्यास श्रीकृष्णाचा संबंध नंतरचा आहे, हें कळण्याजोगें आहे. चांगदेवांना श्रीदत्तापासून सिद्धि मिळाली; पण ते द्वारावतींत

राहिले व त्यांनीं "चक्रपाणि" असें नांव स्वीकारलें. चांगदेवांचे शिष्य अवधूत, निरंजन, अवलिया वृत्तीचे गुंडम राऊळ; यांना "गोविंद" असें दुसरें एक नांव असलेलें प्रसिद्ध आहे. पण त्यांचें मूळ नांव 'गुंड्र'; त्याचें संस्कृतीकरण होऊन गोविंद झालें. त्यांचे शिष्य "चक्रधर"; हे त्या पंथाचे खरे पुरस्कर्ते झाले. पण चक्रधरांची तपश्चर्या श्रीशैलास; सिद्धि मिळाल्या त्या श्रीदत्त प्रासादिकाकडून ! यामुळें श्रीकृष्णाचा संबंध या पंथाशीं नांवापुरता येतो, असेंच म्हणणें भाग नाहीं काय ? सर्व महानुभावांचे आचार व विचार अवधूत निरंजन पद्धतीस अनुसरून होते व आहेत. योग–भोगाच्या समन्वयाचा धडा घालून देणारा आणि निष्काम कर्मयोगाचा उपदेश करणारा द्वारकाधीश श्रीकृष्ण हा त्यांचा कित्ता होता असें म्हणण्यापेक्षां, सर्व–संग–परित्यागी केवळ विरक्तपंथी श्रीदत्त हाच यांचा आदर्श होता असें म्हणणें समंजसपणाचें होणार नाहीं काय ?

विट्ठल संप्रदाय

विट्ठल वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक ज्ञानेश्वर. त्यांना त्यांचे वडील बंधु निवृत्तिनाथ यांचेकडून दीक्षा मिळाली. त्यांची गुरुपरंपरा मत्स्येंद्र-गोरखापर्यंत जाऊन भिडते. श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं स्पष्ट शब्दांत आपली गुरु–परंपरा उघडपणें सांगून टाकल्यामुळें, वारकरी संप्रदायाचा उगम नाथ पंथापासूनच झाला हें वीरशैव व महानुभावांच्या उगमाप्रमाणें निराळे आधार देऊन स्पष्ट करण्याची जरूरी राहात नाहीं; वरील तीन्ही पंथ नाथ संप्रदायाचे दक्षिणापथांतील पडसादच होते. महानुभावानंतर सुमारें एक–दोन पिढ्यांच्या अंतरानें श्री ज्ञानेश्वरांच्या लोकोत्तर कार्यास आरंभ होतो. श्री ज्ञानेश्वरांनीं आरंभिलेल्या वारकरी पंथाची पूर्वपीठिका नाथ संप्रदायाच्या विचार–प्रणालीवरच आधारलेली आहे हें कोणासहि नाकबूल करणें शक्य नाहीं. नाथ संप्रदायांत वर्णाश्रम धर्माला जागा नाहीं हें या पूर्वी स्पष्ट केलेंच आहे. आणि अशा या वर्णाश्रम न मानणाऱ्या नाथ संप्रदायापासून गुरुदीक्षा मिळालेल्या वारकरी पंथास, वर्णाश्रमाभिमान्यांनीं वैदिक पंथाचाच पर्याय म्हणणें धाडसाचें होणार नाहीं काय ? पण हें धाडस श्री सोनोपंत दांडेकरांसारख्या विद्वान संताकडूनहि व्हावें याचें आश्चर्य वाटतें !

महाराष्ट्र ज्ञानकोशांतील आपल्या लेखांत प्रा. दांडेकरांनीं वारकरी संप्रदाय वैदिक मार्गाला अनुसरून आहे, असें मोठ्या आवेशानें प्रतिपादन केलें आहे. श्री. दांडेकर प्रभृतींना आपला पंथ वैदिक परंपरेचा आहे, असें मोठ्या ईर्ष्येनें सिद्ध करण्याची आवश्यकता वाटावी, ह्यांतच त्यांची बाजू लंगडी असल्याचें व्यक्त होत आहे.

नाथपंथ वर्णाश्रम पाळीत नाहीं म्हणूनच "अत्याश्रमी" पित्याचे पुत्र श्री ज्ञानेश्वरादिकांना त्या पंथांत थारा मिळाला. सर्व मतांना व जातींना आपल्या पोटांत घेऊन अखंड भारतांत एक प्रचंड नवा पंथ निर्माण करण्याचा अचाट प्रयत्न या नाथ संप्रदायाकडून झाला. सर्व अठरापगड जाती एका मुशींत वितळवून एकजात हिंदूंचा अभेद्य समाज निर्माण व्हावा अशी जी कल्पना आज प्रसृत होत आहे, तिची मुहूर्तमेढ यापूर्वीच मत्स्येंद्र–गोरखादिकांच्याकडून, अभावितपणें कां होईना दहाव्या–अकराव्या शतकाच्या सुमारास रोविली गेली असें म्हणणें गैर होणार नाहीं.

गोरखाच्या शिष्यपरंपरेंत हिंदुस्थानच्या बाहेरील अहिंदूंचा भरणाहि पुष्कळ झालेला आहे. दत्तभक्त मुसलमान आजहि आपणांस मिळतात. श्रीकृष्णाच्या प्रेमानें वेडे बनून त्याचीं गीतें रात्रंदिवस गाणारे मुसलमान कांहीं थोडे नाहींत. रामनामाचा महिमा जगास जाहीर करणारा कबीर हा मुसलमानच होता. वारकरी संप्रदायांतहि मुसलमान संत कोणीच झाले नाहींत असें नाहीं. देवीदासकृत संतमालिका स्तोत्रांत बऱ्याच मुसलमान संतांचीं नांवें आलेलीं आहेत. मुंतोजी महायोगी हा संत, बहामनी राजवंशीय मुसलमान होता. गहिनीनाथांच्या समाधीस हिंदु आणि मुसलमान सारखेच भजतात.

कांहीं कारणानें मुसलमान झालेल्या जातवेद भैरंभटाला पुनः हिंदु धर्माची दीक्षा देणारा वरद नागेश उर्फ वडवाळ सिद्ध हा वीरशैव असावा. वीरशैवांत "फकीरप्पा" असें नांव बऱ्याच लोकांत आढळतें. फकीर स्वामीचे मठ कर्णाटकांत आहेत. मुसलमानांना दीक्षा देऊन लिंगायत करून घेण्याचे कांहीं प्रयत्न झालेले आंहेत. मळेय मल्लेश नामक एका साधूनें मक्का–यात्रा केल्याचें सांगितलें जातें. त्याच्या समाधीला लिंगायत आणि मुसलमान दोघेहि भजतात. एकनाथांचे गुरु श्री जनार्दन स्वामी यांना एका अवलियाच्या रूपानें दत्ताचें

दर्शन झालें असें सांगितलें जातें. शहाअलम प्रभूनें श्रीदत्त रूपानें जनार्दन स्वामींना दर्शन दिलें असें महाराष्ट्र सारस्वतांत (टीपेंत) लिहिलें आहे. वीरशैव किंवा नाथ संप्रदायी अल्लमप्रभूचा काळ इ. स. ११६०; जनार्दनस्वामींना अल्लम पुढें २०० वर्षांनीं भेटले हें आश्चर्य वाटण्याजोगें आहे. पण गुरुमार्गांत अशी एक सर्वसाधारण श्रद्धा आहे कीं आपल्या मार्गाचे प्रवर्तक गुरु हे अमर असतात. ते केव्हांहि—शेंकडों वर्षांनंतरहि त्या मार्गांतील भक्तांना दर्शन देत असल्याचीं उदाहरणें जगांतील सर्व गुरुमार्गांत नमूद आहेत. बौद्ध संप्रदायांतहि अशी श्रद्धा आहे. मेल्यानंतर येशूचें दर्शन झाल्याचें सांगणारे खिस्ती संत आहेत. मुसलमान सूफींतहि अशी श्रद्धा आहे. दत्तपंथांतहि अशा प्रकारचा अनुभव आल्याचें सांगणारे आजहि आहेत. देहावसानानंतर ज्या अर्थीं दर्शन घडतें, त्या अर्थीं या पुरुषांना 'अमर' म्हणणें जरूर होतें. मरण हें मर्त्याचें लक्षण; मर्त्य हे योनिज आहेत यामुळें हे 'अमर' गुरु अयोनिज असें गृहीत धरावें लागतें. अशा विचारानेंच महापुरुषांच्या चरित्रांत जन्माचे चमत्कार सांगण्याचा, त्यांचें अजात, अयोनिज असें वर्णन करण्याचा संकेत पुराणांतून ठरलेला दिसतो.

अल्ल—अल्लम हें नांव मुसलमानाचें असावें, असें कांहींना वाटतें. पण श्रीअल्लमप्रभूंचें जन्मस्थान वगैरे निश्चितपणें माहीत असल्यामुळें लिंगायत मतप्रवर्तक अल्लम ही व्यक्ति मुसलमान नव्हे हें निश्चित आहे. पण फकीरप्पा-सारखें अल्ल हें नांव मुसलमानांकडून आलें असल्यास माहीत नाहीं. एका ब्राह्मणानें अल्लमगुरूंचें मराठींत लिहिलेलें हस्तलिखित चरित्र (गुरुचरित्र) मिळालें आहे.

हिंदु धर्माच्या कक्षेंत येण्यास मुसलमानांना त्यावेळीं गुरुदत्त मार्गामध्यें एक वाट होती. तेराव्या—चौदाव्या शतकापासून भारताची राजधानी समजल्या जाणाऱ्या दिल्लीचें तख्त मुसलमानांच्या हातीं शेकडों वर्षें राहिलें नसतें तर हिंदु मुसलमानांच्या एकोप्यांत बिघाड आलाच नसता. मागें हूण, सिथियन वगैरे लोकांच्या धाडी हिंदुस्थानवर आल्या. येथें त्यांनीं कांहीं भागावर राज्यहि केलें; तरी पण हे परकीय जन हिंदुस्थानांत आल्यानंतर एक दोन पिढ्यांच्या आंतच परम भागवत किंवा परम शैव बनून हिंदु धर्माभिमानी झाल्याचे दाखले इतिहासांत आहेत. पण ग्रीक आदि परकीयांना पचवून

आत्मसात् करून घेतलेल्या हिंदु धर्मास मुसलमानांना जिरविणें अशक्य कां व्हावें ? अशक्य झालें नसतेंहि, जर भारताचे सम्राट् मुसलमान झाले नसते तर ! सम्राट् राज्यकर्त्यांचा पाठिंबा मिळाल्यानें मुसलमानांच्या वागणुकींत स्वाभाविकपणें चढेलपणा दिसून येऊं लागला. हिंदु-मुसलमानांतील आध्यात्मिक संबंध गौण होऊन त्याला राजकारणाचें स्वरूप अनिवार्यपणें प्राप्त झालें. शिवाय वैभव शिखरापासून घसरत चाललेल्या हिंदु समाजाचें पाऊलच कोठें ठरेनासें झाल्यावेळीं मुसलमांनासारख्या कडव्या समाजाला आपल्यांत घेऊन समरस करून घेणें शक्य नव्हतें. मुसलमानांचा लोंढा हिंदुस्थानावर एंकसारखा धडकतच होता. आपला एकजिनसी समाज एकजिनसी न राहातां जातिभेदाच्या श्रेष्ठ-कनिष्ठ या विषारी भावनांच्या भोंवऱ्यांत जास्त जास्तच दुबळा होत गेल्या-नेंहि मुसलमानांना आंत घेऊन पचविणें अशक्य झालें. त्या प्रयोगांत संपूर्णपणें मुसलमानांच्या आहारीं जाण्याची भीति उत्पन्न झाली. अशा परिस्थितींत मुसलमानांपासून आपलें स्वत्व रक्षण करण्याकरितां मुसलमानांना दूर ठेवणें हिंदूंना जरूर झालें; पण राजकीय-सामाजिक रंगभूमीवर अशाप्रकारें हिंदु-मुसलमानांच्या कितीहि तेढी चालल्या असल्या तरी हिंदुमुसलमानांतील खऱ्या आध्यात्मिक ओलाव्याच्या मंडळींतील सामरस्यास किंवा एकोप्यास त्यानें बाध आला नाहीं.

महानुभाव मुसलमानधार्जिणे झाल्यानें महाराष्ट्रांतून त्यांना बाहेर पाय काढावा लागला, असें कांहींचें म्हणणें आहे. वरील विवेचन वाचलें असतां, या प्रकारच्या आक्षेपास ऐतिहासिक आधार नाहीं असें दिसून येईल. गुरुदत्तमार्गातील सर्व शाखोपशाखांमध्यें मुसलमानांना अवकाश असल्याचे पुरावे आहेत. तसेंच महानुभाव पंथालाहि आध्यात्मिक वृत्तीचा मुसलमान परका वाटला नसल्यास नवल नाहीं. श्री चक्रधरांनीं उत्तर हिंदुस्थानांत शिष्य मिळविले. "आतां हे (चक्रधर) म्लेंच्छामध्यें असैल; उत्तरपंथे गमन :" असें चक्रधरांचें वचन आहे. "गोसावियातें म्लेंच्छामध्यें राज्य करितां (शिष्य मिळवून आपल्या मताचा प्रसार करीत असतां) देखिले" अशी एक लीळा उत्तरार्धाच्या शेवटीं दिलेली आहे; उज्जयिनीहून आलेल्या एकाकडून मिळालेली वरील वार्ता तेथें नमूद आहे. काबूलकडेसुद्धां महानुभाव पंथीय

चांगला आसरा मिळवून राहातात. याचें रहस्य काय तें निराळें सांगण्याची आतां जरूरी दिसत नाहीं. राजकीय रणरंगांतील रागद्वेषानें कलुषित झालेल्या दृष्टीनें पाहाणाऱ्यांना याचा खरा अर्थ समजणें शक्य नाहीं. गुरुमार्गातील हिंदु-मुसलमान संगम त्यांना विचित्र वाटणें स्वाभाविक आहे. हा सर्व मुसलमान धार्जिणेपणा किंवा ही सर्व मुसलमानाळलेली मनोवृत्ति असा सरासं आरोप करण्यास ते प्रवृत्त होतात. अशा तऱ्हेच्या मनोवृत्तीमुळें आपल्या संस्कृतींतील या कोड्यांचा उमज पडत नाहीं.

या प्रकारचाच श्रीज्ञानेश्वरांचा गुरुदत्तमार्गानुसारी वारकरी पंथ हा वर्णाश्रमधर्मप्रतिपादक वैदिक पंथाहून निराळा नव्हे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न ऐतिहासिक दृष्ट्या सयुक्तिक म्हणतां येईल काय ?

पुढच्यास ठेंच व मागचा शहाणा, या न्यायानें श्री ज्ञानेश्वरांनीं आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या धार्मिक चळवळीपासून चांगलाच धडा घेतला असला पाहिजे. सबगोलंकार करण्यास निघालेले कानफाटे असा ठपका नाथपंथाला मिळाला. वीरशैवांनाहि समाजाकडून चांगलाच विरोध झाला. महाराष्ट्रांत त्यांचें मोठें स्वागत झालें नसावें. महाराष्ट्रांत वीरशैवमत प्रसार पावलें नाहीं असा याचा अर्थ नाहीं. वऱ्हाडांत आजहि लिंगायत घराणीं आहेत. उज्जयिनीस वीरशैवांचा मठ होता. सौराष्ट्र सोमनाथाचे भक्त कांहीं वीरशैव "शरण" होऊन गेले. मुसलमानांच्या लुटालुटीस आरंभ झाल्यावर सोरटी सोमनाथ वीरशैव शरणांबरोबर दक्षिणेस कर्णाटकांत पुलिगेरे (लक्ष्मेश्वर) येथें स्थिर झाला. सोमनाथाचीं प्रतीकें कर्णाटकांत अत्यंत लोकप्रिय असून होयसळ यादवांनीं त्या नांवाचें एक नवें गांवसुद्धा वसविलें. उज्जयिनीचा काळेश्वरहि दक्षिणेस येतो. बल्लारी जिल्ह्यांत काळउज्जयिनी नामक क्षेत्र असून तेथें एक वीरशैव शाखेचा मठ आजहि सुप्रसिद्ध आहे. हीं दोन्हीं क्षेत्रें घसरत दक्षिणेस जशीं आलीं, तसें वीरशैव पंथालाहि महाराष्ट्रांतून पुढें आपलें ठाणें उठवावें लागलें. वारकरी पंथाच्या कार्याची महती वर्णितेवेळीं श्री. वि. ल. भावे यांनीं काढलेले उद्‌गार पाहाण्याजोगे आहेत. वारकरी व रामदासी संप्रदाय पुढें आले नसते तर वीरशैवांच्या कचाट्यांतून महाराष्ट्राची सुटका झाली नसती, असें श्री. भावे यांनीं आपलें मत नमूद केलें आहे. महानुभावांना वीरशैवांच्याप्रमाणेंच अत्यंत उग्र

सामाजिक विरोध सोसावा लागला, याचें कारण वरील सर्व पंथांनीं कांहीं आडपडदा न ठेवतां वर्णाश्रमाचा पाया उखडून टाकण्याचा प्रयत्न केला याशिवाय दुसरें कांहीं नव्हे.

स्वतः ज्ञानेश्वर आणि त्यांचीं भावंडें यांना अत्याश्रमी संन्यासी बापाचीं मुलें म्हणून सामाजिक बहिष्काराच्या दिव्यांतून प्रायश्चित्त घ्यावें लागलेंच. अशाच प्रकारच्या सामाजिक प्रकोपामुळें त्यांच्या आईबापांना प्रयागांत जिवंत समाधि घेऊन आपली सुटका करून घ्यावी लागली. श्री ज्ञानेश्वर हें सर्व जाणत होते. आधींच सतावलेल्या समाजाला आणखी डिवचून आपलें कार्य बिघडवून घेण्याचा अविचारी मार्ग अनुसरणें त्या विचारी व दूरदर्शी महात्म्याला शक्य नव्हतें. समाज त्यांच्याशीं मूर्खाप्रमाणें खुनशी रीतीनें वागला तरी त्यांनीं त्याच्याशीं फटकून न वागतां आपल्या चातुर्यानें व प्रेमळ उदार बुद्धीनें त्याला गोंजारून आपल्या जवळ केलें. आजच्या मनोविश्लेषण शास्त्रज्ञांना बुचकळ्यांत पाडणारें असें तें अतुल अनुपम उदाहरण आहे. ज्ञानेश्वरांसारख्यांच्या परिस्थितींत व्यंग्य विडंबन, वक्रोक्ति यांकडे मन अनिवार्यपणें धांव घेत असतें. सरळ उघड बोलणें, अशक्य झालें असतां विरोधकांच्याकडून झालेल्या जांचानें प्रक्षुब्ध झालेलें मन येा ना त्या रीतीनें, व्यक्त किंवा अव्यक्त उपरोधानें, श्लेषानें बोलून विरोधकांचा सूड घेऊं पाहातें. पण श्री ज्ञानेश्वरां-सारख्या असामान्य चारित्र्यवान् पुरुषांचें कांहीं निराळेंच असतें. महाराष्ट्र संत मंडळी श्री ज्ञानेश्वरांना माउली म्हणतात तें यथार्थ आहे. श्री ज्ञानेश्वरांनीं आपल्या उदात्त चारित्र्यानें समाजालाच लाजविलें. चातुर्वर्ण्याला प्रत्यक्ष विरोध करणें हें समंजसपणाचें नव्हे; त्यापासून कार्यहानि मात्र होते, हें त्यांना मागील घडामोडींवरून प्रत्यक्ष दिसत होतें. म्हणून त्यांनीं या बाबतींत मौन स्वीकारलेलें दिसतें. रूढ विचारास विशेष धक्का न देतां गुरुदत्त मार्गाचा प्रसार करण्याचें आपलें कार्य त्यांनीं मोठ्या चातुर्यानें चालूं ठेवलें.

श्री ज्ञानेश्वरांचा स्वभाव सर्वसंग्रही व सारग्राही असा होता. दुराग्रह, एककल्लीपणा, हटवाद यांचा वासहि त्यांच्या विवरणांत कोठें आढळून येत नाहीं. आपला मार्ग वैदिक कीं अवैदिक या विवंचनेंत ते कधींच पडले नाहींत. जेथें जें चांगलें असेल तें न सोडणें हा त्यांचा बाणा होता. त्यामुळें

वैदिक पद्धतींत जें आपल्या मार्गास पोषक आहे, तें राहूं देण्यास श्री ज्ञानेश्वर केव्हांहि सिद्ध होते. ज्यांनीं त्यांनीं आपले आश्रमधर्म पाळावेत पण मुख्य गोष्ट आत्मानुभूति, परमेश्वर–प्राप्ति असल्यामुळें तिला जें जें विरोधी होईल त्याकडे कानाडोळा करणें हें संत मार्गाचें वैशिष्ट्य आहे. " क्षीर–सिंधु–परिसरीं श्री त्रिपुरारी " होते असें ज्ञानेश्वर म्हणतात. यावरून शिव आणि विष्णु या नांवांविषयीं त्यांचा यत्किंचितहि हट्ट नव्हता हें स्पष्ट आहे. ज्यानें त्यानें आपणांस रुचेल व पचेल आणि अनुभूतीस उपयोगी होईल असें नाम घ्यावें व आपला उद्धार करावा. एकंदरींत आत्मोद्धार हें त्यांचें मुख्य लक्ष्य आहे. अशा या उदार भावाच्या बैठकीमुळेंच या वारकरी संप्रदायांत एकोबासारखे दत्तभक्त बहिरापिशासारखे अन्य मतांत शिरून पुनः परत आलेले व शैवदीक्षा मिळालेले, अशा निरनिराळ्या मतांच्या लोकांचाहि त्यांत समावेश झाला. श्री ज्ञानेश्वरांच्या तत्त्वविचारांत शून्याची परिभाषा येते.

चहूं शून्या आरुतें । महाशून्या परुतें ।
सर्वांसी पाहतें । तेचि गा ॥

तसेंच लिंगजंगमाची भाषा त्यांच्या विवरणांत दिसून येते.

गुरुलिंग जंगम । त्यानें दाविला आगम ॥

महानुभाव व महंत–महात्मे असे प्रयोग सुद्धां मिळतात व " कोकिळे ज्ञान " या सारख्या महानुभावी परिभाषेचाहि संपर्क होतो. श्री ज्ञानेश्वरांना द्वैत, अद्वैत यांचाहि आग्रह नव्हता. ज्ञानेश्वरींत शांकर अद्वैतच आहे का अशी अनेकांना शंका येते. ह्याचें कारण हेंच आहे. भक्तीच्या संदर्भांत द्वैतभाव, व सगुण साकार रूप हेंच परम साध्य, तर तन्मयावस्थेंत अद्वयानंदाचा अनुभव अशारीतीनें त्यांनीं द्वैताद्वैताचा मेळ घातलेला आहे. विठ्ठलानें डोक्यावर शिवलिंग धारण केलें आहे अशी श्रद्धा ज्ञानेश्वरप्रणीत संत मार्गांत चालत आली आहे. हरिहर अशी संयुक्त देवता विशेष प्रचारांत येण्यास श्री ज्ञानेश्वरांचा प्रभावच कारणीभूत झाला. जातिपंथांमधील भेदाच्या भिंती त्यामुळेंच जमीनदोस्त झाल्या. परमात्मसिद्धीकरितां तळमळणाऱ्या सर्व जातींच्या व सर्व पंथांच्या आर्त भक्तांना पंढरीची वाट ज्ञानोबांच्या प्रभावानें मोकळी झाली. अशा रीतीनें श्री

ज्ञानेश्वरांनीं वर्णाश्रम धर्माभिमान्यांविरुद्ध एक चकार शब्दहि न उच्चारतां आपणास जें मुख्य साधावयाचें तें साधलें. वर्णाश्रमाला ज्ञानेश्वरांनीं प्रत्यक्ष विरोध केला नाहीं खरा, परंतु वर्णाश्रमाचा पाया त्यांच्या शिकवणीनें हादरला. यामुळेंच खडबडून जागे होऊन पुष्कळ ब्राह्मणांनीं वारकरी पंथाच्या विरुद्ध आरंभिलेला विरोध तुकारामादिसंतचरित्रांत आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो. ब्राह्मण वर्गाला आपलें स्वत्व राखण्याकरितां एखाद्या स्वतंत्र पक्षाची आवश्यकता तीव्रपणें भासूं लागली.

श्री ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकारामादि संत–मंडळींच्या सोज्वळ चारित्र्यामुळें वारकरी संप्रदाय महाराष्ट्रांत झपाट्यानें वाढला. इतकेंच नव्हे तर दुसऱ्या प्रांतांनाहि त्यांच्या अति प्रेमळ भजनांनीं आपल्याकडे वेधून घेतलें. पंजाबांतील गुरु नानक यांच्या ग्रंथसाहेबांत नामदेवाच्या वचनामृतांना जागा मिळाली. श्री ज्ञानेश्वरीनें कर्णाटकांतील बऱ्याच मुमुक्षूंना मोहून टाकलें. या महाराष्ट्र छापाच्या विठ्ठल भक्तीचा प्रसार कर्णाटकाच्या गाभ्यापर्यंतहि झाला. संत मंडळींच्या या कृतीनें आश्रमधर्मास प्रत्यक्ष न जुमानणाऱ्या वीरशैव महानुभाव पंथांना महाराष्ट्रांतून आपलें चंबुगवाळें हालवावें लागलें हें खरें असलें तरी चातुर्वर्ण्याचा पाया खिळखिळा झाला हें कांहीं खोटें नाहीं.

वारकरी संप्रदायानें वर्णाश्रमाला प्रत्यक्ष कोठें विरोध केला नाहीं, एवढ्यावरून हा पंथ वैदिक मार्गावलंबी आहे असें म्हणणें योग्य होणार नाहीं. क्षणभर, वारकरी संप्रदाय वैदिक पंथानुकूल आहे, असें मानलें तर, त्या काळच्या वैदिक वृंदाकडून वेळोवेळीं वारकरी संत मंडळींचा नाना प्रकारचा विरोध, छळ होण्याचीं कारणें काय असतील? श्री ज्ञानेश्वरांनीं जातिभेद काढून टाकण्याचा प्रत्यक्ष चंग बांधला नाहीं, तरी गुरुदत्त मार्गांतील महत्त्वाच्या दुसऱ्या कांहीं गोष्टी विशेष फरक न करितां चालू ठेवल्या. त्या गोष्टी वैदिकांना–कट्टर वैदिकांना मान्य नव्हत्या. आजहि मान्य आहेत असें वाटत नाहीं.

(१) संस्कृत मंत्राचें महत्त्व यत्किंचित्हि कमी झालेलें अस्सल वैदिकाला कधींहि खपणें शक्य नाहीं. वैदिक मंत्रांतील कानामात्रांत बदल न होतां त्याचें पठण व्हावें; गायत्री मंत्र ब्राह्मणानें कधींहि सोडतां कामा नये;

(संस्कृत) मंत्र-जपानेंच ज्ञान प्राप्त होतें; संस्कृताव्यतिरिक्त इतर भाषेंत मंत्रशक्ति नाहीं, अशी वैदिक वृंदाची ठाम समजूत तर संतमंडळींची दृढ श्रद्धा ही कीं "नामापरतें श्रेष्ठ नाहीं." नाम-धारकांना आपण घेतलेलें नाम गायत्री मंत्राहूनहि जास्त पवित्र वाटतें. नाम जपतां "नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा वाया आणिका पंथा जासि झणीं", "हरिपाठ कीर्तीं मुखीं जरी काय, परिच तो होय देह त्याचा." नाम-स्मरणानें तपाचें सामर्थ्य येतें; तीर्थाटन घंडतें. तुकोबांनीं एके ठिकाणीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, "ब्राह्मणा न कळे आपलें तें वर्म, गवसे परब्रह्म नामें एका...तेंचि संध्या ध्यान कर्मक्रिया, ब्रह्म-कर्म ध्यान याचें पायीं", "नामें स्नानसंध्या केलें क्रियाकर्म", "नाम धारकासी नाहीं वर्णावर्ण", "वर्णावर्ण नाहीं नामीं", "आनंदें वैष्णव जाती लोटांगणीं, एक एकाहुनी भद्रजाती", "समर्थासी नाहीं वर्णाश्रम" अशा प्रकारची दृढ भावना संत मंडळींत दिसते.

हे दोन्ही पंथ जुळवून तडजोडीचा मध्यम मार्ग काढणें ही गोष्ट निराळी. पण मुळांत हे दोन्ही पंथ अभिन्न-एकच असें म्हणणें मला धाष्टर्याचें वाटतें.

(२) संस्कृतांतूनच मंत्र जपले पाहिजेत, वैदिक मंत्रच तारक मंत्र होऊं शकतील असा एक भेद. दुसरा एक महत्त्वाचा भेद या दोन्ही पंथांत आहे. गुरुविषयक दृष्टिकोन या दोघांचा निराळा आहे हें या पूर्वी दाखविलेंच आहे. गुरूहून श्रेष्ठ अन्य दैवत नाहीं. गुरूला शरण जाऊन त्याची कृपा माकण्याची या गुरुमार्गाची तऱ्हा कांहीं विशेष आहे. श्री ज्ञानेश्वरांनीं आपल्या पूर्वीच्या रूढींत ओंगळ वाटणाऱ्या कांहीं गोष्टी सोडून दिल्या तरी कांहीं भाग राहिला तो राहिलाच.

गुरूस सर्व समर्पण करून त्याची करुणा भाकावी, कृपा संपादन करावी असें सांगितलें जातें. यांतील "सर्व समर्पण" चा अर्थ कोठपर्यंत न्यावयाचा हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तन-मन-धन सर्वच गुरूच्या चरणीं अर्पण करावयाचें असतें. श्री अरविंदाश्रमांत (पांडिचेरि) येथें आश्रमस्थ (आश्रमांतील एक) होण्यास त्यांनीं आपलें असें कांहीं ठेवावयाचें नाहीं असा दंडक आहे. भक्ताला "योगक्षेमं वहाम्यहं" असें श्री भगवंतांनीं गीतेंत आश्वासन दिलें आहे. गुरु-

मार्गांत हा एक श्रद्धेचा महत्त्वाचा भाग आहे. गुरुमाउलीवर सर्व सोंपवून त्यास शरण जाणें एवढेंच शिष्याचें काम आहे.

श्री ज्ञानेश्वरांनीं आपल्या मार्गांत नाम देणाऱ्या गुरूनें अशाप्रकारें "सर्वस्वाची" अपेक्षा करूं नये असें सांगून मानवगुरूपेक्षां विठ्ठलापायींच आपलें सर्वस्व अर्पण करण्याची प्रथा रूढ केली आणि गुरु नाम देण्यापुरता निमित्तमात्र ठेवला. पण गुरूशिवाय नाम सार्थ होत नाहीं, यांत कांहीं बदल झाला नाहीं.

गुरुप्रसाद मिळाल्याशिवाय शिष्य हा खरा शिष्यच होऊं शकत नाहीं. प्रसाद याचा अर्थ स्थूलपणें बराच शिष्ट, सभ्य प्रकारचा वाटतो. पण याच्या मागील खरा भाव काय तें पहाण्याजोगें आहे. शिष्यानें समर्पण केलेलें गुरूनें स्वीकारावें. गुरूनें आपण घेऊन (उपभोगून) शेष (प्रसाद) द्यावें. देवास आपण नैवेद्य दाखवितों. नंतर तो प्रसाद होतो. स्पष्ट भाषेंत बोलावयाचें म्हणजे गुरूचें उच्छिष्ट हाच गुरूचा प्रसाद.

सर्वस्व अर्पण करणें यांत तन-मनाबरोबर धन तर येतेंच. धन म्हणजे पैसा-अडका असा आजचा अर्थ आहे. पण बायको ही सुद्धां धनांतच येत असे. पांडव द्यूतांत हरले त्यावेळीं त्यांच्या संपत्तीबरोबर द्रौपदीचाहि ताबा कौरवांना मिळाला. चक्रधरांच्या लीळेंत एका शिष्यानें गुरूस आपली भार्या विधिपूर्वक अर्पण केल्याचें वर्णन आहे. आणि गुरूनें तेव्हांच्या तेव्हांच ती शिष्यास परत दिल्याचा उल्लेख आहे. "सकळै गुरूसी अर्पावें. चित्त, वित्त, काया तीन्ही ईश्वरासी अर्पावी, ऐसे म्हणोनी (पाठक) गोसाविया जवळीं आपुली ब्राह्मणी जवळी बैसविली. जवळी कंठाळ ठेविली बैलू बांधला. गोसावियातें दंडवतें घातलीं. चरणा लागली" नंतर गोसावियांनीं अर्पिलेले परत केले, (प्रसाद दिला.) बाराव्या शतकांतील कानडी कवि हरिहर यानें लिहिलेल्या 'बसवदेव राज रगळे' नामक चरित्रग्रंथांत बसवानें जंगमरूपी परमेश्वरास अशाच प्रकारें आपली भार्या देऊन तुष्ट केल्याचें वर्णन येतें.

पण श्री ज्ञानेश्वरांनीं आपल्या गुरु-पंथांत हा प्रकार अजिबात काढून टाकला. नाथ पंथाचे योगी आणि योगिनी हे विरागी, सर्वसंग-परित्यागी संन्यासी असत तरी प्रसंगविशेषीं त्यांच्यांत काय प्रकार चालत असत यावर

श्री. चक्रधरांनीं सांगितलेल्या कानीफ योगी आणि बहुडि योगिनी यांच्या कथेवरून चांगलाच प्रकाश पडतो. कांहीं एका क्षुल्लक गोष्टीवरून कानीफ आणि बहुडी यांच्यांत आपल्यांतील योगशक्तीच्या प्रभावाबद्दल अहमहमिका, ईर्षा सुरू झाली आणि ब्रह्मचर्याच्या परीक्षेंत आधीं कोण हरतो हें पाहाण्याची पैज लागली. या पैजेनें रतिक्रीडेस आरंभ झाला. आणि त्यांत बहुडी हरली, वगैरे कथा चक्रधरांनीं सांगितली आहे. नाथपंथांतील हा किळसवाणा प्रकार पुढील धर्मपंथांत कमी कमी होत गेला. श्री ज्ञानेश्वरांनीं तर अशा प्रकारास पूर्ण आळा घातला इतकेंच नव्हे तर विठ्ठलपंथीय प्रेमळ भक्तिमार्गांत "मधुर" प्रकारहि संपूर्णपणें वर्ज्य मानला. चैतन्यपंथीय मधुरा कृष्णभक्ति महाराष्ट्राला रुचली नाहीं. कृष्णभक्ति केली खरी, पण त्याचेंहि नांव बदलून घेतलें. कृष्ण शब्दाबरोबर गोपीलीलाहि अनुषंगानें आठवतील म्हणूनच कीं काय, महाराष्ट्रानें विठ्ठलभक्तीच्या नव्या अध्यायास आरंभ केला. संताच्या भजनावलींत "गोपी–कुच–मर्दन कृष्णा" चें ध्यान चुकूनसुद्धां आढळणार नाहीं. इतका सर्व सोवळेपणा राखला तरी एक बाब राहिली ती राहिलीच.

श्री ज्ञानेश्वरांच्या विठ्ठलभक्तीपूर्वी श्री मध्वाचार्यांनीं विष्णुभक्तीचा प्रसार केला. माध्वांना वैष्णव असेंहि म्हणण्याचा इकडे प्रघात आहे. पण थोडें सूक्ष्मपणें पहातां श्री मध्वाचार्यांनीं विष्णुभक्ति जरी सांगितली, तरी प्रत्यक्ष रामपूजा रूढ केली. माध्वांत हनुमानाची पूजा मुख्य असून देवांना करावयाचा नैवेद्य वगैरे "श्री मद्धनुमदंतर्गत..." अशा तऱ्हेच्या संकल्पानें केले जातात. श्री वैष्णवांत गरुडाला स्थान आहे तें माध्वांत नाहीं. हनुमाना (भीमा) इतकी अर्जुनालासुद्धां मान्यता नाहीं. माध्व उत्तरादि मठाधीशांच्या नित्यार्चनेंतील श्रीरामाच्या मूर्ति श्री नरहरितीर्थांनीं कलिंग देशाहून आणल्या, असा त्यांचा इतिहास आहे. श्री नरहरितीर्थांचे वडील व ते स्वतः दोघेहि कलिंग देशाच्या राजाजवळ मुख्य प्रधान होते. श्री नरहरितीर्थांनीं तेथून राममूर्ती आणल्या.

अशा रीतीनें तेराव्या शतकांत उत्तरेकडून कर्णाटांत आलेल्या या राम-भक्तीच्या मागें थोडा इतिहास आहे. बाराव्या शतकांत श्री निंबार्कानें राधाकृष्ण भक्तीला चालना दिली. या राधाकृष्ण भक्तीचें शृंगारविलासांत कसें पर्यवसान झालें याचें प्रत्यंतर इ. स. ११७२ च्या सुमारास जयदेव कवीनें लिहिलेल्या

गीतगोविंद काव्यांत उत्तम तऱ्हेनें पहावयास मिळतें. पुढें चैतन्य पंथीयांत तरी "गोपी परकीया" साधनेकरितां जरूर आहे असें मानणारे निघाले! आपल्या पत्नीशिवाय अन्य स्त्रीशीं प्रेम करणें आवश्यक अंग मानलें जाऊं लागलें. शाक्त व नाथपंथांतील या सारख्या थोड्या साधनेच्या इतिहासाची ही पुनरुक्ति दिसते.

राधाकृष्ण भक्तीचें हें विकृत रूप पाहून उत्तरेंत श्री रामानंदानें तेराव्या शतकांत रामोपासना प्रचारांत आणली. ती सोवळी रामोपासना माध्वांनीं दक्षिणेंत आणली. रामदासांनीं सतराव्या शतकांत तिचा महाराष्ट्रांत प्रचार केला.

माध्व मठाधीश हे श्रीरामरूपांत विष्णु पूजीत असले तरी माध्वपंथी संतांनीं (दासांनीं) विष्णुला विठ्ठलरूपांत आळवलेलें आहे. पंढरीचा विठ्ठल हें या दास-संतांचें आराध्यदैवत होतें.

भाषेंतील शब्द वाक्संप्रदाय, म्हणी वगैरेंतून आपल्या मागील संस्कृतीचें प्रतिबिंब उमटलेलें पाहावयास मिळतें. जिथें शिलालेख वगैरे लिखित आधार मिळत नाहींत अशा ठिकाणींहि भाषेंतील हे अवशेष संस्कृतीचा इतिहास जाणण्यास पुष्कळच साहाय्य देतात. प्रस्तुत प्रकरणीं "थुंकी झेलणें" हा वाक् संप्रदाय बरीच माहिती पुरवीत आहे. थुंकी झेलणें याचा आज शब्दशः अर्थ करणें आचरटपणाचें होईल. पण आज जरी हा वाक्प्रचार लक्षणार्थानें रूढ असला तरी एकेकाळीं अक्षरशः अशी रूढि होती म्हणूनच हा वाक्संप्रदाय रूढ झाला असला पाहिजे. आणि याला सुदैवानें जुने लिखित आधारहि मिळतात. कानडींत "बाय तंबुलके कैयानु" असा एक प्राचीन वाक्संप्रदाय आहे. तोंडांतील तांबूलास हात पसरणें असा याचा अर्थ आहे. कुमारव्यासानें बऱ्याच ठिकाणीं हा वाक्संप्रदाय कृष्णकुंजी वगैरे पात्रांच्या तोंडीं घातलेला आहे. थुंकी किंवा पिकेस हात पसरणें म्हणजे हांजी हांजी करणें, दास्यभाव दाखविणें असा त्याचा लक्षणार्थ आहे. पण आपले कोण परकीय कोण याचा निर्णय एका पात्रांत जेवण्यानेंच होत होता असें मागील रूढींवरून दिसून येतें. पाठलाग करून आलेल्या यवनांना श्री शिवाजी महाराज आपलेच आहेत हें दाखविण्याकरितां, एका ब्राह्मणानें त्यांना आपल्या पानांत जेवावयास घेतलें अशी एक कथा आहे. आपल्या कुळाविषयीं शंकित असलेल्या कर्णाला तो आपला

आप्त बांधव आहे, सूतपुत्र नव्हे, याची खात्री पटवून देण्याकरितां कृष्णानें त्यास आपली पिक दिली, असें कुमारव्यासानें एके ठिकाणीं वर्णिलें आहे. पंप भारतांत (इ. स. ९३२) अशाच प्रकारचें एक वर्णन आलें आहे. कर्णावसानानंतर युधिष्ठिराला तो आपला थोरला भाऊ होता हें कळून तो विलाप करूं लागला. त्यावेळीं युधिष्ठिर आपल्या विलापांत असे उद्‌गार काढतो कीं, 'तूं माझा थोरला भाऊ हें मला आधींच कळलें असतें तर किती बरें झालें असतें ? मी आज तुझ्या उच्छिष्टाला (जेवणाला) आणि तोंडच्या तांबूलाला पारखा झालों.' मोरोपंतांच्या भारतांत कर्णाला आपल्या पक्षांत येण्यास विनवीत असतां कृष्ण असें म्हणतो : "तूं जर पांडवांकडे येशील तर 'राज्याभिषेक करतिल नर... किंबहुना घेइल तव तांबोळ क्षिप्र भूमिप दरानें" (उद्योग १०-७८) येथें शेवटच्या वाक्यांतील श्लेषांतील अर्थाची संदिग्धता कुमारव्यास भारतावरून (भूमिप म्हणजे धर्मराजा) दूर होऊं शकते.

कर्णाट–महाराष्ट्रांतील कवींनीं वर्णन केलेल्या या प्रकाराला ऐतिहासिक आधारहि मिळतात. श्री. बसवण्णांचें (इ. स. ११६०) असें एक वचन आहे : "देवा ! तुझ्या शरणांचे तांबूल मी चाखेन, त्यांचें शेष वस्त्र मी लेईन." श्री चक्रधरांच्या लीळेंत अशीं वर्णनें बऱ्याच ठिकाणीं आलीं आहेत. "श्री मुखाचीया तांबूळा अंजुळि ओडविली, गोसावी तांबूळ दिधले, ते तोंडी घातले, आणि दंडवत करूनी निगाली." शिष्य अशाप्रकारें गुरुप्रसाद घेऊन धन्यता मानीत असत.

पण जातिवादानें बंड उभारलें !

वारकरी संप्रदायांतहि (नाथसंप्रदायांतील बाकीच्या बाबी सोडल्या तरी) गुरुप्रसाद स्वीकारण्याचा हा प्रकार मात्र जसाच्या तसा चालूं राहिला, असें दिसतें. वारकरी संप्रदाय पसंत नसलेल्या श्री रामदासांनाहि गुरुमहिमा मान्य आहे.

सद्‌गुरू कृपाविरहित,
सर्वथा न घडे स्वहित
यमपुरीचा अनर्थ चुकेना

(दा. बो. १, ३, ४५.)

म्हणोनी सद्गुरू पूर्णपणें
देवाहुनि अधिक कोटि गुणें
जयासी वर्णिता भांडणें वेदशास्त्रा लागलीं.
(दा. बो. ५, ३, ४५.)

शरण सद्गुरूशीं गेलें पाहिजे ॥

पण श्री समर्थ रामदासांनीं या विषयींचा कांहीं मतभेद अगदीं स्पष्ट शब्दांत नमूद करून ठेवला आहे. श्री रामदासांचा गुरुपादोदक घेण्यासहि विरोध नाहीं. इतकेंच काय ह्या गोष्टी शिष्यांनीं केल्याच पाहिजेत असें रामदासांचें मत आहे; तर मग विरोध आहे कुठें ?

चातुर्वर्ण्यांत ब्राह्मण अग्रज व तें अग्रजत्व ब्राह्मणानें कधींहि घालवितां कामा नये, असें श्री रामादासांचें मत आहे. एवढेंच नव्हे तर "जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट। तरी तो तीन्ही लोकीं श्रेष्ठ।" असें रामदासांना वाटतें. "जरी ब्राह्मण मूढमती। तरी तो जगद्वंद्य॥" असें रामदास सांगतात. ब्राह्मणानें बाकीच्या कोणत्याहि जातीचा गुरु करितां कामा नये असा वैदिकांचा बाणा. त्यांच्या पूर्वपरंपरारक्षणास हा त्यांचा अभिमान उपयुक्त झाला. ब्राह्मणच गुरु असावा हा हट्ट याकरितां होता, पण नाथ संप्रदायांत तर जातगोत कांहीं नसून सिद्ध पुरुष कोणत्याहि जातीचा असला तरी तो गुरु होऊं शकतो. वर्णाश्रम राखण्यास ज्या श्री शंकराचार्यांनीं साहाय्य केलें असें समजलें जातें, त्यांनींहि 'चांडालोऽपि स गुरुः' असें जाहीर केलें आहे! श्री ज्ञानेश्वरांनीं नाथपंथांतील ही परंपरा पुढें चालू ठेविली. संत मार्गांत कोणत्याहि जातीचा गुरु करण्यास आडकाढी नाहीं. तुकारामाच्या सोळा शिष्यांत नऊ ब्राह्मण होते. अशा तऱ्हेचीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील. यामुळें वैदिक मार्गांतील अस्सल सोवळेपणाचा नक्षा उतरला!

नीच यातीचा गुरू। तोहि कान कोंडा विचारू। ब्रह्म सभेसी जैसा चोरू। तैसा दडे॥ ब्रह्मसभा देखतां। त्याचे तीर्थ नये घेतां। अथवा प्रसाद सेवितां। प्रायश्चित्त घडे॥ तीर्थ प्रसादाची सांडी केली। तेथें नीचता दिसोन आली। गुरूभक्ति ते सटवली। एकाएकी॥ गुरूची मर्यादा राखतां।

ब्राह्मण क्षोभती तत्वता । तेथें ब्राह्मण्य रक्षूं जाता । गुरू क्षोभ घडे ॥ ऐसी सांकडी दोहिकडे । तेथें प्रस्ताव घडे । नीच यातीस गुरुत्व न घडे । या कारणें ॥ तथापी आवडी घेतली जीवें । तरी आपणची भ्रष्टावें । बहुत जनास भ्रष्टवावें । हें तों दूषणच कीं ॥ स्वयातीचा पाहिजे गुरू । नाहीं तरी भ्रष्टाकारू । .....नेमस्त (खचितचि) घडे ॥ (जुना दासबोध. समास ५,५८–६४; दासबोध ५–५८–६४.)

अब्राह्मण गुरू केला असतां ब्राह्मण्य नष्ट होतें, असा श्री रामदासांनीं निःसंदिग्ध शब्दांत आपला निर्णय दिला आहे. ब्राह्मण्य नष्ट होणें म्हणजे वैदिक परंपरा बिघडणें, हाच याचा अर्थ खरा असेल तर श्री सोनोपंत दांडेकर प्रभृति प्रतिपादतात त्याप्रमाणें वारकरी संप्रदाय हा वैदिक मार्गाला अविरोधी असें म्हणतां येत नाहीं. वैदिक संस्कार कोणत्याहि कारणानें सोडतां येत नाहींत. संस्कार लोप झाले असतां ब्राह्मण्य नष्ट होऊन तो "व्रात्य" गणला जातो. ब्राह्मणानें अग्रजत्व कधींहि घालवितां कामा नये, अशा तऱ्हेचा स्वाभिमान नाथ 'गुरुदत्त' मार्गांत राहूं शकत नाहीं.

हो कां वर्णांमाजीं अग्रणी
जो विमुख हरिचरणीं
त्याहुनि श्वपच श्रेष्ठ मानी
जो भगवद्भजनी प्रेमळू ॥

असे एकनाथ सांगतात (भागवत अ. ५, ओ. ६०). कांहींहि होवो, ब्राह्मण हा शूद्रापेक्षां, अंत्यजापेक्षांहि कमी लेखलेला सनातनी वैदिकांना कधींहि मान्य होणें शक्य नाहीं. अग्रज तो अग्रजच असाच त्यांचा आग्रह. ब्राह्मणांनीं इतर वर्णीयांना नमस्कार कसा करावा येथपर्यंत जेथें पंक्तिप्रंपच केलेला आहे, त्या वैदिक पंथाला, विप्राशिवाय दुसऱ्या जातीची पादधूलि मस्तकीं धारण करणें मान्य होईल का ? चरणतीर्थ आवडेल का ? गुरूच्या पानांतील प्रसाद गळीं उतरेल का ? सबब कोणत्याहि जातीचा गुरु करण्यास मुभा असलेला वारकरी संतमार्ग वैदिक पंथाचाच एक पर्यास असें कसें म्हणतां येईल ?

गुरुसंप्रदाय धर्म । तेचि जया वर्णाश्रम ।
गुरुपरिचर्या नित्य कर्म । जयाचेया ॥

गुरूचे नाममात्र । तेचि आम्हां वेदशास्त्र ।
गुरूसी मानी माणुसपण । तो पापिष्ट जाण सर्वथा ॥

अग्निहोत्राचा सुकाळ । वड पिंपळाशीं काळ ।
तीन्ही देव पिंपळांत । अग्निहोत्रीं केला घात ॥

म्हणती सोमयाग करा । मुख धरोनि मेंढा मारा ॥

अशाप्रकारें यज्ञयागाची टर उडविणारा वारकरी संप्रदाय वैदिक म्हणतां येईल ?

सांडूं जातीचा अभिमान ।
उंचनीच नाहीं नामाचियापुढें ।
यवनादी नीच असोत भलते ।
परि नाम सर्वदा मुखीं वसो ॥

कोण भक्ती केली गोपाळी ।
काय ती सोवळी की ओवळी ॥
त्याचे उच्छिष्ट कवळ मी मिळी ।
प्रेम सम्मेळी डुल्लत ॥

श्री समर्थ रामदासांनीं यामुळेंच वारकरी संप्रदायाविरुद्ध बंड उभारलें. गुरुमार्गातील पादोदक, तीर्थ, प्रसाद तेवढा राखला तरी हव्या त्या जातीचा गुरु करणें त्यांना आवडलें नाहीं. या चालीचा त्यांनीं निषेध केला. त्यांच्या पंथांत, यवन तर राहोच, अब्राह्मण सुद्धां फारसे आंत घेतलेले नाहींत. पायरी राखून काम करणें हें व्यावहारिक तत्त्वज्ञान रामदासांनीं कधींहि दुर्लक्षिलें नाहीं. श्री ज्ञानेश्वरांच्या शिकवणींत वर्णाश्रम धर्माभिमानाविरुद्ध एक चकार शब्दहि कोठें मिळणार नाहीं. तरी पण वारकरी पंथाच्या सर्वसमभावाच्या शिकवणीनें आणि हव्या त्या जातीचा गुरु करण्यास मुभा ठेवल्यानें वर्णाश्रम धर्माचा पाया बराच हादरला. यामुळें खडबडून जागे होऊन पुष्कळ ब्राह्मणांनीं वारकरी पंथाच्या विरुद्ध उठविलेलें काहूर तुकारामादि–संत–चरित्रांत आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. ब्राह्मण वर्गाला आपलें स्वत्त्व राखण्याकरितां एखाद्या स्वतंत्र पंथाची आवश्यकता तीव्रपणें भासूं लागली. अशा सामाजिक मनःस्थितींत श्री समर्थ

रामदासांचा पंथ उदयास आला. ब्राह्मणानें आपल्या जातीबाहेरचा गुरु करितां कामा नये, असा श्री रामदासांचा कटाक्ष होता.

गुरू तो सकळांसी ब्राह्मण ।
जरी तो जाहला क्रियाहीन ॥
तरी तयासी शरण ।
अनन्य भावें असावे ॥ (५०५)

असें दासबोधांत स्पष्ट बजाविलें आहे. श्री रामदासांपूर्वी पंधराव्या शतकांतच श्री नृसिंह सरस्वतींनीं वैदिक परंपरा रक्षण करण्याकरितां गुरुदत्त मार्गांतून आपला एक निराळा सोवळा पंथ काढला. श्री जनार्दनस्वामींचा दत्तमार्ग नृसिंह सरस्वतींच्या इतका कडकडीत सोवळा, वैदिक पंथाभिमानी नव्हे. श्री जनार्दनस्वामींचे शिष्य एकनाथ महाराज वारकरी संप्रदायांत जातात. खुद्द जनार्दनस्वामींना दत्तगुरुनें अवलिया रूपांत दर्शन दिलें. पण श्री नृसिंह सरस्वतींच्या परंपरेंतील यति पंढरीच्या घोळक्याच्या वाऱ्यासहि उभा राहाणार नाहीं. मूळ गुरुपंथ वेदास अनुसरणारा नसून वेदच त्यांना अनुसरतो. गुरुदत्ताच्या चित्रांत कुत्र्याच्या संकेतानें ही गोष्ट ध्वनित केली आहे. "गुरुवाक्यावांचोनी शास्त्र" कोणतें नव्हे. गुरूचे तोंडून येईल तेंच वेदवचन असा बाणा असलेला हा गुरुमार्ग वैदिक पंथीयांनीं सोवळा करून घेण्याचा प्रयत्न केला. श्रीपाद श्रीवल्लभ व नृसिंह सरस्वतींच्या परंपरेनें हा कडकडीत सोवळेपणा बराचसा राखलाहि आहे. श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) महाराजांत तो पराकाष्ठेला गेला. आधुनिक काळांतील दत्ताचा एक अवतार मानले गेलेले श्री अक्कलकोटकरस्वामी कोणत्याहि जातीच्या घरीं भोजन करीत; मशिदींतून प्रार्थनेलाहि जात; शिवाशिवीचा विधिनिषेधहि त्यांना नव्हता. निरंजन अवलिया म्हणून त्यांचा नांवलौकिक होता. त्यांच्या पुढील पिढींतील दत्त प्रासादिक, दत्तावतारी मानले गेलेल्या श्री टेंबेस्वामींचें सर्वच याच्या उलट. त्रिकालस्नान. शूद्राची सावलीहि सोवळ्याला चालत नसे. त्यांचा कडक सोवळेपणा कट्टर सनातन्यांनाहि थक्क करण्याइतका होता. भजनीपंथ हा टाळकुट्यांचा असें त्यांना वाटे. वर्णाश्रमाविषयीं त्यांचा कटाक्ष विशेष असे. अशा प्रकारें सोवळ्या बनलेल्या या दत्तपंथाच्या चरित्रांतहि मुसलमान शिष्य

डोक़ावतातच. नृसिंह सरस्वतींनीं वादाकरितां आलेल्या ब्राह्मणास एका मांगाकडून हरविलें. मुसलमान बादशहास त्याचा रोग बरा करून आपल्या शिष्यांत गणलें.

कर्णाटकांतील प्रतिक्रिया

कर्णाटकांतील संप्रदायप्रियता आणि सोंवळेपणा हा कांहीं विशेषच आहे. येथील धार्मिक चळवळींतील कांहीं गोष्टींचा महाराष्ट्रांतील धार्मिक चळवळींशीं संबंध पोचतो. वारकरी संप्रदायाविषयीं कर्णाटाची प्रतिक्रिया काय हें जाणणेंहि तुलनात्मक-अभ्यासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. संत भानुदासांनीं विजयनगरहून विठ्ठलाच्या मूर्ति पंढरीला परत नेल्या, असें महाराष्ट्र संत-चरित्रावरून कळतें. पण त्या मूर्ति विजयनगराला कां आल्या याचा उलगडा तेथें होत नाहीं.

कर्णाटकांतील पुरंदरादि वैष्णवदास मंडळी विठ्ठलभक्त होती, हें सुविख्यात आहे. त्यांतील बहुतेकांचीं गाणीं "पुरंदर विठ्ठल", "जगन्नाथ विठ्ठल" वगैरे विठ्ठलमुद्रिकेनें पूर्ण होतात. पंढरी हे सर्व विठ्ठल भक्तांना आपल्याकडे वेधणारें महाक्षेत्र होतें. कर्णाटाप्रमाणें महाराष्ट्राची संत मंडळीहि ज्ञानेश्वरांपासून पंढरी क्षेत्राकडे विशेष ओढली गेली. ज्ञानेश्वरादि संत मंडळींच्या वर्णनावरून हें क्षेत्र त्यावेळीं कर्णाटांतील होतें असें दिसून येतें.

काशीये कनोजु, द्वारका गुजरू ।
कानडा विठ्ठलु पंढरीये ।
कानडा हो विठ्ठलु कर्नाट कु ।
येणें मज लाविलासे वेधु ॥
विठ्ठलु कानडी बोलूं जाणें ।
त्याची भाषा पुंडलीक नेणें ॥

वरील अभंगांत विठ्ठल ही देवता कानडी व पंढरपूर हें क्षेत्र कर्णाटकांतील आहे हें स्पष्ट शब्दांत नमूद आहे. याच अभिप्रायाचे दुसरे बरेच अभंगहि प्रसिद्ध आहेत. "कानडा" हा शब्द अगम्य, न कळणारा अशा अर्थी कांहीं ठिकाणीं उपयोजिलेला आहे हें खरें. 'कानडा हो विठ्ठलु' म्हणजे विठ्ठल

अगम्य, बुद्धीच्या पलीकडचा असा अर्थ होऊं शकेल. पण काशी, द्वारका या स्थळनामांप्रमाणें कर्णाटकाचें नांव देऊन पंढरी क्षेत्र त्या प्रांतांतील आहे, असें वरील अभंगांत सांगितलें आहे.

एकेकाळीं पंढरीचा विठ्ठल कर्णाटकांतील हरिभक्तांचें जिवाभावाचें दैवत होतें. विठ्ठलमुद्रिकायुक्त हजारों "दासर पदगळु" कर्णाटकांतील हरिभक्तांच्या जिभेवर नाचत आहेत. पण आज तोच विठ्ठल मागें बाराव्या शतकापर्यंत कर्णाटकांतील दैवत असें गणला जात होता, याची दोन्ही प्रांतांना आठवण देण्याची पाळी यावी याचें कारण काय? कानडी वैष्णवभक्त विठ्ठलाला परके वाटले नाहींत तरी ते पंढरीला पारखे कां झाले? आज उडुपी व तिरुपति येथें कानडी वैष्णवांचा मेळावा जितका जमतो तितका पंढरीस खचित जमत नाहीं. उडुपीचा देव श्रीकृष्ण; तिरुपतीच्या देवाचें नांव व्यंकटेश किंवा श्रीनिवास, पण कानडी हरिभक्त विठ्ठलार्चीं गाणीं गात उडुपी व तिरुपतीची यात्रा करतात. याचें कारण काय असेल? याचें कारण श्री ज्ञानोबारायांचा वारकरी संप्रदायच होय.

पंढरीहून विठ्ठलाच्या मूर्ति विजयनगराला आल्या. भानुदासाचे समकालीन श्री वादिराज स्वामींच्या तीर्थप्रबंध नामक संस्कृत ग्रंथांत विठ्ठल विजयनगराकडे आल्याचा पुरावा मिळतो. "तुंगातीरगतोऽसि विठ्ठल" असें वादिराज स्वामींनीं म्हटलें आहे. याचा अर्थ चंद्रभागेहून निघून हे विठ्ठला तूं तुंगातीरीं गेलास असा होत आहे. श्री विठ्ठलाच्या मूर्ति विजयनगराला आणल्या गेल्याचें वरील पुराव्यावरून सिद्ध होतें. पण मूर्ति विजयनगराला कां नेल्या त्याच्या मागची मनोभूमिका काय याचा उलगडा अजून झालेला नाहीं. मुसलमानांच्या टोळधाडीनें पंढरी विठ्ठलाच्या मूर्ति अपवित्र होऊं नयेत अशा करतां हिंदुत्वाचे अभिमानी "हिंदूराय सुरत्राण" अशी बिरुदावली धारण करणाऱ्या विजयनगराच्या राजांनीं मुसलमानी राज्याच्या कचाट्यांत अडकलेल्या पंढरीहून त्या मूर्ति आणल्या अशी कांहींची समजूत असलेली दिसते. पण यांत कांहीं तथ्य आहे असें म्हणवत नाहीं. कारण संत भानुदासांनीं विजयनगरहून परत मूर्ति नेल्या त्यावेळीं किंवा पुढें बरींच वर्षें सुद्धां पंढरी क्षेत्र मुसलमानांच्या तावडींतून थोडेंच बाहेर आलें होतें! यास्तव कानडी हरिदासांनीं विठ्ठल मूर्ति पंढरीहून विजयनगरला आणल्याचें कारण निराळेंच आहे असें वाटतें. एका

कानडी विठ्ठलभक्तांच्या गाण्यांत, विठ्ठल पंढरीहून इकडे पळून आला असें वर्णिलेलें आहे. या गाण्याचा कर्ता अर्वाचीन म्हणजे सुमारें दोनशें वर्षांपूर्वीचा असला तरी त्याच्या गाण्यांत पूर्वपरंपरेनें त्याला मिळालेल्या हकिगतीचें यथातथ्य वर्णन आहे.

कानडी पद

येनिदु कौतुकवु, विठ्ठला ! येनिदु कौतुकवु ।
नीनिल्लिगेके बंदे, विठ्ठला ! येनिदु कौतुकवु ॥ ध्रु ॥

मध्वद्वेषिगळु माडुव पद्धतियनु कंडु ।
ह्रद्य वागदे कद्दकळ्ळनंते, यद्दिल्लिगे बंद्या ॥ १ ॥

मिथ्यावादिगळु निरंतर सुत्तिमुत्तिकोंडु ।
अत्तु करेदु कूगुतिरे वहळ बेसत्तु होरट्टु बंद्या ॥ २ ॥

श्री विठ्ठल निन्न सद्गुण वेदशास्त्रगळली ।
शोधिसी नोडलु भूदेवरिगोलिदादरिसि बंद्या ॥ ३ ॥
विठ्ठला ! येनिदु कौतुकवु ॥

अर्थ : " किती कौतुकास्पद आहे बरें ही गोष्ट ! विठ्ठला, तूं इथें कां बरें आलास ? मध्वद्वेषी मिथ्यावादी लोकांनीं तुझ्याभोंवतीं गराडा घालून, आणि रडून कढून तुझ्यापुढें चालविलेले ते चाळे पाहाणें असह्य होऊन तूं चोराप्रमाणें इकडे निसटून पळून आलास ! ब्राह्मणांवर कृपा करण्याकरितांच तूं इकडे धांवून आलास नव्हे का ? "

ब्राह्मणांवर कृपा करण्यास (भूदेवरिगे वोलिदु आदरिसलु) विठ्ठला तूं इकडे धांवून आलास असें म्हणण्यांतील खोंच विचारार्ह आहे. अब्राह्मण गुरु करण्यासहि मुभा देणाऱ्या वारकरी संप्रदायांत शिरणाऱ्या ब्राह्मणांचें ब्राह्मण्य नष्ट होण्याची भीति आहे. असा इशारा श्री. रामदासांनीं दासबोधांत दिलाच आहे. विठ्ठल संप्रदायी वारकरी ब्राह्मणांना, ब्राह्मण म्हणण्यासहि कर्णाटकांतील माध्व ब्राह्मण तयार नसल्याचें येथें ध्वनित होतें. ब्रिनसोवळ्या जातिभेदातीत भक्तीला कंटाळून श्री विठ्ठल पंढरीहून उठून इकडे पवित्र वातावरणांत आला

असें वरील गाण्यांत सूचित आहे. यावरून कानडी वैष्णव भक्तांनीं पंढरी कां सोडली याचा उलगडा होण्याजोगा आहे. अशा रीतीनें कानडा विठ्ठल मऱ्हाटा झाला.

कर्णाटकावर महाराष्ट्रानें अशा रीतीनें मात केली आणि लोण परत दिलें. पण तत्पूर्वी देवगिरी यादवांच्या राजवटींत शेवटीं मराठीला राजाश्रय मिळेपर्यंत म्हणजे तेराव्या शतकाच्या मध्यापर्यंतहि कर्णाटक–"मातु" चा प्रभाव मऱ्हाटीवर होता. यापुढील काळांत सर्व डाव उलटला. वारकरी संप्रदायाचा कर्णाटकीयांवर बराच परिणाम झाला. भागवत (विठ्ठल) पंथाकडे कानडी लोक आकर्षिले गेले. हरिहरांत भेद मानूं नये, अशा विचाराची समत्ववादी मंडळी वारकरी संप्रदायाकडे खेंचली गेली. अद्वैतपंथांतील कट्टर सनातनी, वारकरी पंथापासून दूर राहिले; नृसिंह–सरस्वतींच्या आत्यंतिक सोवळ्या दत्तपंथाचा प्रभाव त्यांच्यावर पडला. कांहीं रामदासीहि झाले. महाराष्ट्राच्या या धार्मिक संप्रदायाबरोबर त्यांचीं मराठीं भजनें, आरत्या वगैरेंचा प्रसार कर्णाटकांत त्या त्या पंथीयांत झाला. कर्णाटकीयांकडून महाराष्ट्राला शिवभक्ति, मल्हारी मार्तंड, यल्लाई, तुकाई वगैरे संप्रदाय एकेकाळीं दिले गेले, त्याचें हें सव्याज (सांस्कृतिक) ऋण फिटलें!

★ ★ ★

: ८ :

उपसंहार

आजच्या समस्या केवळ आजच निर्माण होत नसतात; तर त्यांचीं पाळेंमुळें भूतकाळाच्या गाभ्यांत दूरवर गेलेलीं असतात. काळ हा अखंड आहे. काल, आज आणि उद्यां असे व्यवहाराच्या सोईकरितां त्याचे विभाग पाडलेले आहेत. 'काल' च्या पोटांतूनच 'आज' निघालेला असतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, 'आज' हा थोड्या फार फरकानें कालचाच नवा अवतार असतो.

आजच्या रोगाचें निदान व्हावयास कालच्या आपल्या करणीचा आढावा घेणें जरूर आहे. पण मनुष्यमात्राचा अभिमान, अहंकार आडवा येत असल्यानें कालच्या कृतीचें जितक्या त्रयस्थपणें, शांतपणें व निर्विकारपणें विश्लेषण व्हावयास पाहिजे तितकें तें होऊं शकत नाहीं. यामुळें सामान्यतः आपल्या समस्यांचा सत्यार्थ कळणें कठिण होतें.

कानडी-मऱ्हाटीची गुंतागुंत

कानडी आणि मऱ्हाटीच्या गुंतागुंतीचीहि अशीच स्थिति आहे. ही गुंतागुंत अलीकडची आहे अशी बऱ्याच लोकांची समजूत आहे. पण आमच्या मतें, ती अति प्राचीन आहेत. आतांपर्यंतच्या विवेचनावरून, कर्णाट-महाराष्ट्राचे पूर्वज एकच होते आणि तेथील जन हीं जुळीं भावंडेंच होत

असा निष्कर्ष काढला तर तें चुकीचें होईल काय ? आज कानडी आणि मराठी अशा वेगवेगळ्या नांवानीं ओळखल्या जाणाऱ्या लोकांचा व्यवहार हजारों वर्षांपासून इतका एकमेकांत गुंतलेला आहे, त्यांचा प्रभाव एकमेकांवर इतक्या विलक्षण रीतीनें पडलेला आहे कीं, दोघांचें हें खरें स्वरूप लक्षांत यावयास एकेकट्याचा स्वतंत्रपणें अभ्यास करून भागणार नाहीं. दोन्ही भाषांतील म्हणी, शब्द वगैरेंचें मर्म व औचित्य कळण्यास परस्परांचें साहित्य आणि परंपरा यांच्या अभ्यासाचीच जरुरी आहे. उदाहरणार्थ : ' गंगेंत घोडें न्हालें ' ही मराठी म्हण पुष्कळांच्या मतें पेशवाईंत उत्तरेकडील स्वाऱ्यांचे वेळीं·प्रचारांत आली. पण वस्तुस्थिति पाहातां कर्णाट आणि महाराष्ट्राचे चालुक्य व राष्ट्रकूट राजे यांच्या अमदानींत ही म्हण लोकांचे तोंडीं असल्याचा पुरावा मिळतो. पंप महाकवीच्या कानडी भारतांत (इ. स. ९३२) अरिकेसरीचे घोडे गंगेत न्हाले, असें वर्णन पहिल्या आश्वासांत आलेलें आहे. (गंगावार्धियोळ् आतम तुरगमम् मियिसिदन्) मराठींतील 'अतिशहाणा त्याचा बैल रिकामा' ही म्हण आजच्या कानडी बोलींत रूढ नाहीं. पण इ. स. ११३५च्या सुमारास धारवाड जिल्ह्यांत (मुळगुंद) होऊन गेलेल्या नयसेन याच्या ' धर्मामृत ' काव्यांत " अतिजाणन गोणि बरिदु " ही म्हण नमूद आहे. कानडींतील लुप्त परंपरांचे अवशेष मराठींत मिळतात तर मराठी भाषा व संप्रदायांतील कोड्यांचे खुलासे कानडींत मिळतात. 'कैवारी' हा शब्द जुन्या कानडी साहित्यांत तेराव्या चौदाव्या शतकापर्यंत सर्रास आढळतो; पण पुढें तो मागें पडला. ' पत्करणें ' याचा अर्थबोध आजच्या या स्वरूपांत होत नाहीं. पण कुमारव्यासांनीं ठिकठिकाणीं उपयोजिलेल्या 'पतिकरिसिदनु' (म्हणजे स्वीकारलें) हा प्रयोग लक्षांत घेतां पत्करण्याचा उमग पडतो. इसु प्रत्ययामुळें हा धातु मूळ कानडी नव्हे हें सिद्ध आहे. ज्ञानेश्वरींत ' पतिकरा ' चा प्रयोग येतो. मराठींतील हा शब्द कुमारव्यासानें इसु लावून कानडींत घेतला आहे. ' पोवाडा ' या शब्दाचा अर्थ कळण्यास ' पवाड ' चा कानडींतील प्राचीन प्रयोग साहाय्यक होणार आहे. ' पवाड ' ला चमत्कार, दिव्य, अतिमानुषी कृति असे अर्थ संभवतात. यावरून कोण्या व्यक्तीचा महिमा गाण्याला पवाडे–पोवाडे हा अर्थ रूढ झालेला आहे. ही परंपरा माहीत नसल्यानें मराठींत या शब्दाचें औचित्य

कळेनासें झालें आहे. कानडींतील वोली (ओल्लि) शब्द महानुभाव साहित्यांत आल्याचा उल्लेख मागें केलाच आहे. हा शब्द कानडींत प्रौढ साहित्यिक भाषेंत आढळणार नाहीं. याचा जुना प्रयोग पाहावयाचा असल्यास कानडी साहित्यिकांना चक्रधर लीळाचरित्र व रुक्मिणी स्वयंवराकडेच धांव घेणें जरूर आहे. मुद्दल शब्दाविषयींहि असाच प्रकार आहे. कानडी भाषेंतील आजच्या साहित्यिक ग्रंथांत किंवा गणित पुस्तकांत मुदल् शब्द (मोदलु) चुकूनहि आढळणार नाहीं. पण बाराव्या शतकांतील 'धर्मामृत' नामक ग्रंथांत "मोदलं कोंडु पत्रमं सीळ्वंते" (मुद्दल स्वीकारून कागद फाडून देण्याप्रमाणें) असा प्रयोग आला आहे. मुद्दल हा शब्द मराठींत ज्ञानेश्वरांपासून आजपावेतों लोकांच्या बोलींत जिवंत राहिला आहे. कानडी मात्र आपल्या या सुंदर शब्दाला पारखी होऊन 'अस्सल' अशा परकी शब्दावर आपली गरज भागवीत आहे, हें कानडीचें मुदलांत चुकलें ! मुदल् किंवा मोदल् म्हणजे प्रारंभ असा अर्थ असून व्यापार–व्यवहारांत या शब्दाला लक्षणार्थानें मूळ रक्कम असा दुसरा अर्थ प्राप्त झाला. नयसेनाच्या वरील अवतरणांत, कर्जव्यवहार संपल्यावर रोखा फाडून देण्याची आजची रीत त्यावेळींहि प्रचलित असल्याचें वर्णन आलें आहे. असे हे उल्लेख प्राचीन काळीं कर्णाट–महाराष्ट्रांत रूढ असलेल्या सामाजिक चालीरीतींवर महत्त्वाचा प्रकाश टाकतात.

म्हणी, वाक्संप्रदाय, शब्द वगैरे भाषाविषयक गुंतागुंतीप्रमाणेंच या दोन्ही देशांच्या सीमा व नांवें यांविषयींहि 'हीं कीं, तीं' अशा प्रकारची असलेली भ्रांति आरंभापासून आजपर्यंत चालू असल्याचें दिसून येतें. 'दक्षिण महाराष्ट्र' म्हणून महाराष्ट्रानें संबोधिलेल्या भागास 'उत्तर कर्नाटक' असें कानडी लोकांनीं संबोधावयाचें हा आजचा प्रकार कांहीं नवीन नाहीं. प्राचीन काळांतहि हचें दिसून येतें.

कर्णाटकचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री गोविंद पै हे प्राचीन भारतीय इतिहासाचे तज्ज्ञ म्हणून हिंदुस्थांतील मोठ्या विद्वानांत गणले जातात. कर्णाट–महाराष्ट्राच्या पुरातन इतिहासाचें आलोडन केलेल्या श्री गोविंद पै यांना हे दोन्ही प्रांत अभिन्न असून कर्णाटक म्हणजे महाराष्ट्र, आणि महाराष्ट्र म्हणजे कर्णाटक असें आढळून आलें. 'कर्णाट' शब्दाची व्युत्पत्ति त्यांनीं याच दृष्टीनें बसविली आहे.—

करं किंवा करु म्हणजे मोठा, महा; नाडु म्हणजे देश असा अर्थ लावून कर्णाट–महाराष्ट्र असा निर्णय श्री. गोविंद पै यांनीं घेतला आहे. आणि तारातंत्र नामक प्राचीन ग्रंथांत महाराष्ट्र देशाचें नांव कर्णाट असें दिलें असल्याचें व कर्णाट आणि महाराष्ट्र देश एकच होत असें उल्लेखिलें असल्याचें श्री गोविंद पै सांगतात.

या दृष्टीनें श्री. ए. मास्टर आय्. सी. एस्. यांचें पुढील वाक्य उल्लेखनीय आहे. 'Karu means not only tall but great and it seems highly probable that the Prakrit speaking inhabitants of the North of Deccan high lands, simply translated the word 'Karunadu' into 'Maharashtra' to designate the area from which they come (Indian Antiquery Vol. LVII p. 175).

महाराष्ट्राचे अद्वितीय विद्वान आणि संशोधक कीर्तिशेष डॉ. भांडारकर (थोरले) हे सुद्धां या प्रदेशाचा इतिहास लिहितेवेळीं त्याला काय नांव द्यावें यासंबंधीं घोटाळ्यांत पडले असावेत. महाराष्ट्राचा इतिहास म्हणावें तर बादामी, मळखेड, कल्याण यांसारख्या आजहि कानडी प्रदेशांत असलेल्या त्यांच्या राजांच्या राजधान्या; आणि कर्णाटचा इतिहास म्हणावें तर पुलकेशीचें राज्य पाहून हुएनत्सांग तेथील लोकांना महाराष्ट्रीय (महोलोच) असें म्हणतो. चालुक्य राष्ट्रकूटादि राजांचे सोयरीकसंबंध उत्तरेस विशेष; म्हणून या गोंधळांतून मुक्त होण्यास त्यांनीं आपल्या ग्रंथाला " History of Deccan " " दक्षिणापथाचा इतिहास " असें नांव दिलेलें दिसतें.

श्री पै, मास्टर, भांडारकर आदि आधुनिक ग्रंथकारांची जी स्थिति तोच प्रकार प्राचीन काळांतहि दिसतो. उपर्युक्त 'तारातंत्र' ग्रंथांत महाराष्ट्र-कर्णाटक अभिन्न असें लिहिल्याचा उलेख केला आहेच. श्री नंदलाल डे यांच्या प्राचीन स्थलनामांच्या कोशांत कर्णाटक म्हणजे कुंतल असें दिलें आहे. 'विक्रमांकदेव चरित' नामक काव्याला जोडलेल्या प्रस्तावनेंत बुल्हरनीं कुंतल म्हणजे कर्णाटक असें लिहिलें आहे. डॉ. बी. सी. लॉ यांचेंहि मत तसेंच आहे. बादामी चालुक्यांना कुंतलाधिपति म्हणावयाची परंपरा तमिळ देशांत होती (Tamil Lexicon कुंतल पहा.) बिल्हणानें 'विक्रमांकदेव चरितां' त कल्याणी चालुक्यांना 'कुंतलेन्दु' असें म्हटलें आहे. सातकर्णी राजांचा कुंतलाधीश

असा उल्लेख वात्स्यायनाच्या कामसूत्रांत एके ठिकाणीं आला आहे. या सातकर्णी राजांची राजधानी तर पैठण ! बुल्हरसारख्या मोठ्या दक्ष संशोधकाच्या मतें कुंतल म्हणजे कर्णाटक हें खरें असेल तर पैठण कर्णाटकांत आलें ! कर्पूर-मंजरी नाटकांत विदर्भाला कुंतल म्हटलें असल्याचें दिसतें. या ग्रंथाचें संपादन करतांना लिहिलेल्या टीकेंत डॉ. स्टेन कोनो यांनीं नर्मदा ते कृष्णा-तुंगभद्रेपर्यंत कुंतल देश असें म्हटलें आहे. (कर्पूरमंजरी नाटक, अंक १·१·२५; हॉवर्ड युनिव्हर्सिटी प्रकाशन, पृष्ठ १६०). ' वाचस्पत्य ' नामक महाकोशांत शक्तिसंगम तंत्रांतील एक श्लोक उद्धृत करून कुंतल देशाची व्याप्ति सांगितली आहे. ' कामगिरीम् समारभ्य द्वारकान्तम् महेश्वरी । श्रीकुंतलाभिधो देशः कथितः पूर्व-सूरिभिः ॥ कुंतल द्वारकेपर्यंत येऊन भिडलें ! विदर्भ हा, निःसंशय मूळ महाराष्ट्र असल्यानें विदर्भ जर कुंतल, तर नर्मदेपासून तुंगेपर्यंत महाराष्ट्रच ठरतो. म्हैसूरचा कांहीं भागहि कुंतलांत मोडत असल्याचें कानडी जैमिनीभारतावरून दिसतें. यामुळें कर्णाटाला स्वतंत्र अस्तित्व कोठें राहिलें ? एवढेंच नव्हे तर द्वारकेपर्यंत कुंतल म्हटल्यानें लाड, लाटकर हेहि निःसंशय महाराष्ट्रीय ठरतात.

बृहन्महाराष्ट्राची कल्पना अलीकडची आहे. पंचवीस तीस वर्षांमागें कांहींना हा शब्द सुचला. पण बृहत्कर्णाटक शब्द जुन्या एका शिलालेखांत आला आहे. (Epigraphica Indica Vol. III p. 87.) या बृहत्कर्णाटांत महाराष्ट्रहि समाविष्ट झालेला दिसतो. आतां लाट-कर्णाटाचे जुने उल्लेख पहाः— " जित्वा चोळ कलिंग सेउण बृहत् कर्णाट-लाटाधिपान् ॥ " ' लाट-कर्णाट-कन्हाट-कलिंग-कोंग वंगवेंगि ' (Ep. I. Vol. IV p. 261.) ' जित्वा वंग-तिलंग-गुर्जर-लसत्-कर्णाट-गौडाधिपान् '; ' कर्णाट-लाटोद्भटक्षोणीपालविडंबनः ' (Ep. I. Vol. XII p. 24.) या प्राचीन लेखांतून आलेले हे उल्लेख कर्णाट आणि महाराष्ट्र एकच होत असें दर्शविणारे आहेत. एवढेंच काय, खिस्ती शकाच्या आरंभीं लिहिल्या गेलेल्या एका कथेंत अशाच प्रकारचा समज रूढ असलेला दिसून येतो. शूद्रक राजानें वीरवर नांवाच्या आपल्या सेवकास लाट-कर्णाट असा संयुक्त देश दिल्याचें वर्णन आहे. " लाटदेशे ततो राज्यं सकर्णाटयुते नृप : " (१२-११-१०९.)

वरील लाट-कर्णाट या जोड शब्दानें दोन तऱ्हेचे अर्थ निघूं शकतातः—

(१) महाराष्ट्र व कर्णाटक त्याकाळीं अभिन्न होतें; महाराष्ट्र हा कर्णाटकांतच अंतर्भूत होत होता; किंवा (२) महाराष्ट्र त्यावेळीं वऱ्हाटांतच सामावलेला होता. वऱ्हाडाबाहेर अजून तो पसरूं लागला नव्हता. असा अर्थ केला नाहीं तर लाट-कर्णाट हा जोड शब्द अर्थविहीन ठरतो. लाट-कर्णाट हा शब्द कांहीं एकादोघांनीं वापरलेला नव्हे. ताम्रपट व शिलालेख लिहविणाऱ्या जबाबदार परराष्ट्र मंत्री, (संधिविग्रही) राजमंत्र्याकडून ही परिभाषा शेंकडों वर्षें उपयोगांत आलेली दिसते. लाट देशाची सीमा संपल्यानंतर आजच्यासारखा महाराष्ट्राच्या प्रदेशास आरंभ होत असता तर लाट शब्दापुढें एकदम कर्णाट शब्दाचा उपयोग करणें योग्य झालें नसतें. राजाराजांच्या देवघेवीमध्यें राज्याच्या सीमा जाणणाऱ्या जबाबदार व्यक्तींकडून हे शब्द वापरले गेले आहेत. हें जर खरें, तर लाट देश संपतांच कर्णाट देशाची सीमा सुरू होते असें म्हणणें क्रमप्राप्त आहे. पण आज तर तेथें कर्णाटाचा मागमूसहि दिसत नाहीं हें कसें? एकेकाळीं तेथें कर्णाट असल्याचे कांहीं अवशेष तरी आपणांस आज पाहावयास मिळतात काय? थोड्या बारकाईनें व सरळ तर्कशुद्ध बुद्धीनें पाहिलें असतां त्या भागांत प्राचीनकाळीं कर्णाटकाचें अस्तित्व असल्याचे बरेच पुरावे मिळतात आणि त्याचें विवरण यापूर्वी 'जुळीं भावंड' या प्रकरणांत व अन्यत्र आलेलें आहे.

वाल्मीकि रामायणांत या प्रदेशाचें "विदर्भान् ऋचिकान् चैव" असें वर्णन आलें आहे. महाभारतांत व हरिवंशांतहि ऋचिक किंवा ऋषिक देशाचें नांव येतें. हे ऋचिक (ऋषिक) म्हणजेच अशोकाच्या लेखांत आलेले रिष्टिक होत. रिष्टिक-रट-राठ-रट्ट हे कानडे असावेत अशा प्रकारचा निर्णय डॉ. आळतेकर यांनीं राष्ट्रकूटांवरील आपल्या ग्रंथांत निरनिराळीं कारणें देऊन दिलेला आहे. अशोकाच्या लेखांत रिष्टिकांबरोबर भोजकांचा उल्लेख येतो. रामायणांत ऋचिकांच्या समवेत विदर्भान् असें वर्णन आहे. भोजक राजे विदर्भाचे होत. यावरून खारवेलांच्या व अशोकाच्या लेखांतील भोजक म्हणजे विदर्भ देशाचे जन हें निर्विवाद सिद्ध होतें.

प्रथम-महाराष्ट्र म्हणजे वऱ्हाट असें सिद्ध झालेलें आहे. वऱ्हाटचे जन भोजक तर भोजकाच्याजवळ कोठेंतरी रिष्टिकांची वसाहत किंवा देश असला पाहिजे. अशोकाच्या शासनांतील भोजक-रिष्टिकादि उल्लेखावरून डॉ. बी. सी.

लॉ यांनीं या दोघांहि जनांचे देश जवळजवळच असले पाहिजेत असा निर्वाळा दिला आहे.

खानदेशाला एकेकाळीं ऋचिक–ऋषिक असें नांव होतें. आणि हे ऋचिक किंवा ऋषिक लोक म्हणजे भोजकांचे आप्तबांधव रिस्टिक किंवा राष्ट्रिक हेच असावेत असें म्हणावें लागतें. कारण विदर्भाच्या भोजकांचे शेजारीं खानदेशाशिवाय दुसरीकडे या नांवाचे लोक असल्याचें दिसून येत नाहीं. ऋचिकदेश, गोपदेश, अश्मकादि तात्पुरतीं आलेलीं नांवें मागें पडून मूळ जनवाचक कन्नदेश–खानदेश या नांवानेंच पुन्हां डोकें वर उचललें. वऱ्हाट–मऱ्हाट हें नांव या वरील तर्कास दुजोरा देणारें आहे. विदर्भासारखें दुसरें नांव थोडा काळ रूढ केलें गेलें. पण नवीन रूढ होऊं बातलेलें नांव मागें पडून मूळ मऱ्हाट (वऱ्हाट) हें नांवच आजपर्यंत तगून राहिलेलें आहे. त्याचें भाषांतर 'झाडिमंडळ' हें सुद्धां ग्रंथांतरींच राहिलें!

अशा रीतीनें ज्यांच्यामुळें या प्रदेशाला हीं नांवें आलीं ते, कर्णाट–मऱ्हाटचे पूर्वज, वेद व भारतकालीन यदु-तुर्वसु, अशोककालीन रिष्टिक भोजक, रामायणांतील ऋषिक भोजक व मूळ हट्टिकार (कण्णजन व मरहट्टे)–हे अतिप्राचीन काळापासून अतिशय जवळच्या नातलगांसारखे–जुळ्या भावंडांप्रमाणें राहिले आणि वाढले हें स्पष्ट होत आहे.

आतां हें चित्र पहा

ज्या इतिहासानें या दोन्ही जनांतील जिव्हाळ्याचे घनिष्ठ संबंध वरीलप्रमाणें प्रत्ययास आणले व दोहोंची एकरूपता सिद्ध केली त्याच इतिहासानें दाखविलेल्या पुढील घटना अभ्यसनीय आहेत. त्याच घटना आजच्या निकृष्टतेस कारणीभूत होऊन बसल्या आहेत. कालाच्या पोटांत अनेक परस्परविरुद्ध गोष्टी गडप झालेल्या असतात. काल त्यांचा निरपेक्ष साक्षी आहे. पण मानव मात्र त्यांना आपल्या सद्यःकालीन स्वार्थासाठीं राबवूं पाहात असतो. माणूसहि अशा घटनांकडे जर कालाप्रमाणें तटस्थ, निरपेक्ष बुद्धीनें, 'गुणा गुणेषु वर्तन्ते' दृष्टीनें पाहील तर त्यांतून जें विशाल सत्याचें दर्शन त्याला होईल तेंच त्याला माणुसकीच्या उच्च पायरीवर नेण्यास उपयुक्त ठरेल. यासाठीं आतां मऱ्हाट–कर्णाटच्या मूळ

जनांतील जिव्हाळा आटून आजची यूयम् यूयम्–वयम् वयम् अशी वृत्ति कां निर्माण झाली याच्या कारणांकडे वळूं.

ऐतिहासिक दृष्ट्या देवगिरी आंणि हळेबीडु यादवांच्या यादवीपासून या वितुष्टाला ऊत येऊं लागला असें दिसून येतें. पुढील काळीं दोन्ही प्रांतांतील राज्याभिमानाच्या व प्रांताभिमानाच्या राजकारणास रंग चढूं लागला तसतसें या वितुष्टतेचें स्वरूप जास्तच उग्र होत गेलें; पण अशा मनोवृत्तीमुळें दोन्ही प्रांत आपला खरा इतिहास आकलन करण्यास कसे असमर्थ झाले आहेत तें यापूर्वी प्रत्येक प्रकरणांत दिग्दर्शित केलेंच आहे. अर्थात् त्या सर्वांचें सांगोपांग विवेचन होणें जरूर आहे. पण तें केवळ एका व्यक्तीला झेपणारें काम नव्हे. अर्थात् या सर्वांचा आमूलाग्र अभ्यास होऊन तशा प्रकारचा महाग्रंथ तयार होण्यास सर्व तऱ्हेची अनुकूलता असलेल्या (धन, जन आणि ग्रंथसंग्रह) विश्वविद्यालया-सारख्या संस्थांनींचपुढें येणें जरूर आहे. असो.

मरहट्टाचा महाराष्ट्र कसा झाला ?

रिष्टिक भोजक हे खानदेश आणि वऱ्हाडांत होते आणि हेच प्राचीन कर्णाट–मऱ्हाटाचे ऐतिहासिक काळांतील पूर्वज. हें जर खरें असेल तर खान-देशापासून कर्णाटक घसरत घसरत कृष्णेपर्यंत कसा मागें हटला किंवा मऱ्हाटचें (वऱ्हाटचें) महाराष्ट्र कसें झालें ?

याचें सरळ उत्तर असें कीं आर्यीकरणाच्या जबरदस्त ऐतिहासिक रेट्यांत मऱ्हाट–महाराष्ट्र झालें. महाराष्ट्राचा विस्तार होत होत कर्णाटहि महाराष्ट्राच्या म्हणजे आर्यीकरणाच्या कक्षेंत येत गेलें. ऐतिहासिक काळांतील कांहीं उल्लेखां-वरून सामान्यपणें दर २००–२५० वर्षांनीं महाराष्ट्राच्या सीमा दक्षिणेकडे एकेक नदी ओलांडीत असलेल्या दिसतील :–

(१) आर्यावर्त नर्मदेला संपतो असें मनुस्मृति वगैरेंवरून निश्चित-पणें समजतें. तरीपण वैदिक ऋषींचा संबंध वेदकाळापासूनच दक्षिणा-पथाशीं होता असें अगस्ति ऋषीच्या कथा दर्शवीत आहेत. अगस्तीनें तमिळ देशापर्यंत आर्य संस्कृतीचा प्रसार केल्याचें, त्या देशांतील रूढ कथा व प्राचीन परंपरा सुचवीत आहेत. वऱ्हाटाचा विदर्भ या नांवानें

महाभारतापूर्वीपासून उल्लेख आढळतो. दक्षिणापथांत नर्मदेच्या दक्षिणेस आर्यांची प्रथम वसाहत वऱ्हाटांत झाली असें सर्व संशोधकांचें मत आहे. नर्मदा नदी एकेकाळीं आर्यावर्ताची दक्षिण सीमा गणली जात असावी यांत शंका नाहीं. पण "गोदावर्याः दक्षिणे तीरे" या संकल्पमंत्रांत नर्मदा नदीचें नांव खरोखर असावयास पाहिजे होतें. यावरून या मंत्ररचनाकालीं, आर्यावर्त गोदेपर्यंत येऊन भिडला होता असें दिसतें.

(२) दुसऱ्या पुलकेशीच्या वेळीं, हुएनत्सांग हा चिनी प्रवासी या देशांत आला होता. फ्लीटच्या मतें 'मोहोलोचाची' एक राजधानी नाशिक असावी. यावरून सातव्या शतकापर्यंत महाराष्ट्राचा विस्तार गोदेपर्यंत झाला होता असें म्हणावें लागतें.

(३) अमोघवर्ष–नृपतुंग या राष्ट्रकूट राजाच्या नावानें प्रसिद्ध असलेल्या कविराजमार्ग नामक ग्रंथांत कर्णाटाची मर्यादा गोदेपर्यंत होती असें सांगितलें आहे. 'कावेरियिंदमा गोदावरि वरं इर्द नाडदा कन्नड' या आधाराबरोबर नाशीक जिल्ह्यांतील कानडगौळी व वीरगल्लुहि हिशेबांत धरावे म्हणजे 'गोदेपर्यंत कर्णाट होता' हें विधान काव्यांतील अतिशयोक्तीचें नव्हे याची खात्री पटेल.

(४) यादव काळापर्यंत कर्णाटकाची उत्तर सीमा गोदा होती असें म्हणावयास कांहीं आधार मिळतात. तरीपण आंतल्या आंत कर्णाटकाचें अभावितपणें महाराष्ट्रीकरण चाललेंच होतें हेंहि तितकेंच खरें.

(अ) महानुभाव लीळा चरित्रांत पुढील उल्लेख आहे :

साठि लक्ष महाराष्ट्र। तेही वसविले गंगातीरु। त्र्यंबकूवेरूही ॥

आर्यांना गोदा नदी गंगा नदीच वाटावी हें स्वाभाविकच आहे !

(ब) ऐसे युगीं परी कळी। आणि महाराष्ट्र मंडळी। श्री गोदावरीच्या कूलीं ॥ — ज्ञानेश्वरी (१८–१८–३)

(५) (अ) मुसलमानी अमदानींत बहामनी राजे वऱ्हाडी (मराठी) लोकांनाच नोकऱ्या अधिक देत. कारण विजयनगरच्या कानडी राज्याशीं

झगडण्यास कानडी लोकांचा उपयोग होणार नाहीं हें स्पष्टच होतें. (मराठी ज्ञानकोश पहा. महाराष्ट्र सारस्वत वगैरे ग्रंथांतूनहि या काळीं पुढें आलेल्या महाराष्ट्रीयांची माहिती मिळते.)

(ब) कै. पांगारकरांनीं आपल्या एका छापील व्याख्यानांत पुढील माहिती दिली आहे : विजापूरच्या अदिलशहाच्या दरबारीं मुकुंदराव नामक एक सरदार होता. या मराठा सरदाराच्या बहिणीवर फिदा होऊन अदिलशहानें तिला आपल्या झनानखान्यांत आणलें. पुढें तिच्यामुळें विजापूर दरबारीं मराठीला महत्त्व आलें.

विजापुरापर्यंत मराठी भाषा आली या श्री पांगारकरांच्या माहितीला दुजोरा देणारा उल्लेख एका जुन्या कानडी कैफियतींत मिळतो. या कैफियतीचें नांव 'आर्काड संस्थानद कैफियत्तु' (कर्णाटक साहित्य परिषद् पत्रिका Vol. IX पृ. १३३–१३७)

पेनुगोंडे कर्णाट राज्य; विजापूर महाराष्ट्र राज्य !

राक्षसतागडी युद्धांत पराभव पावून विजयनगरच्या राजांनीं दक्षिणेस पेनुगोंड्यास आपली राजधानी नेली. विजयनगरच्या राजांना "कर्णाट सिंहासनाधीश्वर" असें बिरुद होतें. त्यामुळें त्यांची राजधानी असेल तेथें कर्णाट राज्य ! पण पेनुगोंडे हें तेलगु प्रांतांत येतें. अशा रीतीनें कर्णाट परागंदा झालें, 'कर्णे अटति' हें खरें ठरलें, विजापुरापर्यंत महाराष्ट्र आला !!

महाकवि मुक्तेश्वरांची समाधि तेरवाडला कुरुंदवाडाजवळ आहे. 'मुद्गल' हें जर त्यांचें आडनांव ठरेल तर हें कानडी घराणें म्हणावें लागेल. त्यांचें कुलदैवत सोनारीचा भैरव. सोलापुराचें पूर्वीचें नांव सोन्नलापूर असें असल्याचें जुन्या कानडी साहित्यावरून दिसून येतें. सोन्नलापूर सोनारपूर असणें शक्य आहे. श्री एकनाथांची भार्या विजापूरची होती अशी माहिती श्री. पांगारकर देतात.

(क) कर्णाटांतील ग्रामनामांत मिळणारा पुरावाहि विचारार्ह आहे. धारवाड जिल्हाच काय, म्हैसूरपर्यंतहि "आरे" जन असल्याचें आढळून येतें. उदा: आरे कुरहट्टी; आरे होसूर; आरे मल्लापूर; आरे लक्कमापूर वगैरे !

(ड) सोरब तालुक्यांतील (म्हैसूर) वीरगळावरील लेख "आरिय

नायकर् मुनिदु...तुरुवं कोंबुवल्ली (एदुरिसि) मल्लिशेट्टी माडिद." (इ. स.१२२५)

तुरुवं म्हणजे गोसमुदाय पळवून नेत असतां त्या युद्धांत आरियांच्या बरोबर लढून वीर-स्वर्ग पावलेल्या वीरांचे अशा प्रकारचे पुष्कळ लेख त्या भागांत मिळतात. (E. Carnatica, VIII 86.174; IX Bn, 53; XI Dg. 125; XII pg. 48.)

तेराव्या शतकारंभींच मराठे कर्णाटांत कोठपर्यंत पसरले होते हें वरील गोष्टींवरून चांगलें ध्यानांत येणार आहे.

यांचेंच प्रत्यंतर आणखी दुसऱ्या एका रीतीनेंहि मिळणार आहे.

आपला देश तो पवित्र, दुसऱ्याचा तो भ्रष्ट, पतित ही मानवाची मनोवृत्ति जगांत सर्वत्र सारखीच प्रकट झालेली आहे :

(१) पंचनद देश पवित्र असें एके काळीं वाटत असे. पण पुढें आर्यावर्ताच्या सीमा विंध्य पर्वतापर्यंत आल्या. पारियात्र असें त्या पर्वताचें नांव आहे. दक्षिणापद–दक्षिणापथ ही "अयज्ञीय भूमि" ठरली होती; अपवित्र, बहिष्कृतांची भूमि ठरली होती.

येथील लोकांना "संकीर्णाचारधर्माः, पशुधर्माः, पापाः, म्लेंच्छाः" वगैरे शेलक्या विशेषणांनीं वर्णिलेलें आहे. महाभारत, मनुस्मृति वगैरे ग्रंथांतून असे उतारे मिळतील.

(२) 'भारतीय भूघटना' नामक एका ग्रंथांत या देशाच्या भूमीची सात्त्विक, राजस, तामस, अशी विभागणी केली आहे ती पहा (महाराष्ट्र साहित्य पत्रिका. Vol. II पृ. ८५).

हिमवद्विंध्ययोर्मध्ये सात्त्विकं भूतलं स्मृतम् ।
नागरस्तु स्मृतो देशो हिमवद्विंध्यमध्यगः ॥

विंध्यशैलादि कृष्णान्तं राजसं परिकीर्तितम् ।
तुंगकृष्णादि कन्यान्तं तामसं भूतलं स्मृतम् ॥

कृष्णाया दक्षिणो भागः तामसः परिकीर्तितः ।

आपला तो सात्त्विक, फारच झालें तर राजस, नागरदेश; आणि कृष्णेच्या–फार तर तुंगेच्या दक्षिणेस तामस असंस्कृतांचा देश !

या ग्रंथरचनेचा काळ कोणता असावा हें येथें कळण्याजोगें आहे. कृष्णेपर्यंत महाराष्ट्रसीमा आल्या आहेत. त्या तुंगेपर्यंत पसरूं पाहात आहेत–अशा वेळीं हा ग्रंथ झाला असावा. कारण तुंगेपर्यंत एकदां राजस भूमि ठरते, तर पुन्हां कृष्णानदीच राजस भूमीची दक्षिण सीमा असें सांगितलें जातें.

पण १२००–१३०० च्या सुमारास झालेल्या हरदत्तानें भारताची सीमा निःसंदिग्ध शब्दांत सांगितली आहे ती अशी:–

"लोकोऽयं भारतं वर्षं शरावत्यास्तु योऽवधेः।" म्हणजे या सुमारास आर्यावर्ताची सीमा शरावती नदी (गेरसप्पा) पर्यंत येऊन भिडली. याचा अर्थ असा कीं, महाराष्ट्र येथपर्यंत पसरला.

महाराष्ट्रीकरण कसें झालें ?

हें महाराष्ट्रीकरण कसें घडलें याचें रहस्य पुढील घटनांवरून कळून येणार आहे.

(१) वेदकालीन संस्कृतांत संस्कृतेतर शब्द, कांहीं द्राविड भाषावर्गीय शब्द घुसले आहेत; त्यावरून त्या काळीं संस्कृतेतर भाषा बोलणारे लोक असावेत हें उघडच आहे. वेदांतून आणि उपनिषदांतून 'चंद्र','मट्ची','अलर्क' सारखे शब्द आहेत. हे परभाषेंतील असतील तर या शब्दांनीं युक्त असे ग्रंथ ज्या ठिकाणीं रचले गेले त्या पंचनद देशांतच या जनांची वस्ती असली पाहिजे; आणि आर्यांचा या जनांशीं संपर्क तेथेंच पहिल्यानें आला असला पाहिजे. चंद्र-मस्, तुर्-वसु सारखे दोन भिन्न भाषांतील शब्दांनीं बनलेले जोडशब्द त्या काळीं रूढ झाले हें खरें असेल तर त्या तथाकथित द्राविड वर्गाच्या अर्यीकरणास ऋग्वेदकाळींच सुरवात झाली हें निश्चित ठरतें.

(२) दोन भिन्नभाषिकांचा संबंध येऊन मिश्रणास आरंभ झाल्यावर परस्परांच्या भाषेचे एकमेकांवर कसे व किती परिणाम होतात याचा तज्ज्ञांकडून सूक्ष्म व सांगोपांग तुलनात्मक अभ्यास झालेला आहे. त्याच्या साहाय्यानें आपलें

हें कोडें बरेंच उलगडतें. भाषिक पुरावा या प्रकरणांत याचें थोडें विवेचन आलें आहे.

(३) ऐतिहासिक काळांतील कांहीं गोष्टी विचारार्ह आहेत :

(i) वैवाहिक संबंधांमुळें दक्षिणेंत महाराष्ट्रीकरण झपाट्यानें झालें. अगस्तीनें विदर्भकन्या लोपामुद्रेशीं विवाह केला. शुक्राची मुलगी देवयानी ययातीची बायको झाली. या प्रकारच्या इतिहासपूर्व कालीन अनुलोम–प्रतिलोम विवाहांच्या कथा विशेष जमेस न धरतां अलीकडील कांहीं घटनांचाच आपण विचार करूं.

(ii) वैवाहिक संबंधांमुळें कानडी घराणीं आधीं प्राकृत व नंतर मऱ्हाटी बनलीं. शातवाहनांचें असें हें एकच उदाहरण नव्हे. चालुक्य, कदंब वगैरे राजघराण्यांच्या नांवांशीं साद्दश्य असलेलीं आडनावें मऱ्हाट्यांत आहेत, पण कानडी जनांत तीं राहिलीं नाहींत. राष्ट्रकूट राजघराण्यांत मध्यहिंदुस्थानांतील त्रिपुरीच्या चेदी वंशांतील मुलींशीं लग्नें करण्याची रूढि दोन तीन पिढ्यांपर्यंत चालत आलेली होती. याप्रकारें चालुक्यादि राजघराण्यांत उत्तरेकडील राण्यांबरोबर आलेल्या प्राकृत भाषेनें कर्णाटाच्या राजधान्यांत येऊन आधीं अर्धें व पुढें पूर्ण सिंहासन काबीज केलें.

(iii) शातकर्णी राजांच्या अंतःपुरांत प्राकृत भाषा बोलणाऱ्या स्त्रिया असत. 'श्रूयते च कुंतलेषु सातवाहनो नाम राजा, तेन प्राकृतभाषात्मकं अंतःपुरमेवं वर्तितो नियमः' अशी राजशेखर कवि माहिती देतो. 'शातकर्णींना संस्कृत माहीत नव्हतें, त्यांनीं प्राकृताला आश्रय दिला' असें डॉ. इरावतीबाई लिहितात. आर्यमिश्रण असलेल्या मंगोल शातवाहनांत हाल, पुलिमायीसारखीं कानडी नांवें कशीं? आणि त्यांनीं कर्णाटकांत आपलें मूळ माहेरघर असें कसें नमूद करून ठेवलें? डॉ. आर्. डी. बानर्जी यांनीं हें घराणें कानडी आहे असें आपल्या ग्रंथांतून स्पष्ट निर्देशिलें आहे (Pre-historic, Ancient and Hindu India). डॉ. सुकथनकर आणि डॉ. बानर्जी या बड्या संशोधकांनीं पुढें मांडलेल्या ताम्रपटासारख्या पुराव्याशिवाय पुढील कांहीं आंतरिक गोष्टीहि महत्त्वाच्या आहेत.

(iv) "वासिष्ठी-पुत्रस्य" यासारखे आईच्या नांवावरून वंश सांगणारे यांचे लेख आहेत. हें "मातृप्रधान कुटुंब-पद्धतीचें द्योतक आहे" असें डॉ. इरावतीबाई कर्वे म्हणतात. स्त्रियांच्या नांवावरून कूळ सांगण्याची रूढि आजहि कानडी लोकांत आहे. अशा प्रकारचे कांहीं शिलालेख मिळतात. प्रा. कुंदणगार यांनीं संपादिलेल्या संग्रहांत याचें विवरण दिलें आहे. पण डॉ. इरावतीबाई यांच्या मतें शातवाहन आर्यमंगोल मिश्र वंशाचे असावेत आणि ते मध्य आशियांतून आलेले उपरे लोक आहेत. डॉ. इरावतीबाईंनीं आपलें मत सिद्ध करण्यासासाठीं दोन गोष्टी करणें जरूर आहे. (१) डॉ. सुकथनकरांना मिळालेला ताम्रपट खोटा आहे किंवा त्याचा अर्थ निराळा आहे हें दाखवावें. आणि (२) आर्यांत किंवा मंगोलांत मातृप्रधान कुटुंब-पद्धति होती असें सिद्ध करावें.

(v) शातकर्णी किंवा शातवाहन या नांवांचा अर्थ अजून अनिर्णीत आहे. तरीपण प्राचीन तमिळ ग्रंथांतून येणारा एक उल्लेख निःसंदिग्ध निर्णायक नसला तरी किंचित् अर्थसूचक आहे. शातकर्णींना "नूरुवर् कण्णर्" असें संबोधलें आहे. शंभर कण (जन) असा याचा अर्थ होतो.

(vi) हा संदिग्ध उल्लेख सोडला तरी शातकर्णींच्यीं कांहीं नांवें अर्थपूर्ण आहेत. या घराण्यांत "हाल" नामक प्रसिद्ध राजा झाला. हालप्पा आदि नांवें कानडी लोकांत प्रचलित आहेत. यांच्या वंशीं पुलिमायी नांवाचे राजे होते. वाघाला कानडींत पुलि असें नांव आहे. शूर पराक्रमी या अर्थीं पुलि हा वाक्प्रचार (Idiom) कानडींत आहे. 'पुलि'वरून नांवें घेतलेले राजे कर्णाट इतिहासांत बरेच आहेत. महाराष्ट्राला चालुक्य पुलिकेशी या नांवाचा विसर पडणें शक्य नाहीं.

(vii) महाराष्ट्रीकरणांत राजे तर खरेच पण त्यांजबरोबर त्यांचे सामंतहि सावंत झाले. कानडी काव्यांतून वगैरे वर्णिलेले 'मन्नेयरु' माने बनले.

हळेबीडु होयसळांच्या दरबारीं रचलेल्या कानडी काव्यांत प्रतिहारीच्या तोंडीं मराठी वाक्य कसें याचा उलगडा येथें होत आहे. हस्तिशिक्षक राऊत, मराठी बोलत. राजकुमारांचे शिक्षक तर संस्कृत-प्राकृत जाणणारे उभय भाषाविशारद असणें हें जरूरच होतें.

आधीं 'प्राकृत' म्हणून पोसली गेलेली भाषाच पुढें मराठी भाषा-निर्मितीस व तिच्या वाढीस आवश्यक अशी पार्श्वभूमि निर्माण करण्यास कारण झाली.

वरील विवरण, मुख्यतः राजघराण्यांभोवतालचें वातावरण मराठीच्या उद्गमास व विकासास कसें कारण होत गेलें हें दाखविण्यासाठीं केलेलें आहे. अर्थात् 'यद्यदाचरति श्रेष्ठः तत्तदेवेतरो जनः।' आज प्रतिष्ठित जें बोलतात तेंच उद्यां सामान्य जनांच्या तोंडीं होतें.

(४) याशिवाय लाट–कर्णाटांत सामान्यजनांपर्यंत प्राकृताला नेऊन पोंचविणारी दुसरीच एक महत्त्वाची गोष्ट आहे तिकडे अद्याप कोणाचें फारसें लक्ष गेलेलें नाहीं असें दिसतें.

जैनांनीं येथें आपल्या मतप्रचारार्थ देशभाषेंतून ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. कर्णाटांत कानडी साहित्यांत त्यांनींच प्रथम उत्तमोत्तम ग्रंथ रचले. या देशभाषेबरोबर आपल्या पाठशाळा व तीर्थक्षेत्रांतून प्राकृत भाषेंतील जैन-धर्मग्रंथांच्या अध्ययन–अध्यापनाची सोय केली.

अशा रीतीनें प्राकृत भाषा खेड्यापाड्यापर्यंत जाऊन पोंचली. कानडींत तद्भवांची रेलचेल झाली. प्राकृतांत देशी नांवाखालीं कानडींतून पुष्कळ शब्द शिरले. हेमचंद्राच्या देशी नाममालेंत आलेल्या कानडी शब्दांची यादी डॉ. उपाध्ये यांनीं तयार केली आहे.

हळूहळू याचा परिणाम आज असा झाला आहे कीं, लाटदेशांत कधीं काळीं मूळ भाषा दुसरी होती हें तज्ज्ञांचें म्हणणेंसुद्धां कांहींना खरें वाटत नाहीं! पण ही गोष्ट डॉ. स्टेन कोनो यांना संशोधनानें सिद्ध करावी लागली आहे : "The substrata, over which, Gujarati and Marathi have spread was Dravidian." येथें द्रविडीयन म्हणजे कोण एवढाच आज प्रश्न आहे.

लाट देशांतून मूळ देशभाषा संपूर्ण नष्ट होऊन प्राकृत भाषेनें ती जागा पटकाविली. कर्णाटाच्या उत्तर सीमाहि अशाच कारणानें कोलमडल्या व कानडी भाषा प्राकृत शब्दवैपुल्यानें, प्राकृतसम बनली.

(५) कर्णाटाच्या जनतेनें प्राकृत व संस्कृताचें प्रेमानें स्वागत केलें म्हणूनच भाषेंत येवढा मूलगामी बदल होऊं शकला. संस्कृत व प्राकृताकडील ओढीनें या कानडी लोकांना आपल्या भाषेंत आनंद वाटेना. (याच्या उलट तमिळांनीं मात्र मोठ्या हेव्यानें आपल्या वर्णमालेंत आमूलाग्र बदल होऊं दिला नाहीं. यामुळें संस्कृत–प्राकृत शब्दांना तमिळ वेष धारण करूनच त्या भाषेंत जाणें भाग पडलें. "दंत" शब्द तमिळ लिपीमुळें त्या भाषेंत 'तंद' होतो! तमिळांना आपल्या भाषेंत मूलगामी बदल होणें खपलें नाहीं.) कानडींत संस्कृतची पूर्ण वर्णमाला आली. संस्कृत व प्राकृत शब्द मूळ स्वरूपांतच कानडींत प्रतिष्ठित झाले.

संस्कृत व प्राकृत शब्द मिश्र करण्यानेंच भाषेची गोडी जास्त वाढते या मताला अधिक मान्यता मिळाली. अभिजात जुन्या कानडींत लिहावें असें मानणारा पक्ष नामशेष झाला. कवींना आदर्श असा राजमार्ग घालून देण्याकरितां निर्माण झालेल्या 'कविराजमार्ग' नामक ग्रंथांतील याविषयींचें मत नमूद करण्यासारखें आहे. उच्चारास कठिण असे विशेष संयुक्ताक्षरी शब्द वगळून बाकीचे 'समसंस्कृत' शब्द घेतले पाहिजेत असें या ग्रंथकाराचें मत आहे. याला जुन्या कानडी-विषयीं बिलकूल आदर नाहीं. त्या जुनाट भाषेंत लिहिण्यांत आनंद नाहीं असें सांगतेवेळीं या कवीनें दिलेल्या उपमेंत त्याच्या मनांतील हा तिरस्कार संपूर्ण व्यक्त झाला आहे. त्या 'पळगन्नड' मध्यें लिहिण्यांत 'जरद्वधू-सुरत-सुखां' तील रसिकता दिसून येते असें तो म्हणतो! (कविराज मार्ग १·५०)

कविराजमार्ग हा ग्रंथ राष्ट्रकूट राजाश्रयाखालीं लिहिला गेला आहे. नवव्या शतकाच्या आरंभीं राष्ट्रकूटांच्या दरबारींच सुरू झालेल्या या भाषा-क्रांतीनें, एका रीतीनें, मराठीच्या उदयाची गुढी उभारली असें म्हणावयास हरकत नाहीं. कानडी साहित्याच्या पुनरुज्जीवनाचे जैनांचे हे प्रयत्न परिणामतः मराठीच्या वाढीस अनुकूल ठरले.

(६) जैनेतरांत, ब्राह्मणांना कानडीविषयीं आपुलकी उत्पन्न होईपर्यंत चौदावें शतक उजाडलें. कुमारव्यास, रुद्रभट्ट, लक्ष्मीश वगैरेंसारख्यांनीं उत्तम काव्यें लिहिलीं. पण तींहि संस्कृत–प्राकृत (मराठी) प्रचुर! नवव्या शतकांत कानडी भाषेचा नवा पाया घालतेवेळीं, ही भाषा संस्कृत–प्राकृतोद्भव आहे

अशा मुळांतच झालेल्या चुकीच्या समजुतीचे हे परिणाम आहेत. कानडींतील मूळ जुने शब्द मागें पडून त्या जागीं आर्यभाषेचे शब्द प्रतिष्ठा पावूं लागले.

(७) ब्राम्हणांत कानडीविषयीं पुढील काळांत कांहीं थोडी आपुलकी, उत्पन्न झाली; ती प्रादेशिक अभिमानाची आवश्यकता भासूं लागल्यानंतरची आहे. वीरशैवांनीं मतप्रसाराकरितां कानडींत मोठें साहित्य निर्माण केलें. जैनांनंतर वैदिकांना टक्कर देणारी ही परंपराहि, ब्राम्हणांना कानडीविषयीं अनास्था वाटण्यास कारण झाली. तरी पण पामरजनांना वैष्णव भक्तिमार्गाकडे वळविण्याकरितां माध्वदासवर्यांना कानडींत ग्रंथरचना करणें जरूर झालें आणि त्यांनीं तशी खूप ग्रंथरचनाहि (दासरपदगळु) केली पण माध्वांतील व्यास-कूटनामक गीर्वाणवाणीच्या अभिमान्यांना हें पसंत नव्हतें व नाहीं. हे दासपंथाला टाळकरी म्हणून कमी दर्जाचे लेखितात.

तेलंगणांतील ब्राम्हणांना तेलगु भाषा सोवळ्यांत चालते. देवाच्या पूजेचे मंत्र त्या भाषेंतले असले तरी ते आह्निकाच्या वेळीं म्हणण्यांत तेथील ब्राह्मणांना कांहीं गौण वाटत नाहीं. असें वाटूं नये याकरितांच तेलगु भाषा कण्वमुनिप्रणीत आहे अशी दंतकथाहि प्रचारांत आणल्याचें दिसतें. तमिळ भाषेचे प्रवर्तक अगस्ति ऋषि,अशी समजूत असल्यानें ती भाषाहि ब्राह्मणांना पूजेंत चालते.

पण सोवळ्यांत असतांना कानडी भाषा बोलल्यानें ओवळें होण्याची भीति कानडी ब्राह्मणांना वाटली ! अशीं उदाहरणें दिवसेंदिवस कमी होत असलीं तरी आज मासल्याला मिळणारच नाहींत असें नाहीं. श्री पुरंदर-दासवर्यांनीं कानडींत रचलेले भजन ग्रंथ पूजेसाठीं संस्कृत मंत्रांच्या पुस्तकांबरोबर ठेवलेले न खपून व्यासरायस्वामींच्या कांहीं शिष्यांनीं ते खालीं फेकले अशी एक आख्यायिका आहे !

माध्व उत्तरादि मठाच्या स्वामींचें पंचांग कानडी भाषेंत पण बालबोध लिपींत छापण्याची वहिवाट होती. कानडी लिपीवर सुद्धा बहिष्कार असल्याचें हें निदर्शक आहे.

कानडी भाषा ऋषिप्रणीत बनविण्याची येथील ब्राह्मणांना आवश्यकता भासलेली नाहीं; आधीं संस्कृत, नंतर ती आत्मसात् करणें अशक्य झाल्यावर

प्राकृत व पुढील काळीं मराठीकडे येथील ब्राह्मणांचा ओढा असलेला दिसतो.

यामुळें महाराष्ट्राजवळील कर्णाटांत मराठीच्या प्रवेशाला मुभा मिळाली. तेलंगणाकडील कर्णाटांत तेथील ब्राह्मणांनीं तेलगूस जवळ केलें. तेलगु भाषेंतील आदि कवि नन्नय भट्ट यास कर्णाट पंडित नारायण भट्टानेंच 'तेलगु' भाषेंत भारत रचण्यास उत्तेजन देऊन तें लिहविल्याचें प्रसिद्ध आहे. जैनांचे ग्रंथ कानडींत असल्यानें जर ब्राह्मण कानडी शिकतील, कानडीप्रेमी बनतील तर त्यांचा वैदिक (हिंदु) धर्माभिमान शिथिल होईल अशी ब्राह्मण वर्गाला साधार भीति होती. जैनभारताच्या प्रचारानें व्यासभारत कर्णाटांत मागें पडलें. कुमारव्यासासारखा सुद्धां पंप भारताच्या आहारीं गेला आहे. व्यासभारताहून निराळ्या कथा पंपाकडून त्यानें उचलल्या आहेत. या आपत्तींतून सुटण्याकरितां ब्राह्मणवर्ग कानडी भाषा शिकण्यास विरोध करीत असावा. कानडी नारायणभट्टानें कानडी भारताचे दुष्परिणाम घालवण्याकरितां नन्नय भट्टास तेलगूंत लिहिण्यास आज्ञा केली.

(८) हिंदुधर्माभिमानी वातापीच्या चालुक्यराजांच्या गुजरात व तेलंगणांतील शाखांनीं त्या त्या प्रांतांत तेथील भाषेसच राजाश्रय देऊन ग्रंथ लिहविले, परंतु वातापी घराण्याची कानडी भाषा त्या प्रांतांत टिकविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नाहीं.

कोल्हापूर, सांगली, सातारा भागांत कानडी बोलणाऱ्यांना "तुम्ही जैन काय?" असें विचारलें जातें याचा अनुभव प्रस्तुत लेखकास आहे. साताऱ्याकडील सुप्रसिद्ध जैन-पाटील घराण्यांत म्हाताऱ्या बायांच्या तोंडीं आजहि कानडी भाषा आहे पण पुढील पिढींत मात्र कानडीचा गंधहि दिसत नाहीं.

कानडींत "देशिक" शब्दाला अनाथ असा अर्थ प्राप्त झाला! 'देशी' म्हणजे जाडेभरडें; 'विलायती' म्हणजे उंची ही आजची मनोवृत्ति येथें आठवावी. मराठींतील 'राठ' (रट्ट, राष्ट्रिक) शब्दांतील व्यंग्यध्वनि वरील कानडी वाक्प्रचाराला दुजोरा देत आहे.

कर्णाटांतील हिंदूंची विशेषतः ब्राह्मणवर्गाची ही आंतील मनोवृत्ति ह्रिशेषांत धरल्याशिवाय सबंध कर्णाट प्रांत द्विभाषिक कसा याचा उलगडा होणार

नाहीं. कर्णाटांत तेलगू, तमीळ, अथवा मराठी यांपैकीं एक तरी भाषा समजत नाहीं असा, केवळ कानडीच कळत असलेला भाग फारच छोटा असा आहे. महाराष्ट्रालगतचे मराठी झाले. तेलगूलगतचे राष्ट्रिक रट्ट–रड्डी, आंध्र झालेले दिसतील; दक्षिणेंत रामानुज–मताचा विशेष प्रसार झाला; दत्त व विट्ठल परंपरे-बरोबर कर्णाटांत जसें मराठी आलें तसा रामानुजमताबरोबर तेलगु किंवा तमिळ भाषेला प्रवेश मिळाला. अशाच कारणांनीं **'कर्नाटकराज्यलक्ष्मीरमारमण'** नरपति कृष्णरायाच्या वेळीं विजयनगरांत राजाश्रय मिळून तेलगु साहित्यिकांचें तें मोठें केंद्र बनलें ! मराठी संस्थानिकांच्या मराठी–अभिमानी वृत्तीची याच्याशीं तुलना केली असतां कानडी आणि मराठी या दोन जनांच्या मनोवृत्तींमधील अंतर स्पष्टपणें लक्षांत येईल. मराठी सरदार व संस्थानिकांनीं जेथें ठाण मांडलें तेथें आपली भाषा रुजविली व पोसली ! या वृत्तांतावरून नर्मदेपासून कर्णाट सीमा कशा व कां मागें हटत गेल्या याची थोडीतरी कल्पना येईल असें वाटतें.

आर्यीकरणाच्या प्रारंभीं कर्णाटीयांनीं सर्व प्रकारच्या फेरफारांचें स्वागत केलें. तमिळांप्रमाणें ते तटून वागले नाहींत. पण नवीन सुधारणांच्या ओघांत आपण स्वत्त्व संपूर्ण गमवून बसतों ही जाणीव उत्पन्न होण्यास बारावें शतक उजाडावें लागलें. मध्यंतरीं त्यांनीं कांहींच विरोध केला नसेल असा याचा अर्थ नव्हे. पण बाराव्या शतकानंतर मात्र कानडी लोकांनीं कोणत्याहि फेरफारास अवसर द्यावयाचा नाहीं असा जणूं कांहीं चंग बांधला असें दिसतें. कर्णाटाला प्रगतीचा कटु अनुभव आल्यासारखें वाटून, तेथील जनांस सोलीव परंपराप्रेमास व रूढींस चिकटून राहाण्यांत आनंद वाटूं लागला. प्रतिक्रियेची अशीच लाट वीरशैव व माध्वांच्या कट्टर मनोवृत्तींत दिसून येते.

पण या पार्श्वभूमीचें नीट आकलन न झाल्यानें महाराष्ट्रभाषा व संस्कृति यांतील समस्यांचीं सरळ व समर्पक उत्तरें आजवर मिळालेलीं नाहींत. तुंगेपर्यंत, श्रवणबेळगोळपर्यंत महाराष्ट्राचा विस्तार होता अशी समजूत आहे. ही एकच समस्या घेतली तरी याचा खरा अर्थ काय हें न्यायमूर्ति रानडे किंवा लोकमान्य टिळक यांसारखे एक दोन अपवाद वगळले तर किती जणांना समजलें आहे याची शंका आहे. लोकमान्यांनीं गुर्लहोसूरच्या सुप्रसिद्ध व्याख्यानांत

आपण सर्व एक आहोंत असें कर्णाट बांधवांस सांगतेवेळीं, "आजचा महाराष्ट्र म्हणजे पूर्वीचा कर्णाट होय" असें म्हटल्याची आठवण कर्णाटकांत अजून ताजी आहे. आतां, कानडी लोकांचा विश्वास संपादण्यासाठीं लोकमान्यांचा हा एक राजकीय डाव होता असें विधान करून, लोकमान्यांवर आपण अन्यायानें अप्रामाणिकपणाचा आरोप लादीत आहोंत याची चाड नसलेले व असें करण्यांत आपलीच त्या प्रकारची मनोवृत्ति व्यक्त करणारे कांहीं लोक निघतीलहि. पण न्यायमूर्ति रानडे यांजवर तरी तशा प्रकारचे शिंतोडे उडविण्यास बिलकुल जागा नाहीं. "The mixture of two elements (Marathi & Dravidian) is best illustrated by the peculiarities of the (Marathi) Language whose base is Dravidian but whose structure has been entirely fashioned by Aryan influence." न्यायमूर्तींच्या या निर्णयावरहि कांहीं मंडळी असा प्रश्न विचारूं शकतील कीं त्यांनीं भाषाशास्त्रांत प्राविण्य कधीं मिळविलें? आपल्या नसलेल्या विषयांत मत देण्याचा त्यांना अधिकार काय?

भारतीय भाषांचा उद्गम व विकास यांचा अभ्यास व संशोधन करणें हाच ज्यांचा मुख्य व्यवसाय होता त्या डॉ. ग्रियर्सन यांचें मत तरी विचारार्ह होईल काय? Linguistic Survey of India या नांवाच्या प्रचंड ग्रंथाचे मुख्य संपादक या नात्यानें त्यांनीं आर्य व द्रविडवर्गीय भाषांचे एकमेकावर झालेले परिणाम व त्यांचा विस्तार वगैरेंविषयीं आपल्या ग्रंथांत विस्तृत चर्चा केली आहे. ते म्हणतात: When an Aryan tongue comes into contact with an uncivilised aboriginal one, it is invariably the latter which goes to the wall.The Aryan does not attempt to speak it, and the neccessities of intercourse compel the aboriginal to use broken pigeon form of the language of a superior civilisation. As generations pass, this mixed jargon more and more approximates to its model and in process of time the old aboriginal language is forgotten end dies a natural death...we can watch it in all stages of its progress.

वरील उताऱ्यांतील 'aboriginal' आणि 'uncivilised' हे दोन शब्द सोडले तर बाकी सर्व विचार शास्त्रीय आहेत असें भाषाशास्त्राच्या

दृष्टीनें आजहि म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. डॉ. ग्रियर्सनांच्या वेळीं सैंधव संस्कृतीचें उत्खनन झालेलें नव्हतें; शिवाय द्रविड संस्कृतीचा अभ्यासहि विशेष सुरू झाला नव्हता आणि म्हणूनच डॉ. ग्रियर्सनसारखे लोक वरीलप्रमाणें शब्दयोजना करीत असत.

आर्यवर्गीय भाषा प्रसरणशील आहेत. त्या जेथें जाऊन पाय रोवतात तेथून मागें हटत नाहींत. त्यांची विशेष वाढ झाली नाहीं तरी शतकानुशतकें त्या तगून तरी राहतातच. नीलगिरी, त्रावणकोर, मद्राससारख्या, महाराष्ट्राचा संबंध सर्व तऱ्हेनें तुटलेल्या प्रांतांत कधीं काळीं गेलेले मराठी भाषिक आजहि आपली भाषा मोडक्या तोडक्या स्वरूपांत का होईना पण टिकवून आहेत.

द्राविड भाषांविषयीं याच्या उलट प्रकार डॉ. ग्रियर्सन यांना सर्वत्र अनुभवास आलेला आहे. आर्यभाषावर्गीय प्रदेशांत सांपडलेल्या द्राविडवर्गीय भाषा कालांतरानें नाहींशा होतात याचा अर्थ द्राविडवर्गीयभाषिक लोक आर्यवर्गीय भाषा स्वीकारून आपली भाषा विसरतात असाच होतो ना? द्राविड भाषिकांतहि कानडी बोलणाऱ्यांविषयीं तर हा नियम शेंकडा ९९ इतक्या हिश्श्यांनीं खरा आहे. सातारा-कोल्हापूरकडील जैनलिंगायत घराण्यांत कानडी कसें लुप्त होत आहे हें या क्षणींहि पाहावयास मिळेल. वेवूर, मुधोळकर, गजेंद्रगडकर, बनहट्टी, विजापूरकर वगैरेंसारखीं अस्सल कानडी गांवांचीं आडनांवें घेतलेल्या घराण्यांना महाराष्ट्रांत गेल्यावर 'हे आम्हांसी कानडे' असें म्हणण्याची लौकरच पाळी येते.

कर्णाटांत हरिहर श्रवणबेळगोळपर्यंत मराठी भाषेचे पडसाद कानीं पडले तर त्याचा अर्थ काय करावयाचा? डॉ. ग्रियर्सन यांच्या सूत्राप्रमाणें मराठी भाषिक तेथपर्यंत पसरले होते, महाराष्ट्रांचा विस्तार तेथपर्यंत होऊं पहात होता असें म्हणावें लागतें.

डॉ. ग्रियर्सन हे आपल्या संशोधनांत ठाम अशा ठरलेल्या आपल्या सूत्राप्रमाणें, बलुचिस्तानकडील द्राविडवर्गीय अवशिष्ट ब्राहुई भाषेला ती तेथें उपरी आहे असें म्हणण्यास तयार नाहींत. द्राविडवर्गीय जन सिंध-पंजाबपर्यंतहि होते. आर्यांच्या प्रसारक वृत्तीमुळें द्राविडवर्गीय भाषा विदीर्ण होत. तळाशीं बुडी घेत घेत त्या तेथें ब्राहुईच्या रूपानें अवशिष्ट राहिल्या आहेत.

यावरून वऱ्हाटकडील चांदा भंडारा जिल्ह्यांत अजून जिवंत राहिलेले कुरुंब व होलेय यांची कानडी भाषा व नाशिक, खानदेशकडे नांवाचे कानडी राहिलेले हटकार गौळी (Kanadas) हे सर्व उपरे नसून (ब्राहुईप्रमाणेंच) त्या भागांतील मूळ जन असें म्हणणें क्रमप्राप्त ठरतें. मराठीच्या प्रचारांत तेथील कानडी विरून जातां जातां हे असें मागें राहिलेले अवशेष आहेत.

एकूण काय ?

जुन्या मराठी व कानडी भाषेचा तुलनात्मक अभ्यास केला तर त्यावरून या भाषा एके काळीं एकत्र वाढल्या असल्या पाहिजेत अशा निर्णयाला आपण येऊन ठेपतों. कानडींतील प्राकृतरूपें, मराठीच्या जन्मापूर्वीपासूनच या दोघांचा (कानडी व प्राकृताचा) निकटवर्ती संबंध होता हें दर्शवितात. मराठीचे मूळ जन व कानडीभाषिक मूळ जन हे परस्परांचे आनुवंशिकसंबंधी असावेत याचा निर्वाळा मराठींतील कानडी लकबी, नामपदें व धातु देतात.

कर्णाट व मरहट्टांतील मल्हारी, विठ्ठल वगैरे देवता व लोकांच्या चालीरीती वगैरे गोष्टी वरील भाषिक निर्णयास पाठिंबा देतात. चालुक्य राष्ट्रकूटादि कर्णाट-मरहट्टाचीं राजघराणीं आपला वंशवृक्ष यदु-तुर्वसूंपासून वाढल्याचें सांगतात. कानडे आणि मरहट्टे यांत "आनुवंशिक संबंध असावा" असा निर्णय देणारा पुरावा लक्षांत घेतां आपण यदुतुर्वसुवंशीय अशी या राजघराण्यांत असलेली श्रद्धा निराधार म्हणतां येणार नाहीं.

शिवाय पाली ग्रंथांवरून अंधकवृष्णि यादवांच्या कुळाची परंपरा आर्येतर असावी असें दिसून येतें. वेदांतील कांहीं भाग या तर्काला पोषक आहेत. याच अनुरोधानें इतिहासकाळांतील रिष्टिक-भोजकांची परंपराहि फार उद्‌बोधक ठरते.

आजच्या ज्ञात गोष्टी जमेस धरून मागें शोध घेत गेलें असतां जुळ्या भावंडांप्रमाणें दिसणारे हे कानडे व मराठे यांची पूर्वपरंपरा आपणांस रिष्टिक-भोजक व यदु-तुर्वसु अशा जोडनांवांच्या जनांपर्यंत नेऊन भिडविते.

वेदकाळीं आर्येतर द्रविडवर्गीय जन हे पंचनद देशांत होते या आधुनिक संशोधकांच्या निर्णयाच्या अनुसंधानांत, वेदांतील यदु-तुर्वशांच्या हालचाली,

मोहेंजोदारोसारखीं मोठीं शहरें वसवून वैभवांत असलेल्या पूरूचें दर्शन घडवितात. महाभारतांतील यदुजनांची कुटुंबपद्धति व रीतिरिवाज यांवरून ते आर्येतर असावेत असा दृढ तर्क करतां येईल. पाली ग्रंथांतील उल्लेख हा तर्क दृढतर करतात. प्राकृत भाषेंतील लकबींचा सरळ अर्थ लावण्यास त्या भाषेचे मूळ लोक आर्येतर असावेत असें समजल्याशिवाय गत्यंतर राहात नाहीं; आणि दक्षिणा-पथांतील राजघराणीं आपला संबंध यदुतुर्वसूंशीं जोडतात या घटनेमुळें वरील तर्क दृढतम होतो.

याप्रमाणें कोणत्याहि अंगानें विचार केला असतां तोच निर्णय ठाम होत असेल आणि महत्त्वाच्या बाबतींत एकमेकांचा ताळापडताळा एकमेकांना मिळत असेल तर त्या तर्कांत पुष्कळच तथ्यांश आहे असें म्हणणें फारसें वावगें होईल काय ?

★ ★ ★

सूचि

अक्कलकोट स्वामी १९०
आग्नि पूजा १५४, १५५
अडका १८३
अल्लम प्रभु १६४, १६५, १७१, १७३, १७६
अंडे (धनगर) हंडेवजीर ५६
अंधक-वृष्णि (धनगर) ५६
अंधस् (दूध, अन्न) ७२
अव्यक्त मनाचीं व्यक्त रूपें १६
आराध्य ब्राह्मण १२८
आरिय (मऱ्हाटे) १६, ६४, ८८, १०८, २०४
आर्यावर्त ४६, २०५
आर्यीकरण १६, ६०, ६३, २०२
इंद्र १४, ५७, ११३, १३३ ते १३८, १४४
इंद्रा-पर्वता १३७, १३८
उज्जयनी-काळेश्वर १२५, १७८
ऊर, ऊरा, ऊरु ३५
ऋषि व मुनि निराळे १३, १४
एल्लम्मा, यल्लम्मा पाहा.
कण्ण करण, कर्ण पाहा. १२५, १२६
२४, ६९, ७७, ७८
कण्ण-कण्ह भिन्न ७८, १२६
कण्णेश्वर, कळ् पाहा. १२६
कदळीबनीं जाणें १७१
कन्नड कानडी पाहा.
करण-कर्ण पाहा.
कर्ण २४, ६९, ७७, ७८, १२६
कर्णाट २४, २९, ३६, ३७, ५०, ६५, ६८ ते ८३, ९४, ९६, १००, १०१, १११, १३१, १३६, १४३, १४८, १४९, १९१, १९४, १९६ ते २१६
कर्णाट-राज्यलक्ष्मीरमारमण २१३
करुनाडु २२, १९८
कळ् रसार्थक शब्द १२५
कल्लेश्वर १२४ ते १२६
कानडी २१, २८, ३७, ४३, ४४, ४८, ७१, ७८, ८३, ८६ ते ८८, ९६ ते ११०, ११८, ११९, १२६, १६४, १७२, १९१, १९३, १९५ ते १९७, २०७
कानड गौळी ७८, ७९, १२३, १२४, २०५
कानफाटे (नाथ) १५०, १८४
कालेश्वर (महान्)=कल्लेश्वर १२५
काळ उज्जयनी १७८
कुटुंब द्राविडवर्गीय शब्द ७६
कुटुंब संस्था ६१, ६३

कुटुंबिन् ७६
कुडुवोक्कालिग ७६
कुणबी (मराठा) ७६
कुत्रा १५१, १५२, १९०
कोलमुंडा (जन) १४४
कोल्ल नांवाचीं गांवें १४४
कोल्हापूरदेवी १४४, १४२
खंडेनवमी १३१
खंडोबा १२९ ते १३५
खानदेश ७७ ते ८०, १२६, २०१
गण (समूह) १६६
गण (मरुतांचा) १६६
गणाराधना (वीरशैवांत) १६६
गंगवंश तुर्वसूंचा ७०
गंगवाडी गंगेंत घोडें न्हालें १९६
गुरु १५१, १५८–१६०, १६४-१९०
गुरुपादोदकप्रसाद १६५, १८३, १८७ ते १९१
गुंडम प्रभु १६७, १७२, १७३
गोकर्ण गोपराष्ट्र १२३, १२४
गोधन ४३, ७१
गोमटेश्वर १७०
गोरखनाथ १६१
गोवर्धनगिरी १३५
गोवा गोवाट १२३
गोविंद प्रभु १६७
गौड–पाटील ४७
गौड–बंगाल १४३, २१
चक्रधर १६७–१७४
चन्दला परमेश्वरी १४६
चन्द्र ११६–१२०, ८५, १४६, १४७
चंद्रात्मजरुद्र १०३
चन्द्रमस्–आर्य द्रविड शब्द ११६
चालुक्य ५१, १९८, १९९, २०८
चांग १२०, १२१
चेन् ११७ ते १२२ १४६–१४७
छान १४७
जगदंबा १४१, १४८
जंगम १६५
जाधव मराठे यादव ५६
जैन ९५, १५६, १६२, १६३, १६९, १७०, २१०, २१२
ज्ञानी–चांडालहि गुरु १५८, १८८
ज्ञानेश्वर १५०, १७४ ते १८४
ज्ञानेश्वरी १८, २०३, १८०
झाडमंडळ = झाडिमंडळ २८, २९, ३०, ३१
टेंबे महाराज १९०
तमिळ १२, २२, ४१, ८७, ११७, १३९
तिलंग = तेलंग (राग) ३१
तिबेट १४३
तिरमिड २२


तिरसष्ट १४
तुक्क–तुका १४५
तुरु गोसमुदाय ७१, ७२
तुरुकार–हट्टिकार ७२, १२४, २०४
तुर्क तुरुष्क, यवन ७२
तुर्व ७०
तुर्वश १३, १५, ५७, २१६
तुर्वसु ५७,६८ ते ७२, ८०
तेलगु ३९
तेलंगी ब्राह्मण २१
त्रिपष्टी पुरातन १४, १६६
त्रिपष्टि मरुत १६६
त्रिपष्टि शलाकापुरुष १४
त्रैपुरुष देवालयें १४१
त्र्यंबकेश्वर ५०, १२३
थुंकी झेलणें १८५–१८६
दन ४३, ७१
दनगार=धनगर ४३, ७२
दत्त १५०, १५१–१५३
दक्षिणापद=दक्षिणापथ २२, २४, ६९
२०५
दिवाळी–दसरा वाक्प्रचार १४३
देवगिरी यादव ५१, ६५, ८३, १०१, १०३, २०२
देवयानी ६१
देवव्रत १४, १५
देशस्थ ब्राम्हण ६४, ६५
देशास नांव येण्याच्या रीति १९, ३२, ३३, ४१–४५, ७७, ७८
देशी २३, ३८, ४८, ८१, ८९, २१२
द्रविड २२, ४९, ५६, ५७, ५८, ६१, ११
द्वारका (कुंतल) १९९
धन (गो) दन पाहा. ४३, ५५, ५६, ६०, ७१
धनगर हट्टिकार पाहा.
धनवडे २७, ५५
नट २४, ६९, ७४, ७६, १९९, २००, २०१
नागार्जुन १७२
नाट नट पाहा. २४
नाट्टन् ७७
नाडव ७४–७५
नाथ १६१–१८६
नान्यदेव (कर्णाट क्षत्रिय) ९३
नृसिंहसरस्वती १९०, १९४
नेपाळचें कर्णाट राजघराणें ९३
पंचाचार्य पक्ष १२८
पट्टण=पाटण=पाटणा ४५
पट्टि–हट्टीचें मूळ रूप ३८, ३९, ४५, ४२, ४३, ४४
पडु (धातु) पासून निष्पन्न शब्द ३९, ४५
पत्ति=पट्टि ४७, ५०, ५५, ५७, ६०

पत्तन = पट्टण ४७
पंप-कानडी महाकवि ९८, १३३, १४३, १९६
पवाड-पोवाडे १९६
पर्वत पूजा १३२, १३५
पशु वसु पाहा.
पाटिल गौड पाहा ४७
पाडा-पाडि ३४, ३५
पाडि वसतिस्थान, ३९
वाडि, गोठा ३९-४२
देश ३४
पारा = हारा, पाडा पाहा. ४५, ४६
पालु हालु पाहा. ३८
पुलि २०८
पुलिगेरे (ग्रामनाम) १७८
पुलिकेशी चालुक्य राजे २५, २०८
पुलिमायी सातवाहन राजे २०८
पुर-संस्कृति आर्येतरांची ५८, ५९, १३५, १२
पुरंदर १२, ५८
पुराणलेखनतंत्र ५८, ६१, ११४, १३४, १३५, १४०, १४४, १४७, १४८, १५२, १५७
पूरु = पुरु जन ५७, ५८, १३५, ११, १३
फकीर १७६
बंट नाडवजन ७५
बसव १६५, १६७
बौद्ध २०, १६१, १६२, १६४, १६९, १७२
ब्राहुई ४९, २१५
ब्राह्मण ५३, ६४ ते ६७, ११२, १३२-१३३, १५१ ते १६३, १६८, १६९, १८७
भक्तासारखा देव १२६
भोज भोजक ५९, ७३, ७७, ८०, २००, २०१
मंगळ १४५
मटची ४८
मणि (असुर) १४०
मध्वाचार्य १६९, १७०
मरहट्टे = मऱ्हाटे ५२ ते ६७, २७, ५० २८, ३१, १२३, १३६, १३७, १४३
मरहाट = मऱ्हाट = वऱ्हाट १८ ते २५ ३७
मराठीकरण कानडी शब्दांचें २७, २९, ३५, ४३, ७८
मराठे, २१, २८, ५३, ६७, ६९, १११, १२४, १३१, १३६, १३७, १३८, १९५, २०१, २०७, २१५
मर्कट कोण २३
मऱ्हाट-महाराष्ट्र शब्दाचें मूळ १८ ते ३१

मऱ्हाटी ११, १७ ते ३१, ९७, १००, १०२, ११०, १९५
मऱ्हाटे मराठे पाहा.
आर्यद्राविड ६०
आर्य नव्हे ५५–६३, ६९, ७३, ७४, ७७
मले = माळ = माड १३८
मल्ल–जन १३२
मल्लय्य मल्लजनांचा देव १३१
मल्लासुर १३५
महरट्ठ भारतीय प्राकृतांत नाहीं ३०
महानवमी–वाक्प्रचार १४३
महानुभाव १५१, १६७, १७४
महाराष्ट्र = कर्णाट १९७ ते २०१
महाराष्ट्र १७ ते ३१, ५०, ५१, ५३, ८२, ८६, ९५, १००, १२२, १२९, १३१, १३३, १३६, १४३, १४७, १४९, १५०, १६७, १७७, १८६, १९४, १९५, २१७
महाराष्ट्रीकरण २०२ ते २१५
महालसा–म्हाळसा १३०, १३८
महिष जन १४३–१४४
महिषासुर मर्दिनी १४४
मातुलकन्या विवाह ६३
मातृप्रधान कुटुंबपद्धति ६३, २०१
मामा–भाच्यांच्यामध्यें वैर कां ६०, ६१
मारवाडी (वाक्प्रचार) २१
मारुति शेन्दूर वर्ण कां १२२
माळ = माड, डोंगर, १३८
मुनि १३, १४
मुसलमान १७७, १७८
मूळमहाराष्ट्र = वऱ्हाट २४, २५, ३१
मृध्रवाचा १३, ८६
यतिसंप्रदाय अवैदिक १५१–१५८, १३, १४
यदु १२, १३, १६, २५, ५५, ५७–६२, ६८, ८५, २१६
ययाति ६१, १४
यल्लम्मा १४७–१४९
यादव यदुवंश गौळी ५५, ५७, ५८, ७०, ७२, १२, १३
योग व सांख्य अभिन्न १४
योगिनी १४, १८४
रट्टपाडि ३६, ५०
रड्डि–पाटिल-रट्ट, राष्ट्रिक ७६
रठिक ७४, ७५, २१, ३०
राट–रट्ट, राठोड जन २१, २११
राधाकृष्ण भक्ति १८४
रामदास १८६, १८९, १२२, ५०
रामानंद १८५
राष्ट्रकूट कानडी घराणें २१, ६९, ७०
राष्ट्रिक २२, ७३, ७७, २०२
रुद्र १११ ते १२२
रुद्रिय कोण १३४

लक्ष्मी श्रीदेवी १४६–१४७
लाट=लाड १९९, २००, २०९
लाट–कर्णाट संयुक्तदेश १९९
लिंग–कोलमुंडा भाषेंतील शब्द १२६, १२७
लिंगवन्त १२८,१५४-१६७,१६८,१४
वरहाट=वऱ्हाड=वराड २५–२८, ३१, ३७ ५०
वराळी राग ३२
वशा ७१
वसु (पशु) ७२, ७१
वसुवारस ४१
वाक्प्रचार २१, ८९, १११, १८५, १९६, १९७, २१२, १४
वाट=वाटि=वाडि; वाड ४२, ४५
वारकरी संप्रदाय १७४ ते १९४
विठ्ठल संप्रदाय १७४
विजापूर मराठीचें ठाणें २०४
वीरशैव लिंगवन्त पाहा. १६४–१६७, १६८, २११, १४
वेली परतविणें ६३
व्रजभाषा गौळियांची ४९, ९०, ९१, १६
शंकर=शेन्कर ११९
शंकराचार्य (आद्य) १५७
शनि (व्यक्तिनाम) १४५
शब्दसंकेत ५२
शब्दांची देवाण घेवाण ४८, १०७, ११९, १२७
शंवर इंद्रवैरी १४, १३८, १४६, १४७, १४८, १४९, १९६, १९७
शंभु–शेन्भु ११९
शाक्तसंप्रदाय ११४, १४५, १८४
शातवाहन २०७, १६, ५१
शिन्=शेन्=चेन्=केन् ११७
शिनीवाली १४६, १४७
शिव=रुद्र १११ ते १२२
शिवरात्र–शिनीवाली पूजा १४७
शुक्र व्यक्तिनाम, तुक्क १४५
शुभ–शुभ्र, (गौर वर्ण) आर्यांची दृष्टि १२१, १६४
शून्य बौद्धांची परिभाषा १८०
शेन्दुर–शिंन्दुर ११७
श्रवणबेळगोळ १०३, १७०, २१३
श्रीचक्रपूजा १४५
श्रीपर्वत श्रीशैल पाहा. १७१
श्रीपादश्रीवल्लभ १९०
श्रीशैल–पर्वतेश्वर १२३, १७१, १७२ ९४
संस्कृत कानडीची जननी ९६
संस्कृतीकरण–देश्य शब्दांचें २२, २९, ३९, ४७, ४८, ३१, ७६, १७४
सत्य (ज्ञान) माणुसकी आणते २०१
सन्धिविग्रही परराष्ट्र मंत्री ९९, २००

संन्यास पंथ १५३–१५८, २३, १४
सातवाहन = शातवाहन २०७–२०८
सात्वत (यादव) ५६
सांख्य १४
सिन्दुर = शिन्दुर ११७, १२२
स्त्रियांना धार्मिक स्वातंत्र्य १६६
सूर्य उपासना १३९–१४१
सेउणयादव देवगिरी यादव पाहा.
सेनराजे
बंगालांतील कर्णाट क्षत्रिय ९२
सोनारपुर २०४
सोमनाथ १७८
सौराष्ट्र १७८
हटगार–धनगर २७, ४३, ४८, ५०
५७, ६०, ७२
हट्ट–हाट शब्दव्युत्पत्ति ३७, ३८
हट्टि–पट्टि २८
हट्टिहब्ब–वसुबारसापासून ४१, १४२
हंडे वजीर–अंडे पांहा. ५६
हनुमान् कर्णाटांत १३२
हाटक देश = महाराष्ट्र २८, ५०, १२३
हाटकेश्वर १२३
हार = पार ४६
हारा = पारा = पाडा ४६
हाल, हाला ३५, १०८, ८९
हालु = पालु ३५
हिंदूराय सुरत्राण १९२
होयसळ यादव ५१, ६५, ९९, १०१



★ ★ ★

REFBK-0007746

भारतांतील प्रांतांची तरी एकमेकांस ओळख कोठें आहे ? त्या त्या प्रान्तांचें सांस्कृतिक कार्य, नवसर्जन आपणांस कोठें माहित आहे ? आन्तर भारती भारतीयांना एकमेकांची भक्तिप्रेमानें ओळख करून देईल. सेवा, संस्कृति, कला, उदारता, ज्ञान, विज्ञान—एक गंभीर अशी प्रवृत्ति आन्तर भारती निर्मू पाहील. राष्ट्रांचें महान् ऐक्य जीवनांत अनुभवण्याचे मंगल प्रयत्न होवोत. निरनिराळ्या थोर कल्पना प्रत्यक्षांत आणण्यासाठीं देशांतील सर्व प्रकारचे लोक एकत्र श्रमत आहेत असे देखावे राष्ट्रभर दिसूं लागले पाहिजेत. हिंदु—मुसलमान, स्पृश्य—अस्पृश्य सारे एकत्र येऊन नवनिर्मिति करताहेत; भिन्न भिन्न प्रांतीय लोकहि परस्परांस प्रेमानें भेटत आहेत, परस्परांच्या संस्था पाहात आहेत, मदत देत आहेत, त्यांतून स्फूर्ति घेत आहेत असें व्हायला हवें. भारतीय आत्म्याचें ऐक्य—संघ...त अनुभवायला विविध कर्मांची सहस्रतंत्री भारतभर वाजूं लागली पाहिजे. **—साने गुरुजी**